# ''पुणे जिल्ह्याच्या सामाजिक व सांस्कृतिक बदलामध्ये वाचन चळवळीचे योगदान: समाजशास्त्रीय अभ्यास''

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

**तात्विक व सामाजिक विद्याशाखांतर्गत 'समाजशास्त्र' विषयातील**
**विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला संशोधन प्रबंध**


**संशोधक**

**राजकुमार मुकुंदराव गांधले**

**(PRN -02115003746)**

**मार्गदर्शक**

**डॉ. माधवी रेणावीकर**

**संशोधन केंद्र**

**समाजशास्त्र विभाग,**

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे. ४११०३७**


**मार्च २०२१**

# CERTIFICATE BY THE GUIDE

Certified that the work incorporated in the Ph.D. Thesis captioned**"पुणे जिल्ह्याच्या सामाजिक व सांस्कृतिक बदलामध्ये वाचन चळवळीचे योगदान: समाजशास्त्रीय अभ्यास"** Submitted by **Mr. Rajkumar Mukundrao Gandhale** was carried out by the candidate under my supervision. The candidate has conducted a genuine work has completed all required course work of Ph.D. course and such materials as have been obtained from other sources have been duly acknowledged in the Ph.D. Thesis.

Date :**Dr. Madhavi Renavikar**
Place : Research Guide

# DECLARATION

Mr. Rajkumar Mukundrao Gandhale declare an oath that the references and literature that are used in my Ph.D captioned **"पुणे जिल्ह्याच्या सामाजिक व सांस्कृतिक बदलामध्ये वाचन चळवळीचे योगदान: समाजशास्त्रीय अभ्यास"** are form original sources and are acknowledge an appropriate places in thesis.

Further, I declare that I have not used this information for any purpose, other than my research.

Date : Mr. Rajkumar Gandhale

Place : Research Student

# ऋणनिर्देश

शिक्षणापासून स्वत: वंचित असतानाही माझ्यावर शिक्षणाच संस्कार करणाऱ्या आई वडिलांचा मी सर्वप्रथम ऋणी आहे. या यशाचे सर्व श्रेय त्यांनाच आहे.

पीएच. डी.च्या माझ्या मार्गदर्शक गुरुवर्य प्रा.डॉ. माधवीरेणावीकर यांच्यामुळेच माझे पीएच.डी.संशोधनाच`काम पूर्ण होऊ शकले. मी त्यांचा मनापासून आभारी आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे समाजशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. विशाल जाधव, मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ.संजय खरात तसेच गोखल इन्स्टिटयुटपुणे येथील समाजशास्त्र विभागाचेप्रमुख डॉ. प्रशांत बनसोडे, मॉडर्न महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. ज्योती गगनग्रास, प्रा. डॉ.सुधीर येवले, डॉ.बाळासाहेब सोनवणे, प्रा.किरण मांजरे, प्रा.धनंजय झोंबाडे, प्रा.राहूल बाराते, प्रा. मोतीलाल मोरे, डॉ.नारायण राजूरवार, ॲड. संग्राम संभाळे,प्रा. क्षिरसागर मधुकर, प्रा. गणपत परबत,प्रा. बब्रुवहान सुर्यवंशी, प्रा.सुरश शहापुरे यांच्या सहकार्या बद्दल मी त्यांचा आभारीआहे. तसेच दिगंबर मिसाळ व अभिजीत सोनावणे यांनी टंकलेखनाच सुबक व अचूक काम केलेत्यांच्या सहकार्याबद्दल मी आभारी आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील समाजशास्त्र विभागातील व पीएच.डी विभागातील सर्व अधिकारी व त्यांचा सहकार्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचा अत्यंत आभारीआहे.

सर्वेक्षणाच्या कामात मला सहकार्य करणारेअनेक मित्र आहेत. यामध्ये डॉ.रवीद्र मते, डॅा. राजेंद्रसरोदे, डॅा.विवेक घोटाळे,प्रा.जयश्री डंके, डॉ.जयश्रीखर्चे यांचेही मला बहुमोल सहकार्य मिळाले. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

डी.सी.एम.सोसायटीचे जनरलसेक्रेटरी मा.एम.डी.शेवाळे साहेब, अध्यक्ष मा.डी.टी.रजपूत साहेब, खजिनदार मा.विशालभाऊ शेवाळे साहेब, पर्यवेक्षक वसंत साळवे साहेब, तसेच आंबेडकर महाविद्यालयातील प्रा.सांगळे मॅडम, महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ.नरेश पोटे, डॉ.बाळासाहेब नामदेव सोनवणे, प्रा.रणजित देशमुख, प्रा.रत्नेशअग्रवाल, प्रा.प्रविणकांबळे, डॉ.मस्के सर, डॉ.तेजपाल कांबळे, प्रा.सहस्रबुद्धे मॅडम, डॉ.जयश्रीकांबळे, ओ.एस.श्री.भुजबळसर, श्री. अशोक नांगरे व शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद यासर्वांचे मला बहुमोलसहकार्य मिळाले, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

पीएच.डी.चे काम पूर्ण होण्यामागे माझी पत्नीआयु.ज्योती गांधले यांचा मोलाचा सहभाग आहे. माझी कन्या रिधमचा हीउल्लेख महत्त्वाचाआहे. माझे मेव्हणे रामचंद्र ससाणे व बहीण मिनाक्षी ससाणे यांच्या ऋणातराहणे मी पंसदकरेन.

माझ्या या पीएच.डी.पूर्ण होण्यामागे अनेक जणांचे सहकार्य लाभलेआहे.त्यातज्ञात अज्ञात सर्व सहकार्यांचे मी आभार मानतो.

(**राजकुमार मुकुंदराव गांधले**)

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| | प्रमाणपत्र | | II |
| | प्रतिज्ञापत्र | | III |
| | ऋणनिर्देश | | IV |
| | अनुक्रमणिका | | VI |
| **प्रकरण पहिले : प्रस्तावना** | | | **१–२८** |
| १.१ | प्रस्तावना | | २ |
| १.२ | वाचन चळवळीचा अर्थ | | ३ |
| १.३ | वाचन चळवळीचे महत्त्व | | ७ |
| १.४ | वाचन चळवळीची व्याप्ती | | १२ |
| १.५ | जागतिक पातळीवरील वाचन चळवळ | | १४ |
| १.६ | भारतामधील वाचनालय चळवळीचा विकास | | १७ |
| १.७ | महाराष्ट्रातील वाचन चळवळीचाआढावा | | १९ |
| १.८ | पुणे जिल्ह्यातील वाचन चळवळीचा आढावा | | २२ |
| १.९ | प्रकरणाचा आकृतीबंध | | २३ |
| १.१० | सारांश | | २५ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | | २७ |
| **प्रकरण दुसरे: संदर्भ साहित्याचा आढावा व सिद्धांत** | | | **२९–८३** |
| २.१ | प्रस्तावना | | ३० |
| २.२ | संशोधन साहित्याची उद्दिष्टे | | ३२ |
| २.३ | संशोधन साहित्याच्या आढाव्याचे महत्त्व | | ३३ |
| २.४ | सैद्धांतिक संकल्पनांची चौकट | | ३४ |
| २.५ | संदर्भ साहित्याचा आढावा | | ५२ |
| | २.५.१ | वसाहतवादी कालखंड | ५२ |
| | २.५.२ | उत्तर वसाहतवादी कालखंड | ५९ |
| | २.५.३ | संशोधन प्रबंध | ७६ |

| | | | |
|---|---|---|---|
| २.६ | पुर्नः संशोधनाची गरज | | ७८ |
| २.७ | सारांश | | ८० |
| | संदर्भ सूची | | ८१ |
| **प्रकरण तिसरे: संशोधन पद्धती** | | | **८४–९७** |
| ३.१ | प्रस्तावना | | ८५ |
| ३.२ | समस्या सूत्रण | | ८८ |
| ३.३ | संशोधन विषयाची व्याख्या, महत्त्व, हेतू व उद्देश | | ८८ |
| ३.४ | विषयाचे महत्त्व | | ८८ |
| ३.५ | संशोधनाची उद्दिष्टे | | ८९ |
| ३.६ | संशोधनाची गृहितके | | ८९ |
| ३.७ | संशोधन पद्धती | | ९० |
| ३.८ | नमुना निवड पद्धती | | ९१ |
| ३.९ | प्रश्नावली | | ९२ |
| ३.१० | तथ्य संकलन पद्धती | | ९३ |
| ३.११ | संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा | | ९४ |
| ३.१२ | सारांश | | ९७ |
| | संदर्भ सूची | | ९८ |
| **प्रकरण चौथे : तथ्यांचे संकलन व विश्लेषण** | | | **९९–२२३** |
| ४.१ | प्रस्तावना (क्षेत्रीय पाहणी) | | १०२ |
| ४.२ | वैयक्तिक माहिती | | १०४ |
| | ४.२.१ | वय | १०४ |
| | ४.२.२ | शिक्षण | १०५ |
| | ४.२.३ | लिंग | १०६ |
| | ४.२.४ | वाचन साहित्य | १०७ |
| | ४.२.५ | वाचनाचा उद्देश | १०८ |
| | ४.२.६ | वाचनालयाची नियमिता | १०९ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ४.२.७ | वाचनालयाची सुविधा | ११० |
| ४.३ | सामाजिक बदल | | १११ |
| | ४.३.१ | तक्ता क्र : १ जातीव्यवस्थेत झालेला बदल | ११२ |
| | ४.३.२ | तक्ता क्र : २ अंधश्रद्धेवर झालेला परिणाम | ११५ |
| | ४.३.३ | तक्ता क्र :३ स्त्रियांविषयक सामाजिक दृष्टीकोनात बदल | ११७ |
| | ४.३.४ | तक्ता क्र : ४ गुन्हेगारीवर झालेला बदल | १२० |
| | ४.३.५ | तक्ता क्र : ५ सामाजिक प्रश्नांची तीव्रता | १२२ |
| | ४.३.६ | तक्ता क्र : ६ दुर्बल घटक | १२५ |
| | ४.३.७ | तक्ता क्र : ७ साक्षरतेचे प्रमाण वाढले | १२६ |
| | ४.३.८ | तक्ता क्र : ८ पर्यावरण संवर्धन | १२७ |
| | ४.३.९ | तक्ता क्र : ९ लोकसंख्येवर झालेला परिणाम | १३० |
| | ४.३.१० | तक्ता क्र : १० स्वच्छतेविषयक जागृती | १३२ |
| | ४.३.११ | तक्ता क्र : ११ वैचारिक प्रबोधन | १३३ |
| | ४.३.१२ | तक्ता क्र : १२ आरोग्यविषयक दृष्टीकोन | १३७ |
| ४.४ | सांस्कृतिक बदल (क्षेत्रीय पाहणी) | | १३९ |
| | ४.४.१ | तक्ता क्र : १ उत्सव | १४० |
| | ४.४.२ | तक्ता क्र : २ सांस्कृतिक कार्यक्रम | १४३ |
| | ४.४.३ | तक्ता क्र : ३ राष्ट्रीय सण | १४६ |
| | ४.४.४ | तक्ता क्र : ४ कलह निवारण | १४८ |
| | ४.४.५ | तक्ता क्र : ५ आंतरजाती विवाह | १५० |
| | ४.४.६ | तक्ता क्र : ६ पारंपरिक रूढी, परंपरा | १५२ |
| | ४.४.७ | तक्ता क्र : ७ धर्मांचे प्रमाण | १५५ |
| | ४.४.८ | तक्ता क्र : ८ सहिष्णुतेचे प्रमाण | १५७ |
| ४.५ | आर्थिक बदल (क्षेत्रीय पाहणी) | | १६१ |
| | ४.५.१ | तक्ता क्र : १आर्थिक स्तर | १६१ |
| | ४.५.२ | तक्ता क्र : २ राहणीमानाचा दर्जा | १६३ |
| | ४.५.३ | तक्ता क्र : ३ दळणवळण सुविधा | १६५ |
| | ४.५.४ | तक्ता क्र : ४ प्रसारमाध्यमांचा वापर | १६७ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ४.५.५ | तक्ता क : ५ बचत प्रकार | **१६९** |
| | ४.५.६ | तक्ता क : ६ सरकारी योजना | **१७२** |
| | ४.५.७ | तक्ता क : ७ कुटीर उदयोग | **१७५** |
| | ४.५.८ | तक्ता क : ८ कृषी उदयोग | **१७७** |
| | ४.५.९ | तक्ता क : ९ आर्थिक उत्पादनाची साधने | **१७९** |
| ४.६ | राजकीय बदल (क्षेत्रीय पाहणी) | | **१८१** |
| | ४.६.१ | तक्ता क्र : १ राजकीय नेतृत्व | **१८१** |
| | ४.६.२ | तक्ता क्र : २ सामाजिक नेतृत्व | **१८३** |
| | ४.६.३ | तक्ता क्र : ३ महिलांचा राजकारणातील सहभाग | **१८६** |
| | ४.६.४ | तक्ता क्र : ४ समूह राजकीय नेतृत्व | **१८८** |
| | ४.६.५ | तक्ता क्र : ५ मतदार जागृती | **१९०** |
| | ४.६.६ | तक्ता क्र : ६ राजकीय समाजकारण | **१९२** |
| | ४.६.७ | तक्ता क्र : ७ राजकीय पक्षीय विचारसरणी | **१९४** |
| | ४.६.८ | तक्ता क्र : ८ जातीय राजकारण | **१९६** |
| | ४.६.९ | तक्ता क्र : ९ ग्रामपंचायत | **१९८** |
| | ४.६.१० | तक्ता क्र : १० राजकीय विविधता | **२००** |
| | ४.६.११ | तक्ता क्र : ११ राजकीय सलोखा | **२०१** |
| | ४.६.१२ | तक्ता क्र : १२ वाचन चळवळीमुळे झालेले परिवर्तन | **२०३** |
| ४.७ | तथ्य संकलन–सारांश | | **२०५** |
| ४.८ | व्यक्तीनिष्ठ व्यष्टीचे अध्ययन | | **२०८** |
| | **प्रकरण पाचवे : निष्कर्ष आणि शिफारशी** | | **२२९–२५७** |
| ५.१ | प्रस्तावना | | **२२९** |
| ५.२ | निष्कर्ष | | **२२९** |
| ५.३ | गृहितकाची पडताळणी | | **२४१** |
| ५.४ | शिफारशी | | **२४४** |
| ५.५ | संशोधनासाठी काही नवीन विषय | | **२४६** |
| | **परिशिष्टे** | | **२५३** |

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना


| | | |
|---|---|---|
| १.१ | प्रस्तावना | २ |
| १.२ | वाचन चळवळीचा अर्थ | ३ |
| १.३ | वाचन चळवळीचे महत्त्व | ७ |
| १.४ | वाचन चळवळीची व्याप्ती | १२ |
| १.५ | जागतिक पातळीवरील वाचन चळवळ | १४ |
| १.६ | भारतामधील वाचनालय चळवळीचा विकास | १७ |
| १.७ | महाराष्ट्रातील वाचन चळवळीचा आढावा | १९ |
| १.८ | पुणे जिल्ह्यातील वाचन चळवळीचा आढावा | २२ |
| १.९ | प्रकरणांचा आकृतीबंध | २३ |
| १.१० | सारांश | २५ |
| | संदर्भ सूची | २७ |

# प्रकरण पहिले
# प्रस्तावना

## १.१ प्रस्तावना :

केवळ मनुष्य प्राणी हा असा एकमेव आहे की, त्याला भाषेचे ज्ञान आहे. जो बोलू शकतो. प्रत्येकजण चांगल्या शब्दांसाठी भुकेलेला असतो. वाचन ही फार मोठी मोलाची संस्कृती आहे. गुरू होऊन शब्दच आपल्याला खूप काही शिकवून जातात. वाचनाने जशी भाषा समृद्ध होते, तसेच कलह निर्माण व्हायलाही वेळ लागत नाही. आपण दुसऱ्यांशी किती वेळा प्रेमाने बोललो, मनापासून बोललो हे आपणांस शेवटपर्यंत वाचनच शिकवते. कारण दुसऱ्यांशी चांगल्या शब्दांत बोलायला मन मोठे असावे लागते ही गोष्ट फक्त वाचनच रुजवू शकते. म्हणूनच म्हणतात की, शब्द हे शस्त्र आहे, ते जपूनच वापरावे ही बाब वाचन अधोरेखित करते.

समाजव्यवस्थेत नेहमी परिवर्तन होत असते. आदिम काळापासून ते आधुनिक काळापर्यंत समाजामध्ये अनेक बदल होत गेले. मानवाने आपले जीवन सुलभ बनविण्यासाठी नवनवीन गोष्टींचा शोध घेतला. ''आदिम काळामध्ये मानवाने झाडाच्या पानावर लेखन करण्याची कला अवगत केली. ही कला आज आधुनिक काळामध्ये संगणकीय छपाईपर्यंत येऊन ठेपली आहे. संगणकीय छपाईमुळे मानवाच्या विकासामध्ये महत्त्वाची भर पडली आहे.''[१]

वाचन चळवळीचा विकास एक महत्त्वाचा टप्पा आहे. कागद, शाई, छपाईची कला या गोष्टींचा शोध लागण्यापूर्वी ज्ञान व माहितीचे आदान प्रदान अत्यंत मंद गतीने होई. परंतु सर्वप्रथम चीनमध्ये कागद, छपाई या तंत्रांचा शोध लागला. अरब लोकांनी त्याचा विकास घडवून आणला आणि पुढे जाऊन पाश्चिमात्य देशांमध्ये छपाई व ग्रंथ निर्मितीचे तत्त्वज्ञान पूर्णत्वास पोहोचले. त्यामुळे ग्रंथ निर्मितीचा दर्जा तर वाढलाच. परंतु जे ग्रंथ पूर्वी दुर्मीळ होते, ते सहज सुलभ नव्हते, ते सर्व सुलभ झाले. त्याच्या किंमती कमी झाल्या. आपल्या इच्छेनुसार त्यांचा संग्रह करणे समाजातील सर्व घटकांना शक्य होत गेले. तंत्रज्ञानातील या विकासामुळेच ग्रंथ निर्मितीला वेग आला. पुस्तके मोठ्या संख्येने ग्रंथालयातून संग्रहित करणे शक्य झाले व त्यामुळे त्याचा लोकांना मोठ्या प्रमाणात फायदा झाला.

छपाई नंतरचा वैज्ञानिक प्रगतीचा पुढचा टप्पा म्हणजे संपर्क माध्यमांची प्रगती होय. ''ध्वनीफिती, चित्रफिती, तक्ते, स्लाईड्स इ. आधुनिक साधनांनी निरक्षर व नवसाक्षरांना त्यांच्या ज्ञानप्राप्तीच्या प्रयत्नात मोलाची मदत केली आहे.''[२] आधुनिक काळातील वाचन साहित्याच्या आधारे या सर्व साधनांचा व माध्यमांचा वापर करण्यात येत असून त्या योग्य सर्वसामान्य नागरिकांना त्वरित माहितीचे वितरण करणे, ही गोष्ट साध्य होऊ शकली आहे. त्यामुळे समाज शिक्षण व समाज परिवर्तन कार्यास गती मिळाली.

अशा प्रकारे विविध घटकांचा वाचनाच्या एकूण विकास प्रकियेमध्ये महत्त्वाचा सहभाग आहे. ''ज्ञानाच्या अभिलाषेपोटी वाचन चळवळ सुरू झाली. साक्षरता प्रसार, वैज्ञानिक क्रांती, समाजसुधारकांनी दिलेले प्रोत्साहन या सर्वांच्या सहयोगाने वाचन चळवळ विकसित झाली.''[३] त्यामुळे जगभर लोकशिक्षणाच्या कार्यात वाचन चळवळीने मोलाची कामगिरी केली आहे.

''वाचनाची तीन माध्यमे आहेत. माहिती माध्यमे, विचार माध्यमे आणि वैकल्पिक माध्यमे .''[४] माहिती माध्यमांमध्ये वृत्तपत्र, मासिके, रेडिओ, टी.व्ही. आणि इंटरनेट यांसारख्या माध्यम प्रकारांचा समावेश होतो. वैकल्पिक माध्यमांमध्ये विशिष्ट ध्येय आणि उद्दिष्ट घेऊन काम करणाऱ्या माध्यमांचा सहभाग असतो. कथा, कांदबऱ्या, ग्रंथ आणि कवितासंग्रह ही माध्यमे एक प्रकारे विचार माध्यम प्रकारात येतात.

## १.२ वाचन चळवळीचा अर्थ :–

वाचन चळवळीचा आढावा घेण्यापूर्वी, वाचन चळवळीच्या व्याख्या पाहणे गरजेचे आहे. कारण वाचन चळवळीचे पूर्ण स्वरूप या व्याख्याच्या आधारे स्पष्ट होते. ''वाचन चळवळ ही ग्रंथालयोचाच एक भाग आहे, त्यामुळे विविध संदर्भ ग्रंथामध्ये किंवा शब्दकोष, समाजविज्ञान कोषामध्ये वाचन चळवळीची स्वतंत्र अशी व्याख्या उपलब्ध नसल्याने वाचन चळवळीचा अभ्यास करण्यापूर्वी वाचनालयाच्या व्याख्यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.''[५] या गरजेपोटी ग्रंथालयाच्या व्याख्या सांगून त्याचे स्वरूप स्पष्ट करण्यात आले आहे. वाचन चळवळीच्या व्याख्या खालीलप्रमाणे देता येतील.

''समाजातील सर्व स्तरातील लोकांच्या आवश्यकतेनुसार पुस्तके दिली व त्यानुसार उपक्रम राबवून नवी माहिती, नवे ज्ञान पुरवण्याचे काम वाचनालये, ग्रंथालये करतात.''[६] अशा प्रकारे वाचनाचे महत्त्व विशद करताना ग्रंथालयांना नजरेआड करता येणार नाही.

युनेस्को या संस्थेने ग्रंथालय म्हणजे काय? हे नमूद करत असतानाच काही महत्त्वाचे मत मांडले आहे. त्याप्रमाणे की, ''बहुजन समाजातील सर्वसामान्य अशा सर्व लोकांना वाचनामुळे मनोरंजन, माहिती आणि नवे ज्ञान देण्यासाठी केलेली सार्वजनिक व्यवस्था म्हणजे ग्रंथालय होय.''[७] म्हणजेच मनोरंजन, माहिती व नवे ज्ञान विकसित करणारे ठिकाण किंवा घटक हा सार्वजनिक वाचनालय असल्याचे मत वरील व्याख्येत नोंदवले गेले आहे.

सार्वजनिक ग्रंथालयाची व्याख्या करताना प्रा. सुहास भोसले लिहितात की, ''सार्वजनिक ग्रंथालये म्हणजे सर्व नागरिकांमध्ये कोणताही भेदभाव न ठेवता मोफत ग्रंथालय सेवा पुरवणाऱ्या अत्यावश्यक संस्था होत. त्याचप्रमाणे समाजात घडणारे बदल, निरक्षरतेचे उच्चाटन आणि शिक्षणाचा प्रसार, आर्थिक आणि औद्योगिक विकास, सांस्कृतिक प्रगमनशीलता या गोष्टींचा परिपाक म्हणजे सार्वजनिक ग्रंथालय होय.''[८] म्हणजेच सार्वजनिक वाचनालय हे सर्वसामान्यांचे हक्काचे ठिकाण असायला हवे. जेथे समता असायला हवी. सोबतच नागरिकांना तेथे सद्यःस्थितीची वास्तवता लक्षात यावी, असे मत भोसले यांनी मांडले आहे.

वाचनामध्ये फार मोठे सामर्थ्य असते. वाचन माणसाला जोडते आणि तोडतेही, पण आपल्या शब्दाने व विचाराने जो मार्गदर्शन करतो तो महान असतो. वाचन मनुष्याच्या उन्हात सावलीसारखे असते. दुसऱ्याच्या मनावर फुंकर घालणारे असते. वाचन हे जगण्याची प्रेरणा व उर्मी देत असते.

वाचनामुळे विविध क्षेत्रामध्ये खूप मोठे परिवर्तन झाले आहे, हे नाकारता येणार नाही. अगदी आदिम समाजापासून पाहिल्यास पशुपक्ष्यांपासून मानवापर्यंत संवाद साधण्यासाठी कुठल्यातरी भाषा आणि माध्यमाचा उपयोग होत आलेला आहे. सुरुवातीच्या काळात असणारी सांकेतिक भाषा नंतर तोंडी भाषेच्या रूपाने समोर आली आणि तिचा विकास लेखी स्वरूपात झाला. म्हणून शिलालेख ताम्रपट यांचा आपणास उल्लेख करता येईल. तोंडी स्वरूपात असणारी माहिती काही काळापुरती समाजव्यवस्थेस हातभार लावत होती. परंतु लेखी स्वरूपात समोर आलेली माहिती वर्षानुवर्ष

समाजाच्या सर्वांगीण विकासामध्ये सक्रिय योगदान देताना दिसते आहे. ''शिलालेखापासून सुरुवात होऊन ताम्रपटावरील लेखन, झाडाच्या पानावरील लेखन आणि नंतर कागदावरचे लेखन सामाजिक विकास प्रक्रियेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावताना आपणास दिसते.[९] या लेखन चळवळीमुळे वाचन चळवळ विकसित होत गेली आणि वाचन चळवळीमुळे समाज विकसित होत गेला. या प्रक्रियेचाच एक भाग म्हणजे पुणे कार्यक्षेत्रात सर्वांगीण बदल वाचनामुळे झालेला दिसतो. वरील अभ्यासाचा विचार करण्यापूर्वी वाचन चळवळीचा ऐतिहासिक आढावा घेणे गरजेचे आहे. म्हणूनच, या पहिल्या प्रकरणामध्ये वाचन चळवळीचा आढावा खालीलप्रमाणे घेतला गेला आहे.

वाचन चळवळीचा आढावा घेताना समाजव्यवस्थेतील सर्व घटकामध्ये परिवर्तन आणण्यासाठी नवे ज्ञान देणे आवश्यक आहे. वाचनालयातून ज्ञानाचा पुरवठा केला जातो. बहुजन समाजातील सर्व सामान्य वाचन साहित्य उपलब्ध व्हावे व त्यातून त्यांचे मनोरंजन व्हावे नवीन माहिती व ज्ञान त्यांच्यापर्यत कोणताही भेदभाव न करता पोहचावे, हा ग्रंथालयाचा उद्‌देश आहे.

वाचनाचे दोन प्रकार आहेत. प्रगट वाचन आणि मूकवाचन हे दोन आहेत. पुढे त्या दोन प्रकाराचेही काही उपप्रकार आहेत.

१. **प्रगट वाचन**:– अक्षर ध्वनीच्या मोठ्या आवाजातील उच्चारणाला प्रगट वाचन म्हणतात.
२. **मूकवाचन** :– मूकवाचन ही संकल्पना संवेदनांवर आधारित आहे. प्रगट वाचनाचे दोन प्रकार आहेत.
३. **सस्वर वाचन** :– स्वत:च्या आकलनाने केलेले वाचन हे सस्वर वाचन असते.
४. **मूकवाचन** :– लिखित अथवा मुद्रित अक्षर रूप डोळयाने, मेंदूने अर्थग्रहण करणे याला मूकवाचन असे म्हणतात.

मूकवाचनाचे चार प्रकार आहेत.

१. **संदर्भ वाचन** :– संदर्भ पुस्तकांचे वाचन करणे.
२. **सखोल वाचन** :– एखाद्या ग्रंथाचे सखोल वाचन करणे.
३. **विस्तृत वाचन** :– काव्य, नाटक, मासिके यांचे वाचन करणे.
४. **गतिवाचन** :– योग्य गतीने वाचन करणे यास गतिवाचन म्हणतात.

ग्रंथालये निरक्षर लोकांना साक्षर करून शिक्षणाच्या प्रसारासोबतच समाज प्रबोधन औद्योगिक विकासामध्ये हातभार लावताना दिसतात. ''सर्व माहिती नवीन समाजाच्या विविध लोकांपर्यंत नेण्याचे काम करते आणि व्यक्तीला शहाणे बनवण्याचे काम करते.''[१०] समाजातील विविध बदल ग्रंथालयाच्या माध्यमातून होताना दिसतात. म्हणून नागरिकांना ग्रंथालयाच्या योजना उपलब्ध करून देण्याचे काम शासन करत आहे. एकंदरीत पाहता वाचन चळवळीचा विकास होत गेल्यामुळे वाचन चळवळ समाजाच्या विकासामध्ये मोठी मदत करत आहे. म्हणून वाचन चळवळ सामाजिक बदलातील एक महत्त्वाचा घटक असल्याचे वरील व्याख्येवरून लक्षात येते.

''भारतात २००१–२०११ च्या जनगणनेनुसार स्त्रियांमध्ये ६० टक्के तर पुरुषांमध्ये ४० टक्के मोठे निरक्षर जनतेचे प्रमाण असल्याने अनौपचारिक वाचन चळवळीचे महत्त्व आपणास नाकारता येणार नाही.''[११]

वाचनामुळे जनतेला माहितीपूरक पुस्तके, मनोरंजनपूरक पुस्तके, प्रेरणादायी पुस्तके आणि धार्मिक किंवा तत्त्वपूरक अभ्यासामुळे शाश्वत मूल्यांची ओळख होत असते, होताना दिसते. सुदृढ समाजाच्या निर्मितीसाठी माहिती आणि ज्ञानाबरोबरच मूल्यांची स्थापना करणे गरजेचे असल्याने वाचन चळवळ या दृष्टीने महत्त्वाची भूमिका निभावताना आपणास दिसते. ''समाजातील शिक्षण व संस्कृतीविषयक परिवर्तन वाचनातून होत असल्याने एकूणच समाजातील सर्व घटकांच्या बदलामध्ये वाचन चळवळीचे महत्त्व अनन्य साधारण आहे.[१२] आज एकही घटक वाचन चळवळीपासून अलिप्त दिसत नाही, म्हणून वाचन साहित्य आधुनिक युगात सुदृढ समाजासाठी महत्त्वाचे असल्याचे दिसते. हे महत्त्व ओळखून १९६७ मध्ये तत्कालीन सरकारने 'गाव तेथे वाचनालय' ही योजना अंमलात आणून वाचन चळवळीचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

## १.३ वाचन चळवळीचे महत्त्व :–

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये माहिती व ज्ञानाचा समाजामध्ये व्यापक प्रमाणात प्रसार करण्यासाठी ग्रंथालय चळवळीचे अनन्य साधारण महत्त्व आहे. ''समाजातील प्रत्येक मानव शिक्षणामुळे ज्ञानी बनत असतो. केवळ भौतिक विकासावर माणूस जगू शकत नाही.[१३] त्याला समाजाची, अध्यात्माची, धर्मांची, संस्कृतीची गरज असते. या सर्व गरजांची पूर्तता वाचनामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष होत असल्याने त्याचे महत्त्व दिसून येते. वाचन चळवळ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे यांच्या माध्यमातून समाजाला ज्ञान आणि माहिती देण्याचे काम करत आहे. समाजाला ज्ञानी बनवणे, हा समाजविकासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. समाजातील औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण हे अभ्यासातून होताना आपणास दिसते. वाचन चळवळीच्या माध्यमातून समाज ज्ञान संपादन करत असल्यामुळे वाचन चळवळ मोठ्या प्रमाणात हातभार लावत आहे.

अनौपचारिक शिक्षण पद्धतीमध्ये वाचकास स्वत: विविध ग्रंथ, मासिके आणि वर्तमापत्र वाचून स्वत:लाच ज्ञान प्राप्त करावे लागते. त्या दृष्टीने फक्त वाचन चळवळ खूप महत्त्वाची आहे. याच माध्यमातून लोकशिक्षण आणि समाजशिक्षण घेताना आपणास दिसत आहेत. लोकांमध्ये हे प्रत्येक माणसाला लिहिता किंवा वाचता आले पाहिजे, परंतु भारतीय समाज आजही मोठ्या प्रमाणावर निरक्षर असल्याने त्यांना छापील ज्ञान आत्मसात करता येत नाही. त्यामुळे उदा., रेडिओ, दूरदर्शन, टेपरेकॉर्डर, व्हिडिओ अशा विविध माध्यमांच्या आधारे लोकांना माहिती देण्याचे काम वाचन चळवळ करत आहे.

प्रत्येकाच्या आयुष्यात काही ना काही तरी समस्या असतात. दु:खाचे, अपेक्षाभंगाचे प्रसंग येतात. ताणतणाव असतात. मनाविरूद्ध काही घटना घडतात. अनेक प्रश्न असे असतात की, त्यांची उत्तरे सापडत नाहीत. कधीकधी अपघात, आजारपण अशी संकटे येतात. कधी कटू अनुभव येतात. मन सैरभैर होते. जवळची माणसे सोडून गेलेली असतात. मग आपले या जगात कोणी नाही असे वाटते. उदास, पोरकेवाटते. कधीकधी गैरसमज होऊन मनस्ताप होतो. अशा वेळी आधार देणारे, उभारी देणारे प्रेमळ वाचन एकदम जादू करते. त्याचा आधार वाटतो. जगण्याची इच्छा दृढ होते.

''आज आधुनिक काळात टू–जी, थ्री–जी किंवा फोर–जी अशा पद्धतीचे मोबाईल नव्याने येत आहेत. अगदी तशाच स्वरूपात विचारांच्या मैफली आणि वाचनाची पुस्तके बदलत आहेत. त्यामुळे साहित्याला नवा वाचक मिळत आहे.''[१४] वाचकाला समजेल, रुचेल, आवडेल, कळेल, उमजेल अशी पुस्तके तयार करणे, ही काळाची गरज आहे.

एक नीतीवान आणि समर्थ राष्ट्र उभारणीत छोटे मोठे योगदान देणारा जबाबदार नागरिक घडवायचा असेल तर केवळ 'माहिती संपन्न' असून चालणार नाही, तर 'ज्ञान संपन्न' करणारे बनवावे लागतील, यात तिळमात्र शंका नाही.''२१ वे शतक हे विज्ञान युगाचे आहे. त्यामुळे झालेल्या क्रांतीमुळे काळ अधिकच गतिमान झाला आहे. ज्ञानाच्या विविध क्षेत्रांची क्षितिजे प्रचंड वेगाने विस्तारत आहेत.''[१५] या काळासोबत धावताना मागे पडल्यास 'आऊट डेटेड' होण्याचा मोठा धोका समोर उभा आहे. हा धोका ओळखून तरुणांच्या हातात संस्काराचे मूल्य येणे आवश्यक आहे. हे मूल्य फक्त वाचनच निर्माण करू शकत.

मराठीचे प्रसिद्ध लेखक आणि ज्ञानपीठकार भा. नेमाडे म्हणतात, ''गुरे जशी चरता–चरता अधिक सकस चारा असणाऱ्या कुरणाकडे आपोआप जातात, अगदी त्या प्रमाणे वाचकही एकदा वाचायला लागला की तो आपोआप चांगल्या पुस्तकांकडे जाऊन पोहचतो.''[१६]

आजच्या पिढीचे वाचन नाही, असा सर्वसाधारण आक्षेप आज सर्रास घेतला जातो. कारण गेल्या पिढीने जो वेळ वाचताना, खेळात, गप्पांत, चर्चेत, व्यक्तिमत्त्व विकासात घालवला त्यापेक्षा दुप्पट वेळ आजची पिढी संगणकासमोर घालवत आहे. जेव्हा आपण एका संगणकापुढे डोळे करून बसतो, तेव्हाच आपण संपूर्ण जगाकडे पाठ करून बसलेलो असतो, असा साधा हिशोब या पिढीला केव्हा कळणार? एखादे रोपटे जेव्हा आपण जमिनीत लावतो, तेव्हा योग्य तेवढं पाणी, खत, सूर्यप्रकाश या गोष्टी योग्य वेळी मिळाल्या तरच ते रोपटे वाढते नि त्याचा वृक्ष होतो. पण आजच्या या गतिमान काळात सर्वांना कुंडीतली सदाफुली होण्याची अधिक घाई आहे. वाचनाने व ज्ञानाने समृद्ध असा वटवृक्ष व्हावे, असे कमी लोकांना वाटते.

आपल्या वयाचा विशिष्ट टप्पा गाठेपर्यंतचं आपण शाळा, कॉलेजात शिक्षण घेत असतो. पण शिकण्याच्या परिघाबाहेरचे असंख्य विषय हे अवांतर वाचनानेच समजतात. अगदी

लहानपणापासूनच वाचन संस्कृती मुलांमध्ये रुजवायला हवी. ज्ञानेश्वरांचे पसायदान, तुकोबांचे अभंग, ओव्या, मोरोपंताच्या आर्या या लहानपणी शिकल्या, तर त्याचे जिभेवर संस्कार होतात. शाळकरी वयात 'श्यामची आई' मनापासून वाचलेला मुलगा भविष्यात कधी चोरी करेल, असे मला अजिबात वाटत नाही. योग्य त्या वयात योग्य ते वाचन झाले तर त्याने माणसाची जडणघडण विचारी आणि संस्कारशील होते. मराठी साहित्याचा विचार केला असता ह.ना.आपटे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, नाथ माधव यांच्यापासून सुरू झालेला 'अक्षर संवाद' हा पुढे कुसुमाग्रज, पु.ल.देशपांडे, ग.दि.माडगूळकर व वसंत कानेटकर यांनी रंगविला. या साहित्यकांनी एक पिढीच घडविली, असे म्हटले जाते.

विश्वाचे भ्रमण करताना विवेकानंद पुस्तके वाचत होते. दिवस रात्र अभ्यास करणारे डॉ. भीमराव आंबेडकर, अंदमानच्या अंधाऱ्या कोठडीतसुद्धा कैद्यांना शिकवणारे सावरकर यांनी पुस्तकांशी मैत्री केली.

वाचनाचे महत्त्व व फायदे याविषयी भाष्य करताना कवी सुरेश पाचकवडे म्हणतात की,

''ग्रंथ साहित्याचे घर, ग्रंथ ज्ञानाचे आगर,
ग्रंथ सिद्धीचा पदर, ग्रंथ सर्जनाचा स्वर''[१७]

समाजात मोठ्या प्रमाणावर लेखकांचा वर्ग वाढत असताना वाचकवर्ग कमी होताना दिसतो आहे. संगणकामुळे संदर्भग्रंथ, विश्वकोष हाताळण्याची सवय कमी होताना दिसत आहे. त्यामुळे एकूणच इतिहास, राजकारण, साहित्य, नाटक, संगीत, कला व काव्य या संदर्भातील 'रसिकता' कमी होताना दिसत आहे. आजच्या तरुणांनी वाचनाने समृद्ध व्हावे. त्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रातील शिखरे पाहावीत. नाहीतर, त्यांना उद्या रस्त्यावरचे 'स्पीडब्रेकर्स'ही हिमालयाची शिखरे वाटतील.

रणजित देसाईंची 'श्रीमान योगी', सावंतांची कर्ण, व.पु.काळेंचा 'पार्टनर', पु.ल.देशपांडेचा 'हिरतात्या', ग.दि.माडगूळकरांचे 'गीत रामायण', जयंत दळवींचा 'नथुराम', वि.स.खांडेकरांचा 'ययाति', वसंत पोतदारांचा 'योद्धा संन्यासी' हे सगळे वाचन आजच्या तरुण पिढीने आपल्या पुढचे आदर्श ठेवायला हवेत. वाचनाच्या अभावाने दुर्दैवाने विचारमंथन, भाषणे, वर्कशाप आयोजित करून सभेला जाणारे वक्ते, जिज्ञासू श्रोते यांची संख्या कमी होत आहे.

मनुष्याच्या अंधकारमय जीवनात ज्ञानाचा दिवा हा प्रकाश देण्याचे काम करतो. आपण जीवन जगत असताना, जीवनातील संघर्षाला सामोरे जात असताना, जीवनातील चढ–उतार पाहत असताना आपण वाचायला शिकले पाहिजे. वाचायला शिकले तर आपणाला अनुभव मिळेल. आयुष्यामध्ये किती उन्हाळे, किती पावसाळे, किती हिवाळे पाहिलेत याच्यापेक्षा आपण किती वाचन केले? किती लिहिले? हे फार महत्त्वाचे आहे. वाचनामुळेच आपणाला व्यासंग होतो. यासाठी लिहायला आणि वाचायला शिकले पाहिजे. अगदी समर्थांनी म्हटल्याप्रमाणे, 'प्रत्येक दिवशी लेखन करावे, सातत्याने वाचावे प्रसंगी अखंडित वाचीत जावे' ही संस्कृती जर रुजली तर व्यासंगी, अभ्यासू, उच्च विद्याविभूषित लोक घडतील. याचा फायदा आपल्या समाजाला नक्कीच होईल.

'वाचाल तर वाचाल' ही म्हण फार पारंपरिक समाजापासून आपण ऐकत आलो आहोत. पण याचा अर्थ आपणाला कितपत समजला, हा संशोधनाचा प्रश्न आहे. कारण वाचनाकडे आपण किती लक्ष देतो? शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी इतर साहित्याकडे लक्ष दिले पाहिजे, त्यातून मुलांना चांगल्या सवयी सकारात्मक दृष्टीकोन, वस्तुस्थितीचे ज्ञान प्राप्त होईल.

सभोवताली आपल्याला जे जे दिसते ते ते वाचण्याचा आपण प्रामाणिक प्रयत्न केला, तर आपल्या जवळ ज्ञानाचा भरपूर ठेवा साठू शकेल. याच ज्ञानाचा फायदा आपल्याला समाजाबरोबर वैयक्तिक आयुष्यातही होत असतो. ही बाब नाकारता येत नाही. वाचनामुळे आपली जीवनपद्धती सुधारते. वाचन ही संस्कृती आहे, जे समाजात घडले आहे किंवा घडत आहे, ते आपल्या समोर ठेवते. आपण केवळ ते वाचण्याचे काम केले तरी आपल्या आवतीभोवती काय चालले आहे, याचा मागोवा घेता येतो. यातूनच आपणाला चांगले शिकता येते व इतरांनाही शिकवता येते.

वाचनाची सवय एकदा लागली की माणूस मनावरील ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात गुंतून जातो. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो. त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस आत्महत्या, हत्या असे प्रकार करण्यापासून प्ररावृत्त होतो. आजकालच्या तरुणांना खूप ताण असतो. त्या अनुंषगांने वाचन त्यांना मदत करू शकते.

सरतेशेवटी इतकेच वाटते की, ज्या महाराष्ट्राने नरहर कुरुंदकर, निर्मलकुमार फडकुले, राम शेवाळकर यांसारखे वक्ते पाहिले, त्याच महाराष्ट्रात कसबेंसारखे इतिहास संशोधक, जयंत

नारळीकरांसारखे शास्त्रज्ञ, सुरेश भटांसारखे गझलकार, वसंत कानेटकरांसारखे नाटककार घडावेत, यासाठी वाचन संस्कृती रुजविणे गरजेचे आहे.

वामन निंबाळकर म्हणतात की,

''शब्दांचे पसरून निखारे आग कधी लागत नसते
शब्दांनीच पेटतात घरे, दारे, देश आणि माणसेसुद्धा,
शब्द विझवतात आगही शब्दांनी पेटलेल्या माणसांची
शब्द नसते तर पडल्या नसत्या डोळ्यातून आगीच्या ठिणग्या,
वाहिले नसते आसवांचे महापूर
आले नसते जवळ कोणी,
गेले असते दूर-दूर''[१८]

## १.४ वाचन चळवळीची व्याप्ती :–

भारतासारख्या खंडप्राय व विकसनशील देशामध्ये समाजातील शेवटच्या घटकापर्यंत ज्ञान व माहिती पोहोचविणे हे औपचारिक शिक्षण पद्धतीने शक्य झाले आहे. देशातील शेवटच्या घटकापर्यंत ज्ञान पोहचविणे ही व्यापक संकल्पना असल्याने वाचन चळवळीचे क्षेत्र अत्याधिक विस्तृत असल्याचे आपणास दिसते. देशाच्या जडणघडणीमध्ये वाचन चळवळीचा मोठा वाटा असल्याने यात विविध योजना व उपक्रमांच्या माध्यमातून सर्व स्तराला उपलब्ध करून दिल्यामुळे वाचन चळवळीचे क्षेत्र दिवसेंदिवस अधिक विस्तारले आहे. भारत देशाच्या सीमा भौगोलिक दृष्टीने विखुरलेल्या आहेत. या देशामध्ये दारिद्र्याचे प्रमाणही मोठे असल्यामुळे सद्यस्थितीचे माहिती व ज्ञान समाजातील प्रत्येक घटकास देऊन जागृत करावयाचे झाल्याने वाचन चळवळीचे क्षितिज अधिक विस्तारलेले दिसते.

वाचन चळवळीच्या माध्यमातून मूल्यांचे ज्ञान समाजातील प्रत्येक घटकास उपलब्ध करून दिले जात असल्याने वाचन चळवळीची व्यापकता मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. समाजातील प्रत्येक घटकाशी संबधित वाचन चळवळ असल्याने विविध प्रकारचे ज्ञान समाजाला देणे चळवळीचे काम आहे.

आपण व्यायामशाळेत जातो. भरपूर व्यायाम करून चांगलं शरीर कमवितो. तसेच दररोज ग्रंथालयात जाऊन दररोज एक तास जरी वाचन केलं तरी आपल्या जवळ ज्ञानाचा मौल्यवान साठा साठू शकेल. हा साठा आपण अमृत म्हणून इतरांना दिला तरी समाजाच्या जडणघडणीमध्ये याचा आपणास उपयोग होऊ शकेल. कारण ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते. रोजच्या वर्तमानपत्रातून आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचा अंदाज आपणास मिळतो. जीवनात आपण किती ही संपत्ती, पद, पैसा मिळवला यापेक्षा आपण अभ्यास किती केला? आपले वाचन किती आहे? आपली वैचारिक पात्रता किती आहे? हे सगळयात महत्त्वाचे मानले जाते. विचार हे वाचनाने प्राप्त होतात. यासाठी वाचनाचा छंद आपणास जोपासता आला पाहिजे. चांगल्या आचार–विचारांमुळे आपण देशाच्या प्रगतीस हातभार लावू शकतो.

''तरूणांमध्ये वाचनाचे वेड, वाचनाची आवड तयार करावयाची असेल तर तसे वातावरण करणे गरजेचे आहे. वाचन कराल तेवढेच ज्ञान वाढत जाईल. ग्रंथ हे गुरू आहेत.''[१९] अलीकडच्या काळात आपल्या मोबाईल फोनवरसुद्धा विशिष्ट नंबर फिरवल्या बरोबर आजच्या घडीला जगातील

कानाकोपऱ्यात घडणाऱ्या घटनांची अद्यावत माहिती प्राप्त होते. जुन्या पिढीपाशी ही अद्ययावत साधने उपलब्ध नसल्यामुळे वाचनातून आपल्या ज्ञानाची भूक भागवत असत.जास्तीतजास्त वाचनातून ते आपली ज्ञान लालसा भागवत असत.

मात्र आज वाचनासाठी अनेक उत्तम साधने हातात उपलब्ध असूनही तरुणपिढी वाचनापासून दूर जात आहे. ती मोबाईलच्या आहारी जाऊन आणि इंटरनेटवर वेळ घालवत असल्याचे आजचे चित्र आहे. त्यांना वाचनासाठी वेळ उपलब्ध नसतो, असे कारण सांगितले जाते. नव्या माध्यमांच्या आगमनाने वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. तरुणांमध्ये साहित्याची आवड वाढावी म्हणून जनजागृती निर्माण करणे, ही काळाची गरज आहे.

लोकमान्यांनी 'तुम्हाला तुमचे व्यक्तिमत्त्व घडवायचे असेल तर वाचन करा,' असा संदेश दिला आहे. धावत्या युगाच्या बरोबरीने धावायचे असेल तर वाचन करा, असाही उपदेश त्यांनी दिला. मात्र आजच्या धकाधकीच्या जीवनात इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांच्या दुनियेत गुंतल्यामुळे त्यांच्या उपदेशाकडे नव्या पिढीचे लक्ष नाही. सखोल विचारांतूनच एकरूप समाज निर्मित होत असतो आणि सखोल विचार करण्याची सवय चांगल्या वाचनातूनच तयार होते.

पूर्वीच्या काळी वाचन हे विशिष्ट समाजातील आणि त्यातही फक्त पुरुषांशी संबंधित असल्याने माहिती व ज्ञान त्यांच्यापर्यंत पोहोचणे सहज शक्य होते. परंतु सामाजिक बदलांच्या माध्यमातून आणि विविध समाज सुधारकांच्या कार्यातून ही चौकट मोडून समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत ज्ञानाची दरवाजे उघडल्यामुळे विकास होणे सहज शक्य झाले. असे असतानाही आजही ज्ञान आणि माहिती यापासून मोठा समाज दूर आहे. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत ज्ञान व माहिती पुरवणे हे वाचन चळवळीचे काम असल्याने तिचे क्षेत्र अत्याधिक विस्तारीत झाले आहे. प्रस्तुत संशोधनाची मर्यादा पाहता या सर्व गोष्टींचा एकत्रित विचार करणे शक्य नसल्याने पुणे या कार्यक्षेत्रातील अभ्यास अशी मर्यादा घालून घेतली आहे.

## १.५ जागतिक पातळीवरील वाचन चळवळ :–

वाचन चळवळ केंद्रस्थानी घेऊन जगाचा विचार केल्यास असे लक्षात येते की, ''जगामध्ये वाचन प्रक्रियेपूर्वी छपाई प्रक्रिया अस्तित्वात आली. या छपाई प्रक्रियेचा उपयोग करून सुरुवातीच्या काळात धार्मिक ग्रंथाची निर्मिती करून धार्मिक ज्ञान लोकांपर्यत घेऊन जाण्याचे कार्य केले.''[२०] त्या काळी धार्मिक ग्रंथांना अनन्यसाधारण महत्त्व होते, त्यामुळे परंपरांचा प्रसार व नैतिकतेला अधिष्ठान मिळत गेले. त्यामुळे मानवी जीवनाच्या विकासामध्ये धार्मिक ग्रंथ महत्त्वाचे दिसून येतात.''७ व्या शतकामध्ये बुद्ध तत्त्वज्ञान लाकडी साच्यावर कोरून लोकांपर्यंत पोहोचवले गेले. अशाच प्रकाराचे एक गुंडाळी पत्र चीनमध्ये झीयान राजाच्या थडग्यामध्ये मिळाले. सर्वसाधारण पत्रे ६५० ते ६७० च्या काळात लाकडी ढाच्यावर छपाई केलेली मिळाली. अशाच प्रकारे छपाई केलेल्या कोरिया आणि जपानमध्ये ७०४ आणि ७५१ कालावधीतील प्रती इ. स. पूर्व १६६६ साली संशोधकांना मिळाल्या.''[२१]

''चीनमधील एका राजाने ७७० च्या आसपास अशाच प्रकारे छपाई केलेल्या एक लाख प्रती मागवून वाचकांसाठी पागोडयामध्ये ठेवण्यात आल्या होत्या. वाचन चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी 'साचेबद्ध छपाई' विकसित करून अधिक लोकांपर्यंत घेऊन जाण्यासाठी गुटेनबर्गने पेपरवरील छपाईचा शोध इ. स. १४२५ ला लावला.''[२२] सर्व प्रथम धार्मिक चित्र व खेळावयाचे पत्ते मोठ्याप्रमाणात छापण्यात आले. या छपाईचा दर्जा अधिक विकसित करून माहिती आणि ज्ञानाचा परदेशात जास्त विकास करण्यात येऊ लागला. इ. स.१४६९ ला इटली येथे प्रिटिंग प्रेस सुरू झाली, तर १५०० साली व्हेनिसमध्ये नंतर पॅरीस, मेक्सि, फिलीपाईन्समध्ये छपाई यंत्राचा उपयोग करून वाचन वर्ग निर्माण होत गेला.

जगात विशेषत: पाश्चिमात्य देशामध्ये जे थोर उदारमतवादी व पुरोगामी दृष्टीने थोर नेते होऊन गेले. त्यांनी शिक्षण व ज्ञानाचे महत्त्व ओळखले होते. अशा नेत्यांमध्ये औद्योगिक क्षेत्राचे अग्रणी, संसदपटू, शिक्षणतज्ज्ञ, राजकीय नेते आणि अनेक अशा लोकांनी वाचन करून आपल्या क्षेत्रात ते यशस्वी झाले होते. म्हणूनच समाजातील ज्या तळागाळातील वर्गाला ज्ञान मिळवण्याचे माध्यम उपलब्ध नव्हते, त्यांना शिक्षण संस्था, ग्रंथालये, इमारती, पैसा, पुस्तके इत्यादी साधने उपलब्ध करून देण्यासाठी या समाजहिताची कळकळ असलेल्या नेत्यांनी तळमळीने प्रयत्न केले. विशेषत:

पाश्चिमात्य देशामधील वाचन विकास अशा प्रयत्नांमधूनच झालेला आहे. कार्नेनी प्रतिष्ठान सारख्या दानशूर संस्थांनी इंग्लड, अमेरिकेतील ग्रंथालय चळवळीसाठी प्रचंड अर्थसाहय केल्याचे आपल्याला माहीत आहेच. या उदारमतवादी व सुसंस्कृत प्रवृतीमुळेच पाश्चिमात्य देशात लोक शिक्षणाचा पाया बळकट स्वरूपाचा घातला गेला आहे. आज त्या देशातील विशाल सार्वजनिक ग्रंथालये अत्यंत समृद्ध व संपन्न स्थितीत आपले ज्ञानदानाचे कार्य तन्मयतेने करीत आहेत, असे मोठे विलोभनीय दृश्य आहे.

''मध्ययुगापासून ते अठराव्या शतकापर्यंत युरोपवर धर्मांचा प्रभाव फार मोठ्याप्रमाणावर होता. ठिकठिकाणी अनेक धर्मस्थळे (चर्चेस्) प्रार्थना मंदिरे व देवस्थाने होती, तेथील धर्मगुरू व तत्सम लोक लेखन, वाचन हा उद्योग प्राधान्याने करीत असत.''[२३] साहजिकच या धार्मिक संस्थांमधून ग्रंथालये ग्रंथ संग्रह निर्माण झाले. आपल्याकडे जशा पोथ्या, जुनी हस्तलिखिते (शास्त्री, पुराणिक, पुजारी अशांसारखे) धार्मिक लोक जतन करून ठेवत असत, तसाच हा प्रकार होता. ख्रिश्चन धर्माच्या ज्ञानाच्या प्रसारासाठी काही संस्था किंवा मंडळे (मिशन्स) उदयास आलेली होती. या सुमारास समाजातील गरीब लोकांत ज्ञानप्रसार करण्यासाठी काही शैक्षणिक संस्थाचा उदय झाला होता. रविवारच्या शाळा तसेच दररोजच्या सायंकालीन व्याख्यानामधूनही धार्मिक विषयाप्रमाणेच इतर विषयाचीही माहिती दिली जात असे. या व्याख्यानाचे स्वरूप प्रवचनासारखेच असले तरी काळानुरूप त्यात जीवनावश्यक मुद्यांचाही परामर्श घेतला जाऊ लागला व त्याद्वारे लोकांना ज्ञान देण्यास सुरू झाले. एक प्रकारे बदलत्या परिस्थितीचे प्रतिबिंबच या उपदेशातून पडू लागले. या चळवळीमधूनच काही नियतकालिकांस प्रसिद्धी मिळाली.

औद्योगिक क्रांतीमुळे इंग्लडमधील जीवनात मूलगामी परिवर्तन सुरू झाले. दैववाद व धार्मिक प्रवृत्तीचा पगडा कमी होऊन या जगातील जीवन कसे सुखी व समृद्ध होईल, असा विचार सर्वत्र होऊ लागला. त्या अनुषंगाने विविध वस्तूंचे उत्पादन, विक्री, उद्योग व्यवसायाची वाढ होऊ लागली. समाजाची जुनी व्यवस्था व बैठक कालबाह्य होऊन एक नवा उद्योगप्रधान समाज निर्माण होऊ लागला. हा बदल फार महत्त्वाचा होता. कारण या स्थित्यंतरामुळेच इंग्लंडमध्ये नवनवीन ज्ञान, माहिती, नवे तंत्र याची गरज भासू लागली आणि गरज ही शोधाची जननी या न्यायाने नव्या ज्ञानाचा शोध सुरू झाला. विकासाला चालना मिळत गेली, माहीत झालेल्या नव्या गोष्टीचा प्रसार करण्यासाठी

पुस्तके, नियतकालिके यांची गरज वाढू लागली. लोक वाचायला लागले. यामुळेच समाजात ग्रंथ आणि ग्रंथालये यांची चळवळ वाढू लागली.

मनुष्यप्राण्याने निसर्गातील घटनाक्रम स्वत:चे प्रयत्न व बुद्धिकौशल्य त्यांच्या बळावर मिळवलेले यश ज्ञान यांची माहिती संग्रहित करण्यात आल्यामुळे ग्रंथालयाचा उदय झाला, असे मानले पाहिजे. अर्थात, आज आपल्याला ग्रंथालयाचे जे प्रगत स्वरूप दिसते तसे ते जुन्या काळी असणे शक्यच नव्हते. त्या काळातील साधने व पद्धती खूपच वेगळ्या होत्या. त्या प्राचीन काळी आपल्याला पहावयास मिळतात.

मातीच्या विटांवर लिहिलेली असिरिया वा बॉबीलोनीया देशांत आढळलेली पुस्तके, इजिप्तमध्ये शोधून काढलेला पॅपिरस नावाचा कागद, मध्यकालीन युरोपातील लाकडी फलक व तत्सम साधने, ताडाची पाने, रेशमी कापड, तांब्याच्या पट्टया किंवा ताम्रपट अशा भारतात आढळलेल्या वस्तू, यांचा वापर कधी काळी लिहिण्यासाठी केला जात असे. हाडे व कागद यांसारख्या चीनमध्ये वापरल्या जाणाऱ्या वस्तू, या वस्तूची निर्मिती करणे हे फार कष्टप्रद व खर्चाचे काम असे. साहजिकच अशा वस्तूंचा उपयोग करून त्यावर काही लिहून ठेवण्याचा उद्योग सत्तारूढ राजे, श्रीमंत, धार्मिक संस्था जसे धर्ममठ चर्चेस् यांच्याकडूनच होई. पुढे काळाच्या ओघात कागदाचा शोध लागला व युरोपमध्ये १५ व्या शतकात मुद्रणकलेचा प्रारंभ झाला. त्यामुळे पुस्तकनिर्मिती किंवा काही माहिती वा ज्ञान जतन करून ठेवणे हे सुलभ होत गेले. विशेषत: छपाईचा शोध लागल्यावर एकच पुस्तक अनेक प्रतीत तयार करणे शक्य झाले. आज आपण ज्या स्वरूपात पुस्तक पाहतो, त्याचा जन्म हा असा झाला.

युरोपमध्ये जी प्रबोधनाची व सुधारणेची चळवळ फोफावली, त्यामुळे तेथील लोकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडून आले. सनातन समजुती व श्रद्धांना तडे देऊन नवे संशोधक पुढे आले. त्यांनी मोठे शोधक व साहसी जलप्रवास केले. नवीन प्रदेश व भूखंडाचा शोध लावला व तेथील जनजीवनावर पुस्तके लिहून जगाला त्यांची ओळख करून दिली. सर्वत्र पुराणमतवादाचा त्याग करून बुद्धिवाद, प्रयत्नवाद, अभ्यास व संशोधन करण्याची जणू लाट आली, ही परिस्थिती ग्रंथ निर्मितीला अतिशय पोषक ठरली. शिक्षणाचा व पर्यायाने लोकशाही मूल्यांचा प्रसार वाढला त्यातून ग्रंथालयाचा उदय झाला. समाज परिवर्तनाच्या चळवळीमुळे उदारमतवादी शिक्षणाचा प्रसार झाला. व्यक्ती

स्वातंत्र्याच्या कल्पनेला पुष्टी मिळाली. या साऱ्या परिवर्तनामधून कालांतराने सामान्य जनतेसाठी वाचनालये अस्तित्वात आली.

वाचन चळवळ जागतिक स्तरावर सामाजिक बदलामध्ये महत्त्वाची ठरत असताना भारतामध्येही वाचन चळवळीमुळे मोठ्या प्रमाणात सर्वच स्तरामध्ये परिवर्तन होताना दिसते. वाचन चळवळ खऱ्या अर्थाने इंग्रज राजवटीमध्ये रुजल्याची दिसते. रूढीप्राय काळापासून समाज प्रबोधनासाठी अशा प्रकारे ज्ञानाचा प्रसार होताना दिसतो.

## १.६ भारतामधील वाचनालय चळवळीचा विकास:–

वाचनामुळे माणसाच्या बुद्धीचा विकास होतो व स्वतः तो स्वयं प्रकाशित होऊन लोकांना तो मार्गदर्शन करतो. त्याचप्रमाणे जगाच्या परिपूर्णतेसाठी वाचन हे आवश्यक आहे. मानवाला माणूसपण देण्याचे काम हे वाचन साहित्य करत असतो.

पुस्तकांमधील समृद्ध विचारांचा आपल्या जीवनावर चांगला प्रभाव पडतो. आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन कायमचा बदलून जातो. पुस्तक हे केवळ शब्दसंपदा वाढवण्यास मदत करणारे साधन नसून हे अनुभवांसह कल्पनाचे आशा–आकांक्षाचे क्षितिज निर्माण करणारे साधन आहे. पुस्तक हे आपणाला सकारात्मक विचार करायला प्रवृत्त करतात. पुस्तकांचे महत्त्व तरुणांना पटले पाहिजे.

वाचन संस्कृतीची काळजी घेणे आवश्यक आहे. वाचल्यामुळे मानव प्रगल्भ होतो. नियमित वाचन केले तरच भावी पिढी सक्षम व सुजाण होईल. तरुणपिढीने पुस्तक वाचन हा छंद जोपासला पाहिजे. ''साक्षर तरुणांपैकी ६१ टक्के त्यांनी साध्य केलेल्या उद्दिष्टांबाबत समाधानी आहेत. मात्र वाचनाचा छंद असलेल्या तरुणांमध्ये समाधानाचे प्रमाण ७० टक्के, तर कमी वाचन करणाऱ्यांमध्ये हेच प्रमाण ५८ टक्के आहे.''[२४]

वाचनामुळे लिखाण करण्यास मदत होते. विचार करण्यास प्रेरणा मिळते. माणसातील विवेक–बुद्धी विकसित होते त्यामुळे इतरांच्या दु:खाची जाणीव होते.

प्राचीन काळापासून भारत देशाला ज्ञानाचा व संस्कृतीचा संपन्न वारसा लाभलेला आहे. प्राचीन तसेच मध्ययुगीन काळातही, ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या सामाजिक संस्था होत्या आणि त्या सोबत अनेक ठिकाणी चांगली ग्रंथालयेही अस्तित्वात होती. या देशातील काही राजे व शासक यांनी ग्रंथ संग्रह करण्याची चांगली कामगिरी केलेली आहे.

प्राचीन भारतात अयोध्या, काशी, कांची, उदंतपुरी, गुजशीला, तक्षशीला, नालंदा अशी अनेक विद्यापीठे होती. यामध्ये हिंदू, जैन व बौद्ध धर्माचार्यांनी असंख्य हस्तलिखितांचे जतन केले होते व तेथे वादविवाद, परिसंवाद चर्चा होत असत. मध्ययुगात अनेक मोगल शासकांनीही आपल्या राज्यात 'किताबखाने' सांभाळले होते. जैनुल अबिदीन (१४२०–१४७०) या काश्मिरी सुलतानाने आपल्या राज्यात शिक्षणसंस्था व त्यांना जोडून ग्रंथसंग्रह करविला होता, असा उल्लेख आढळतो. मोगल आक्रमकांमार्फत कागद बनविण्याची कला काश्मिरी कारागिरांनी शिकून घेतली होती व ते कागदनिर्मिती करीत होते, असा इतिहास आहे. यांखेरीज साऱ्या आशिया खंडात प्रसिद्ध असलेले तामिळनाडू राज्यातील तंजावार येथील महाराजा सरफोजी सरस्वती महाल ग्रंथालय, त्याचप्रमाणे पाटणा येथील सुप्रसिद्ध खुदाबक्ष लायब्ररी अशी अनेक ग्रंथालये मध्ययुगीन भारतात निर्माण झाली होती.

''ख्रिश्चन मिशनऱ्यांनी सोळाव्या शतकात लेखन वाचनाचा प्रसार केला तसेच मुद्रण अस्तित्वात आल्यानंतर ग्रंथसंग्रह करण्याकडे कल वाढत गेला. अडयार मॅन्युस्क्रिप्टस लायब्ररी (मद्रास), ओरीएंटल लायब्ररी (म्हैसूर), ओरीएंटल रिसर्च इंन्टिट्युट लायब्ररी (बडोदा) तसेच पुणे येथील भांडारकर ग्रंथालय यांसारख्या नावाजलेल्या ग्रंथालयाची सुरुवात अव्वल इंग्रजी काळातच झाली.''[२५] आधुनिक काळात भारतात ग्रंथालयाचा उदय खऱ्या अर्थाने इंग्रजी अमदानीतच झाला. ब्रिटिशांनी परंपरागत शिक्षणव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणले. छपाई व पुस्तके निर्माण करण्यास पाठिंबा दिला. त्यानुसार शहरात प्रथम स्थापन झाली.

वाचनामुळे सामान्य जनतेपर्यंत ज्ञान पोहोचल्याने लोकांना समाजव्यवस्था समजू लागली. यातूनच क्रांतीची बीजे पेरली गेली. जागतिक पातळीवरील क्रांती आणि विचारवंतांकडे भारतीय समाज आकर्षित होऊन स्वतंत्रता, समता व बंधुतेची मागणी करू लागला. भारतामध्ये आर्थिक विषमतेसोबतच जातीय विषमता मोठ्या प्रमाणात असल्यामुळे समतेचा विचार आणि साक्षरता समाजामध्ये क्रांती घडवून आणत होता. वर्षांनुवर्ष असलेली गुलामगिरी झुगारून माणूस म्हणून जगण्याचा प्रयत्न समाजसुधारकांच्या माध्यमातून केला जाऊ लागला. संत ज्ञानेश्वर यांनी पसायदान लिहून सामाजिक समतेचा विचार मांडला. हाच विचार संत कबीरांच्या विद्रोहात दिसून येतो. कबीर म्हणतात,

''कबीरा खडा बाजार में मांगे सबकी खैर।
ना काहो से दोसती ना काहो से वैर।।''[२६]

भारतामध्ये वाचन चळवळ अधिक विकसित होताना महाराष्ट्रामध्ये महात्मा फुले व इतर समाजसुधारकांपर्यंत येऊन पोहोचते. समाजसुधारकांनी सामाजिक प्रबोधनासाठी ओव्या, अभंग, कविता, भारूड, कीर्तन अशा प्रकारे ज्ञानाचा प्रसार करणे, हे या माध्यमांचे काम होते.

## १.७ महाराष्ट्रातील वाचन चळवळीचा आढावा :–

मराठीतील सुविख्यात साहित्यकार विंदा करंदीकर यांनी म्हटल्याप्रमाणे की,

''पुस्तक पंढरी, तुम्हाला भेटते
सार्थक करिते जीवनाचे
विज्ञान विठोबा, कला रूकमाई
भेटते दोघेही, तुम्हा येते,
प्रत्येक पुस्तक प्रसाद मानून
घेतात ते धन्य इहलोकी''[२७]

महाराष्ट्र ही भूमी संतांची, समाजसुधारकांची प्रबोधन व परिवर्तनाची असल्याने सामाजिक, बदल हे मोठ्या प्रमाणात पूर्वीपासून झालेले दिसतात. या बदलांमध्ये वाचन चळवळीचे मोठे योगदान आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

पारंपरिक समाजामध्ये साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प, नगण्य होते. एका विशिष्ट वर्गाची मक्तेदारी ज्ञानावर होती. साक्षरता व वाचन साहित्य याची उपलब्धता अतिउच्चभ्रू जसे राजे, महाराजे, राजकुमार यांच्यासाठीच होते. धार्मिकतेचा पगडा हा ऐकीव पसरविलेल्या गोष्टींवरून असल्यामुळे सामान्य लोक खऱ्या ज्ञानापासून वंचित होते. तोंडीसाहित्य निर्मितीमुळे बऱ्याच वेळा समाजामध्ये प्रबोधन करणारा त्यांच्या मर्जीप्रमाणे किंवा स्वार्थासाठी मूळ संकल्पनेमध्ये बदल करून लोकांना सांगत असत. लिखित साहित्याची लोकांना पडताळणी करता येत नव्हती. समाजामध्ये धर्मप्रसारकांनी जे सांगितलेले नियम आहेत, ते प्रमाण असत. त्यामुळेच त्यातून अनेक चालीरिती, रूढी, परंपरा समाजात निर्माण झाल्या.

रूढी, परंपरा, लोकनीती, चालीरिती, नियमने तोंडी असल्यामुळे जसेच्या तसे समाजाकडे हस्तांतरीत होत नव्हती. कारण लोक हे अज्ञानी असल्यामुळे लोक त्या तोंडी माहितीला प्रमाण मानत होते. लोकांमधील वास्तव ज्ञानाच्या अभावामुळे मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा व कर्मकांड वाढत गेला, बुद्धिवाद नाहीसा होत गेला, खोट्या गोष्टीला अनन्य साधारण महत्त्व आले व हेच खोटे ज्ञान समाजाचे प्रमाण बनले.

ज्ञान हा मानवाचा तिसरा डोळा आहे. हे तत्कालीन समाजसुधारकांनी ओळखून समाजामध्ये विचारांच्या प्रबोधनास सुरुवात झाली. महाराष्ट्राची आर्थिक राजधानी बॉम्बे आहे, तर पुण्याला शिक्षणाचे माहेर घर म्हणून ओळखले जाऊ लागले. याच पुण्यामध्ये कर्मकांड, अन्याय, अत्याचाराचा अतिरेक झाल्याचे इतिहास सांगतो. पुरोगामी अभ्यासकांनी अज्ञान आणि अन्याय अत्याचारापासून समाजाला बाहेर काढण्यास सुरवात केली. ज्यामुळे खऱ्या अर्थाने सामाजिक परिवर्तनास सुरुवात झाली. लोक शिक्षण घेऊ लागले, शहराकडे येऊ लागले, ज्यामुळे ते ज्ञानी बनले व आपण अज्ञानी का होतो हे लक्षात आले. उदा., संत ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, नामदेव यांनी लोकप्रबोधनातून मुहूर्तमेढ रोवली. अंधश्रद्धेच्या बाबतीत तुकाराम महाराज म्हणतात, ‘नवसे होती पुत्र तर का करावा लागे दूध पती.’ अशा पद्धतीने तुकाराम महाराजांनी समाजाचे प्रबोधन केले.

महाराष्ट्रातील ही प्रबोधन व अतिज्ञानाची चळवळ पुढे घेऊन जाताना महात्मा फुलेंनी १८४८ मध्ये पहिली मुलींची शाळा सुरू केली आणि ‘अविद्येमुळे एवढे सारे अनर्थ झाले’, असे सांगताना ते अभंगामध्ये म्हणतात, ‘‘विद्येविना मती गेली। मती विना निती गेली। नीती विना गती गेली। गती विना वित्त गेले। वित्ता विना शुद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले।’’

प्रबोधनाची ही चळवळ पुढे घेऊन जाताना संत गाडगेबाबांनी चालते बोलते विद्यापीठ सुरू केले. हातामध्ये झाडू घेऊन खऱ्या अर्थाने समाजाची डोळे उघडणी केली. ते म्हणतात, ‘‘माय बापा हो देव हा माणसात पहा. समाजातील अंधश्रद्धा आणि अज्ञान दूर करण्यासाठी त्यांनी प्रबोधनाचे माध्यम म्हणून कीर्तनातून लोकांना संदेश दिला. शिक्षणातून प्रबोधन होऊ शकते, हे ओळखून त्यांनी समाजाच्या प्रबोधनाबरोबरच शाळाही सुरू केल्या. गाडगेमहाराज म्हणतात, मला एक छोटेसे मडके होऊन मोत्यासारखे दिसावे वाटते. ही परंपरा बी. आर. आंबेडकरांनी चालवलेली आपणास दिसते. महर्षी कर्वे, आगरकर, लोकमान्य टिळक, न्या. रानडे, राजर्षी शाहू महाराज आणि इतर समाजसुधारकांनी वाचन चळवळीच्या माध्यमातून प्रबोधन केले. याला आणखी पुढे घेऊन जाताना महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी ‘गाव तेथे वाचनालय’ ही योजना राबवून समाजामध्ये शैक्षणिक विकास घडवण्याचे काम केल्याचे दिसून येते.

एकंदरीत पाहता महाराष्ट्रामध्ये वाचन चळवळीची मुळे खोलवर रुजली असल्याने वाचन चळवळीचा मोठा विकास झाला आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्याची प्रगती झाली आहे. शेवटी, सुविख्यात साहित्यिक मंगेश पाडगावकर असे म्हणतात की,

‘‘ग्रंथ आमुचे साथी, ग्रंथ आमुच्या हाती
ग्रंथ उजळती अज्ञानाच्या अंधाराच्या राती,
ग्रंथाच्या तेजामधूनी जन्मा येते क्रांती
ग्रंथ शिकविती माणुसकी अन् ग्रंथ शिकविती शांती.’’[२८]

## १.८ पुणे कार्यक्षेत्रातील वाचनाचा आढावा :–

पुणे जिल्हा हा महाराष्ट्रातच नव्हे, तर देशाच्या वाचन चळवळीचे केंद्र आहे, असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. पुणे जिल्ह्याला प्रबोधन आणि परिवर्तनाची फार जुनी व विस्तृत परंपरा आहे. परंतु, खऱ्या अर्थाने इंग्रजी शिक्षण आणि ख्रिस्ती मिशनऱ्याच्या कार्याने नवशिक्षित व सुधारणाभिमुख मध्यमवर्गाचा उदय १८ व्या शतकात झाला. सुधाणावादी चळवळ व राष्ट्रवादाचा उदय अशा घटनांमुळे पुणे जिल्ह्यातील सामाजिक जीवन ढवळून निघाले होते. सामाजिक प्रबोधनाचा उदय, पुणे नेटिव जनरल लायब्ररीच्या (पुणे नगर वाचन मंदीर) उद्याने झाला. ज्योतिष, वेद, धर्मशास्त्र यांसारखे विषय शिकवण्याकरीता पुणे येथे विश्रामबागवाड्यात एक महाविद्यालय उघडण्यात आले. पुढे १९३९ साली पुण्यामध्येच मराठी व इंग्रजी शाळा उघडण्यात आल्या. यातून गोपाळ हरी देशमुख, सदाशिवराव गोवंडे, विष्णू मोरेश्वर भिडे यांसारखी मंडळी उदयास आली.

१८४८ साली महात्मा फुलेंनी मुलींसाठीची स्वतंत्र शाळा चालू करून परिवर्तनाची मुहूर्तमेढ रोवली. इ.स. १८४७ ला रेसकोर्स, तर १८४८ साली पुना नेटीव जनरल लायब्ररी व ज्ञानप्रकाश हे दैनिक सुरू झाले. लोकहितवादी याच सुमारास शतपत्रे प्रभाकर या दैनिकमधून छापू लागले. १८५१ मध्ये महात्मा फुल्यांनी आण्णासाहेब चिपळूणकरांच्या वाड्यात दुसरी शाळा अस्पृश्यांसाठी सुरू केली. पुढे १८५१ ला रास्ता पेठेत, १८५२ ला वेताळ पेठेत शाळा सुरू करून पुण्यामध्ये शिक्षणाची चळवळ उभी केली. त्याचबरोबर, विचार मंथन म्हणून दीनबंधू नावाचे पत्रक प्रकाशित केले.

''सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनात पुणे विद्यापीठाचा मोलाचा वाटा आहे. इ.स. १९४९ साली पुणे विद्यापीठाची स्थापना झाली आणि शिक्षणाचे शैक्षणिक वातावरण सर्वत्र पसरले.''[२९] त्यानंतर पुण्यामध्ये आकाशवाणी, दूरदर्शन केंद्रे स्थापन होऊन पुण्याचे औद्योगिकीकरण प्रचंड वेगाने होत गेले. ज्यामध्ये वाचन चळवळीचे मोठे योगदान आहे.

वाचन चळवळ केंद्रस्थानी ठेवून पुणे जिल्ह्याचे वाचन चळवळीमध्ये मोठे योगदान आहे. पुणे शहरास आज विद्येचे माहेरघर म्हणून जसे ओळखले जाते. तसेच पुणे शहरास सांस्कृतिक शहर म्हणूनही ओळखले जाते. पुणे जिल्ह्यातील 'ओतूर' या गावी पहिला आंतरजातीय विवाह लोखंडे यांनी घडवून आणला आणि सामाजिक बदलास प्रोत्साहन दिले. एवढेच नव्हे, तर त्यांनी नाभिकांचा संप घडवून आणला. सोबतच जनमाणसांमध्ये हक्क आणि कर्तव्याची भावना निर्माण केली.

महात्मा फुले यांनी प्रसूती केंद्र स्थापन करून विधवांना आपल्या बाळास जन्म देण्यासाठी हक्काचे ठिकाण उपलब्ध करून दिले होते. एवढेच नव्हे, तर विधवा कौशिबाईच्या मुलास यशवंतास हक्क देऊन मोठी सामाजिक क्रांती घडवून आणली होती. म्हणून पुण्यातील वातावरण चिघळले होते. याच दरम्यान विधवा पुनर्विवाहाचे समर्थन न करता प्रत्यक्ष महर्षी कर्वे यांनी विधवेशी विवाह केल्यामुळे सामाजिक बदलास मोठा हातभार लागला होता.

अशा प्रकारे पुणे जिल्ह्यामध्ये विचार मंथनाचे स्थित्यंतरे होताना दिसतात. वाचन चळवळीने सर्व विचारधारांच्या चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना, अभ्यासक, विचारवंत, लेखक, संपादक, पत्रकार बनवले म्हणून वाचन चळवळीचे योगदान मोलाचे आहे. पंचवार्षिक योजनेमुळे देशभर ग्रंथालये व माहिती केंद्र यांची मोठी साखळी निर्माण झाली. वाचन चळवळीस प्रेरणा किंवा उत्तेजन देण्यासाठी लोककवी इंद्रजित भालेराव म्हणतात की,

''ग्रंथांनी ठेविली संस्कृती जिवंत
म्हणूनिया ग्रंथ नित्य घ्यावे,
ग्रंथ खरिदावे, ग्रंथ उरी घ्यावे,
ग्रंथ भेट द्यावे, वेळोवेळी''[३०]

## १.९ प्रकरणांचा आकृतीबंध आराखडा

**पहिल्या प्रकरणामध्ये –** वाचन चळवळीचा आढावा, प्रस्तावना, अर्थ व व्याख्या, वाचन चळवळीचे महत्त्व, वाचन चळवळीची व्याप्ती, जागतिक पातळीवरील वाचनालयाची पार्श्वभूमी, भारतातील वाचनालय चळवळीचा आढावा, महाराष्ट्रातील वाचनालय चळवळीचा इतिहास वाचनालयाची पाहणी, सारांश.

**दुसऱ्या प्रकरणामध्ये –** साहित्य परीक्षण, सैद्धांतिक संकल्पनांची चौकट, प्रास्ताविक, अभ्यासाची उद्दिष्ट्ये, संशोधनाचे महत्त्व, सिद्धांत कल्पना, साहित्याचा आढावा, वसाहतवादी कालखंड व उत्तर वसाहतवादी कालखंड, सारांश.

**तिसऱ्या प्रकरणामध्ये –**सामाजिक संशोधन पती, प्रस्तावना, समस्या सुत्रण, संशोधन विषयाची व्याख्या, व्याप्ती महत्त्व हेतू व मर्यादा, संशोधनाची उद्दिष्ट्ये, संशोधनाची गृहीतके, संशोधन पद्धती, नमुना निवड पद्धती, नमुना निवडीचे महत्त्व, संशोधनाची साधने, प्रश्नावली, प्रश्नावलीची पद्धत, सारांश

**चौथ्या प्रकरणामध्ये –** तथ्यांचे संकलन व विश्लेषण, **सामाजिक बदल (क्षेत्रीय पाहणी)** प्रस्तावना, वाचनामुळे झालेल्या परिवर्तन, जाती व्यवस्थेत झालेला बदल, अंधश्रद्धेवर झालेला परिणाम, स्त्रियांविषयक सामाजिक बदल, गुन्हेगारीवर झालेला बदल, सामाजिक प्रश्नांची तीव्रता, दुर्बल घटक, साक्षरतेचे प्रमाण वाढले, पर्यावरण संवर्धन, लोकसंख्येवर झालेला परिणाम, स्वच्छतेविषयक जागृती, वैचारिक प्रबोधन, आरोग्यविषयक दृष्टीकोन, सांस्कृतिक बदल (क्षेत्रीय पाहणी), उत्सव सांस्कृतिक कार्यक्रम, राष्ट्रीय सण, कलह निवारण, आंतर जाती विवाह, पारंपरिक रूढी परंपरा, धर्मांचे प्रमाण, सहिष्णुतेचे प्रमाण, **आर्थिक बदल (क्षेत्रीय पाहणी)** आर्थिक स्तर, राहणीमानाचा दर्जा, दळणवळण सुविधा, प्रसारमाध्यमांचा वापर, बचत प्रकार, सरकारी योजना, कुटीर उद्योग, कृषी उद्योग, आर्थिक उत्पादनाची साधने, **राजकीय बदल (क्षेत्रीय पाहणी)** राजकीय नेतृत्व सामाजिक नेतृत्व, महिलांचा राजकारणातील सहभाग, समूह राजकीय नेतृत्व, मतदार जागृती, राजकीय समाजकारण, राजकीय पक्षीय विचारसरणी, जातीय राजकारण, ग्रामपंचायत, राजकीय विविधता, राजकीय सलोखा, वाचन चळवळीमुळे झालेले परिवर्तन, तथ्यसंकलन – सारांश, **व्यक्तीनिष्ठ व्यष्टीचे अध्ययन**

**पाचव्या प्रकरणामध्ये**– निष्कर्ष, शिफारशी.

## १.१० सारांश :–

वाचनही एक कला आहे. प्रेरणा, जिद्द, आत्मविश्वास, संयम, शांती, समाधान, मूल्यशिक्षण, प्रेम, करूणा, जिव्हाळा व आनंद प्राप्तीचे केंद्र म्हणून वाचनाकडे बघितले जात आहे. संपूर्ण व्यक्तिमत्त्व निर्माण होण्यामध्ये वाचन फारच आवश्यक आहे. आकलनासह केलेले ध्वनी उच्चारण म्हणजे वाचन होय. वाचनाने वाणीवर संस्कार होतो. त्यामुळे वाचनाची चळवळ केवळ भारतातच नव्हे, तर जगभर त्या त्या कालखंडात विकसित होत गेली आहे. वाचन, लेखन, चिंतन आणि प्रबोधनाची महाराष्ट्राला एक मोठी परंपरा लाभली आहे.

वर्तमानकाळ हा फार गतिमान आहे. विज्ञानामुळे माणसाच्या जगण्याला नवा आकार आला आहे. याचाच परिणाम होऊन आज वाचनाची माध्यमे अधिक विकसित झाली आहेत. नव्याने सकस व कसदार वाचन त्यातून घडत आहे. सोशल नेटवर्किंगमुळे एकीकडे लिहिणारे, तर दुसरीकडे वाचणारेही वाढत आहेत. त्यामुळे वाचनाचा प्रसार आणि प्रचार मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. अनेक नवनवीन प्रतिभावंत तरुण लेखक व समीक्षक म्हणून उदयाला येत आहेत. सोबतच तरुण कवीनीं आपल्या वाटणीतील कविता मांडून समाजाचे लक्ष वेधून घेतले आहे. हा वाचनाच्या चळवळीचा फायदा झाला.

पुण्यासारख्या शहरात शिक्षणाच्या निमित्ताने येणाऱ्यांची संख्या फार मोठी आहे. मात्र या शहरातील व शैक्षणिक चळवळीने शिक्षणासाठी येणाऱ्या लोकांना नेहमीच आकर्षित केले आहे. आजचा तरुण चांगल्या वाचनाकडे वळतो आणि वाचनातून किंवा चिंतनातून आपली घुसमट, मत, विचार, साचलेपण अभिव्यक्त करतो व तो अभ्यासक म्हणून नावारूपाला येतो. तो वेगवेगळया माध्यमातून अभिव्यक्त होतो. समाजाच्या व्यथा, वेदना, समस्या, प्रश्न मांडतो. यासाठी कथा, कादंबरी, कविता, नाटक, एकांकिका, लघुपट, ब्लॉग, फेसबुक, व्हॉट्सॲप अशा वेगवेगळ्या प्रकाराची मदत घेतो. विचारवंत, राजकारणी, लेखक, कवी, अभिनेते, वक्ते, प्राध्यापक, संपादक, प्रशासकीय अधिकारी, शास्त्रज्ञ, शाहीर, कलावंत असे आहेत की, ज्यांचा विकास झाला, जे नावारूपाला आले . त्यांच्या जडणघडणीमध्ये पुण्याचा वाटा आहे, ही महत्त्वाची बाब आहे.

पुणे जिल्ह्यातील वाचन चळवळीचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे अनेक विचार प्रवाहातील किंवा विचारधारेतील चळवळी, संघटना, संस्था, प्रतिष्ठान, सामाजिक मंडळे, संमेलने अशा विविध बाबींतून पुणे जिल्ह्यातून नेहमीच वाचन व लेखन चळवळीस प्रेरणा, प्रोत्साहन व बळ मिळाले आहे.

वाचन चळवळीचा जागतिक आणि भारतातील प्रवास हा सकारात्मकच आहे. सोबतच महाराष्ट्रातसुद्धा वाचन चळवळीची परंपरा इतिहास निर्माण करणारी राहिली आहे. आज वाचन चळवळ खेड्या–पाड्यात, वाड्या–वस्त्यात पोहचली आहे. अनेक उपक्रम, विविध संस्था, कॉलेज, विद्यापीठे यासाठी पुढाकार घेत आहेत. 'गाव तेथे ग्रंथालय' हा उपक्रम शासनस्तरावर राबविला जात आहे. त्यामुळे वाचन चळवळीस पोषक वातावरण मिळत आहे. एकूणच काय तर वाचन चळवळ मोठ्या प्रमाणावर गतिमान होत आहे. त्यासाठी विविध उपक्रम सहायक ठरत आहेत. वाचन चळवळीच्या प्रसार आणि प्रचारासाठी समाजातील विविध स्तरांतून सामूहिक प्रयत्न होत आहेत.

आजच्या धावत्या व गतिमान काळात अनेक उपक्रम समाजात वाचन चळवळ राबवत आहे. त्यापैकीच कॉलेज व युनिवर्सिटी स्तरावर वाचन शिबिरे व कार्यशाळा आणि लेखक तुमच्या भेटीला असे स्तुत्य कार्यक्रम घेतले जात आहेत. त्याचबरोबर वाचनाच्या प्रसारासाठी विविध पुरस्कार, स्पर्धा, निबंध, वक्तृत्व, काव्य, वाद–विवाद, संवाद, चर्चासत्र या माध्यमांतून वाटचाल सुरू आहे. अनेक थोरामोठयाची उदाहरणे, चरित्रे व मुलाखतीच्याद्वारे समाजातील मोठ्या समूहाला वाचन चळवळीचे महत्त्व कळणे गरजेचे आहे. म्हणून पुढील प्रकरणामध्ये संशोधकाने संदर्भ साहित्याचा आढावा व सैद्धांतिक संकल्पनात्मक चौकटीच्या माध्यमातून घेतला आला आहे.

## संदर्भ सूची :–


१. बिपीनचंद्र घ.; १९९८, आधुनिक भारत व मानवी इतिहास – के. सागर प्रकाशन, पुणे. पृ.१८६.

२. विधाते सुलभा. ;२००१ माहिती संप्रेषण व तंत्रज्ञान – महाराष्ट्र शासन सरकारी मुद्रणालय, पुणे, पृ. १९.

३. भिडे व पाटील ; १९८२,महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास – देशमुख व कंपनी प्रकाशन, पुणे, पृ. ७९.

४. विधाते सुलभा. ;२००१. माहिती संप्रेषण व तंत्रज्ञान – महाराष्ट्र शासन सरकारी मुद्रणालय, पुणे, पृ. ३६.

५. मराठे श्याम ; १९८७, आकर्षण आणि व्यक्तिमत्त्व विकास – इंद्रायणी साहित्य प्रकाशन, रत्नागिरी, पृ. ६८.

६. उपरोक्त, पृ. ८३.

७. उपरोक्त, पृ. ८७.

८. राजभोसले सुहास. ;१९८९, आम्हा कोण म्हणोनि काय पुसता? – राजे प्रकाशन, नागपूर, पृ.२३.

९. बिपीनचंद्र १. ; १९९८, आधुनिक भारत व मानवी इतिहास – के सागर प्रकाशन,पुणे पृ.७२

१०. गोर्ल शिवराज. ;२००२, बदला तुमच भविष्य – कॉन्टिनेन्टल प्रकाशन, मुंबई, पृ. ६४

११. लोखंडे धनंजय. ; २०११,समाज प्रबोधन व लोकसंख्या शिक्षण – पुणे विद्यापीठ मुद्रणालय, पृ. ०८

१२. लोकराज्य मासिक ; जानेवारी २०१, साहित्य संमेलन विशेष – माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, पृ.१७.

१३. लोखंडे धनंजय. ;२०११, समाज प्रबोधन व लोकसंख्या शिक्षण – पुणे विद्यापीठ मुद्रणालय, पृ. ११

१४. विधाते सुलभा. ;२००१ माहिती संप्रेषण व तंत्रज्ञान –महाराष्ट्र शासन सरकारी मुद्रणालय, पुणे, पृ. ४१.

१५. उपरोक्त, पुणे, पृ. ५३.

१६. लोकराज्य मासिक ; २०१,साहित्य संमेलन विशेष – माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, पृ.५५.

१७. संदीप मगदूम ; २०१७,पासवर्ड सूत्रसंचालनाचा – वेदांतराजे प्रकाशन, कोल्हापूर पृ. ९८.

१८. उपरोक्त, पृ. १५.

१९. प्रकाश बुरूटे ;२००१, बहर व्यक्तिमत्वाचा – कॉन्टिनेन्टल प्रकाशन, मुंबई, पृ. ४३.

२०. रंजन कोळंबे ;२००१, विज्ञान आणि तंत्रज्ञान – के. सागर प्रकाशन, पुणे. पृ.११.

२१. ए.वाय.कोंडेकर ;१९९८, अश्मयुगीन इतिहास व बदल – प्रगती प्रकाशन, पुणे, पृ.९६.

२२. उपरोक्त, पृ. १०७.

२३. जयसिंगराव पवार ;१९९९, आधुनिक भारताचा इतिहास – डायमंड प्रकाशन, पुणे पृ.८४.

२४. धनंजय लोखंडे ;२०११, समाज प्रबोधन व लोकसंख्या शिक्षण – पुणे विद्यापीठ मुद्रणालय पृ.१३.

२५. जयसिंगराव पवार ;१९९९, आधुनिक भारताचा इतिहास – डायमंड प्रकाशन पुणे, पृ.९३.

२६. श्यामसुदरदास ;१९८८, कबीर ग्रंथावली – वाणी प्रकाशन, नवी दिल्ली, पृ.५९.

२७. संदीप मगदूम ;२०१७, पासवर्ड सूत्रसंचालनाचा – वेदांतराजे प्रकाशन, कोल्हापूर पृ. ९७.

२८. उपरोक्त, पृ.९७.

२९. धनंजय लोखंडे ;२०११, समाज प्रबोधन व लोकसंख्या शिक्षण – पुणे विद्यापीठ मुद्रणालय, पृ.१४.

३०. संदीप मगदूम ;२०१७, पासवर्ड सूत्रसंचालनाचा – वेदांतराजे प्रकाशन, कोल्हापूर पृ. ९

# प्रकरण दुसरे

# सिद्धांत व संदर्भ साहित्याचा आढावा


| | | | |
|---|---|---|---|
| २.१ | प्रस्तावना | | ३० |
| २.२ | संशोधन साहित्याची उद्दिष्ट्ये | | ३२ |
| २.३ | संशोधन साहित्याच्या आढाव्याचे महत्त्व | | ३३ |
| २.४ | सैद्धांतिक संकल्पनांची चौकट | | ३४ |
| २.५ | संदर्भ साहित्याचा आढावा | | ५२ |
| | २.५.१ | वसाहतवादी कालखंड | ५२ |
| | २.५.२ | उत्तर वसाहतवादी कालखंड | ५९ |
| | २.५.३ | संशोधन प्रबंध | ७६ |
| २.६ | पुनर्संशोधनाची गरज | | ७८ |
| २.७ | सारांश | | ८० |
| | संदर्भ सूची | | ८१ |

# प्रकरण दुसरे

# सिद्धांत व संदर्भ साहित्याचा आढावा

## २.१ प्रास्ताविक

प्रस्तुत संशोधनात वसाहतवादी काळ व उत्तर वसाहतवादी कालखंडातील साहित्याचा वाचन संस्कृतीचे योगदान संशोधकाने साहित्याचे परीक्षण करताना मांडले आहे. संशोधन विषयाच्या संबंधात जे महत्त्वपूर्ण ज्ञान उपलब्ध आहे. त्याचा सारांश देणे व त्या विषयात उपलब्ध असलेल्या ज्ञानाचा आधार महत्त्वाचा आहे. उपलब्ध असलेला ज्ञानाचा नवीन परिस्थितीमधील बदललेला अर्थ विशद करण्यासाठी संबंधित विषयाचा पाया भक्कम करणे. म्हणजे संबंधित साहित्याचा आढावा घेणे होय. हे महत्त्वपूर्ण ज्ञान संशोधन विषयाच्या सबंधातील विविध ग्रंथामध्ये, लेखात उपलब्ध असते. त्यातील योग्य त्या घटकांचे वाचन, चिंतन व उपयोजन म्हणजेच संबंधित साहित्याचा आढावा होय.

ज्या व्यक्ती आपल्या विचारांना चालना देत नाहीत, त्यांच्या मनात समस्या अडचणी निर्माण होत नाहीत. विविध अनुभवांनी युक्त असणाऱ्या ज्ञान समृद्ध मनामध्ये त्या निर्माण होतात व शैक्षणिक आणि वैज्ञानिक प्रकाशनाच्या अभ्यासातून विविध कल्पना व चांगल्या समस्यांचे आकलन होऊ शकते.[१]

संशोधन विषयाशी संबंधित यापूर्वी कोणते संशोधन झाले, त्यापैकी कोणत्या संशोधनातील कोणते निष्कर्ष प्रस्तुत संशोधनात पूरक आहेत, कोणते वेगळे आहेत, कुठे साम्य आहे, कुठे फरक आहे, हे प्रथमतः पाहणे आवश्यक आहे. त्यानंतर त्याचा योग्य आधार घेऊन त्यापुढील नवीन गोष्टी शोधून काढणे अथवा जुन्या निष्कर्षांना बदलत्या परिस्थितीला नवा अर्थ शोधण्यासाठी आजपर्यंतच्या संबंधित शैक्षणिक संशोधन निष्कर्ष, वाचन, चिंतन, मनन, उपयोजन करणे म्हणजे संबंधित संशोधन साहित्याचा आढावा घेणे होय. जागतिक पातळीवर वाचन चळवळीचा विचार केला, तर वाचनामुळे संपूर्ण जगामध्ये परिवर्तन झाले आहे. उदा., संपुर्ण जगाला माहित आहे की, माँटेस्क्यु रूसो, व्हॉलेटेअर यांच्यासारख्या अनेक विचारवंतांनी समाजामध्ये परिवर्तनाचे बीज रुजवले आहे. भारतीय समाजाचा विविध अभ्यासकांनी,

संशोधकांनी, समाजसुधारकांनी केलेल्या संशोधनाचा आढावा या ठिकाणी घेण्यात आला आहे. पुणे जिल्ह्यातील समाजामध्ये वाचन चळवळीमुळे झालेल्या सामाजिक व सांस्कृतिक बदलाचा अभ्यास करण्याच्या अगोदर वाचन चळवळीची संकल्पना, व्याख्या व तिची सामाजिक सांस्कृतिक पार्श्वभूमी समजून घेण्याबरोबरच वसाहतवादी कालखंडात झालेले बदल व उत्तर वसाहतवादी कालखंडात झालेला बदल यांचा अभ्यास मार्गदर्शक असून या पूर्वीचे संशोधन/संदर्भ प्रस्तुत अभ्यासास पूरक ठरतात. या दृष्टीने वाचन चळवळीच्या संदर्भातील साहित्याचा आढावा नक्कीच उपयुक्त ठरेल. उपलब्ध संशोधन साहित्यामुळे प्रस्तुत अभ्यासाची दिशा ठरविता येते. प्रत्यक्ष संशोधन कार्याला सुरुवात करण्यापूर्वी या विषयाची पूर्वी संशोधन झालेले आहे का? आणि झाले असेल तर त्या संशोधनाचा प्रस्तुत संशोधनाला कितपत व कसा उपयोग होईल, हे पाहणे आवश्यक आहे. वाचन चळवळीचा आढावा घेण्यासाठी वाचन चळवळीच्या संदर्भात उपलब्ध असणारी पुस्तके, मासिके, अहवाल, वर्तमानपत्रे व संशोधन इ. अभ्यास करून वाचनामुळे समाजामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय जीवनावर झालेल्या बदलावरती दृष्टीक्षेप टाकण्याचा प्रयत्न या ठिकाणी करण्यात आला आहे. त्याचबरोबर प्रत्यक्ष संशोधन विषयासंबधी संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे. जेणेकरून, आतापर्यंत झालेल्या संशोधन कार्यापेक्षा प्रस्तुत संशोधन कार्य कसे भिन्न आहे, याची कल्पना येईल.

पुणे जिल्ह्यातील वाचन चळवळ व त्यामुळे झालेले सामाजिक, सांस्कृतिक बदल याविषयी लेखकाने संपादकीयमध्ये विस्तृत विवेचन केलेले आहे. पुणे जिल्ह्यातील हवेली, मावळ, भोर, आंबेगाव आणि वेल्हे इ. तालुक्यामधील माहिती संशोधकाने उत्तरदात्याकडून प्रश्नावलीच्या आधारे भरुन घेतली आहे. वाचन चळवळीतील सामाजिक, धार्मिक, वैचारिक, राजकीय, पारंपरिक, वैवाहिक सांस्कृतिक व इ. घटनेविषयी व वाचन चळवळीच्या माध्यमातून सविस्तर आढावा घेतला आहे.

पुणे जिल्ह्यातील हवेली, भोर, वेल्हे, आंबेगाव आणि मावळ तालुक्यांचा वाचन चळवळीच्या दृष्टीकोनातून अभ्यास प्रस्तुत शोधग्रथांत मांडला आहे. सदर विषयासंदर्भात संशोधकाला वाचन चळवळीचा अभ्यास, वाचन चळवळीची संकल्पना या संदर्भात झालेले

सामाजिक शास्त्रीय लेखन, विविध मासिके व साप्ताहिकांतून त्याची दर्शविलेली सद्यःस्थिती व वर्तमानपत्रे पुणे जिल्ह्यातील वाचन चळवळीचा वसाहतवादी व उत्तर वसाहतवादी कालखंडाचा आढावा घेण्यात आला आहे.

## २.२ संशोधन साहित्याची उद्दिष्ट्ये

१) संशोधन विषयाची पुनरावृत्ती होऊ नये व संशोधनाबद्दल योग्य मार्गदर्शन मिळावे.

२) संशोधनासंदर्भात संशोधकास योग्य पद्धती तंत्राबद्दल दिशा मिळावी.

३) संशोधन विषयासाठी गृहीतके, परिकल्पना याबाबत निश्चित कल्पना येते.

४) संबंधित साहित्याचे व आधार सामग्रीचे निष्कर्ष याबाबत तुलनात्मक माहितीची उपलब्धता प्राप्त होते.

५) संशोधकास आपल्या संशोधनामध्ये समर्पक सांख्यिकीय तंत्रे व त्यांचा उपयोग या संदर्भात माहिती मिळवणे.

६) संशोधकास संदर्भ साहित्य मार्गदर्शक ठरते व त्याच्या मदतीने संशोधकास स्वतःच्या ज्ञानाची पातळी अधिक विस्तृत करता येते.

वरील उद्दिष्टासाठी संशोधन समस्येशी संशोधनाचा व साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे.[२]

## २.३ संशोधन साहित्याच्या आढाव्याचे महत्त्व

प्रस्तुत संशोधनासंबंधी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष साहित्याचा व संशोधनाचा आढावा घेण्यात आलेला आहे. त्याचे महत्त्व पुढीलप्रमाणे,

१) संबंधित संशोधन यापूर्वी झालेले आहे की नाही, ते समजते. त्यामुळे संशोधनाची पुनरावृत्ती टाळता येते.

२) संशोधकाला आपल्या संशोधनाची माहिती मिळते, त्यामुळे समस्येचे विश्लेषण व समस्या कथन करताना मार्गदर्शन होते.

३) संशोधन समस्येशी निगडीत झालेल्या संशोधनाची माहिती मिळते, त्यामुळे संशोधन विषयासंदर्भात ज्ञानात भर पडते व संशोधनाची कार्यपद्धती समजते.

४) संशोधकास आपल्या संशोधनातील परिकल्पना मांडण्यास मदत होते.

५) संशोधनात माहिती मिळविण्यासाठी कोण कोणती साधने वापरावी, यांचे मार्गदर्शन मिळते.

६) संशोधनाची गृहीतके व मर्यादा ठरवता येतात.

७) संख्याशास्त्रीय पद्धतीचा वापर कसा करावा, हे समजते.

८) संशोधनातील माहितीचा आधार घेता येतो.[३]

## २.४. समाजशास्त्रीय सैद्धांतिक संकल्पनाची चौकट (Sociological Theory)

### २.४.१ सैद्धांतिक आधार

सदर संशोधन कार्य हे पुणे जिल्ह्याच्या सामाजिक व सांस्कृतिक बदलाध्ये वाचन चळवळीचे योगदान या संदर्भात असल्याने या संशोधनासाठी योग्य ती सैद्धांतिक चौकट ठरविणे, हे महत्त्वपूर्ण कार्य आहे. समाजशास्त्रीय अभ्यासामध्ये सैद्धांतिक चौकटीला अतिशय महत्त्व आहे. सैद्धांतिक चौकटीबद्दल बोलताना हरिकृष्ण रावत यांनी आपल्या समाजशास्त्रीय विश्वकोशात असे म्हटले आहे की, वस्तु आणि घटनांच्या संबंधी अंतर्गत प्रश्न आणि त्यांची संभाव्य उत्तरे या बाबतीत जे अंदाज लावले जातात, या अंदाजाच्या समूहाला सैद्धांतिक दृष्टीकोन असे संबोधले जाते.

समाजशास्त्रात कोणत्याही घटनेकडे वैज्ञानिक दृष्टीकोनातून पाहिले जाते. योग्य त्या निष्कर्षापर्यंत पोहचणाऱ्यांसाठी या पद्धतीचा व सैद्धांतिक दृष्टीकोनाचा उपयोग होतो. समाजशास्त्र या विषयात विविध सैद्धांतिक दृष्टीकोनाचा आधार घेऊन वेगवेगळ्या बाबी अभ्यासल्या जातात.''[४]

उपरोक्त संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी एमील डरखिम या विचारवंताने सांगितलेला ''विचार प्रणाली सिद्धांताच्या'' संदर्भ चौकटीतून पाहिले आहे. कारण, या सिद्धांतानुसार लोकांच्या विचारप्रणालीत बदल घडून आला, तर समाजात परिवर्तन घडून येते. म्हणजेच समाज परिवर्तन घडून येण्यासाठी लोकांची विचारप्रणाली बदलणे गरजेचे आहे. लोकांच्या विचारामध्ये वाचनाने निश्चितच बदल घडून येतो. लिखित साहित्याच्या माध्यमातून जितके चांगले विचार लोकांपर्यत पोहचतात, तशी लोकांची पूर्वग्रह दूषित धारणा बदलून ते सदसद्विवेकबुद्धीने निर्णय घ्यायला लागतो. समाज परिवर्तनास मदत होते, तेव्हा उपरोक्त संशोधन विषयास नॉम चॉम्स्की यांचे मिडिया संदर्भातील चौकट, फ्रँकफर्ट स्कुलचे विचार प्रवाह, हेबरमास, फुको, अल्थुजर यांच्या सैद्धांतिक विचारांची चौकट व एमील डरखिम यांच्या विचारप्रणाली परिवर्तन सिद्धांताची संदर्भ चौकट लागू होते.

### २.४.२ सामाजिक परिर्वतनाचा विचार प्रणाली सिद्धांत

एमील डरखिम यांनी हा सिद्धांत मांडला असून या सिद्धांतात व्यक्तींच्या मनातील समाज, सामाजिक गट, सामाजिक संस्था, कायदा, नियमने, मूल्ये, नीती, कल्पना इ. समाजरचनेवर प्रभाव टाकतात. त्यातून समाजामधील भिन्नता, संस्कृती व वर्तन प्रकार व्यक्त होतात. एमील डरखिम यांच्या मते, जरी सामाजिक आंतरक्रियांमधून सामाजिक घटना निर्माण होत असल्या, तरी व्यक्तिगत विचारांचे महत्त्व नाकारता येत नाही. त्या व्यक्तींच्या विचारांच्या प्रभावामुळेच सामाजिक परिवर्तन घडायला चालना मिळते, असे एमील डरखिम मानतात. त्यांच्या मते, मानवाच्या सर्व आंतरक्रिया व एकूणच समाज हा विचारांच्या पायावर रचला जातो.''[५]

उपरोक्त माहिती वरून असे दिसून येते की, सामाजिक परिवर्तनात विचारप्रणाली हा घटक अतिशय महत्त्वाची भूमिका बजावते. कारण सामाजिक परिवर्तन घडण्यामागे अनेक कारणे असतात. परंतु व्यक्तींच्या मनात समाजव्यवस्थेचे असलेले प्रतिबिंब तसेच सामाजिक गट, संस्था, कायदा व नियमनातील बदल सामाजिक जाण व त्यातून होणाऱ्या आंतरक्रियातील बदल सामाजिक परिवर्तन दर्शवितात. व्यक्तींच्या विचारसरणीतील परिवर्तन हे खरे महत्त्वाचे आहे. परंतु व्यक्तींच्या व्यक्तिगत विचारात परिवर्तन होण्यास अनेक कारणे जबाबदार आहेत. व्यक्तींच्या व्यक्तिगत विचारांवर अनेक बाबींचा जसे व्यक्तींची सामाजिक स्थिती, जात, धर्म, वंश, वर्ग, आर्थिक स्थिती, सांस्कृतिक पार्श्वभूमी अशा अनेक घटकांचा प्रभाव असतो. समाजव्यवस्थेतील अनेक पूर्वग्रह त्यांची विचारप्रणाली घडवत असतात. समाजातील बहुतेक लोकांची विचारप्रणाली ही सारखीच असते. परंतु विविध पुस्तकांच्या वाचनाने मात्र विचार प्रणालीत परिवर्तन घडून येऊ शकतो. व्यक्तींच्या विचार प्रणालीत बदल घडवून घेण्यासाठी भौतिक परिस्थिती किंवा दुसऱ्या काही बाबी जबाबदार असतील, तर या बाबींमध्ये व्यक्तींमध्ये असणारी वाचनाची आवड यातून तो पूर्वग्रह दूषित विचारातून सहज बाहेर पडतो. वेगळ्या पद्धतीने विचार करायला लागतो व येथूनच सामाजिक परिवर्तनात भर पडत जाते.

विचारप्रणालीबाबत मत व्यक्त करताना मॅक्स वेबर या विचारवंताने असे म्हटले आहे की,'विचार प्रणाली परिवर्तन हे बहुतेक सामाजिक परिवर्तनाचे कारक आहेत. असे विचार

त्यांच्या 'द' प्रोटेस्टंट एथिक्स ॲण्ड द स्पिरिट ऑफ कॅपिटॅलीझम' या ग्रंथात दिसून येते. वेबर यांच्या उपरोक्त विवेचनावरून असे जाणवते की, भांडवलशाहीच्या आधीपासूनच भांडवलशाही उदयास पोषक विचार सुधारक पंथात आले होते. परंतु सनातन ख्रिश्चन कॅथलिक पंथाच्या विचारांमध्ये आस्था नसल्याने त्या विरुद्ध उठाव करून प्रोटेस्टंट पंथ निर्माण झाला व या पंथाने नवीन विचारसरणी अनुयांयामध्ये रुजवली. धार्मिक कल्पनेतून अर्थव्यवस्थेत परिवर्तन आले. हेच बदल सामाजिक परिवर्तनाला कारणीभूत ठरले. म्हणजेच लोकांमध्ये जी विचारप्रणाली रुजवली जाते, ती परिवर्तनास पोषक ठरते, असे मॅक्स वेबर यांचे प्रतिपादन आहे.''[६]

विचारांच्या विकासाचा समाज रचनेवर, सामाजिक परिर्वतनावर कसा परिणाम होतो, हे सांगतांना विचारांमधून निर्माण झालेल्या ''ज्ञानाचे समाजशास्त्र'' या नावाच्या समाजशास्त्राच्या शाखेची सुरुवात कार्ल मॅनहीम यांनी केली. मॅनहीम यांचे असे म्हणणे आहे की, मानवाच्या विचारांचा मानवावर व त्यांच्या दर्जेवर व भूमिकांवर परिणाम होतो. पर्यायाने हा परिणाम समाज रचनेवर देखील दिसून येतो. त्यांच्या मते मानवाच्या मनातील विचारांना सामाजिक व सांस्कृतिक बैठक आहे. म्हणून व्यक्तींच्या दर्जा व भूमिका, सामाजिक स्थान, समाज रचना, सामाजिक गट, सामाजिक संबंध, नीती, न्याय, धर्म इ. बाबींवर आधारित विचार तयार होतात व ते सामाजिक संबंधामध्ये प्रतिबिंबीत होऊन भिन्न प्रकारच्या सामाजिक प्रक्रिया निर्माण करतात. हे सर्व सामाजिक परिवर्तनास सदर संशोधनास लागू होणाऱ्या सामाजिक परिवर्तनाच्या विचारप्रणाली सिद्धांतात असे प्रतिप्रादन केले आहे. सर्व सामाजिक परिवर्तन हे वैचारिक परिवर्तन असते व वैचारिक परिवर्तन हेच बहुतेक सर्व सामाजिक परिवर्तनाचे कारक आहेत. परिवर्तनाबाबत विचार केला असता असे दिसते की, विचारप्रणाली सिद्धांत हा सामाजिक परिवर्तनाची एक बाजू आहे. कारण सामाजिक परिवर्तन हे वेगवेगळ्या मार्गांनी घडून येते. परंतु वैचारिक परिवर्तन ही बाब सामाजिक परिवर्तनामध्ये घडून येण्यास फार महत्त्वाची आहे. वैचारिक परिवर्तन वाचन संस्कृती ही मोलाची भर घालते.

भारतीय समाजव्यवस्थेचा अभ्यास केला तर असे जाणवते की, भारत देशात जात, धर्म, वर्ग, कैटुंबिक समस्या अशा अनेक बाबी आहेत. जातिव्यवस्था ही बाब या

समाजव्यवस्थेच्या सामाजिक संरचनेचा एक महत्त्वपूर्ण असा भाग आहे. त्याचप्रमाणे स्त्रियांचे दुय्यमत्व व त्यातून उद्भवणाऱ्या समस्येचे स्वरूप हे आणखी भिन्न आहे. परंतु या सर्व समस्यांमध्ये आज २१ व्या शतकात जे परिवर्तन दिसत आहे, त्यात लोकांच्या विचारात आलेले परिवर्तन हा महत्त्वाचा भाग आहे. लोकांच्यात वैचारिक परिवर्तन येण्यासाठी जशी प्रबोधनाची आवश्यकता असते, तशीच त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवणे व त्यांच्या विचारात बदल होईल, असे साहित्य त्यांना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. आज आपल्या समाजामध्ये जे वैचारिक बदल झालेले आहेत. त्यात प्रामुख्याने लोकांमध्ये रुजत चाललेली वाचन संस्कृती होय. वर्तमानपत्रे, विविध साप्ताहिके, मासिके, पाक्षिके, दिवाळी अंक व विचारांच्या विरोधात झालेली लिखाणे सर्वांनी या गेल्या काही वर्षात लोकांच्या विचारात परिवर्तन घडवून समाजात रुजवलेल्या रूढी, अनिष्ठ प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा यांच्यात आमूलाग्र असे परिवर्तन झाले आहे. हे परिवर्तन आज सर्वत्र आहे. तेव्हा वैचारिक परिवर्तनाने समाज परिवर्तन होते, हे या सिद्धांतातून स्पष्ट होते.''[७]

- **फ्रँकफर्ट स्कुल**

प्रस्तुत विषयासंदर्भात वाचन संस्कृती या संकल्पनेचे समाजशास्त्राच्या परिप्रेक्षामधून जागतिक वास्तव संदर्भ व यथार्थता तपासणे, अगत्याचे ठरते. कारण सदर विषयाच्या अनुषंगाने जर्मनीमधील फँकफर्ट स्कुलचा उद्देश जाणणे, महत्त्वपुर्ण आहे. पश्चिम जर्मनीमध्ये फ्रँकफर्ट विश्वविद्यालयात १९२३ मध्ये एका सामाजिक संशोधन संस्थेची स्थापना केली होती. या संस्थेने सामाजिक जीवनाच्या क्षेत्रामध्ये संशोधन कार्याची वैचारिक चळवळ सुरू केली होती. ही चळवळच पुढे फ्रँकफर्ट समुदाय म्हणून ओळखली गेली. ही वैचारिक चळवळ प्रामुख्याने मार्क्सवादी चिंतनातून प्रभावित झालेली होती. जी तत्कालीन मार्क्सवादी विचाराने प्रभावित समाजव्यवस्थेची व्याख्या करत होती. जर्मनीत हिटलरशाहीच्या उदयानंतर काही काळ ही चळवळ मंदावली. परंतु दुसऱ्या विश्वयुद्धानंतर हिटरलशाही संपुष्टात येऊन १९४९ ला या चळवळीने पुन्हा जोर धरला. या वैचारिक प्रबोधन चळवळीच्या अध्ययन लक्षात ज्ञानमिमांसा मार्क्सवाद व संस्कृती हे होते. परंतु या सांप्रदायातील विद्वानांनी 'प्रजातीवाद' व 'पूर्वग्रह' यांसारख्या विषयावर महत्त्वपूर्ण संशोधन केलेले आहे.

यात प्रामुख्याने टी.डब्ल्यू. एडोर्नो, डब्ल्यू. बैन्जामीन ई.क्रॉम., एम.होरखेयर आणि एच. मारकुस या नावांचा विशेष उल्लेख करावा लागेल. या संप्रदायाचे प्रमुख योगदान हे रिकात्मक सिद्धांतात येते, ज्यात मार्क्सवादाला एक नवीन रूप दिले गेले. ज्याला नवमार्क्सवाद असे म्हटले जाते. नवमार्क्सवादी हे मार्क्सच्या ऐतिहासिक विश्लेषणाच्या बाजूने आहेत. ते मार्क्सचे ऐतिहासिक सिद्धांत, आर्थिक मुख्य व उत्पादन प्रक्रिया विषयक विचारांची टिका करतात.

फ्रँकफर्ट स्कुलने अधिकृतरीत्या मार्क्सवाद स्वीकारला असला, तरी या स्कुलवर वेगळ्या विचारसरणीचा प्रभाव या इंस्टीट्युटमध्ये होता. परंतु नाझीवादाला शह देण्यासाठी फ्रँकफर्ट स्कुलच्या तत्त्वज्ञांनी आणि विचारवंतानी भूमिका बजावली. संस्थेच्या सर्वच अभ्यासकांनी मार्क्सवादाची युरोपमधील बदलत्या परिस्थितीची सांगड घालण्याचा प्रयत्न केला.

**संस्कृती उद्योगः–** रेमंड विलियम यांच्या मते, मार्क्सवादी सिद्धांताला (सांस्कृतिक भौतिकवादाला) अनन्य साधारण महत्त्व आहे. सांस्कृतिक उत्पादन ही मानवी क्रियेप्रमाणेच एक भौतिक वस्तु आहे. संस्कृतीला समाजाच्या एका उप अंगाप्रमाणे किंवा स्व जाणीवेप्रमाणे समजून घेता येते. परंतु या सिद्धांतामध्ये समाज व संस्कृतीचा परस्पर संबंध कसा लावायचा व समजून घ्यावयाचा याबद्दल सूतोवाच केलेले आहे. विल्यमच्या मते, संस्कृती ही जीवन जगण्याची एक पद्धती आहे. संस्कृतीला राजकीय व आर्थिक प्रक्रियेचे अंग असल्यामुळे संस्कृतीतील तिच्या वास्तव बाबीमुळे सामाजिक प्रक्रिया घडत असतात. सध्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात संस्कृती उद्योग हे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक बदलाचे साधन म्हणून पाहिले जाते.

संशोधकाने वाचन चळवळीचा अभ्यास करताना समाजात लोक जीवन जगताना त्यांच्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक अंगावर या व्यवस्थेचा प्रभाव पडतो व लोक त्यानुसार जीवन जगण्याचा प्रयत्न करत असतात. म्हणून उद्योग संस्कृती ही मानवाला प्रभावित करताना दिसते.

थीओडोर अडोर्नो हे जनसामान्यांवर व संस्कृतीवर जनसंपर्क माध्यमाचा (Mass Media) प्रभाव कशा पद्धतीने पडत असतो. याचे त्याने चिकित्सात्मक विवेचन केले आहे.

कार्ल मार्क्सने आधुनिक भांडवलशाही समाजात संस्कृतीचा प्रभाव महत्त्वाचा असतो, हे सांगितले. परंतु मंजल्स यांनी माध्यमे विचारधारा (Ideology) या बाबीचे लिखाण केले. Mass म्हणजे विशिष्ट कुठला समूह नसून तो समाजाच्या सांस्कृतिकदृष्टया वंचित दबलेला समूह असतो. म्हणून मास कल्चर ही तळागाळातील/बहुजन वर्गाची संस्कृतीशी विसंगत असते. लोकसंस्कृतीमध्ये (Mass Culture) मध्ये वस्तु (Object) उत्पादक व उपभोक्ता, असे तीन प्रमुख घटक सहभागी असतात. वस्तु ही सांस्कृतिक वस्तु म्हणून उद्योगात तयार केली जाते. लोक सांस्कृतिक वस्तु मध्ये टि.व्ही. वरील कार्यक्रम किंवा पुस्तके यांचा समावेश होऊ शकतो. मार्क्सच्या भांडवलशाहीच्या विश्लेषणात या वस्तु म्हणजे केवळ कारखाण्यातील उत्पादन प्रक्रियेद्वारे श्रमिकांच्या श्रमशक्तीचे फलित नसून, ती एक उपयुक्त वस्तुसुद्धा असते. या उपुयक्त वस्तु वेगळ्या पद्धतीने उत्पादित करून तिचे विनिमय वाटप मास मार्केटिंग उद्योगामार्फत करणे, हे त्याचे वैशिष्ट्य असते. अशा वस्तुचे उत्पादन हे उपभोक्त्याद्वारे संस्कृतीची निर्मिती करण्यासाठी केले जाते. अशा उत्पादकांकडून उत्पादित केलेल्या वस्तुचे विनिमय उपभोक्ता या वस्तू विकत घेऊन तिचा 'वापर मुख्य' म्हणून उपयोग करतो. विनिमय मुख्य व वापर मुख्य हे एक चिन्ह मुख्य म्हणून बाजाराच्या जाहिराती आणि नियंत्रणातून एकमेकांशी जोडलेले असते. या प्रक्रियेतून उपभोक्त्याच्या सदसद्विवेकबुद्धी नियंत्रित केली जाते. ही त्या वस्तु उत्पादन प्रक्रियेची गतिशीलता असते, असे समाजशास्त्रात आपले मत नोंदवतात. उपभोक्ता अशा बनवलेल्या वस्तुचे विशिष्ट समाजात किंवा व्यवहारात एक सांस्कृतिक प्रतिमा किंवा अस्मितेच्या स्वरूपात म्हणून रूपांतरित करून देवाणघेवाण करीत असतो.

फ्रँकफर्ट स्कुलचे विचारवंत असे प्रतिपादन करतात की, 'फुरसतीचा वेळ' हासुद्धा प्रभावीपणे औद्योगिक उत्पादनासाठी विचारात घेतला जातो. करमणुकीचे साधने म्हणून टी.व्ही., वृत्तपत्र, चित्रपट, लोकप्रिय संगीत रेडीओ आणि नियतकालिके ही संस्कृती उद्योगात तसेच सांस्कृतिक अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचे घटक आहेत. बहुसंख्य समाजात संस्कृतीचे पुनरुत्पादन आणि प्रमाणितीकरण करून हे केवळ नफा कमवण्यासाठी प्रयत्न असतो. यातून समाजाला मूळ प्रश्नांकडून लक्ष विचलित केले जाते. फुरसत उद्योग हे जनमानसांच्या फावला वेळेचा वापर मुख्य रूपांतरित करण्यासाठी करतात. फुरसत किंवा फावला वेळ ही एक

कामापासून विश्रांती नव्हे, तर ती उत्पादनाची तयारी करण्याची बनते. उद्योग समूहातील मागणी विरहित आणि प्रमाणिकृत उत्पादनाच्या प्रसारामुळे व्यक्तीला चिकित्सक व स्वतंत्रपणे विचार करण्याच्या क्षमतेचा आणि सजगतेचा अस्त होता. त्यामुळे कलाही नामशेष होते आणि बाजारी करणाऱ्याच्या तसेच व्यापारीकरणाच्या विळख्यात अडकते. मास मिडियाच्या जनसंपर्क तंत्रानी समस्त कामगार वर्गाला निष्क्रिय बनवले. त्यामुळे भांडवलशाही नष्ट न होता ती मजबूत होताना दिसते. भांडवलशाही समाज विचारधारेच्या माध्यमातून समाजावर सामाजिक नियंत्रण आणि एकोपा प्रस्थापित करते. उद्योग समूह भांडवलशाही व्यवस्थेला तारण्यासाठी मूल्यांचे पुनरूत्पादन करण्याचा प्रयत्न करीत असते. त्याचवेळी मास मिडिया लोकांना भांडवलशाहीचा वर्चस्ववादी विचारधारेचा निष्क्रिय प्राप्तकर्ता (Passiue Recipient) घडवते.

संशोधकाने या मार्क्सवादी दृष्टीकोनाचा वाचन चळवळीच्या माध्यमातून नेमका काय बदल झाला, मुलाखतीच्या आधारे माहिती घेतली. पण विभाग दोनमध्ये व्यष्टी अध्ययन पद्धतीच्या माध्यमातून ज्यावेळी माहिती घेतली त्यावेळी लक्षात आले की, वाचन चळवळीला या भांडवलशाही व्यवस्थेने कामगारांच्या चळवळीप्रमाणे निष्क्रीय बनवले आहे, असे दिसते. कारण लोक साहित्य वाचन करतात. परंतु ते आता व्हॉट्सअप, इंटरनेट, टि.व्ही. केबल यातून काटछाट करून आलेले साहित्य ऐकतात व त्यावर विश्वास ठेऊन निष्कर्ष मांडायला तयार होतात. समाजशास्त्राचा एक विद्यार्थी म्हणून जरी वाचन चळवळ समाजात परिवर्तन अणण्यामध्ये जरी महत्त्वाची भूमिका असली, तरी ते वाचकांचे परिवर्तन हे भांडवलशाही पद्धतीने होताना दिसते. या ठिकाणी भांडवलशाही व्यवस्थेला जे म्हणायचे आहे, ते वाचकवर्ग येथे म्हणताना दिसतो. म्हणजेच वाचकवर्गसुद्धा संभ्रमात असलेला दिसतो, असे व्यष्टी अध्ययनातून अभ्यास केल्यास लक्षात येते.

फेअरवलोच्या मते, भांडवलशाही हे एक परिपक्व रूप आहे. बाजारीकरणामुळे राजकारणाच्या क्षेत्रातही मोठ–मोठे फलक भाष्ये, आश्वासनाच्या जाहिराती, प्रचारकी गाणी इ. माध्यमातून 'राजकीय जाहिरात' हा नवाच संदेश प्रबंधक अस्तित्वात आला आहे. चिकित्सक संदेशप्रबंधक विश्लेषकासाठी आधुनिकेत्तर काळातील असे संदेश प्रबंधक हे एक आव्हान ठरू शकतात. जाहिराती व लोकांना भुरळ घालून चुकीचे संदेश पोहोचविणाऱ्या प्रसारकांचे

चिकित्सक परीक्षण करणे, ही आजच्या काळाची गरज ठरते. अशा संदेश प्रबंधकाची मांडणी, रचना, संहिता, भाषाशैली, दृष्य व श्राव्य वैशिष्ट्ये आणि सामाजिक सांस्कृतिक संदर्भ याचे विश्लेषण करून जनजागृती करणे, हा चिकित्सक संदेश प्रबंधक विश्लेषणासाठी समाजपरिवर्तनाचा एक प्रभावी प्रयत्न ठरू शकतो. भांडवलशाही समाजात संस्कृतीचा प्रभाव किती महत्त्वाचा असतो, हे मार्क्स व एंजल्स यांनी लक्षात आणूण दिले. माध्यमे आणि विचारधारा यामध्ये Mass म्हणजे विशिष्ट कुठला समूह नसून तो समाजाच्या सांस्कृतिकदृष्टया वंचित दबलेला समूह असतो. म्हणून मास कल्चर ही तळागाळातील/बहुजन वर्गाची संस्कृती असल्यामुळे ती लोकप्रिय संस्कृती म्हणूनही ओळखली जाते. ही संस्कृती उच्च अभिजन किंवा श्रेष्ठीजन वर्गाच्या उच्च संस्कृतीशी (High Culture) विसंगत असते.[८]

पुणे जिल्ह्यातील सामाजिक व सांस्कृतिक बदलामध्ये वाचन चळवळीचा अभ्यास करताना संशोधकाने वेगवेगळ्या मार्क्सवादी सैद्धांतिक चौकटीतून प्रत्येक बाबींचा विचार केला आहे. संदर्भ साहित्याचा आढावा घेताना संशोधकाने असे पुस्तके, मॅक्झीन, पेपर साप्ताहिके निवडले आहेत.  त्या साहित्याचा त्या वाचकाला विचार करावयास लावला आहे. त्यामध्ये संशोधकाने 'दलित साहित्याचा' आढावा घेतला व त्या साहित्याचा त्या त्या समाजातील किंवा जातीच्या लोकांना एक जीवन जगण्याची संस्कृती मिळाली. आपले म्हणजे ते त्या साहित्यात मांडू लागले व लोकांना एकत्रित बसून विचार करावयास या साहित्याने भाग पाडले, म्हणून Mass चा विचार या भांडवलशाही व्यवस्थेत होणे गरजेचे आहे, हे या चळवळीच्या माध्यातून लक्षात येते.

- **मार्क्सवादी परिप्रेक्ष व नवमार्क्सवादी परिप्रेक्ष**

मार्क्सवादाने भांडवलशाहीची चौकट मोडून त्याच्या पुढे जाण्याचा मार्ग दाखवला आहे. मार्क्स म्हणतो की, समाजात बदल घडवायचा असेल तर क्रांती अटळ आहे. या बदलास दोन पैलू महत्त्वाचे आहेत. ते म्हणजे आर्थिक व राजकीय असे दोन मुलभूत पैलू आहेत. वस्तुंच्या व्यापारातून विरोध विकासामधून विश्व निर्माण झाले. नंतर प्राणी व मनुष्य निर्माण झाला. मनुष्यांनी समाज निर्माण केला. मनुष्याने जीवन जगण्यासाठी उत्पादन पद्धतीची निर्मिती केली. उत्पादन पद्धती बदलत जाते, त्याचबरोबर सामाजिक संबंध बदलतात. म्हणजेच सामाजिक वर्ग

बदलतात. उत्पादन पद्धती व सामाजिक विशिष्ट संबंध हा भौतिक सामाजिक पाया हा पाया जसा असेल त्या प्रकारच्या मानसिक संस्कृतीचा समाज उभारला जातो. कायदा राज्यव्यवस्था, काव्य कला, साहित्य, धैर्य इ. मानसिक संस्कृतीत समाज आदि अवस्थेपासून अनेक रूपांतरे होत बदलत गेला आहे. आतापर्यंत तत्त्वज्ञानाने केवळ जग समजावून घेण्याचा प्रयत्न केला. आपली जबाबदारी जग बदलणे आहे, ही मार्क्सची तत्त्वज्ञानाबद्दलची भूमिका होती. समाजव्यवस्था बदलत असते आणि हा बदल उत्पादन साधनामध्ये असते. उत्पादन पद्धती व त्या पद्धतीत निर्माण झालेले सामाजिक संबंध यांच्या बदलांमुळे घडून येतो, हा मूळ सिद्धांत होय. यालाच ऐतिहासिक भौतिकवाद असे म्हणतात. या सिद्धांतानुसार मार्क्सने त्यांच्या काळापर्यंतच्या मानव इतिहासाची संगती दाखवली आहे.

समाजातील वंचित घटकाच्या सक्षमीकरणातील संवाद–जनसंपर्काकाचे महत्त्व या विषयावर विकास संवाद क्षेत्रातील तज्ज्ञांमध्ये व्यापक सहमती आहे. मेलकोटे व स्टिव्हज् यांच्या म्हणण्यानुसार, दुर्बल समाज घटकाच्या सशक्तीकरणासाठी केवळ माहिती देणे आणि आणि तांत्रिक नवकल्पनांचा प्रसार करणे, यापेक्षाही जास्त आवश्यकता असते. याचाच अर्थ त्यांनी विकासाला चालना देणाऱ्या संवाद प्रक्रियेचे केंद्रीय स्थान नाकारले नाही. रॉजर्स आणि सिंघल यांनी 'माहितीकरण' हा शब्दप्रयोग, माहिती–तंत्रज्ञानाधारीत सामाजिक आर्थिक विकास चळवळीच्या दिशेने, समाजमाध्यमांनी या आधी घेतलेल्या दृष्टीकोनाच्या पुर्ततेसाठी केला. वस्तुतः नवमार्क्सवादी विचारवंत मॅन्युअल कॅस्टल यांनी 'नेटवर्क समाज' संपूर्ण जगात पसरतो आहे. परंतु आहे रे व नाही रे वर्गातील अंतर वाढवण्याची प्रक्रिया ही इंटरनेटमुळेच सुरू राहते. यामुळेच सायबर लेखन प्रवेश करणाऱ्या लोकांचे मोठ्या प्रमाणात विभाजनही केले जात आहे आणि इंटरनेटच्या विश्वात प्रवेश न करणाऱ्या इतरांना वेगळे केले जात असते. नेटवर्क सोसायटीचा अर्थ येथे असा आहे की, माहिती आणि संचार तंत्रज्ञानाधारीत अशी समाज रचना, ज्याचे संचालन मायक्रो–इलेक्ट्रानिक्स व डिजिटल संगणकीय प्रणालीवर आधारीत माहिती–तंत्रज्ञानाद्वारे होते. संकलित केलेल्या ज्ञानाच्या आधारे असे नेटवर्क प्रक्रिया तयार करते, तसेच माहितीचे वितरणही करते. [९]

पुणे जिल्ह्याच्या सामाजिक व सांस्कृतिक बदलामध्ये वाचन चळवळीचे योगदान याविषयीची मांडणी करताना संशोधकाने मार्क्सवादी परिप्रेक्ष व नवमार्क्सवादी परिप्रेक्ष या सैद्धांतिक संकल्पनेच्या चौकटीतून वाचन चळवळीला पाहण्याचा प्रयत्न केला आहे. कारण समाजामध्ये पारंपारिक समाजापासून ते आधुनिक समाजापर्यंत बदल, परिवर्तनाचे माध्यम हे विचार आहेत आणि हे विचार लोकांना वाचन साहित्यातून मिळतात. मार्क्सवादी परिप्रेक्षामधून लोकांनी जे ज्ञान लवकर आत्मसात केले आहे, ते म्हणजे सोशल मिडिया, इंटरनेट म्हणून समाज जसा बदलत जाईल, तशी मानवाने संप्रेक्षणाची साधने तयार केली आहेत. याला वाचन चळवळसुद्धा अपवाद नाही, असे या परिप्रेक्षामधून लक्षात येते.

- **युर्गेन हेबरमासचे सार्वजनिक जनक्षेत्र/लोकवृत्त (Public Sphere)**

फ्रँकफर्ट स्कुलच्या परंपरेतील एक महत्त्वाचा विचारवंत म्हणून हेबरमासकडे पाहिले जाते. हेबरमास हे समकालीन जागतिक विचारवंतामधील एक प्रमुख नाव आहे. लोकशाही आणि समाजातील सार्वजनिक संवाद व्यवहार हा त्यांच्या चिंतनाचा एक प्रमुख विषय एखाद्या समाजाचे एखाद्या काळातील सार्वजनिक चर्चेचे विश्व कसे साकारते किंवा बदलते, यावर त्या समाजातील जनमताचे आणि राजकारणाचे आरोग्य अवलंबून असते. हे त्यांच्या मांडणीचे मुख्य सूत्र वरकरणी सोपे वाटत असले तरी हेबरमास याची मांडणी बरीच गुंतागुतीची आहे. या सार्वजनिक चर्चा कुठे घडतात, त्यात कोण कोण सहभागी होतात, लोक एकमेकांशी कसे बोलतात, कोण कोणत्या विषयावर बोलतात, त्याच्या बोलण्याला धरून ठेवणारी सामुहिक समज काय आहे, बोलण्यामध्ये विवेक आणि तर्काला किती स्थान आहे वगैरे अनेक गोष्टींबद्दल हेबरमास खूप खोलाची मांडणी करतात. त्या दृष्टीने सतराव्या आणि अठराव्या शतकातील युरोमध्ये फॅफे हाउस, सलॉन, रिडिंग, क्लब यांच्या माध्यमातून नवे सार्वजनिक चर्चा विधामुळेच फ्रान्समध्ये राज्यक्रांती होऊ शकते, असे ही त्याचे प्रतिपादन आहे.

मानवी भाषेची रचना स्पष्ट करून हेबरमास असा दावा करतो की, नैसर्गिक शास्त्रे आणि सामाजिक शास्त्रे यांच्यात चर्चा होत असलेल्या मुद्यांवर चर्चा विचार विनिमय करून सहमती मिळविण्याची शक्यता भाषेमध्ये गृहीत आहे. मुक्त संवादाची शक्यता असल्यामुळेच मानवी भाषा शक्य होते. या शक्यतेचा विकास करणे ही हेबरमासची प्रगतीची कल्पना आहे.

सर्व व्यक्तींना समान रीतीने सहभागी करून घेऊन दमनरहित संवादामधून सार्वजनिक प्रश्न निर्माण होणार कारण बाह्य निसर्गावरील मानवाच्या वाढत्या नियंत्रणाच्या संदर्भात मानवी गरजांचा व माणसामाणसांतील संबधांचा प्रश्न प्रत्येक वेळेस नव्याने सोडवावा लागेल.

पुणे जिल्ह्यातील सामाजिक आणि सांस्कृतिक बदलामध्ये वाचन चळवळीचे योगदान या विषयाच्या अनुषंगाने संशोधकाने वाचकांचा या सैद्धांतिक चौकटीतून मांडणी केली आहे. हेबरमास म्हणतात की, **पब्लिक स्पेअर**च्या माध्यमातून जनमानसात वेगवेगळ्या विषयावर चर्चा होते. आणि त्या चर्चेचा परिणाम लोकांमध्ये होतो. ते म्हणतात, ‘चहाचा टेबल’ ‘सलुनमधील चर्चा’ या चर्चा जरी अनौपचारिक पद्धतीच्या असल्या तरी या चर्चेतून अनेक प्रश्न तयार होतात. त्याचा प्रसार हे व्हॉट्सअॅप, यु–ट्युबच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचताना दिसतात. लोकांमध्ये सोशल मिडियाच्या माध्यमातून माहिती पसरते. ती माहिती किती खरी आणि किती खोटी परंतु या माध्यमातून लोकांना मिळालेल्या माहितीच्या आधारे लोक समाजात चर्चा करताना दिसतात. माहितीच मुळात पायाभूत नसल्यामुळे लोकांमध्ये संभ्रमाची स्थिती निर्माण झाल्याचे दिसते.

पब्लिक स्पेअर काही सुत्रे आपल्याकडेही लागू होतात. गावोगाव पाटांवर आणि चावड्यांवर चालणाऱ्या चर्चा म्हणजे आपल्याकडील सार्वजनिक चर्चा विश्वाचा पारंपरिक अविष्कार. त्याखेरीज आपल्याकडेही अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकात एक नवे सार्वजनिक चर्चाविश्व आकाराला येत गेले. ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज यांसारखे विविध, अनेक प्रकारची मंडळे आणि सभा विचारांच्या प्रसारासाठी चालवलेली नियतकालिके वैगेरेच्या माध्यमातून त्यावेळी अनेक विषयावर चर्चा झडत गेल्या. चर्चा करण्याचे नवे संकेत हे रूढ होत गेले. महाराष्ट्र आणि बंगालमधील प्रबोधन पर्व हे त्या अर्थाने एका नव्या सार्वजनिक संवादाच्या नव्या जागा येत गेल्या, तस तशी नवनवीन सार्वजनिक संवाद विश्वेही तयार होत गेली. एकमेकांना घडत बिघडत सोशल मीडियातून साकारत असलेल्या सार्वजनिक संवाद विश्वाचे खरे वेगळेपण या माध्यमाच्या मुद्यात आहे. दलितांच्या, स्त्रियांचा इतकेच नव्हे तर लैंगिक अल्पसंख्यांकाचा लक्षणीय सहभाग, हे या सोशल मीडियाच्या चर्चा विश्वाचे एक प्रमुख वैशिष्ट्य स्वस्तातील फोन, स्वस्तातील डेटा पॅक, आपल्या भाषेत व्यक्त होण्यासाठी

सोप्या तांत्रिक सुविधा आणि डिजीटल युगात प्रवेश करण्यासाठी एकूणच सरकारी व व्यापारी शक्तीकडून मिळणारे प्रोत्साहन, यामुळे एरवी सार्वजनिक संवाद विश्वाच्या गावकुसाबाहेर राहिलेला एक फार मोठा वर्ग लोंढयासारखा या नव्या संवाद विश्वामध्ये शिरला. तंत्रज्ञानाच्या रेट्याखेरीज आणि समतांखेरीज हे इतक्या प्रमाणावर इतक्या वेगाने घडते. [१०]

हेबरमास म्हणतात, प्राचीन समाजापासून ते आधुनिक समाजापर्यंत संवादाचे माध्यम बदलत गेली. तस तशा स्वरूपाच्या चळवळी विकसित होत गेल्या. त्या त्या काळामध्ये वाचनाचे स्वरूप जरी बदलले असले, तरी परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन म्हणून वाचन चळवळ आहे. संशोधकाने याच मुद्याच्या आधारे वाचन चळवळ कशी विकसित होत गेली, हे पहिल्या प्रकरणामध्ये स्पष्ट केले व समाज बदलाचे एक महत्त्वाची चळवळ म्हणजे वाचन चळवळ होय. हे त्यांनी अधोरेखित केले.

- **नॉम चॉम्स्की** (Nom- Chomskay)

नाम चॉम्स्की हा ज्यू धर्मीय विचारवंत होता, भाषाशास्त्रज्ञ, समाज तत्त्ववेत्ता व मानसशास्त्रीय विचारवंत म्हणून आधुनिक जगामध्ये प्रसिद्ध आहे. ते वेगवेगळ्या विषयावर आपले मत व्यक्त करत असतात. त्या विषयाच्या संदर्भात वेगवेगळे अंतरंग उलगडून ते लोकांना विचार करण्यासाठी प्रवृत्त करतात. नॉम चॉम्स्की यांनी (मिडिया) आधुनिक माध्यम व वाचन चळवळ या संदर्भात भाष्य केलेले आहे. डीव्हाईसद्वारे संप्रेषण करण्यासंदर्भात त्यांनी आपले मत प्रदर्शित करून घरातील उदा. देतात. हे संप्रेषण कसे उथळ आहे व ज्ञान कसे वेगवान आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

- जेटॉन यांनी त्यांना मुलाखतीच्या दरम्यान प्रश्न विचारला की, आपणास असे वाटते का लोग समोरासमोर किंवा तोंडी बोलण्याऐवजी डीव्हाईसद्वारे संप्रेषण करणे अधिक सोईस्कर होत आहे.
- नॉम चॉम्स्की म्हणतात, माझे नातवंडे इतकेच करतात म्हणजे अर्थातच ते लोकांशी बोलतात. परंतु त्यांचे संवाद खूपच वेगवान आणि अतिशय उथळ संवाद आहेत. मजकुर संदेश, ट्विटर या संवादावरून असे दिसून येते की, नॉम चॉम्की यांनी आधुनिक माध्यम हे वाचन चळवळीसाठी योग्य प्रकारे वापरले जात नाही, असे नमूद केले आहे.

- ''मॅन्युफॅक्यटीग कन्सेट'' या पुस्तकामध्ये एडवर्ड एस हर्षन यांच्यासह नॉम चॉस्की याने विचार प्रकट करताना असे नमूद केले आहे की बऱ्याच गोष्टीमध्ये ऐतिहासिकदृष्ट्या वंचित गटातील लोकांसाठी, त्यांना संधी शोधण्यासाठी सोशल मिडीया तंत्राचा वापर केलेला आहे. सोशल मिडियाच्या माध्यमातून सुशिक्षित लोकांकडून निरक्षर लोकांपर्यंत ज्ञान पोहोचविण्यासाठी सोशल मिडीयाचा वापर करण्यात आलेला आहे, असे दिसते. वाचन चळवळ म्हणून प्रसार माध्यमे वापरण्याविषयीच्या त्यांच्या सुप्रसिद्ध आणि दीर्घबचावात्मक दृष्टीकोनाचा तार्किक विस्तार त्यांनी मॅन्युफॅक्चरींग कंसन्ट या पुस्तकामध्ये सहलेखक एडवर्ड एस होतन यांच्यासह मांडलेला आहे.

चॉम्स्कीच्या मतानुसार 'मालकी' वर्गातील लोक जगातील त्यांच्या स्वतःच्या विशेष अधिकार स्थानाला बळकटी देणारी अशी विचारधारा निर्माण करण्यासाठी अपरिहार्यपणे संप्रेषणाची साधने वापरली जेव्हा जनतेचे लक्ष विचलित झाले आहे आणि संमत झाले आहे. तेव्हा आर्थिक राजकीय अभिजात वर्ग त्यांच्या स्वतःच्या आवडीचा पाठपुरावा करण्यास सक्षम आहे.

वरील चॉम्स्कीच्या मतानुसार, समाजातील भांडवदार वर्ग व मालकी असलेल्या वर्गातील लोक त्यांच्या वेगवेगळ्या असलेल्या वर्गातील लोक त्यांच्या वेगवेगळ्या अधिकारांचा, भांडवलाचा व ताकदीचा वापर करून एक वेगळी विचारधारा जी त्यांच्यासाठी पूरक आहे व ती निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारची विचारधारा निर्माण करण्यासाठी हा वर्ग राजकारणामध्ये व समाजकारणामध्ये मिडियाच्या माध्यमातून कोणत्या प्रकारचे प्रभाव पाडीत आहेत, हे महत्त्वपूर्ण आहे. राज्य आणि मतदार पुर्वी संभाव्य विजयाच्या बातम्यांचे विश्लेषण हा त्या राज्यातील मतदारावर कोणत्या प्रमाणात प्रभाव पाडत आहे हे महत्त्वपूर्ण आहे. मतदान व मतदार यांच्या संदर्भातील बातम्यांचे प्रकाशन प्रसार माध्यमांच्याद्वारे प्रसारीत करून राजकीय हेतू पुरस्कृत करण्याचा सतत प्रयत्न केला जातो.

नॉम चॉम्स्की यांनी माध्यम, संप्रेषण शक्ती व राजकीय हेतू यांचे समकालीन भांडवलशाही समाजाशी असणारे गुंतागुंतीचे संबंध यावर प्रकाश टाकलेला आहे. याचबरोबर समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून वाचन चळवळीमुळे अनुशासनाशी किंवा संबंधित व्यवस्थेशी

असणारे पूरक हितसंबंध यांविषयी भाष्य करताना दिसत आहेत.

संप्रेषणाच्या साधनाचा वेगवेगळ्या प्रकारे वापर करते. सार्वजनिक मालकीच्या माध्यमातून पुणे जिल्ह्यातील वाचन चळवळीला आलेली बळकटी ही समाजभिमुख व समाजाच्या प्रगतीसाठी फायद्याची आहे अशी दिसून येते. न्यूजपेपर, वेगवेगळ्या प्रकारची मासिके, पॅम्प्लेट, यांच्या माध्यमातून वाचन चळवळीला नवीन स्वरूप आणि दिशा मिळाली आहे.[११] (उदा., साधना मासिकाच्या माध्यमातून थोर विचारवंत व अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे काम सामान्य लोकांपर्यंत पोहचण्यास मदत झाली.)

**खाजगी माध्यम–** भारतामध्ये खाजगीकरणानंतर प्रसार माध्यमांनी खाजगीकरण स्वीकारून वेगवेगळ्या प्रकारचे प्रसार माध्यमांच्या संस्था निर्माण झाल्या या माध्यमातून समाजातील वेगवेगळ्या स्तरातील लोकांपर्यंत अपेक्षित असणाऱ्या विचारांचा प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. काही वेळेस असे दिसून येते की, खाजगी मालकीच्या प्रसार माध्यमातून त्यांना अपेक्षित असणाऱ्या विचारांचे प्रसारण करून प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या समाजाकडून त्यांना उपयोगी असणाऱ्या संकल्पना रुजविल्या जातात.

वाचन चळवळीमध्ये स्वरूप आणि साधनांच्या बदलांचा परिणाम दिसून येत आहे. वेळ आणि काळानुरूप वाचनाच्या पद्धती व त्याला पूरक असणारी साधने यांच्यामध्ये बदल होत गेला. आधुनिक युगामध्ये तंत्रज्ञानाचे ग्रंथालयाची जागा, E-लायब्ररी, E- बुक्स, E- जर्नल्स अशा प्रकारच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नवीन वाचक वर्ग निर्माण होऊ लागला सध्याच्या स्मार्टफोन युगामध्ये दुर्मिळ व महत्त्वाचे ग्रंथ ई–लायब्ररीच्या माध्यमातून वाचकाला मिळू लागली. ई–बुकच्या माध्यमातून आधुनिक युगातील वाचक वर्ग सहजरीत्या आवश्यक असणारी माहिती व संदर्भ गोळा करू लागले. तसेच आधुनिक युगामध्ये तंत्रज्ञानाच्या आधारावर हुशार व तज्ज्ञ व्यक्तींनी वेगवेगळ्या क्षेत्रातील ज्ञानाविषयीचा मुद्रण व प्रसार करून स्मार्ट फोनच्या माध्यमातून व्हॉट्सॲप, टेलिग्राम, फेसबुक, यु–ट्युब या माध्यमावरती प्रसारित करून श्रवण माध्यमातून तो समजून घेण्यास व आकलन होण्यास मदत होऊ लागली. अशा प्रकारे नवीन तंत्रज्ञानाची वाचन चळवळीला नवी दिशा देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

सदर विषयाच्या संदर्भामध्ये समीक्षात्मक दृष्टीकोनातून मांडणी करून ती लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम नॉम चॉम्स्की व त्यांच्या समकालीन विचारवंतानी, तत्त्ववेत्याने केलेला आहे.

वाचन संस्कृती आणि समाजिक परिवर्तन या विषयासंदर्भात अनेक विचारवंतांनी मांडलेल्या सिद्धांताच्या दृष्टीकोनातून पाहिले असता असे स्पषट होते की, वाचन संस्कृतीच्या प्रभावामुळे लोकांमध्ये एक विशिष्ट विचारप्रणाली निर्माण होते व ते त्याच विचारांचा अंगीकार करून समाज व्यवहार करताना दिसतात. जसे लुईस अल्थुजर यांनी आपल्या FOR MARX AND READING CAPITAL या पुस्तकात असे म्हटले आहे की, अर्थव्यवस्था, राजकीय व्यवस्था आणि विचारप्रणाली या तीन बाबींमध्ये आंतरक्रिया होवून लोकांच्या विचारामध्ये परिवर्तन आले की नवसमाजाची निमिर्ती होते. विचारांमध्ये परिवर्तन आणण्याचे काम हे बऱ्यापैकी वाचन संस्कृती करते.

''लोकांमधील येणाऱ्या वैचारिक परिवर्तनासंदर्भात बोलताना मायकेल फूको नावाच्या विचारवंताचा KNOWLEOGE AND POWER हा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे. त्याच्या मते, शक्तीचा संदर्भ हा प्राथमिक बदलाशी आहे. ज्ञान आणि शक्तीला आपण एकमेंकापासून दूर करू शकत नाही. कारण ते दोन्ही परस्परावलंबी आहेत. शक्तीशिवाय ज्ञानाची व ज्ञानाशिवाय शक्तीची आपण कल्पनाच करू शकत नाही. कारण त्या दोन्ही बाबीं एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. परंतु तो असे देखील म्हणतो की, ज्ञानाच्या माध्यमाजवळ असणारी शक्ती ही ज्ञान असेल तरच माहित होते. जसे हत्ती हा प्राणी खूप शक्तीशाली आहे. परंतु त्याला स्वत:ला जर त्याच्याकडे असणाऱ्या अफाट शक्तींची जाणीव नसेल, तर त्याच्या शक्तीचा काहीही उपयोग नाही. त्याचप्रमाणे कोणत्याही समाजात विचार परिवर्तन घडून आणण्याची क्षमता त्या समाजाच्या लोकांमध्ये होणारी विचारांची देवाणघेवाण सामाजिक परिवर्तनास चालना देते. आज वर्तमानपत्राचे होणारे वाचन देखील परिवर्तनास चालना देण्याचे महत्त्वाचे काम करते.

ऐन्टोनिओ ग्रामसी यांच्या वर्चस्व सिद्धांत हा देखील वाचन संस्कृती व सामाजिक परिवर्तन या बाबी परस्पर पूरक असल्याचे दर्शविते. ग्रामसी वर्चस्व सिद्धांताबद्दल त्यांनी राजकरीय वर्चस्व, सांस्कृतिक वर्चस्व व वैचारिक वर्चस्व या बाबींचा उल्लेख केलेला आहे.

समाजात ज्या व्यक्ती वैचारिक प्रगल्भता असते, त्यांचा वैचारिक प्रभाव इतरांवर तयार होतो. हे वर्चस्व इतर सर्वच लोकांना स्वीकारावे लागते.

वरील विचारवंताप्रमाणेच लुई अल्थुझर या विचारवंताचा Community Action Theory हा सिद्धांत देखील अतिशय महत्त्वाचा आहे. या सिद्धांतात त्याने असे म्हटले आहे की, ही पद्धती सर्व ठिकाणी वापरणे जरूरी आहे. कारण यात सर्व लोकांना एकत्रित बोलावले जाते सर्वांना आपाआपली मते मांडण्याचा अधिकार दिला जातो. सर्वांना मान्य होईल असे त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न होईल. यामुळे बुद्धीला महत्त्व येईल. लोकांना बऱ्याच वाईट गोष्टी कळतील नैतिकतेला महत्त्व मिळेल.

समाजात जर वाचन संस्कृती रुजवली तर लोकांनी इतरांशी आंतरक्रिया होताना बऱ्याच चांगल्या विचारांची देवाणघेवाण होईल व समाजात मोठया प्रमाणावर परिवर्तन होणार आहे. [१२]

सामाजिक परिवर्तनास अनेक घटक कारणीभूत आहेत. त्याच प्रमाणे वाचन संस्कृती ही बाब देखील सामाजिक सांचनेच्या बऱ्याच घटकात अमूलाग्र असे परिवर्तन घडवून आणण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडते. सदर संशोधन ताज्या संदर्भ साहित्याचा उल्लेख केलेला आहे. या संदर्भ साहित्याने पुणे शहरातील नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील लोकांच्या विचारामध्ये परिवर्तन आणलेले आढळते. कारण कोणतेही समाज परिवर्तन हे वेगाने व्हायचे असेल, तर लोकांच्या विचारामध्ये परिवर्तन होणे आवश्यक असते. हे परिवर्तन समाजाच्या संरचनेत होते. समाजाच्या अंतर्गत व्यवस्थेचे व त्यातील परस्पर संबंधाचे अध्ययन यात केले जाते. असे कॉम्ट, स्पेंन्सर, मार्क्स, वेबर, दुरखीम, पेरेटो आणि पार्सन्स यांचे म्हणणे आहे. लोकांच्या विचारामध्ये परिवर्तन आले की मग या सर्व घटकांत परिवर्तन येते. परंतु लोकांना वाचनासाठी उपलब्ध होणारे संदर्भ साहित्य हे अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडते.

सदर संशोधन हे पुणे शहरातील लोकांवर होणारा वाचन चळवळीचा परिणाम असे असल्याने पुणेकरांना जे जे वाचन साहित्य आहे. वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, त्रैमासिके, पाक्षिके यांचा वाचक वर्ग हा या शहरातील अतिशय जास्त प्रमाणात असलेला दिसतो. या

शहरातील लोक हे वाचन संस्कृतीचे शौकीन आहेत. यामुळे वैचारिक परिवर्तनास एक प्रकारे दिशा प्राप्त होताना दिसते. पुणे विद्यापिठातील जयकर ग्रंथालय, पुण्यातील इतर ग्रंथालये, अप्पा बळवंत चौकातील अनेक पुस्तकांची दुकाने, पुण्यात वाचन संस्कृतीस असणारे महत्त्व दर्शवितात. यामुळे या शहरातील लोक इतर लोकांच्या तुलनेत वैचारिक प्रयत्न असलेले जाणवते. त्याचबरोबर इतर ठिकाणाहून व अनेक राज्यातून पुण्यास शिकण्यासाठी येण्याचे प्रमाण हे प्रचंड चांगले आहे. दरम्यान असे असले तरी मात्र या क्षमतेची जाणीव त्यांना व्हावी लागते. ही जाणीव त्यांना विचारांच्या जागृतीतून होते. वाचन संस्कृती हा विचार जागृती करण्याचे काम करतो.

वाचन संस्कृती व सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करताना आपणास जुर्गन हेबरमॉस यानवमार्क्सवादी विचारवंताचा Theory of Public Spere या सिद्धांताचा अभ्यास करणे गरजेचे आहे. अशा सिद्धांतात नवमार्क्सवादी म्हणून ज्यांनी पावलेले जुर्गन हेबरमास असे म्हणतात की, समाजात लोकांना आपले विचार व्यक्त करण्यासाठी एका ठिकाणी जमावे लागते. या ठिकाणचा उल्लेख ते लोक कट्टा Public Spere असा करतात. आपाआपले विचार एकमेंकासोबत देवाणघेवाण करतात. त्यातून त्यांना दैनंदिन घडामोडीची व समाजात नेमके काय चालले आहे, याची प्रचिती येते. हा कट्टा लोकांना अतिशय महत्त्वाचा वाटतो. कारण ते या कट्टयावर आपले विचार स्वातंत्र्यपणे मांडण्याचे स्वातंत्र्य असते. अशा कट्टयावर त्यांना हवे ते विषय हाताळता येतात व इतरांशी येणाऱ्या संपर्कातून ते ज्ञान प्राप्ती करतात. असे जुर्गन हेबरमॉस या विचारवंताने Public Spere यात म्हटले आहे. म्हणजेच लोक कट्टा हा एका दृष्टीने लोकांना इतरांचे नवीन विचार ऐकण्याचा मार्ग आहे. जर या कट्ट्यात सहभागी होणारे लोक वाचन करणारे असतील तर ते इतर लोकांपर्यत नवीन विचार पोहोचवू शकतील व आपआपसातील समाज परिवर्तनाची प्रक्रिया सुरू होते. आज पुण्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रभर वर्तमानपत्रे वाचले जातात, बऱ्याशा खेडयात तर वर्तमानपत्र वाचण्यास सकाळी लोक एकदम जमतात व त्यातून त्यांच्यात विचारांची देवाणघेवाण होते. लोकांमध्ये होणारी विचारांची देवाणघेवाण सामाजिक परिवर्तनास चालना देते. आज वर्तमानपत्राचे होणारे वाचन देखील परिवर्तनास चालना देण्याचे महत्त्वाचे काम करते.

ऐन्टोमिओ ग्रामसी यांचा वर्चस्व सिद्धांत हा देखील वाचन संस्कृती व सामाजिक परिवर्तन या बाबींचा परस्पर पूरक असल्याचे दर्शवितो. ग्रामसी वर्चस्व सिद्धांताबद्दल त्यांनी राजकरीय वर्चस्व, सांस्कृतिक वर्चस्व व वैचारिक वर्चस्व या बाबींचा उल्लेख केलेला आहे. समाजात ज्या व्यक्ती वैचारिक प्रगल्भ असतात, त्यांचा वैचारिक प्रभाव इतरांवर तयार होतो व हे वर्चस्व इतर सर्वच लोकांना स्वीकारावे लागते.''

## २.५ संदर्भ साहित्याचा आढावा :–

सदरील संशोधनाचे महत्त्व आणि व्याप्ती विशद करीत असताना या विषयांशी निगडीत पूर्वी झालेल्या काही संशोधनाचा थोडक्यात आढावा घेणे, गरजेचे आहे. त्यातून पूर्वीचे संशोधन आणि सदरील संशोधन यातील फरक किंवा वेगळेपण स्पष्ट होईल. तसेच सदरील संशोधनाच्या महत्त्वाच्या बाबींवर एक वेगळा प्रकाश पडेल. त्यामुळे पूर्वीची संशोधने आणि सदरील संशोधन यांचा आढावा किंवा मागोवा पुढीलप्रमाणे घेतला गेला आहे.

### २.५.१ वसाहतवादी काळ सुधारणावादी वैचारिक प्रसार आणि वाचन संस्कृतीवर होणारा परिणामः–

वसाहतवाद व साम्राज्यवाद हे शब्द नेहमी समान अर्थाने वापरले जातात. ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीनुसार Coldnialism हा शब्द Colonia या रोमन भाषेवरून आला आहे. ‘नवीन देशातील वसाहत म्हणजे नव्या प्रदेशामध्ये स्थायीक होणारा लोकांचा समूह जो त्यांच्या पालक देशाशी कटीबद्ध किंवा संबंधित असा समाज बनतो. अशा प्रकारे निर्माण झालेला समाज हा मूळ रहिवाशी आणि त्यांचे वंशज व उत्तराधिकारी यांनी मिळून रहिवाशी आणि त्यांचे वंशज व उत्तराधिकारी यांनी मिळून असतो. पालक राज्याशी संबंध असेपर्यंतच ही वसाहत अस्तित्वात असते.’

वसाहतवादामध्ये लोकांचे एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर होते आणि स्थलांतरित होऊन येणारे नवीन लोक त्याच्या मूळ देशाशी राजकीय संबंध ठेवत नव्या प्रदेशामध्ये कायमचे स्थानिक होतात. याचा अर्थ स्वामित्व गाजवणे किंवा ताब्यात ठेवणे, असा आहे. अशा प्रकारे साम्राज्यवादामध्ये एक देश दुसऱ्या देशावर वसाहत सार्वभौम अप्रत्यक्ष नियंत्रण याद्वारे आपले वर्चस्व प्रस्थापित करतो. वसाहतवाद म्हणजे काय आपणास पुढील विश्लेषणावरून लक्षात येईल. एखाद्या देशाच्या नागरिकांनी दुसऱ्या देशावर वर्चस्व निर्माण करणे आणि तेथील स्थानिक लोकांवर संस्थात्मक व तांत्रिक अधिका मिळवणे म्हणजेच एकूणच राजकीय व आर्थिक वर्चस्व प्रस्थापित करणे. वसाहतवादाची अधिमान्यता हा फार प्राचीन

काळापासून एक बहुचर्चित विषय आहे. एकोणिसाव्या शतकामध्ये युरोपीय साम्राज्य उर्वरीत जगाच्या टीकांपर्यंत पोहचले. त्यामुळे उदारमतवादी व वसाहतवादी वाटचाल यामधील संघर्ष हळूहळू तीव्र होत गेला. सर्वजण वसाहतवाद व साम्राज्यवादाच्या अधिमान्यतेचे सर्वार्थाने समर्थन करत होते. या दोन्ही परस्परविरोधी भूमिकांची सांगड घालण्याचे काम हे 'नागरिकरणाची प्रक्रिया' म्हणून ओळखले जाते. याचा अर्थ असंस्कृत समाजावर तात्पुरत्या काळासाठी राजकीय अवलंबित्व किंवा माफकत्व लादणे आणि त्या समाजांना उदार मतवादी संस्था व स्वशासन यासाठी संक्षम बनवणे. [१३]

संशोधकाने वसाहतवादी या संकल्पनेचा उपयोग वसाहतवादी काळामध्ये भारतामधील शोषित, पीडित, वंचित समाजास जो त्यांचा दबलेला आवाज त्यांचे प्रश्न इंग्रज राजवटीच्या काळात मांडण्यासाठी परवानगी मिळाली. याच काळात भारतातील प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या विरोधात लिखाण वाचन करण्यास इथल्या शोषित समाजास परवानगी मिळाली. म्हणून येथील दबलेल्या लोकांनी वसाहतवादी धोरणाला जवळ केले. त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, न्या. रानडे, राजाराम मोहन रॉय, राजश्री शाहू महाराज यांनी याच काळामध्ये प्रचलित प्रथा होत्या. त्या प्रथांच्या विरोधी लिखाण करून न्युजपेपर, पुस्तके, मासिके यांच्या माध्यमातून समाजामध्ये प्रबोधन केले. म्हणून पुणे जिल्ह्याच्या चळवळीचे योगदान या विषयाच्या अनुषंगाने साहित्याचे परीक्षण करताना वसाहतवादी काळाचा उल्लेख करणे महत्त्वाचे आहे. याच काळात लेखन व वाचन समाज बदलासाठी महत्त्वाचे आहे. इंग्रजांनी भारतातील आदिवासी व मागास जमातीची भाषा शिकली. भाषेमुळे त्यांना या ठिकाणच्या समस्या जाणवल्या व त्या अनुषंगाने त्यांनी वसाहतवादी धोरण राबवले. म्हणून साहित्याचे परीक्षण करताना वसाहतवादी काळ व उत्तर वसाहतकाळ अशा दोन काळानुसार साहित्याची विभागणी करून सदंर्भ साहित्याचा आढावा घेण्यात आला.

**१. ''दर्पण व दिग्दर्शक –: बाळशास्त्री जांभेकर– १८१२ ते १९४६''**[१४]

यांना मराठी वृत्तपत्राचे जनक, सामजसुधारक, इतिहास संशोधक व विचारवंत म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रातील सांस्कृतिक इतिहासामध्ये 'दर्पण व दिग्दर्शन' या नियतकालीकामुळे नेहमी हे स्मरणार्थ राहिले आहे. पाश्चात्य विचारांचे स्वागत करण्याची

भूमिका प्रथम दर्पणमधून त्यांनी मांडली. लोकांच्या मनावर संस्कार करण्याचे काम दर्पण व दिग्दर्शन अशा या नियतकालीकामध्ये केले. म्हणून आधुनिक महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाची गंगोत्री म्हणून त्यांना ओळखले जाते. ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण या वृत्तपत्राने मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरू झाले. दर्पण या वृत्तपत्राने मराठी वृत्तपत्र सृष्टीत नवे पर्व सुरू केले. जांभेकरांनी स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, लोकशाही, राष्ट्रनिष्ठा, बुद्धी प्रामाण्यवाद इ. तत्वे आपल्या लेखनातून समाजासमोर मांडली. त्यानंतर जांभेकरांच्या मार्गदशनाखाली दिग्दर्शन हे मासिक सुरू झाले. जांभेकर हे स्वत: या मासिकाचे जनक व संपादक होते

## २. ''महात्मा ज्योतीबा फुले– १८२७ ते १८९०''[१५]

महात्मा ज्योतीबा फुले यांनी स्वांतत्र पुर्व काळाखंडात विविध ग्रंथ लिहून समाज प्रबोधन करण्याचे काम केले आहे. धर्माच्या नावाखाली शुद्रातील अतिशुद्रांचे शोषण कसे केले जाते, यासंबधी फुले यांनी ब्राम्हणांचे कसब या ग्रथांत विस्ताराने लिहले आहे. शुद्रांच्या लग्नात, शुद्रांच्या घरभरणीच्या वेळी, शुद्रांच्या संसार खटल्यात, शुद्रांच्या अंतकाळी ब्राम्हण अडवणूक करतात, त्यांची फसवणूक करतात, याचे अत्यंत यर्थात चित्रण या ग्रथांत केले आहे.

जन्मपत्रिका, लग्नपत्रिका, विधी, रामनवमी, हनुमान जयंती, श्रावण महिन्याचा शेवटचा सोमवार नरक चतुर्दशी, विजयादशमी, लक्ष्मीपुजन, बलिप्रतिपदा, मकरसंक्रांत, महाशिवरात्री अशा विविध प्रसंगी भट ब्राम्हण, शुद्रातील अतिशुद्रांचे आर्थिक शोषण कसे करतात व त्यांची अडवणूक कशी केली जाते, या संबधी अत्यंत विस्ताराने लिहिले आहे.

## ३. ''विष्णुशास्त्री पंडीत– १८२७ ते १८७६''[१६]

**इंदुप्रकाश** हे साप्ताहिक २ जानेवारी १८६२ मध्ये विष्णुशास्त्री पंडीत यांनी सुरू केले. मुंबईतील सुशिक्षित समाजात जो विचार जोपसण्यासाठी जात होता. त्या विचारांना पाठबळ देण्याचे काम या साप्ताहिक केले. हे साप्ताहिक १८६२ ते १९२४ असे ६२ वर्षे सुरू होते. हे साप्ताहिक भारतीय स्वातंत्र्य चळवळीस पूरक आणि ब्रिटीश वसाहतवादी राजवटीवर टिका करणारे होते. लोकहितवादी, न्यायमूर्ती रानडे यांनी इंदुप्रकाशमध्ये लेखन केले.

**''डॉ. बाबासाहेब आंबेडकर २०१२ अस्पृश्य मुळचे कोण ''[१७]**

- या पुस्तकामध्ये डॉ. आंबेडकरांनी सहा प्रकरणे तयार केली आहेत. पहिल्या प्रकरणात अहिंदुतील अस्पृश्यता व हिंदुतील अस्पृश्यता कशी होती, ही जातीची उतरंड हिंदू व्यवस्थेने आपल्या हिताच्या दृष्टीकोनातून निर्माण केली होती.
- दुसऱ्या प्रकरणात – अस्पृश्य लोक गावाबाहेर का राहतात, अस्पृश्य हे वाताहत झालेले लोक आहेत काय, अन्यत्र अशी उदाहरणे आहेत काय, अशा विभक्ती वसाहत अन्य देशातून नष्ट झालेल्या आहेत काय, असे विचार दुसऱ्या प्रकरणामध्ये मांडले आहेत.
- तिसऱ्या प्रकरणामध्ये अस्पृश्यतेचे नेमके मुळ काय आहे, वंशभेद की उदयोगधंदे असे या प्रकरणात मांडले.
- चौथ्या प्रकरणात – अस्पृश्यतेचे मूळ हे बौद्ध धर्माचा तिरस्कार की गोमास भक्षण असे आहे.
- तर पाचव्या प्रकरणात हिंदूंनी कधीही गोमांस खाल्ले नाही काय, ब्राम्हणेतरांना गोमांस भक्षणाचा त्याग का केला, ब्राम्हण शाकाहारी कशामुळे बनले, गोमांस भक्षणाने वाताहत झालेले लोक अस्पृश्य कसे बनले.
- प्रकरण सहामध्ये अशुद्ध आणि अपवित्र,वाताहत झालेले लोक अस्पृश्य केव्हा बनले
- डॉ. आंबेडकरांनी आपल्या या पुस्तकाच्या माध्यमातून समाजातील वास्तवता काय आहे, हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

### ४. ''गोपाळ गणेश आगरकर– १८५६ते१८९५''[१८]

**सुधारक, केसरी** –: महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक चळवळीच्या इतिहासात गोपाळ गणेश आगरकर यांचे अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. त्यांनी सामाजिक आर्थिक प्रश्नांसंबंधी चिंतन करून सुधारक या पत्रातून सामाजिक व आर्थिक प्रकाश टाकून महाराष्ट्राचे खूप मोठे वैचारिक प्रबोधन केले आहे. विरोधाची व निंदेची पर्वा न करता समाजसुधारण्याचा पताका आयुष्यभर घेउन फिरले. इ.स. १८८१ ते १८८९ या काळात त्यांनी केसरीचे संपादक म्हणून काम पाहिले. जॉन स्टुअर्ट मील, ऑगस्ट कॉम्त, हर्बट स्पेन्सर यांच्या तत्त्वांचा पगडा आगरकरांच्या विचारांवर दिसून येतो. ४ जानेवारी १८८१ रोजी केसरी हे मराठी साप्ताहिक आगरकरांच्या संपादकीय काळात सुरू झाले. केसरीमध्ये प्रामुख्याने लोकांना त्यांच्या हक्कांची

जाणीव करून देणे, जुन्या सामाजिक चालीरिती, रूढी, परंपरा यांची जाणीव करूण देणे व नवविज्ञानवादी समाज निर्माण करणे, हे केसरीचे उद्दिष्ट होते. संपादक या नात्याने आगरकरांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक धार्मिक अशा विविध विषयांवर लेखन केले. इ. १८८६ मध्ये सुधारक हे साप्ताहिक आगरकरांनी सुरूवात केले. समाजातील दोष लोकांपुढे मांडणे, ते दूर करण्यासाठी उपाय सुचवणे व युरोपियन समाजव्यवस्थेत अनुकरण करण्यासारखे काम आगरकरांनी सुरू केले. सुधारक पत्राद्वारे आगरकरांनी प्रचलित चालीरिती, रूढी, आचार, विचार, व्यवहारातील ढोंग व दांभीकपणा अशा वर्तनावर बोट ठेवले. सदर संशोधनात वरील संदर्भाचा आढावा उपयुक्त आहे.

## ५. ''लोकमान्य टिळक– १८८१ ते १९२०''[१९]

लोकमान्य टिळकांनी जनतेला स्वातंत्र चळवळीमध्ये सक्रिय करण्यासाठी व सामाजिक परीवर्तनासाठी जनजागृतीचा एक महत्त्वाचा भाग या विचारांनी १८८१ मध्ये केसरी हे वृत्तपत्र सुरू केले. भारतीय स्वातंत्र लढ्यामध्ये टिळक व गांधी या दोन पर्वात आणि त्यानंतरच्या कालखंडात संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत केसरीने राज्यातील जनतेच्या विविध प्रश्न व समस्यांना वाचा फोडण्याचे कामही केले आहे. केसरी, ज्ञानप्रकाश ही वृत्तपत्रे तालुका व शहरात येत असत. तो काळ राजकीय संक्रमणाचा होता, त्यामुळे वर्तमानपत्रे वाचकांची आवडीची होती. त्या काळात दृकश्राव्य ही माध्यमे उपलब्ध नव्हती. अगदी १९६० पर्यंत रेडिओसुद्धा ग्रामीण भागात फारच दुर्मीळ होता. त्यामुळे जन प्रसारासाठी प्रसारमाध्यमांचे काम केसरी वृत्तपत्राने पार पाडले. तालुकास्तरीय व ग्रामीण भागात बहुसंख्य जनतेला जीवन जगताना प्लेग, देवी, नारू यांसारख्या साथीच्या रोगांची लागण होत होती. वैद्यकीय सुविधांचा अभाव, वारंवार पडणारे दुष्काळ, कर्ज वसुली, सावकारी, निरक्षरता, शैक्षणिक धोरणे, टिळकांनी इंग्रजाच्या विरोधात केसरी वर्तमानपत्राच्या माध्यमातून लोकांसमोर आपली मते मांडली व लिखाण केले. टिळकांनी ब्रिटीशांशी झगडून वृत्तपत्राला स्वातंत्र्यही मिळविले.

## ६. ''महात्मा गांधी–हरिजन– १८६९ ते १९४८''[२०]

महात्मा गांधीनी १९३३ मध्ये इंग्रजीतून हरिजन हे साप्ताहिक वृत्तपत्र सुरू केले. गांधीजा म्हणतात की, हरिजन म्हणजेच 'देवाचे लोक' आणि हरिजन म्हणजे आदिवासी लोक

हे साप्ताहिक अस्पृश्य जातीच्या व समाजातील इतर लोकांपर्यंत पोहचण्याचा आणि त्यांच्याशी संवाद करण्याचा प्रयत्न महात्मा गांधीजींनी हरिजन सेवक या नियतकालीकामधून केला. हरिजन मासिकामध्ये अस्पृश्य लोकांबदल ते लिहित असत. अस्पृश्य लोकांना समाजामध्ये सामावून घेतले पाहिजे. कारण तो समाजसुद्धा आपलाच एक भाग आहे. आपण सर्वजण देवाची मुले आहोत. त्याचप्रमाणे हरिजनसुद्धा देवाची मुले आहेत. त्यांच्यामध्ये आणि आपल्यामध्ये कोणताच फरक नाही. हे महात्मा गांधीनी तत्कालीन समाजाला या नियतकालीकाच्या माध्यमातून प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला.

## ७. ''विठठल रामजी शिंदे– १८७३–१९४४''[२१]

विठठल रामजी शिंदे यांनी दलित सेवेला जन्मभर वाहून घेतले. त्यांना गांधी युगाच्या आधी सर्वांगीण सुधारणावादाचा पुरस्कार करणारे विचारवंत म्हणून ओळखले जाते. अस्पृश्य निवारण करण्याच्या कामी त्यांचे कार्य महत्त्वाचे होते. विठठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यांच्या उन्नतीचे कार्य करण्याचा निर्णय भिंगार या अहमदनगर गावाजवळच्या असपृश्यांच्या सभेत जाहीर केला. १९०६ साली त्यांनी ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लास मिशनची स्थापना केली. त्यांच्यावर हर्बट स्पेन्सरच्या ग्रंथांचा व मॅक्समुलरच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव होता. १९३३ साली त्यांनी भारतीय ''अस्पृश्यतेचा प्रश्न'' हा ग्रंथ लिहून अस्पृश्यांच्या दुःख आणि वेदनांची कैफियत मांडली. भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न या ग्रंथात अस्पृश्यता ही पूर्व संस्कृतीतून आली असावी, अस्पृश्य जुन्या काळाचे राजे होते. अस्पृश्य धर्मांने बौद्ध होते, अस्पृश्यतेचा विकास कसा झाला. महाराष्ट्रातील मुळची वस्ती महार व मांग समाजाची असावी व भारतीय समाज हा त्रैवर्णिय समाज असावा, असे निष्कर्ष नोंदवले आहेत.

## ८. ''केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे''– १८८५ ते १९७३''[२२]

प्रबोधनकार ठाकरे हे मराठी पत्रकार, समाजसुधारक, वक्ते व संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे पुढारी होते. महात्मा फुले हे त्यांचे आदर्श होते. समाजसुधारणा हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय होते. प्रबोधनकार ठाकरे यांनी ''देवळाचा धर्म आणि धर्माची देवळे'' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकांमध्ये पुजाऱ्यांच्या स्वरूपात बहुजन समाजातील लोकांनी मंदीरे काबीज केली परंतु देवळांच्या रूपाने कोट्यवधी रूपयांचे उत्पन्न समाजाच्या सुधारणासाठी व

प्रगतीसाठी कसे वापरता येईल, या विषयीचे विश्लेषण या पुस्तकात करण्यात आले आहे. शाळा, कॉलेज, प्रयोगशाळा, दवाखाने, अनाथाश्रम, सार्वजनिक वाचनालये, मंदिरे, सस्नेस्ह भोजन, शाळा आशा विविध प्रकारे देश उद्धारक गोष्टींसाठी देवळांचा सदुपयोग होऊ शकतो, यावर प्रबोधनकार ठाकरेंनी प्रकाश टाकला.

## ९. ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर– १८९१ ते १९५६''[२३]

- **मूकनायक**– डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे पाक्षिक इ.स. १९२० मध्ये सुरू केले. या पत्राच्या शिर्षभागी संत तुकारामांची वचने असत. मूकनायक या पत्रामधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांचे स्थान मजबूत केलेया पत्रामधून विविध विचार, समाचार, पत्रिका, यांसारखी सदरे चालवली जात. या पत्राचे एकूण १९ अंक उपलब्ध आहेत.
- **बहिष्कृत भारत**–: ३ एप्रिल १९२७ रोजी डॉ. आंबेडकरांनी बहिष्कृत वर्गाच्या चळवळीचा प्रसार करण्यासाठी बहिष्कृत भारत या मुखपत्राची निर्मिती केली. या पत्रामधून डॉ. आंबेडकर बिनतोड व तार्किक युक्तिवाद, वास्तविक व नेमके लेखन, समाजाला जागे करण्याची तळमळ त्यांच्या लेखनातून दिसून येते. डॉ. आंबेडकरांनी पुन्हा शतपत्रे, बहिष्कृत भारतातून प्रकाशित केले. बहिष्कृत भारत या मुकपत्राचा केंद्रबिंदू दलित बांधवांची उन्नती हाच होता.
- **जनता**–: इस.१९३० मध्ये जनता हे पाक्षिक डॉ. आंबेडकरांनी सुरू केले. डॉ. आंबेडकर स्वत: या पत्रातून लेखन करीत धर्मातरांची भूमिका, स्वतंत्र मजूर पक्षाची भूमिका याच पत्रामधून बाबासाहेबांनी मांडली होती. वर्तमानपत्र हे अस्पृश्यांच्या चळवळीला जिवंत ठेवण्याची एक संजीवनी आहे, अशी आंबेडकरांची धारणा होती. म्हणून जनता या पत्रकाला डॉ. आंबेडकरांनी २९ वर्ष जीवदान दिले.

## २.५.२ उत्तर वसाहतवाद :–

उत्तर वसाहतवादी काळामध्ये उत्तर संरचनावादी झाक देरीदा म्हणतात  की ज्ञान व ज्ञानमिंमासा या संकल्पना उत्तर आधुनिकतावादी प्रणालीच्या संदर्भात महत्त्वाच्या मानल्या जातात उत्तर आधुनिकवादी साहित्येमीमांसेनुसार सध्याच्या सर्जनशील लेखकांसमोर नानाविध व विपुल पर्याय खुले आहेत परंतु त्यामुळेच त्यांच्या वापरा बद्दल आणि अस्सलपणाबद्दल त्यांच्या मनात संदेह व अनिश्चितताही निर्माण झाली आहे. साहित्यकृतीच्या अर्थ निर्णयावरील अधिकारशाहीला विरोध हे उत्तर आधुनिकतावादाचे एक प्रमुख लक्षण ठरते जादुई वास्तववाद हा नावाचा वाङ्मयप्रकार उत्तर आधुनिकतावादी वाङ्मय चळवळीतून पुढे आला. [२४]

सदर संशोधनामध्ये संशोधकाने उत्तर वसाहतवादी साहित्याचेही साहित्य परीक्षण केले आहे. वाचन चळवळीच्या समाजामध्ये कशी रुजली व त्या वाचन साहित्याचा जनसामान्य माणसाला काय फायदा झाला. पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, सोशल माध्यमे यातून लोकांमध्ये काय बदल झाला समाजाला नेमकी कोणती प्रेरणा मिळाली हा उद्देश समोर ठेवून साहित्याचे परीक्षण केलेले आहे. ते पुढीलप्रमाणे,

### १. ''डॉ.बाळासाहेब सोनावणे –विद्रोही कबीर''[२५]

डॉ. बाळासाहेब सोनावणे हे आधुनिक पिढीतील लेखक,वाचक, अनुवादक म्हणून ओळखले जातात. भटक्या विमुक्तांचे मुक्त चिंतन, जात पंचायतीच्या निमित्ताने उपेक्षितांचे प्रतिज्ञापत्र यांसारखी विविध प्रबोधनात्मक पुस्तके त्यांनी प्रकाशित केले आहेत.

‘विद्रोही कबीर हे नव्याने प्रकाशित झालेले हे त्यांचे पुस्तक वाचन चळवळ अधिक विकसित करण्यास हातभार लावणारे आहे. जवळपास सहाशे वर्षापूर्वी जातीयता, धार्मिकता, अमानवियता, अंधश्रद्धा यावर कडाडून टीका करून मानवीय समाजाचे स्वप्न पाहिले होते. पुढील काळात त्यांचे योगदान व उपयोगीता लक्षात घेता डॉ. आंबेडकरांनी कबीरांना गुरू मानले. विद्रोही कबीर या पुस्तकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे गुरू कबीर या विषयी सविस्तर मांडणी करून वैचारिक धागा जोडला आहे. तो परिवर्तनवादी चळवळीस पूरक ठरणारा आहे. तथागत गौतमबुद्ध आणि संतकबीरांचा वैचारिक संबंध व कार्यकाळ उलघडण्याच्या बरोबरच संत कबीर, कवी कबीर, मानतावादी, विद्रोही कबीर, समतावादी कबीर, स्त्रीवादी

कबीर आशा मुदयांच्या आधारे कबीरांची वैचारिक प्रतिभा स्पष्ट करून वाचन चळवळीस भरीव योगदान दिले आहे

## २. ''अंधश्रद्धा निमूर्लन वार्तापत्र – संपादक राजीव देशपांडे''[२६]

अंधश्रद्धा निर्मूनल हे वार्तापत्र गेल्या २९ वर्षापासून अविरत चालु आहे. महाराष्ट्रातील सर्वाधिक खपाचे वैज्ञानिक मनोवृत्तीचे मासिक म्हणून याची ओळख आहे. समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रूजवण्यासाठी लेख, कार्यकर्ता परिचय, धार्मिक स्थळांची चिकित्सा इ. लेख प्रकाशित करून समाज प्रबोधन केले जाते. याचबरोबर धर्मनिरपेक्षता, अविष्कार स्वातंत्र्य, वैज्ञानिक जाणिवा व विवेकवादा विरोधात असलेी धार्मिकता, अतिरेकेपणा, अंधश्रद्धा, जादूटोणा तंत्रविज्ञानचा विरोध करून स्वस्थ समाज निर्मितीसाठी हे मासिक काम करते आहे.

## ३.''बळीराजाः मुख्य संपादक, नितीन भोसले''[२७]

बळीराजा हे मासिक आधुनिक व्यापारी शेतीचे मासिक म्हणून ओळखले जाते. १९९२ साली सुरू झालेले हे मासिक जवळपास ४५ वर्ष आधुनिक शेतीचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यत पोहचवित आहे. शाश्वत सेंद्रिय शेती,फळबागांची काळजी, ठिबक सिंचन, गटशेती यांसारखे विविध प्रयोग, तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेती केली जाते. या मासिकाचे संपादक भोसले यांनी विविध चर्चासत्रे, परीसंवाद घेउन गेल्या सोळा वर्षात एकविस मराठी, नऊ हिंदी, आठ इंग्रजी व पाच गुजराती माहितीपटांची निर्मिती करून शेतकऱ्यांपर्यंत माहिती पोहचविली आहे. शेतीसाठी वाहून घेतलेल्या या मासिकाने शेतीला प्रतिष्ठीत उदयोग बनवण्याचे एक स्वप्न पाहिले आहे.

## ४. ''किशोर शां. काळे : कोल्हटयाचे पोर''[२८]

१९९४ साली प्रकाशित झालेले कोल्हटयाचे पोर हे आत्मकथन दोन वेळेस प्रकाशित करण्यात आले आहे. समाजाने नाकारलेल्या व आई वडिलांच्या प्रेमाला पारख्या झालेल्या मुलाची वास्तववादी कथा या आत्मकथनात व्यक्त झाली आहे. कोल्हाटी समाजात एका नाचणारनीच्या पोटी जन्म घेत नाजायज आवलाद हे समाजाने दिलेले सर्टिफिकेट बाजूला ठेवून डॉ. ही पदवी या मुलाने पादाक्रांत केली आहे. सामाजाने लादलेले नाचणारीन हे पालुपद घेऊन

आयुष्यभर वेदनांचा काळोख पाहणारी आई यामध्ये अधोरेखित केली आहे. किशोर शांताबाई काळेच्या रूपाने कोल्हाटी समाजाच्या रूपात देखील चित्रण या पुस्तकात करण्यात आले आहे. शिका, संघटीत व्हा व संर्घषकरा हा मंत्र घेऊन किशोर काळे नावाचा मुलगा शिकून डॉक्टर होतो, आणि समाज सेवाही करतो, हीच सामाजिक बांधिलकी या पुस्तकातून व्यक्त झाली आहे.

## ५. ''मिळून साऱ्या जणीःमुख्य संपादक विद्याबाळ''[२९]

मिळून साऱ्याजणी – ऑगस्ट १९८९ साली सुरू झालेले मिळून साऱ्या जणी हे मासिक अखंडीत चालू आहे. या मासिकामध्ये सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, साहित्यिक घटनांचा आढावा घेतला जातो. या मासिकामधून कथा, कविता प्रकाशित करून नवीन लेखकाला एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते. कमवत्या व न कमवत्या स्त्रियांचा आर्थिक दृष्टीकोन या मासिकामधून अधोरेखित केला जातो. एकूणच परिवर्तनाकडे घेऊन जाणारे हे मासिक आहे. वैज्ञानिक दृष्टीकोन, मानवतावाद, समाज सुधारणेचा वसा या मासिकाने कायम राबवला आहे. धार्मिक वृत्ती, अंधश्रद्धा, विचार शून्यता यावरती देखील या मासिकामधून प्रकाश टाकला जातो.

## ६. ''परिवर्तनाचा वाटसरू :सपांदक अभय कांता''[३०]

परिर्वतनाचा वाटसरू हे पाक्षिक गेले २० वर्ष प्रकाशित केले जात आहे. हे पाक्षिक समता वादावर आधारित नवसामाज निर्मितीसाठी बांधील आहे. हे पाक्षिक कोणत्याही वशिष्ट राजकीय विचार धारणेशी बांधील किंवा संबधित नाही. वैचारिक भूमिका या आधारे मांडणारे, संघटनात्मक सतत कार्यरत असल्याने हा विचारमंच सतत कार्यरत ठेवला. वाटसरूचे लाईफ मिशन राहिले आहे. राजकीय, सामाजिक वातावरणामध्ये वाढलेली हिंसा, मारामाऱ्या, बलत्कार, लैंगिक अत्याचार यांचा खोलवर आणि वेगवेगळ्या पातळीवर शोध घ्यायला हवा. विषमतेच्या आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि सामाजिक, लैगिंक अविष्कारांचा अभ्यास होणे गरजेचे असल्याने वाटसरू या पाक्षिकाने या विषयी लेखन आणि संशोधनास वाहून घेतले आहे.

### ७. ''शरनकुमार लिंबाळे : 'प्रज्ञासूर्य' दिलीपराज''[३१]

प्रज्ञासूर्य या पुस्तकामध्ये शरनकुमार लिंबाळे यांनी दलित समाजामध्ये डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर झालेली प्रचंड सांस्कृतिक उलथापालथ चित्रित केली आहे. डॉ. आंबेडकरांच्या रूपाने गावकुसाबाहेरील काळोख अर्थात प्रज्ञासूर्येचा उदय झाल्याचे लिबांळे लिहतात. डॉ. आंबेडकरांनी हक्क आणि अधिकारांची जाणीव करून देऊन स्वाभीमान त्यांच्या गळी उतरवला व प्रस्थापित व्यवस्थेविरूद्ध संघर्ष उभा केला. बाबासाहेबांचा विचार घराघरात पोहचत गेला आणि समाजामध्ये मोठया प्रमाणात प्रगती होत गेली. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर अनेक विदवान, विचारवंत, लेखक व पत्रकारांनी आपल्या लेखनासाठी आंबेडकरांच्या विचारांचा आधार घेऊन फुले, शाहु, आंबेडकरी वैचारिक वारसा जपत समाज प्रबोधनाचे काम केले. याच प्रयत्नाचा एक भाग हे पुस्तक आहे.

### ८. ''विश्वास पाटील: 'झाडाझडती''[३२]

झाडाझडती या पुस्तकाच्या जळवपास १७ आवृत्ती प्रकाशित झाल्या आहेत. साहित्य क्षेत्रातील हा महापराक्रम वाचन क्षेत्रातील क्रंातीची दिशा दर्शक आहे. या कादंबरीकारमध्ये अनेक संघर्ष केंद्रे असल्याने जीवनाचे भीषण नाट्य चित्रित झाले आहे. विकासाच्या नावाने धरणे बांधली जातात. परंतु धरणग्रस्तांच्या विस्थापनाचा प्रश्न कायम तसाच राहतो, हे भीषण वास्तव प्रस्तुत कादंबरीकारचा गाभा आहे. ज्या परिसरामध्ये धरणांची निर्मिती झाली. तेथील विस्थापित गावकरी आजही सरकार दरबारी पुनर्विकासाठी चकरा मारून थकला आहे. यातूनच निर्माण होणारी संघर्ष केद्रे या कादंबरीत चित्रीत करण्यात आली आहेत. ही कादंबरी हजारो धरणग्रस्तांचे प्रतिनिधीत्व करत आहे.

### ९. ''डॉ. नरेंद्र जाधव: आमचा बाप व आम्ही''[३३]

आमचा बाप व आम्ही या पुस्तकाचे प्रथम प्रकाशन २ डिसेंबर १९९३ साली करण्यात आले. यानंतर या पुस्तकाच्या जवळपास २० आवृत्या प्रकाशित झाल्या. आमचा बाप व आम्ही या पुस्तकामध्ये एका समाजाची कथा चित्रित आहे. या पुस्तकामध्ये एका निर्मळ बाप–मुलाच्या जिव्हाळयाच्या नात्यावर प्रकाश टाकला आहे. एक सामान्य बाप आपल्या मुलाला लढाऊ बाणा

देताना 'किसीसे डरना मत' हा मंत्र देतो डॉ. आंबेडकरांच्या विचाराने व चळवळीने प्रभावीत झालेल्या बापाने जातीयतेची व दारिद्र्याची भीती कधी ही बाळगली नाही. त्यावर मात करून आनंदाची पेरणी आपल्या संसारात करत राहिले. आपल्या मुलांवरती संस्कार करून कोणत्याही क्षेत्रात जा व तेथे सर्वोच्च यश मिळवा, असा आदेश दिला आणि या आदेशाचे पूर्णत: पालन करून त्यांच्या मुलांनी सर्वोच्च पदे पादाक्रांत केल्याचे दिसते आहे.

## १०. ''वि. स. खांडेकर: अमृतवेल''[३४]

मराठी साहित्यातील प्रसिद्ध कादंबरीकार वि.स. खांडेकर यांची अमृतवेल ही १९६७ साली प्रकाशित झालेली कादंबरीकार आहे. या कादंबरीकारच्या २३ आवृत्या प्रकाशित होऊन २०१२ राजी पुनर्मुद्रण करण्यात आले आहे. माणूस हा आत्मकेंद्रीत आहे. आत्मकेंद्रीततेशिवाय त्याला काहीच सुचेनासे होते, तेव्हा मनुष्य केवळ इतरांचा नव्हे तर स्वत:चाही शत्रु बनतो. हे वर्णन प्रस्तुत कादंबरीकारत वि.स. खांडेकरांनी चित्रित केले आहे.

## ११. ''त्र्यंबक नारायण अत्रे: गावगाडा''[३५]

अत्रे यांनी गावगाडा हे पुस्तक १९१५ साली लिहिले आहे. या पुस्तकामध्ये गावगाडयाच्या वास्तवाचे वर्णन करण्यात आले होते. प्रामुख्याने बलुतेदार,. आलुतेदार, वतन, वृत्तीमध्ये जाती, पोटजाती, जात, धंदे यांची कामे आधोरेखित केली आहेत. गाव मुकादमी शीर्षकाखाली देशाधिकारी म्हणून गावामधील कारभार पाहणारे पाटील, कुलकर्णी, महार, जागल्या व गावचौगुल्यांची कामे प्रस्तुत करून दिवाणी, फौजदारी, देशमुख, पाटील व कुलकर्णी यांच्या हक्काची टिपणी आहे. वतन व वेतन या प्रकरणात जिल्हाधिकारी व तालुक्याधिकाऱ्यांची कामे तसेच मुन्सिपाल्टी, जिल्हाधिकारी, तालुका बोर्ड यांसारख्या कामांचे वतन व वेतन स्पष्ट केले आहे.

## १२. ''ए.पी. जे. अब्दुल कलाम :आग्नीपंख ''[३६]

अग्निपंख हे पुस्तक भारताचे माजी राष्ट्रपती ए. पी. जे अब्दुल कलाम यांनी हे पुस्तक लिहिले. भारतातील तंत्रज्ञानाचा विकास देशाचे सार्वभौमत्व व संरक्षण सिद्धांताविषयी मनामध्ये अनेक शंका असताना हे पुस्तक प्रकाशित झाले आहे. भारताने तंत्रकौशल्यात केलेला प्रचंड

विकास भारत तंत्रज्ञानाचे नेतृत्व करू शकतो, हे सिद्ध केले आहे. ए. पी. जे अब्दुल यांनी कलाम पुस्तकाच्या सुरूवातीला स्वतःचे बालपण, कठीण प्रसंग, ताणतणाव, शाळेची फी भरण्यासाठी केलेल्या कामाचे वर्णन केले आहे. कलामांना आयुष्यात भेटलेले सहकारी खूप मोलाचे वाटतात. विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात पूर्वीच्या संशोधकांच्या खांदयावर उभे राहून आधिक योगदान देण्याचा प्रयत्न केला आहे. ए.पी. जे अब्दुल कलाम वेगवेगळ्या विभागात काम करत जीवनाची लढाई लढत राहिले. आकाश क्षेपणास्त्राच्या निर्मितीत सहभाग घेऊन मोलाची मदत केली. आधुनिक भारतातील विज्ञान क्षेत्राच्या यशापयशाचा जमाखर्च या पुस्तकात मांडला आहे. भारताच्या राष्ट्रीयभावनेची आणि विज्ञान तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात स्वावलंबी होण्यासाठी केलेल्या सहकारी प्रयत्नांची ही कथा आहे.

### १३. ''आनंद यादव: घरभिंती''[३७]

घरभिंती ही आनंद यादवांची चरित्रात्मक कादंबरी आहे. या कादंबरीचे प्रकाशन १९९२ साली झाले असून पुनर्मुद्रण २०१७ साली केले आहे. ही कादंबरी मराठी साहित्यातील मोलाचा ठेवा आहे. महाभारतातील संघर्षपूर्ण घटनांचे वर्णन म्हणजे घरभिंती ही कादंबरीकार होय. ग्रामीण साजातील सर्वसाधारण कुटूंबाची ही कहाणी आहे. जीवघेण्या आर्थिक परीस्थितीचे चक्रभाव भेदून एका तरूणाने निकराचा दिलेला लढा घरभिंती या कादंबरीकारत चित्रित करण्यात आला आहे. अंतर्बाहय विस्तृतवेध घेणारी आत्मचरित्रात्मक ग्रामीण साहित्याला अचूक दिशा देणारी ही कादंबरी आहे.

### १४. ''साधना: मुख्य संपादक, विनोद शिरसाठ''[३८]

साधना हे मासिक भारतीय स्वातंत्र्याच्या पहिल्या वर्धापनदिनी म्हणजे १५ ऑगस्ट १९४८ रोजी साने गुरूजींनी साधना साप्ताहिक सुरू केले. गेली ७० वर्षे ते अखंड प्रकाशित होत आहे. राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक विषयावरील विश्लेषणात्मक व चिकित्सक लेखन साधनातून प्रसिद्ध केले जाते. हे करताना साधनाची भूमिका भारतीय संविधानातील मूल्यांना पुढे घेऊन जाणारी राहिली आहे. गुरूजींच्या नंतर आलेल्या आचार्य जावडेकर, रावसाहेब पटवर्धन, यदुनाथ थत्ते, नानासाहेब गोरे, वसंत बापट, ग. प्र. प्रधान, डॉ. नरेंद्र दाभोळकर या संपादकांनी साधनाची ओळख वैचारिक व परिवर्तनवादी नियतकालिक अशी निर्माण केली.

याशिवाय किशोरवयीन मुलामुलींसाठी गोष्टी, लेख, बालविवाह व कुमार विशेषांक सातत्याने प्रकाशित होत राहिले.

### १५. ''योजना : मुख्य संपादक, राजेशकुमार झा''[३९]

योजना हे मासिक नियोजन आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड , तेलगु , पंजाबी , उर्दु, बंगाली, तमीळ, मल्याळम, उडीसा व आसामी या भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या र्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे योजना हे एक व्यासपीठ आहे. विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न, आणि चालू घडामोडी प्रसिद्ध करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकामधून प्रकाशित होणारे लेख अभ्यासपूर्ण असल्याने प्रत्येक क्षेत्रातील अचूक माहिती वाचकास मिळते.

### १६. ''सुगावा ः मुख्य संपादक, विलास वाघ''[४०]

सुगावा हे मासिक गेली ५० वर्षे सातत्याने प्रकाशित होत आहे. हे मासिक वैचारिक तसेच आंबेडकरवादी विचारांना केंद्रस्थानी ठेवून लेखन, कविता प्रकाशित करते आहे. या मासिकामधूनदरवर्षी निर्माण झालेले विविध प्रश्न, त्यांच्याविषयी विविध विचारवतांची मते या मासिकात लेख रूपाने प्रकाशित होताना दिसतात. आंबेडकरी चळवळीला सशक्त बनविण्यासाठी आंबेडकरांच्या विविध विचारपैलूंवरती प्रकाश टाकणारे लेख व कविता यातून प्रकाशित होत राहतात. दलित समाज आणि राजकारण, दलित समाजावरील अन्याय, अत्याचार डॉ. आंबेडकर आणि मुस्लिम समाज, ओ.बी.सी., डॉ. आंबेडकर आणि भटके यांसारख्या प्रश्नांविषयी सातत्याने चर्चा करून आंबेडकरी विचार जनमानसांपर्यंत पोहचविण्याचे काम सुगावा हे मासिक करते आहे.

### १७. ''समाज प्रबोधन पत्रिका''[४१]

गेली ५८ वर्ष अविरतपणे प्रकाशित केली जात आहे. या मासिकामधून प्रकाशित होणारे लेख सामाजिक तसेच चिकित्सक असतात, त्यातील चौकट व विश्लेषणात्मक मांडणी समाज प्रबोधन पत्रिकेतील लेखाची वैशिष्ट्ये होत. या पत्रिकेमधून नविन प्रकाशित होणारी पुस्तकांची पुस्तक परीक्षण देखील प्रकाशित केले जाते. समाजातिल विविध प्रश्न, जागतिक बाजारपेठ,

जागतिक राजकारण, भारतीय शेती आणि औद्योगीकरण, इतिहास संशोधन, समाजातील जात व वर्णव्यवस्था, पायाभूत गुंतवणूक व आर्थिक विकास, ग्रामीण शाश्वत विकास, द्रारिद्र्य निर्मूलन, पर्यटन यांसारख्या विविध प्रश्नांवर प्रकाश टाकणारे लेख, आकृत्या आणि फोटोसहित प्रकाशित करून माहिती तंत्रज्ञानाचा फायदा समाजातील शेवटच्या घटकांर्पेत ही पत्रिका पोहचविते.

## १८. ''नव भारत : मुख्य संपादक, वसंत पळसीकर''[४२]

नव भारत हे मासिक गेले ७२ वर्ष प्रकाशित होत आले आहे. मानवाच्या व मानवीय संस्कृतीचा विकास व उन्नतीस पोषक होईल, अशा प्रकारे विचार या मासिकामधून व्यक्त होतात आणि हेच या मासिकाचे ध्येय व उद्दिष्ट आहे. या मासिकात प्रकाशित होणाऱ्या लेखांचा कोणताही विशिष्ट हेतू नसून जीवनविषयक व सांस्कृतिक मूल्यांसंबंधी दृष्टीकोन विकसित करण्याचा प्रयत्न आहे. समाजाचा व व्यक्तीचा वैचारिक विकास व्हावा, सांस्कृतिक मूल्य ठरवली, जोपासली व अंगिकारली जावी, यासाठी हे मासिक उपयुक्त आहे.

## १९. ''आंदोलन : मुख्य संपादक, मेधा पाटकर''[४३]

आंदोलन शाश्वत विकासाठी हे मासिक गेली दहा अकरा वर्ष प्रकाशित केले जात आहे. समाजातील विविध प्रश्नांवरती या मासिकातून आवाज उठवला जातो. नर्मदा आंदोलन, शेतकऱ्यांचे प्रश्न, त्यांची दुरव्यस्था, दिशाभूल करणारी सरकारी धोरणे, शिक्षणाकडे बघण्याचा परिवर्तनवादी दृष्टीकोन विकसित करण्यासाठी या मासिकातून सातत्याने लेखन केले जाते. शेतकरी व शेत मजूर यांचे प्रश्न, बळजबरीने होणारे भू–संपादन या विरूद्ध लढण्याची भूमिका या मासिकामधून सातत्याने मांडली जात आहे.

## २०. ''डॉ. नारायण कांबळे : राजर्षी शाहू संघर्ष पर्व''[४४]

राजर्षी शाहू महाराजांचे महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणेमध्ये उल्लेखनीय स्थान आहे. आरक्षणाचे जनक म्हणून इतिहासामध्ये त्यांची ओळख आहे. राजर्षी शाहू महाराजांनी प्रस्थापित विषमता मूलक सामाजिक व्यवस्थेला दिलेले आव्हान व केलेला संघर्ष सर्वांना प्रेरणा देणारा आहे. राजर्षी शाहूंचे जीवन हे पुन्हा पुन्हा अभ्यासण्यासारखे आहे. या पुस्तकाचे महत्त्व म्हणजे आ. ह. साळुंखे यांनी लिहिलेली प्रस्तावना, प्रस्तुत पुस्तकाची मांडणी होय. सदर पुस्तकामध्ये

पहिल्या प्रकरणामध्ये सैद्धांतिक भूमिका स्पष्ट करण्यात आली. दुसऱ्या प्रकरणात सामाजिक विचारांचे समाजशास्त्रीय चिंतन या विषयी विचार मांडले आहेत. तिसऱ्या प्रकरणात राजर्षी शाहूंच्या सामाजिक विचाराची प्रेरणा शोधण्याचा प्रयत्न केला आहे. चौथ्या प्रकरणात राजर्षी शाहूंचा वैचारिक व कार्यात्मक दृष्टीकोन स्पष्ट करण्यात आला आहे. पाचव्या प्रकरणत राजर्षी शाहूंनी चालवलेली शैक्षणिक चळवळ या विषयी चिंतन करण्यात आले आहे. सहाव्या प्रकरणात सत्यशोधक व ब्राम्हणेत्तर चळवळ या संदर्भात परिशीलन करण्यात आले आहे. सातवे प्रकरण हे समारोपाचे असून त्यात राजर्षी शाहूंच्या सामाजिक चळवळीचा आढावा घेण्यात आला आहे. राजर्षी शाहू महाराज महाराष्ट्रातील स्वांतत्र्य, समता व विकासातील चळवळीतील दिपस्तंभ होते. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला कृतीशिल अर्थ देण्याचे काम त्यांनी केले. सामाजिक न्यायापासून वंचित असणाऱ्या समूहाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून सन्मानाने जगवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्यातील नेतृत्व गुणांची जाणीव त्यांना करून दिली. त्यांना प्रेरणा व प्रोत्साहन दिले. बाबासाहेबांच्या कार्यात स्वत: सहभागी राहून सामाजिक चळवळीला पुढे नेण्याचे कामराजर्षी शाहूंनी केले. राजर्षी शाूंचे विविध अंगी विवेचन हे नव्याने समजून घेण्याच्या दृष्टीने हा ग्रंथ उपयुक्त आहे.

## २१. ''प्रशांत बनसोडे : पंचनामा सांस्कृतिक भांडवलशाहीचा ''[४५]

पंचनामा सांस्कृतिक भांडवलशाहीचा या पुस्तकाचे प्रथम प्रकाशन २ फेब्रुवारी २०१५ साली करण्यात आले या पुस्तकामध्ये सामाजिक रचनेच्या प्रक्रियेतून वारसांकडे कुटुंबाकडून संक्रमित होणारे संचित ज्ञान म्हणजे सांस्कृतिक भांडवल होय. या संचित ज्ञानात ज्ञान आणि कौशल्य या दोन्हींचा समावेश होतो. ज्यांच्याकडे या सांस्कृतिक भांडवलाचे पाठबळ आहे, त्यांना शैक्षणिक यश मिळणे समाजशास्त्रज्ञ बोर्देऊ यांनी मांडलेल्या सांस्कृतिक भांडवलाच्या संकल्पनेचा एक परिणाम आहे. सांस्कृतिक भांडवल सामाजिक असमानतेचे पुनरूत्पादन कसे करते आणि सांस्कृतिक भांडवलाचा अभाव शिक्षण व्यवस्थेतून सांस्कृतिक आणि सामाजिक बहिष्कृततेला कारणीभूत कसा ठरतो, याच्या आकनलासाठी ही मदत करते. बोर्देऊ यांनी मांडलेली आणि अजूनही विकसीत होत असलेली सांस्कृतिक भांडवलाची संकल्पना भारतातील जात वर्ग वास्तवतेच्या संदर्भात पडताळून पाहण्याचा हा प्रयत्न आहे. परंपरागत जाती व्यवस्थेने रुजविलेल्या सांस्कृतिक शिक्षण आणि त्या सोबत येणाऱ्या सत्ता प्रतीष्ठेची असमान विभागणी

अभिप्रेत होती. कुटुंबाकडील सांस्कृतिक भांडवलाच्या संदर्भात गुणवत्तेचा विचार होणे गरजेचे आहे. अभिजन कुटुंबाकडील सांस्कृतिक भांडवल कुटुंबातील नव्या सदस्याकडे आपोआप हस्तांतरीत होत असते आणि या विशेष अधिकाराचे रूपांतर गुणवतेत होत असते. ज्यांच्याकडे त्याचा अभाव असतो, ते उच्च शिक्षणातून बहिष्कृत होण्याची शक्यता वाढते. अनुसूचित जाती–जमातीतील सांस्कृतिक भांडवलाच्या अभावाला जबाबदार असलेले घटक व्यवस्थात्मक आहेत. त्यांच्यावर मात करणे इ. घटक लेखकाने अधोरेखित केले आहेत.

**''योगीराज बागूल : तमाशा : विठाबाईच्या आयुष्याचा''** [४६]

तमाशा : विठाबाईच्या आयुष्याचा हे आत्मचरित्र योगीराज बागूल यांनी लिहिले आहे. नवीन सुधारित आवृत्ती जून २०११ साली ग्रंथाली प्रकाशन मुंबई यांनी प्रकाशित केली आहे. तमाशा ही लोकप्रिय कला जिवंत ठेवण्यासाठी जीवाचे रान आणि आयुष्याचं वाळवण केलेल्या तमाम कलावंतास हे पुस्तक अर्पण केलं आहे. टिचभर पोटाची खळगी भरण्यासाठी चाळ बांधून वयाच्या १३ व्या वर्षापासून तमाशा बोर्डावर पाय ठेवून तमाशा विश्वात वादळ उठविणाऱ्या विठाबाई भाऊ मांग यांचे हे आत्मचरित्र होय. विठाबाईच्या जीवनाविषयी त्यांनी केलेल्या लोककलेच्या सेवेविषयी या पुस्तकात विस्तारित विवेचन करण्यात आले आहे. आजपर्यंत तमाशा विश्वास दिग्गज कलावंत आणि कलावंतीनी होऊन गेल्या पण त्यांचे जीवनचरित्र लिहिले गेलेच असे नाही. योगिराज बागूल यांनी विठाबाईच्या चरित्राच्या माध्यमातून तमाशा व्यवस्थेवरती त्यांच्या अडचणी दुःख, वेदना, पिळवणूक, छळवणूक यावरती या पुस्तकामध्ये प्रकाश टाकला आहे.

**''लक्ष्मण माने : उपरा''** [४७]

उपरा ही लक्ष्मण माने लिखित प्रसिद्ध असे आत्मकथन आहे हे आत्मकथन ग्रंथाली प्रकाशन मुंबई येथे केले. त्याच्या पाच आवृत्त्या आणि २२ वेळा पुनर्मुद्रण आतापर्यंत झालेले आहे. उपरा या आत्मकथनामधून लेखन लक्ष्मण माने स्वतःविषयी व समाजाविषयीचे वास्तव

चित्रण मांडताना दिसतो. या समाजव्यवस्थेने व्यक्तीचे जगण्याचे अधिकार हिरावून घेऊन त्याच्यावर पिढ्यान्‌पिढ्या कसा अत्याचार व जीव कुसाबाहेर ठेवून त्यांना बहिष्कृत अशी वागणूक दिलेली आहे. हे त्यांनी या पुस्तकात मांडले आहे.

उपरा हे दलित साहित्यातील हे एक प्रसिद्ध आत्मकथन आहे या आत्मकथनावरती अनेक नामवंत लेखकांनी समीक्षात्मक लेखन केले आहे. महाराष्ट्रातील जवळ जवळ सर्वच विद्यापीठामध्ये गेल्या अनेक वर्षात पदवी व पदवीत्तर अभ्यासक्रमास होते. उपरा या आत्मकथनावरती अनेक संशोधक विद्यार्थ्यांनी एम.फिल. Ph.D. हे संशोधन अनेक विद्यार्थ्यांनी केलेले आहे.

या पुस्तकाने भटक्या–विमुक्त जाती–जमातीच्या प्रश्नावर सामाजिक मंथन सुरू झाले. भटक्यांचे प्रश्न हा सामाजिक चर्चेला विषय झाला. त्यांच्यासाठी काम करणाऱ्या मंडळीच्या कामाला चालना मिळाली तर पुस्तक लिहिण्याचे श्रम सार्थकी लागले, असे मी समजेन. पिढ्यान्‌पिढ्या बिऱ्हाड पाठीवर घेऊन गाढवाचं जिणं जगणाऱ्या मंडळीच्या वेदना समाज समाजावून घेऊ शकला, तरी खूप झालं. हे लिहिणं हाही जात–पंचायतीच्या दृष्टीने फार मोठा गुन्हा माहीत आहे. पण होणाऱ्या परिणामांना तोंड देण्याची माझी तयारी आहेच. वडिलांनी एकाच मांडवात दोन्ही छोट्या बहिर्णींची लग्न आधी उरकून टाकली आहेत, त्यामुळेच मी हे लिहिण्याचे धाडस मी करू शकलो असेल काय?

### ''दया पवार : बलुत''[४८]

बलुत हे दया पवार लिखित प्रसिद्ध आत्मकथन आहे हे आत्मकथन ग्रंथाली प्रकाशन मुंबई यांनी प्रकाशित केली असून त्याच्या सहा आवृत्त्या आणि २४ वेळा पुनर्मुद्रण झाले आहे. बलुत ही आत्मकथा नाना प्रकारच्या दुःखांनी गदगदलेल्या दगडू मारूती पवार नावाच्या माणसाची आत्मकथा आहे. पु. ल. देशपांडे आपला अभिप्राय देताना लिहितात की बलुत म्हणजे दुःखाने गदगदलेले झाड आहे. दया पवार यांचा महार जातीच्या आई–वडिलांच्या पोटी जन्म झाला. हाच त्यांचा अपराध होय. किड्यामुंग्यासारखे लाचार जीवन जगावे लागणे, हा दया

पवार यांच्या कथनाच्या पानापानावर आढळते. दगडू मारूती पवार यांच्या वाट्याला आलेले हे दुःखाचे बलुत भारतीय व्यवस्थेने त्यांच्या जन्मकाळीच त्यांच्या पदरात बांधले. अशा दाही बाजूंनी फाटलेल्या अवस्थेत जगणारा दगडू वैयक्तिक दुःखे जोजवीत न बसता दलितांच्या चळवळीत पडतो. जन्मापासून छळणारा अस्पृश्यतेचा शिक्का तो आपल्या सामाजिक जीवनातून नष्ट व्हावा म्हणून चालविलेल्या चळवळीत अमतलबी नेत्यांच्या चळवळीत वाढत जाणारी त्याची निराशा, अशा परिस्थितीत शापासारखे ठरणारे मन, ज्या आईने आपल्यासाठी एवढे डोंगराएवढे कष्ट उपसले तिला उभ्या हयातीत मी काय सुख दिले, ही टोचणी, बायकोने एकाकी घर सोडून एका म्हाताऱ्याशी लग्न करून उधळलेला संसाराचा पट, संगमवेरच्या बाजारात अंगावर फाटके लुगडे, डोक्यावर गवताचा भारा आणि पाठीला धोतराला बांधलेले तान्हे लेकरू हे तिचे अनपेक्षितपणे घडलेले दर्शन, स्वतःच्या एकलकोंड्या प्रवासात तीव्र आठवण व्हावी असा एकच पण दगडूपासून तोडून नेलेला दुवा म्हणजे लाडकी लेक, एकूण तिलाही तिच्या आईने 'खाचरा'त ठेवलेले. फाटत फाटत जाणाऱ्या जीवनाला कुठे कुठे आणि किती ठिगळे जोडायची, या ग्रंथाचे फलित सांगायचे तर असेच म्हणावे लागेल. या ग्रंथाच्या वाचनाने आपल्या निबर डोळ्यांना चिटकलेल्या आंधळ्या रूढीजन्य श्रद्धांचे सत्यदर्शनाला पारखे करणारे मोती बिंदु गळून पडतील. माणसामाणसात नवे जिव्हाळे जोडून समाजाला कृत्रिम आणि जाचक बंधनातून मुक्त करण्याचे नाव म्हणजे बलुत होय.

## ''उत्तम कांबळे : वाट तुडवताना''[४९]

सकाळ वृत्तपत्राच्या उत्तर महाराष्ट्र आवृत्तीचे संपादक उत्तम कांबळे यांची आत्मकथा दलित आत्मकथेच्या परंपरेला महत्त्वाच्या वळणावर आणून ठेवणाऱ्या ए दलित युवक समाजजीवनाच्या मुख्य प्रवाहात येतो खंबीरपणे उभा राहतो स्वतःच्या जातीच्या जीवन प्रवाहाकडे आणि मुख्य प्रवाहकडे पाहत अनुभव घेतो आणि आपली कार्यक्षमता सिद्ध करून वाट तुडवताना या आत्मकथनाद्वारे जगासमोर मांडतो ही खूप मोठी प्रेरणादाई घटना आहे.

उत्तम कांबळे आपल्या आत्मकथनासंदर्भात बोलताना लिहितात की, माझ्या पुरते बोलायचे झाले तर मी ग्रंथाच्या गावात गेलो नसतो, तर गावगाड्यात राहिलो असतो. म्हणजेच ग्रंथसंपदा ही मानव विकासास  आवश्यक असल्याचे स्पष्ट होते. सन २०१३ रोजी मनोविकास प्रकाशाने वाट तुटवताना हे आत्मकथन प्रकाशित करून सामाजिक विकासास गतीप्रधान केले आहे. व्यवस्थेबाहेरील जग आणि व्यवस्थेतील जग या दोन्हीविषयी उत्तम कांबळे यांनी अतिशय बारकाईने निरीक्षणे मांडली आहेत.

### ''आनंद यादव : झोंबी, मेहता प्रकाशन''[५०]

झोंबी ही आनंद यादवांची प्रसिद्ध कादंबरी आहे. तसे पाहता झोंबी ही एक बाल्य हरवलेले बालकांड आहे. आनंद यादव यांची आत्मकथा सत्य आणि भावनांवर आधारीत आहे. या कथेमध्ये यादव यांनी गावाकडील समाजाचे चित्रण केले आहे. शतकानुशतके दुःख आणि दारिद्र्यामध्ये व विपनावस्थेत जगणाऱ्या समाजाचे चित्रण झोंबी या कादंबरीकारत लिहिले आहे. ग्रामीण भागाचा बाज असणारे हे लेखकाचे जवळपास आत्मकथनच आहे. ग्रामीण साहित्याची चळवळ जोमाने पुढे घेऊन जात असताना आनंद यादव यांनी ग्रामीण फळीचे नेतृत्व केले आहे. आनंद यादव यांनी लैंगिक अर्थाने यशस्वी ठरलेल्या लेखकाने आपल्या बालपणाची कथा झोंबी या आत्मकथनात सांगितले आहे. आपले बालपणा आठवून बालपणातील नानाविध घटनांची एक सुंदर ललित कलाकृती निर्माण झाली आणि साहित्य जगतातील चर्चित आत्मकथन बनले. झोंबीमधील लेखनाचे तीन भाग सुरुवातीला केले होते. परंतु नंतरच्या काळात ते रद्द करून वाचकांच्या हाती ठळक स्वरूपात आत्मकथा देण्यात आली आहे. मेहता प्रकाशनाचे सुनिल मेहता ते केवळ प्रकाशक नसून झोंबीचे पालन व पोषणकर्ता आहेत.

### ''आप्पा कोरपे : मी तो हमाल' ऑगस्ट १९९९''[५१]

मी तो हमाल ही आप्पा कोरपे यांची आत्मकथा आहे. रूपाली प्रकाशन अहमदनगर यांनी १९९९ साली याची प्रकाशन केले असून ही या पुस्तकाची पाचवी आवृत्ती आहे. हमाल

हा व्यापारी वर्गाचा बैल समजला जातो. त्याच्याकडे सांगण्यासारखे किंवा ऐकण्यासारखे अनुभव काय असणार आहेत, ही समजूत या पुस्तकाने मोडीस काढली आहे. आप्पा कोरपे यांनी हमालांची संघटना बनवून हमालांचे दुःख आणि वेदना सरकार दरबारापर्यंत पोहचविण्याचे काम केले आहे. आपल्या जन्मभराचे अनुभव कोरपे यांनी बाबा आढाव आणि त्यांच्या सारख्या जाणकार व्यक्तीच्या समोर ठेवले आणि त्यातूनच मी तो हमाल या पुस्तकाची निमिर्ती झाली. आप्पा कोरपे स्वतः हमाल असल्याने ते आपले अनुभव कामगारांसमोर मांडायचे आणि हे अनुभव त्या कामगारांना स्वतःचेच वाटायचे. त्यांच्या आग्रहाखातर आपण कोरपे यांनी आपल्या सगळया आठवणी दुःख, वेदना लिहून काढल्या आणि एक एक करत हमालाचे दुख आणि वेदना शब्द रूपाने या पुस्तकाची निर्मिती झाली. आप्पा कोरपे रूपाने या पुस्तकाची निर्मिती झाली. आप्पा कोरपे यांचा जन्म दुष्काळ छायेत असलेल्या जामखेड आणि आष्टी तालुक्यातील मालवणी येथे १९२६ साली झाला. बापच वयाच्या ३५ वर्षी १२ वर्षाच्या मुलीबरोबर झालेले लग्न, घरातील अठराविश्व दारिद्र्य एकट्याच्या मजूरीवर कुटूंबात खाणारी पाच तोंड दोन भावंडे आणि बापाची दारिद्र्यामुळे झालेली होरपळ व मृत्यू आप्पा कोरपे यांनी जवळून पाहिला आपली आणि मुलाची भाकरीची सोय व्हावी म्हणून मुलाच्या समंतीने दुसऱ्या नवऱ्याशी गाठ बांधणारी त्याची आई ओली बाळंतीण असताना लेकराला सोडून गेलेली आई यासारखे दाहक अनुभव आप्पा कोरपेयांनी मी तो हमालाचा आत्मकथेमध्ये प्रामाणिकपणे मांडले. हमाल ते महाराष्ट्र राज्य हमाल माथाडी महामंडळाच्या उपाध्यापर्यंत गेल्याची कथा म्हणजेच मी तो हमाल ही आत्मकथा होय.

### ''आण्णा भाऊ साठे : फकिरा''[५२]

फकिरा ही कादंबरी आण्णाभाऊ साठे यांनी लिहिली आहे. याचे प्रकाशन डिसेंबर २०१७ मध्ये झाले. ही या कादंबरीची १९ सावी आवृत्ती आहे. या पुस्तकाचे प्रकाशन गुलाबराव मारूती कारले यांनी केले आहे. फकिरा या कादंबरीविषयी आण्णाभाऊ साठे म्हणतात की, मी या कादंबरीसोबत मी माझी कैफीयत थोडीशी सादर करत आहे. फकिरा हा माझा होता. मी जे पाहिले अनुभवले ऐकले तेच मी या कादंबरीत लिहिले. फकिराची भयंकर

घोडदौड चालू होती. तेव्हा मी पाळण्यात होतो. इंग्रजांचा खजिना लुटून भरधाव धावत तो घरी आला. माझ्या जन्माची वार्ता ऐकून आक्काच्या ओटीत ओंजळभर सुरती रूपये ओतले आणि बाळंतीणीची काळजी घ्या, असे सांगून निघून गेला. फकिरा ही कादंबरी अन्याय अत्याचाराच्या विरोध विद्रोह करणाऱ्या फकिराची जीवन कथा आहे. गावचा पाटील फकिरास म्हणतो की, काहीही करा पण जगलं पाहिजे. फकिरा धडक उठून धनदांडग्यांचे व इंग्रजाचे खजिने लुटून उपासी पोटी असणाऱ्या गोरगरिबांच्या घरामध्ये अन्न–धान्य पोहचविण्याचे काम करतो, हीच प्रेरणा जगण्यास माणसास पूरक होत असल्याने सामाजिक बदलांमध्ये या कादंबरीचे मोठे योगदान आहे.

**''भालचंद्र फडके : दलित साहित्य वेदना व विद्रोह''**[५३]

दलित–साहित्य : वेदना आणि विद्रोह या पुस्तकाचे प्रकाशन २००० साली झाले. या पुस्तकामध्ये भालचंद्र फडके यांनी समाजाचे वास्तव जाणून घेत असताना सर्व सामान्य जनतेला भारतीय समाजात नेहमी मान अपमान सहन करावा लागतो. एखाद्या व्यक्तीवर अन्याय झाला तर त्याला न्यायाच्या प्रतीक्षेत संपुर्ण जीवन जगावे लागते. त्यांच्या असे लक्षात आले की हजारो वर्षींपासून अन्याय व अत्याचार सहन करीत येथील दलित समाज जीवन जगतो आहे. नेमकी त्याची वेदना काय आहे, हे जाणून घेताना या वेदनेतून विद्रोहाचा जन्म झाला आहे. डॉ. बाबासाहेबांच्या 'दिक्षाग्रहणाच्या वेळेचे' वास्तव जवळून पाहिले आहे. त्यांच्या विचारांचे चिंतन करत होतो. त्यांच्या विचारांची मशाल घेऊन गावन गाव पेटवा असा घोष करणारी तरूण मने घडत होती.

समांतर साहित्याची चर्चा करताना कमलेश्वर म्हणाले होते की, चालताना, प्रवास करताना, कार्यालयात, कारखान्यात काम करताना, शाळेत कुठेही गेला असता क्षणाक्षणाला अपमानित व्हावे लागते. कारण दुर्बल माणसे सहन करण्याशिवाय काहीही करू शकत नाहीत. कारण गावकीचे काम नाकारणाऱ्याला मारहाण केली जाते. अपमान व अन्याय माणसाला दडपून टाकतो, तर बऱ्याच वेळेला त्याच्या मनात प्रक्षोभ विद्रोह जन्माला घालतो. आजवर सोसलेल्या छळातून त्याला एक नवी दृष्टी आली आहे आणि ती म्हणजे मी माणूस आहे. माणूसकीचे सर्व

हक्क मी मिळविनच. या लेखनाच्या माध्यमातून भालचंद्र फडके यांनी वेदना या विद्रोही कशा बनतात, हे सांगण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या पुस्तकात केला आहे.

### ''स्त्री–पुरुष तुलना– ताराबाई शिंदे लिखित : विलास खोले''[५४]

ताराबाई शिंदे लिखित स्त्री–पुरुष तुलना या पुस्तकाचे प्रथम प्रकाशन १५ ऑगस्ट १९९७ साली झाले. या पुस्तकामध्ये १९ व्या शतकातील स्त्रियांचे प्रश्न स्वतंत्रपणे व ठामपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून समस्त स्त्री जातीचे दुःख दुर व्हावे व स्त्रिला समाजात सन्मानाने जगता यावे, तिचा आत्मविश्वास वाढावा, तिला पुरुषाच्या बरोबरीने स्थान प्राप्त व्हावे, या अपेक्षेने ताराबाईंने आपले लेखन केले. तर्कशुद्ध प्रतिपादन, प्रक्षोभक मतप्रदर्शन, विवेक निष्ठ, युक्तीवाद कौशल्य, भाषाशैली या वैशिष्ट्यांनी संपन्न अशी स्त्रियांच्या दुःस्थितीची मीमांसा म्हणजे ताराबाई शिंदे यांची स्त्री–पुरुष तुलना प्रो. विलास खोले यांनी सखोल संशोधन करून १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील स्त्रियांच्या परिस्थितीवर चांगला प्रकाश पाडला. ताराबाईंच्या लेखनास निमित्त झालेल्या विजयालक्ष्मी खटल्यासंबंधीचे सन १८८१ मधील सर्व महत्त्वाचे कागदपत्र प्रो. खोले यांच्यामुळे अभ्यासकांना येथे पाहवयास मिळतात. तसेच महात्मा जोतीराव फुले यांच्या मुक्ताई या चौदा वर्षाच्या विद्यार्थीनीने लिहिलेल्या मराठीतील पहिला दलित निबंधही या पुस्तकात वाचावयास मिळतो. म्हणून या पुस्तकाच्या रूपाने समाजातील स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले आहे.

### ''माटे : अपेक्षिताचे अंतरंग''[५५]

उपेक्षितांचे अंतरंग हा माटे यांचा कथासंग्रह १९४१ मध्ये प्रसिद्ध झाला. यातील कथा माटे यांच्या सहृदय व्यक्तिमत्त्वातून जन्माला आल्या आहेत. आपल्या जवळच राहणाऱ्या पण आपण कधीच न पाहिलेल्या माणसाची रूपे या कथांतून चित्रित झाली आहेत 'बन्सीधर, तू आता कुठे जाशील?' आई आणि वडील या दोघांपासून दुरावलेल्या एका अजान बालकाची कथा एकदा आई सोबत गेलेला बन्सी यात्रेत हरवता. चोऱ्या करणाऱ्या कातकऱ्यांच्या वस्तीवर

त्याला दिवस काढावे लागतात. त्या वस्तीतले चिम्या आणि तुळशी या चुकल्या वासरावर माया करतात. तो काही दिवस त्यांच्याकडे राहतो. दरम्यान बन्सीच्या बापाने दुसरे लग्न आणि आईने नवा घरोबा केलेला असतो. खूप पायपिटी नंतर बन्सीला बाप भेटतो पण तेथे आई नसते म्हणून सुखाचा घास टाकून बन्सी बाहेर पडतो. कलेढोणला आई सापडते पण तिच्या नव्या संसारात त्याला जागा नसते. आई, बाप आहेत पण आई एका ठिकाणी तर बाप दुसरीकडे. त्यामुळे बन्सी पोरकाच राहतो. तो पुन्हा चिम्या आणि तुळशीकडे येतो. पण आता त्यांचे घरटे मोडलेले असते नियतीने बन्सीची केलेली वंचना अशा करूण नाट्यातून माटे चित्रित करतात.

**''गायकवाड लक्ष्मण : 'उचल्या', श्रीविद्या प्रकाशन, शनिवार पेठ पुणे''**[५६]

लक्ष्मण गायकवाड हे पाथरूड या जमातीचे आहेत. त्यांनी समाजव्यवस्थेत त्यांच्या वाट्याला आलेला छळ त्यांच्या या स्वकथनातून सांगितला आहे. इंग्रजांनी या जमातीवर गुन्हेगारी जात म्हणून शिक्का मारला होता. म्हणून या जमातीत जन्माला येणारी मुले जन्मताच गुन्हेगार मानली जात होते. लक्ष्मण गायकवाड जेव्हा शाळेत जायचे, तेव्हा 'चोर आला रे' म्हणून त्यांना शिवीगाळ करायचे प्रत्येक जण त्यांच्याकडे चोरटा, उचल्या म्हणून त्यांच्याकडे प्रत्येक जण बघायचा. लक्ष्मण गायकवाड यांना जातपंचायतीच्या विरोध होता की, तू शिक्षण घ्यायचे नाही. ते शिक्षण घेण्यासाठी गेले म्हणून जातीतील लोक आजारी पडले, कुणाला हगवण लागली, कुणाला ताप आला अशी त्या समाजात अंधश्रद्धा होती. समाजात खूप मोठी विषमता होती. मंदिरामध्ये प्रवेश नाकारणे, वरून पाणी वाढणे, सार्वजनिक ठिकाणी पाणी भरु न देणे. कोणतीही चूक नसताना त्यांना अपराध्याचे जीवन जगावे लागले. जातीव्यवस्थेची कैफीयत मांडताना लक्ष्मण गायकवाड म्हणतात, कळंब तालुक्यातील मोहा या गावी पारध्यांवर सरपंच आणि पोलिसांनी हल्ला केला. त्याचबरोबर ढोकी या गावी सात पारधी जिवंत कापले. इतके होऊन अस्पृश्यांना निवारण्यासाठी अनेक कायदे केले असताना जातीयता पाळणारे निर्दोष सुटतात.

सध्या समाजव्यवस्था पाहताना समाजात–जातीयता पाळणे कमी झाले असले, तरी जात ही प्रत्येकाची अस्मिता बनली आहे. लक्ष्मण गायकवाड यांनी पुस्तकाच्या लेखणाच्या

माध्यमातून त्याच्या जातीची झालेली परवड समाजाच्या समोर मांडली आहे. त्याची नोंद ही त्या त्या वेळच्या सरकारने घेतली आहे. या लेखनाच्या माध्यमातून त्यांनी त्यांच्या समाजाला एकत्रित करण्याचा प्रयत्न केला आहे, हे त्याच्या वाचनाचे व लेखनाचे श्रेय म्हणावे लागेल

## २.५.३ ''संशोधन प्रबंध''[५७]

१. **''एस. जी. महाजन''**:– यांनी सार्वजनिक वाचनालय चळवळीचा ऐतिहासिक मागोवा;१८०५ ते १९२१ असा विषय घेतलेला आहे. त्यांच्या प्रबंधामध्ये वाचनालयाचा राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक चळवळीमध्ये पश्चिम महाराष्ट्रावर सार्वजनिक वाचनालयाचा कसा प्रभाव पडला हे त्यांनी आपल्या संशोधानातून सांगितले आहे.

२. **''एम. सत्यनारायण''** :– यांनी वाचनालयांनी वाचकांना कशी माहिती पुरवली, याचा अभ्यास त्यांच्या प्रबंधामध्ये मांडला आहे. याचाच अर्थ असा की, वाचनालयाचा आणि सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास शोधनिबंधासाठी काही विचारवंतानी केला आहे.

३. **''हॅगिस आणि गोल्डिंग''**:– यांनी सार्वजनिक वाचनालयाचे समालोचन केले, दुर्गम समुदायांसाठी तरतुदी केल्या. हे साउथ लिंकन शायर्स मोबाईल लायब्ररीच्या एका घर स्टॉप क्लायंटला सार्वजनिक लायब्ररी सेवा प्रदान करण्याच्या पद्धतीचे लेखन केले आहे. लेखानुसार सेवेसाठी निवडल्या गेलेल्या चार पद्धतीचा मागोवा घेण्यात आला आहे. ज्याद्ववारे बुक केलेल्या ग्रामीण दुकानांच्या ग्रंथालये घरांची सेवा वाढवतात आणि ग्राहकांना लायब्ररीत घेऊन जातात. अभ्यासात सामाजिक समावेश, बेस्ट व्हॅल्यू आणि पब्लिक लायब्ररी स्टँडर्ड या विषयांवर प्रकाश टाकला आहे. ज्यामध्ये कर्ज हाउस स्टॉप मोबाईल लायब्ररी सर्व्हिसची जागा घेताना विचारात घ्यावे लागेल.

४. **''सातपुते''**:– २००८ मध्ये राष्ट्रीय सार्वजनिक वाचनालयाच्या भूमिकेविषयी स्पष्टीकरण दिले विकास. सार्वजनिक लायब्ररी ही एक संस्था आहे. जी देखरेख करते. शैक्षणिक, सांस्कृतिक, करमणूक वा समाजाची माहिती व त्या संबंधित हा समाजाचा अविभाज्य घटक मानला जातो. जो विचारांच्या परस्परासाठी आणि सृजनशील उपयोगात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. शैक्षणिक विकासासह आणि शैक्षणिक, सांस्कृतिक आणि माहितीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सार्वजनिक वाचनालय राष्ट्रीय विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, असे वर्णन केले आहे. या पत्रात असा निष्कर्ष काढला आहे की, सांस्कृतिक विकास आणि त्याचा सामाजिक जीवनाशी आर्थिक व औद्योगिक विकासाशी, कृषी आणि ग्रामीण विकास, मनोरंजन केंद्र आणि राजकीय चेतनांशी निकटचा संबंध आहे.

५. **''सुदानीस राव''** :– यांनी वाचनाचे महत्त्वपूर्ण वर्णन केले. उदयोन्मुख समाजातील सवयी या पेपरचा मुख्य विषय म्हणजे सार्वजनिक वाचनालयाचे महत्त्व मुलांमध्ये वाचनाची सवय वाढविण्यावर ग्रंथालयाची भूमिका आणि ज्ञान संस्था विकसित करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक गंथालय ग्रंथपालांमध्ये सेवांचा आत्मा विकसित करण्याची आवश्यकता, यावर देखील प्रकाश टाकणे. कागदामध्ये वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धती अवलंबल्या गेल्या. लेखकाने स्पष्ट केले की, सार्वजनिक ग्रंथालये ग्रंथालयांमध्ये वाचनाची सवय लावण्याच्या विविध पद्धतीची गणना करतात. मुलांना वाचनाची सवय वाढवण्यासाठी प्रवृत्त करण्यासाठी ग्रंथालयाच्या माहिती सेवांना प्रवृत्त करण्यासाठी, जागरूकता निर्माण करण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांना नियमितपणे विविध कार्यक्रम व उपक्रमांची आखणी करण्याची गरज असल्याचेही नमूद केले आहे.

६. **''कला अंजन''** :– यांनी २०१४ मध्ये सार्वजनिक ग्रंथालयांच्या भविष्यातील भूमिकेविषयी चर्चा केली. सदय ट्रेंड, ग्रंथालये संक्रमणामध्ये आणि त्यावर चर्चा केली की, ती समुदाय सांस्कृतिक केंद्र म्हणून उदयास येत आहे. हे नमूद केले गेले होते की, सार्वजनिक लायब्ररी ही एक भौतिक जागा आहे. नवीन संप्रेषण तंत्रज्ञानाचा अवलंब करून आभासी जागेवर देखील असणे आवश्यक आहे. डिजिटल संप्रेषण प्रदान केले पाहिजे. सार्वजनिक ग्रंथालयांनी त्यांच्या समुदायांच्या समाधानाच्या पातळीचे मूल्यांकन करणे चालू ठेवणे

आवश्यक आहे. त्यामुळे त्यांचे ज्ञान व साक्षरता प्रदान करणे आणि त्यांचे ज्ञान देणे हे मूलभुत हेतू कायम आहे.

७. **''डॉ.पांडूरंग भोसले''**:– यांनी २०१२ मध्ये पंढरपूर शहरातील ग्रंथालय व वाचन संस्कृती एक अभ्यास हा संशोधन प्रकल्प पूर्ण केला. त्यामध्ये त्यांनी सार्वजनिक वाचनालयामुळे लोकांमध्ये ज्ञानाच्या कक्षा रूंदावत जातात. त्याचा परिणाम समाजाची दिशा ठरविण्यामध्ये होतो. पाश्चात्य देशांमध्येसुद्धा या विषयांवर वेगवेगळ्या अंगाने लेखन केले गेले आहे.

सदरचा विषय हा समाजशास्त्र आणि ग्रंथालय माहितीशास्त्र असा आंतरविदयाशाखीय संशोधन समाजशास्त्रात फार कमी झाले आहे. आजपर्यंत राज्यशासनाने, केंद्रशासन व स्थानिक स्वराज्य संस्थानी अनुदान निधी सार्वजनिक वाचनालयासाठी उपलब्ध करून दिली. शासनाची विशेष योजना 'गाव तिथे वाचनालय' याविषयी देखील काही शोधनिबंध लिहिले आहेत. परंतु संशोधकांनी प्रस्तुत संशोधनामध्ये वाचन चळवळीचा समाजशास्त्रीय अभ्यास सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि अर्थिक अंगाने केला आहे. म्हणून उपयुक्त संशोधनापेक्षा हे संशोधन नक्कीच वेगळे आहे. त्यातून समाजाला नवीन दिशा मिळण्यास मदत होईल. तसेच या संशोधनातून अनेक पैलू सामाजिक अर्थाने स्पष्ट होण्यास हातभार लागेल.

## २.६ पुनर्संशोधनाची गरज :–

वरील संदर्भ साहित्याचा परामर्श घेतला असता असे निदर्शनास येते की, वाचन संस्कृती रुजवण्यासाठी वृत्तपत्र, मासिके, प्रसारमाध्यमे, रेडिओ व इतर साधणे महत्त्वाची आहेत. सदर साधनांचा अभ्यास सामाजिक, सांकृतिक, आर्थिक परराष्ट्र धोरण, आंतरराष्ट्रीय देश–राज्य पातळीवर झालेला आहे. स्थानिक पातळीवर, जिल्हा पातळीवर आणि तालुका पातळीवर समस्याची उकल होण्याच्या दृष्टिकोनातून अभ्यास पूर्ण पद्धतीने झालेला नाही. ग्रंथालय, वाचनालय हे लोक शिक्षण व लोकमत तयार करण्याचे प्रभावी साधन आहे. वाचनालय एक विश्वास व मुक्ती प्राप्तीचा महत्त्वाचा घटक आहे. वाचनालयामध्ये सर्व स्तराच्या वाचकांचा समावेश होतो. वाचनालयामध्ये शब्दकोडे, ललित, कथा, कला, क्रीडा,

आर्थिक ग्रंथ, मनोरंजनात्मक साहित्य, राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक स्वरूपाची पुस्तके असतात. या सर्वांचा परिणाम मानवी बुद्धीवर मोठ्या प्रमाणात होतो. म्हणून सदर विषयात पुनर्संसंशोधनाची आवश्यकता आहे. जिल्हा व तालुका पातळीवर वाचनालयाची गरज निर्मितीसाठी या पुढील काळात संधी, अव्हाणे व त्या संबंधीचे प्रश्न सद्यास्थितीपेक्षा वेगळे आहेत. त्यामुळेच त्या दृष्टिकोनातून या विषयावर पुन्हा अभ्यास करण्याची आवश्यकता निर्माण होणार आहे.

## २.७ सारांश :

सदर प्रकरणामध्ये संदर्भ साहित्याचा आढावा व सिद्धांताचे स्पष्टीकरण दिले आहे. संशोधन साहित्याची उद्दिष्ट्ये आढाव्याचे महत्त्व, समाजशास्त्रीय सिद्धांत आणि वसाहतवादी काळ व उत्तर वसाहतवादी काळातील वृत्तपत्राचा आढावा घेतला आहे. संशोधन प्रबंधाचा अभ्यास घेतला आहे. सदर संशोधनांची पुर्नरमांडणीची आवश्यकतासुद्धा दर्शविली आहे. संदर्भ साहित्य व समाजशास्त्रीय व सैद्धांतिक संकल्पनेच्या चौकटीतून संशोधनाची मांडणी केली आहे. म्हणून मांडणीला दिशा मिळावी, यासाठी पुढील प्रकरणामध्ये संशोधन पद्धती या प्रकरणाची मांडणी केली आहे.

## संदर्भ सूची :–


१. नाडगोंडे गुरूनाथ; १९९९, सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२. बोधनकर सु., अकोणी वि.; १९९३, सामाजिक संशोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाशन, औरंगाबाद.

३. आगलावे प्रदिप;२०००,संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.

४. कमल मुळे; २००७,समाजशास्त्रीय सिद्धांत, विद्याप्रकाशन, औरंगाबाद पृ.४९.

५. उपरोक्त पृ.४०.

६. व्ही.एन.गजेंद्रगड,प्रा. व्ही.एस. मारूलकर; २०००, समकालीन भारतीय समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर. पृ.४९.

७. पी.के. कुलकर्णी;२००० समाजशास्त्रातील सैद्धांतिक दृष्टीकोन, श्रीमंगेश प्रकाशन नागपूर. पृ. ४८.

८. S. L. Doshi, (2006) Modernity and Post Modernity, Rawat Publication Jaipur and New Delhi

९. उपरोक्त पृ. ५३

१०. उपरोक्त पृ. ६६

११. Edward S. Herman and Noam Chomsky (1988) - Manufacturing Consent: The Political Economy of the Mass Media

१२. Ritzer, G. (2018), Sociogical Theory MCGrow- Hill International Edition : Sociology Series Publication.

१३. Jan Vrmeer; 2010 - A History of the Modern World 1500-2000 A.D., Jain Publication.

१४. बाळशास्त्री जांभेकर; १९३२- दर्पण व दिग्दर्शक

१५. महात्मा ज्योतीबा फुले; २०१३, ब्राम्हणांचे कसब, शेतकऱ्यांचा असूड.

१६. गो. ग. आगरकर; १८५६–१८९५.

१७. विठ्ठल रा. शिं. ; १८७३, भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न.

१८. डॉ. बाबासाहेब आंबेडकर; बहिष्कृत भारत, २०१९.

१९. लोकमान्य टिळक; केसरी, १८८१.

२०. के.सी. ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे ; १८८५ ते १९७३.

२१. इंदुप्रकाश; विष्णुशास्त्री पंडीत.

२२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर; २०१२, अस्पृश्य मुळचे कोण, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर.

२३. महात्मा गांधी; हरिजन, १९३३.

२४. S. L. Doshi, (2006) Modernity and Post Modernity, Rawat Publication Jaipur and New Delhi

२५. बाळासाहेब सोनावणे; २०१९, विद्रोही कबीर, यशोदीप प्रकाशन, पुणे.

२६. राजीव देशपांडे; अंधश्रद्धा निमूर्लन वार्तापत्र;.

२७. नितीन भोसले; २०२०, बळीराजा मुख्य संपादक,.

२८. किशोर शां. काळे २००१, कोल्हाटयाचे पोर, प्रकाशन ग्रंथाली, पुणे.

२९. विद्याबाळ; २०२०, मिळून साऱ्याजणी ; मुख्य संपादक,.

३०. परिवर्तनाचा वाटसरू; २०१८, सपांदक अभयकांता शरदवनवरे,प्रज्ञा रमा पवार, सुरेश कोथळे. कार्य संपादक, देवेंद्र ईगंळे.

३१. शरनकुमार लिंबाळे ; १९९१, 'प्रज्ञासूर्य,' दिलीपराज प्रकाशन,पुणे ३०.

३२. विश्वास पाटील; २०११, 'झाडा झडती' राजहंस पब्लीकेशन पुणे ३०.

३३. नरेंद्र जाधव; २००६, आमचा बाप व आम्ही, ग्रंथाली पब्लीकेशन,दादर मुंबई

३४. वि. स. खांडेकर; २०१२, अमृतवेल,

३५. त्र्य. ना. अत्रे; १९९५, गावगाडा, प्रकाशन वरदा कुक, पुणे १६

३६. ए.पी. जे. अब्दुल कलाम; १९९९, अग्निपंख,राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

३७. आनंद यादव; २०१७, घरभिंती, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे ३०.

३८. साधना; मुख्य संपादक, विनोद शिरसाठ, २०१८.

३९. राजेशकुमार झा; २०१४, योजना मुख्य संपादक,

४०. विलास वाघ; २००३, सुगावा, मुख्य संपादक

४१. समाज प्रबोधन पत्रिका,२००३.

४२. नव भारत; मुख्य संपादक,वसंत पळसीकर

४३. मेधा पाटकर; २०१७, आंदोलन, मुख्य संपादक

४४. नारायण कांबळे; २०१९, राजर्षी शाहु संघर्ष पर्व, लोकायत प्रकाशन, पुणे

४५. प्रशांत बनसोडे; २०१५, पंचनामा सांस्कृतिक भांडवलशाहीचा, मनोविकास प्रकाशन, पुणे.

४६. योगीराज बागूल; २०११, तमाशा : विठाबाईच्या आयुष्याचा, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

४७. लक्ष्मण माने; १९८०, उपरा, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

४८. दया पवार; २०१२, बलुत, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

४९. उत्तम कांबळे; २०१३, वाट तुडवताना, मनोविकास प्रकाशन, पुणे.

५०. आनंद यादव; १९८०, झोंबी, मेहता प्रकाशन, पुणे.

५१. आप्पा कोरपे; १९९९,मी तो हमाल, रूपाली प्रकाशन, अहमदनगर.

५२. आण्णा भाऊ साठे; २०१७, १९ वी आवृत्ती, फकिरा, सुरेश एजन्सी, पुणे.

५३. भालचंद्र फडके; २०००, दलित साहित्य वेदना व विद्रोह

५४. विलास खोले; १९४७, स्त्री–पुरुष तुलना– ताराबाई शिंदे लिखित, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

५५. श्री. म. माटे; १९४१, अपेक्षिताचे अंतरंग, सुगावा प्रकाशन, पुणे.

५६. गायकवाड लक्ष्मण; २०१७, उचल्या, श्रीविद्या प्रकाशन, शनिवार पेठ पुणे

५७. संशोधन प्रबंध.३२.३८.

# प्रकरण तिसरे

# संशोधन पद्धती


| | | |
|---|---|---|
| ३.१ | प्रस्तावना | ८५ |
| ३.२ | समस्या सूत्रण | ८८ |
| ३.३ | संशोधन विषयाची व्याख्या, महत्त्व हेतू व उद्देश | ८८ |
| ३.४ | विषयाचे महत्त्व | ८८ |
| ३.५ | संशोधनाची उद्दिष्ट्ये | ८९ |
| ३.६ | संशोधनाची गृहितके | ८९ |
| ३.७ | संशोधन पद्धती | ९० |
| ३.८ | नमुना निवड पद्धती | ९१ |
| ३.९ | प्रश्नावली | ९२ |
| ३.१० | तथ्य संकलन पद्धती | ९३ |
| ३.११ | संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा | ९४ |
| ३.१२ | सारांश | ९७ |
| | संदर्भ सूची | ९८ |

# प्रकरण तिसरे

# संशोधन पद्धती

## ३.१ प्रस्तावना :

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी वापरण्यात आलेली सर्वेक्षण पद्धती, संशोधन सामग्रीचे स्वरूप, साम्रगी गोळा करण्यासाठी वापरलेली साधने, जनसंख्या, नमुना निवड, सामग्रीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन इ. विषयक सविस्तर माहिती दिलेली आहे. या प्रकरणातील माहितीच्या आधारे संशोधन पद्धतीची माहिती घेण्यास मदत होणार आहे. संशोधनाचा मुख्य हेतू नवीन ज्ञान ग्रहण करणे, नवीन माहितीचे साधन तयार करणे, आपले व इतरांचे ज्ञान वाढविणे, जे ज्ञान मानवी समाजाच्या प्रगतीस पोषक ठरेल, अशी परिस्थिती निर्माण करणे होय. संशोधनातून समस्यांचे आकलन होते.

संशोधनासाठी योग्य पद्धतीचा वापर करणे आवश्यक असते. संशोधन समाधानकारक होण्यासाठी त्यामध्ये साधनांचे महत्त्वाचे स्थान आहे.

संशोधन हे वैज्ञानिक पद्धतीने होणे गरजेचे आहे. संशोधन शास्त्रीय पद्धतीने केले तरच त्याचा उपयोग होतो. अन्यथा चुकीच्या पद्धतीवर आधारलेल्या संशोधनातून चुकीचे निष्कर्ष निघतात व त्याचा लाभ कोणालाही होत नाही. म्हणून संशोधन करण्याची पद्धत व प्रक्रिया नीट समजून घ्यायला हवी. संशोधनाची प्रक्रिया ही या विषयाचा गाभा आहे.

संशोधनाच्या प्रक्रियेचा सुरुवातीचा भाग म्हणजे ज्या प्रश्नावर संशोधन करायचे तो प्रश्नच मुळात समाजायला हवा. आपण कोणत्या प्रश्नावर संशोधन करणार आहोत, याविषयी स्पष्ट कल्पना असणे गरजेचे आहे. म्हणजेच समस्येचे अर्थात यामधला महत्त्वाचा भाग असा की, उद्दिष्ट्ये निश्चित करण्यापूर्वी आपण संशोधन करणार असलेल्या प्रश्नावर या आधी कुणी संशोधन केले आहे का, याचा आढावा घेणे गरजेचे आहे.

पूर्वीच्या संशोधनाचा आढावा घेण्यामागे असा उद्देश आहे की, यामुळे आधीच्या संशोधनाची माहिती मिळते व नवीन संशोधनास वाव मिळतो व त्यातून संशोधनाची उद्दिष्ट्ये ठरवता येतात. यामुळे आपल्या संशोधनाची उद्दिष्ट्ये काय असावीत, हे निश्चित करता येते. यामुळे संबंधित

विषयावर प्रकाशित झालेले शोधनिबंध, इतर लेख, पीएच. डी. चे प्रबंध इ. अनेक मार्गाचा वापर करून आधीच्या संशोधनाचा आढावा घेता येतो.

अभ्यासासाठी संशोधन अध्ययनाची रूपरेषा ठरवणे, एक महत्त्वाचा भाग आहे. आपण काय करणार आहोत, हे स्पष्टपणे समजायला हवे. यामुळे संशोधनाला दिशा मिळते. उद्दिष्ट्ये ही स्पष्ट शब्दांमध्ये असायला हवीत आणि उद्दिष्टांची लांबलचक यादी न बनवता, मोजकीच उद्दिष्ट्ये ठेवायला हवीत. उद्दिष्ट्ये निश्चित करताना, ती आपण गाठू शकू किंवा नाही याचाही विचार करायला हवा. संशोधनाच्या शेवटी उद्दिष्ट्ये व निष्कर्ष याचा संबंध स्पष्ट करता यायला हवा. यामुळेच उद्दिष्ट्ये निश्चित करणे महत्त्वाचे ठरते.

अनेक संशोधन प्रकल्पांमध्ये उद्दिष्टांवर आधारित गृहीतके ठरवली जातात. यामागचा मुख्य उद्देश म्हणजे संशोधनाला सुरुवात कशी करावी. यासंबंधीचे मार्गदर्शन मिळते. संशोधनाला सुरुवात करताना काही गोष्टी गृहीत धरल्या जातात आणि त्याप्रमाणे गृहीत वाक्य (स्टेटमेंट ऑफ हायपोथिसिस) तयार केले जाते. संशोधन करून हे गृहीत वाक्य हे सिद्ध होत आहे की नाही? हे पाहता येते. यासाठी आवश्यक ती माहिती गोळा केली जाते. कारण संशोधनामध्ये एखादी गोष्ट प्रत्यक्ष सिद्ध करणे म्हणजेच पुरावा गोळा करून सिद्ध करणे, हे जरूरीचे आहे.

यासाठी संशोधन करताना माहिती गोळा केली पाहिजे. (कलेक्शन ऑफ इन्फर्मेशन) माहिती कोणाकडून गोळा करायची व कोणती माहिती गोळा करायची, तसेच माहिती गोळा करण्यासाठी कोणत्या मार्गाचा वापर करायचा, या तीनही प्रश्नांना उत्तरे द्यावी लागतात. माहिती गोळा करताना सर्वप्रथम कोणाकडून माहिती गोळा करायची, हे आधी निश्चित करायला हवे. जर आवश्यक असेल, तर नमुना सर्वेक्षण हा प्रकार वापरला पाहिजे.

माहिती मिळवण्यासाठी वेगवेगळ्या मार्गाचा वापर करावा लागतो. यामध्ये मुख्यत: जी माहिती अगोदरच प्रसिद्ध झाली आहे, अशा पद्धती (सेकंडरी सोर्सेस) व स्वत: गोळा केलेली माहिती (प्रायमरी सोर्सेस) असे दोन भाग पडतात. माहिती स्वत: गोळा करताना प्रश्नावली तयार करणे जरूरीचे आहे. प्रश्नावली तयार करताना प्रश्नांची संख्या ही मोजकीच असावी म्हणजे उत्तरे देणाऱ्याला सोपे जाईल. प्रश्नावलीमध्ये कोणते प्रश्न असावेत, हे संशोधनाच्या उद्दिष्टांवरून ठरवले पाहिजे.

माहिती जमा झाल्यानंतर तिचे पृथःकरण (ॲनलिसिस) करण्यासाठी वेगवेगळया पद्धती वापरल्या जातात. उदा., टेबल्स तयार करणे, सरासरी काढणे, आलेख पद्धतीचा वापर करणे इ. यानंतर आपण धरलेली गृहीतके ही स्वीकारता येतात किंवा नाही (ॲक्सेप्टन्स ऑफ हायपोथिसिस) हे ठरवण्यासाठी अनेक संख्याशास्त्रीय चाचण्या उपलब्ध आहेत. आपल्या संशोधनासाठी नेमकी कोणती चाचणी वापरावी, ही माहिती करून घेऊन त्याप्रमाणे गृहीतके तपासता येतात. यानंतर संशोधनाचे निष्कर्ष मांडता येतात. आपण संशोधन करून नक्की काय शोधून काढले व त्याचा उपयोग काय होईल, हे मांडले पाहिजे. यामध्ये महत्त्वाचा भाग म्हणजे आपली उद्दिष्ट्ये, गृहितके व निष्कर्ष यामध्ये संबंध दाखवता यायला हवा.

''ग्रीक तत्त्ववेत्ता प्लेटो यांचे 'रिपब्लिक' आणि त्यांचे शिष्य अरिस्टॉटल यांचे 'द एथिक्स आणि पॉलिटीक्स' हे ग्रंथ समाज जीवनाविषयीच्या चिंतनाची समृद्ध उदाहरणे आहेत. या ग्रंथामध्ये त्यांनी समाज आणि समाज जीवनाविषयी काही मुलभूत गोष्टीचे समर्थन केले आहे.'' शुक्राचार्याचे नीतीसार, उपनिषदे, पुराणे, स्मृती ग्रंथ, रामायण, महाभारत या ग्रंथामधून मानवीय वर्तनाबद्दल शासन, राज्य, व्यवहार इत्यादी पैलूंबाबत विचार व्यक्त झालेले आहेत. अशा प्रकारचे चिंतन त्यांनी मांडले आहे. त्यांचे शास्त्रशुद्ध प्रकारचे चिंतन हे आदर्शवादावर अवलंबून होते. तर्कशुद्ध, शास्त्रशुद्ध आणि वस्तुनिष्ठ पद्धतीवर आधारित नसलेल्या विचारांना समाजशास्त्रीय विचार असे म्हणता येणार नाही.''[१] त्यामुळे काळाच्या ओघाने आणि बदलत्या परिस्थितीमुळे सामाजिक घटनांच्या अभ्यासासाठी शास्त्रीय संशोधन पद्धतीचा अवलंब करून समाजाचे विश्लेषण करण्याची गरज निर्माण झाली.

या अनुषंगाने विचार करता सामाजिक संशोधन करणे समाजाच्या हिताचे आहे. कळत नकळत वरील बाबींचा विचार करता पुणे परिसरातील प्रगती वाचनामुळे झाली आहे. असे दिसते. यामध्ये प्रामुख्याने वाचनालयातील ग्रंथपाल आणि वाचकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. या वाचनामुळे सर्वांगीण सामाजिक बदल घडत असतो. यामध्ये अनेक घटनांचा, रूढी परंपरांचा, देवी–देवता व उत्सवांचा संदर्भ देता येईल, जो सामाजिक विकासामध्ये पूरक ठरताना दिसतो. समाजामध्ये होणारे सांस्कृतिक बदल हे वाचनाच्या म्हणजेच माहिती किंवा ज्ञानाच्या आधारे झाल्याचे दिसतात. समाजामध्ये सांस्कृतिक बदल घडण्यासाठी व्यक्ती बदलणे आवश्यक आहे आणि व्यक्ती बदल हे

वाचन किंवा वाचन चळवळ घडवून आणते. हे या अभ्यासात दिसून येईल. वाचन समाजामध्ये राजकीय व आर्थिक बदल मोठ्या प्रमाणात घडवून आणते. म्हणून आज समाजात राजकीय व आर्थिक प्रबोधनामुळे झालेल्या बदलांच्या मुळाशी वाचन चळवळ असल्याचे दिसते.''

## ३.२ समस्या सूत्रण:

भारतीय समाजव्यवस्थेत उत्तर वसाहतवादी काळात शैक्षणिक सुविधांमुळे मोठ्या प्रमाणात बदल घडून आला. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी अनेक योजना अंमलात आणल्या. याचबरोबर समाजाचा विकास व्हावा म्हणून वाचनाची आवड निर्माण करणे आवश्यक झाले. यासाठी 'गाव तेथे वाचनालय' ही योजना राबविली गेली. समाजाच्या सर्व घटकांमध्ये परिवर्तन होण्यासाठी प्रयत्न केले गेले. गाव तेथे वाचनालय या योजनेने होणाऱ्या परिवर्तनाचा परिणाम अभ्यासणे शक्य नसल्याने पुणे क्षेत्रातील वाचन चळवळीमुळे समाजशास्त्रीय अभ्यास करण्याचे उद्दिष्ट आहे. या विषयांवर समाजशास्त्रीय पद्धतीने अभ्यास होणे गरजेचे आहे. कारण, हा विषय आंतरविद्याशाखीय आहे. वाचनालयामुळे सामाजिक व सांस्कृतिक बदल कसा होत आहे, हे अभ्यासकाला महत्त्वपुर्ण वाटते. म्हणून संशोधनासाठी हा विषय निवडला आहे.

## ३.३ संशोधन विषयाची व्याख्या, महत्त्व, हेतू व उद्देश:

## संशोधन अभ्यासाचा हेतू:

''संशोधन म्हणजे नेमक्या समस्यांच्या समाधानासाठी केलेला सुव्यवस्थित व वस्तुनिष्ठ व बिनचूक शोध होय.''[२]

''संशोधन म्हणजे तथ्ये किंवा तत्त्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा किंवा परीक्षण होय किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत व पद्धतशीर केलेले परिश्रम होय.''[३]

## ३.४ विषयाचे महत्त्व:

विषयाची व्याप्ती फार मोठी आहे. ''सरकारने जे धोरण राबवले त्यातून प्रत्येक व्यक्ती शिक्षित बनला पाहिजे, जगातील माहिती त्याला ग्रामीण भागामध्ये सहज कळाली पाहिजे, या उद्देशाने सरकारने वाचनालयाला अनुदान देऊन हा उपक्रम चालू केला. परंतु, समाजासाठी याचा उपयोग

झाला आहे की नाही? याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. सामाजिक बदलात वाचन चळवळीचे योगदान पाहता पुणे कार्यक्षेत्रात या उपक्रमामुळे समाजात कसा बदल होत गेला, हे पाहणे महत्त्वाची बाब आहे. सार्वजनिक वाचनालयाचा कार्यक्रम राबवताना अनेक समित्यांची निर्मिती केली. Fyzee Committee १९३९ फैजी समितीने १९४० मध्ये जो प्रस्ताव दिला, त्याला विलंब झाला. त्यामुळे अपेक्षित असलेले उद्‌देश साध्य होऊ शकले नाहीत.''[४]

## ३.५ संशोधनाची उद्दिष्ट्ये:

संशोधन समस्याची उकल होण्यासाठी पुणे जिल्ह्यातील सामाजिक व सांस्कृतिक बदलामध्ये वाचक वर्गाच्या योगदानासाठी खालील उद्दिष्ट्ये निश्चित केली आहेत.

१. 'गाव तेथे वाचनालय' या कार्यक्रमाचा उद्देश जाणून घेणे.

२. पुणे शहर व पुणे परीसराच्या भागातील वाचनालयाची सद्यस्थिती जाणून घेणे.

३. वाचन चळवळीमुळे सामाजिक व धार्मिक परिणामांचा आढावा घेणे.

४. वाचन चळवळीमुळे सामाजिक व सांस्कृतिक परिणामांचा आढावा घेणे.

५. वाचनामुळे उपक्रमांची माहिती जाणून घेणे.

६. वाचनालयात परिस्थितीनुसार झालेल्या बदलाची माहिती घेणे.

## ३.६ संशोधनाची गृहितके:

सामाजिक संशोधनात गृहीत कृत्यांना महत्त्व आहे. गृहीत कृत्यांमुळे संशोधनासाठी कोणती तथ्ये संकलीत केली पाहिजे. याविषयी निश्चितता प्राप्त झाल्यामुळे संशोधक इतरत्र भटकत नाही. म्हणून संशोधकानी पुढीलप्रमाणे गृहीतके मांडली आहेत. गृहीतके पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**गृहीतके:**

१. वाचनामुळे लोकांना पायाभूत माहिती मिळते.

२. वाचनामुळे सामाजिक प्रश्न व व्यवस्थेची माहिती होते.

३. 'सार्वजनिक वाचनालये' 'गाव तेथे वाचनालय' या कार्यक्रमांची सफलता होत आहे.

४. वाचन संस्कृतीमुळे चिकित्सक वाचक निर्माण होतो.

## ३.७ संशोधन पद्धती –:

सदर संशोधनासाठी संशोधकाने मिश्र संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. तसेच सदर संशोधनात पुणे जिल्ह्यातील वाचक वर्गाची निवड करण्यासाठी साधा या दृच्छिक नमुना निवडीतील सहेतुक नमुना निवड पद्धतीचा (Random Smapling Method) वापर केला आहे.

### गुणात्मक व संख्यात्मक संशोधन पध्दती –:

अभ्यासकाने संशोधनाचे काम योग्य पद्धतीने हाताळणे, हे संशोधनाच्या साधनांवर अवलंबून असते. सामाजिक संशोधनात ज्या नेहमी वापरल्या जाणाऱ्या पद्धती आहेत, त्या म्हणजे तुलनात्मक पद्धती, क्षेत्रकार्य पद्धती, ऐतिहासिक पद्धती, वैज्ञानिक अध्ययन पद्धती, गुणात्मक व संख्यात्मक पद्धती इ. होय.''[५]

संशोधकाने सदर संशोधनासाठी निवडलेल्या उपरोक्त विषया संदर्भात गुणात्मक व संख्यात्मक या दोन्ही संशोधन पद्धतीचा वापर केला आहे व व्यष्टी अध्ययन पद्धतीच्या माध्यामातून १५ वाचकाचा अभ्यास संशोधकाने केला आहे. त्याची मांडणी चौथ्या प्रकरणामध्ये केली आहे.

### १. गुणात्मक संशोधन –:

''एखाद्या सामाजिक किंवा समस्यांच्या माहितीचे जेव्हा गुणाच्या आधारे विश्लेषण केले जाते, त्यास गुणात्मक अध्ययन असे म्हणता येईल. म्हणजेच, गुणात्मक संशोधन पद्धतीत गुणांच्या आधारे विश्लेषण केले जाते. ही पद्धती प्रामुख्याने तात्त्विक स्वरूपाची असते.''[६] या संशोधनात सहभागी निरीक्षण, असंरचित मुलाखत, व्यष्टी अध्ययन, आशय विश्लेषण, दृकश्राव्य साधने, कागदपत्रांचे परिक्षण, यांच्या साहाय्याने तथ्य संकलित करण्याचा प्रयत्न केला आहे. या पद्धतीत तथ्य संकलन हे क्षेत्रकार्य, मुलाखत तंत्र, संस्कृती वर्णन पद्धतीवर अधिक भर दिलेला आहे.

### गुणात्मक संशोधन पद्धतीची वैशिष्टये –:

१. गुणात्मक संशोधन हे सामाजिक घटनांसंदर्भात, सामाजिक घटना, क्रिया, मूल्य व प्रमाणके इ. लोकांच्या जीवनात अस्तित्वाशी संबंधित मुद्दे या दृष्टीकोनात येतात.
२. निसर्गवादी संरचनेत सहभागाच्या दृष्टीकोनातून विस्तृत वर्णनाात्मक, असे हे अध्ययन आहे.

३. समग्रवादी चौकटीतून सामाजिक व भाषिक संदर्भागत सामाजिक घटनांचे वर्णन, व्यक्ती वर्तनाधारे अध्ययन केले जाते.

४. आगमन पद्धती, मुक्त व लवचिक दृष्टीकोन या संशोधन प्रतिमानात आहे. एकूणच या पद्धती अंतर्गत एखाद्या घटकाच्या संस्कृतीचे वर्णन, घटनाशास्त्रीय दृष्टीकोन तसेच घटकांचे सौंदर्य, समृद्ध  उपयोजन, चांगले अथवा वाईट स्वरूप यांचे मूल्यमान केले जाते.

**२. संख्यात्मक पद्धती –**:

संख्यात्मक पद्धती ही अंकीक/संख्यात्मक तथ्य संकलनासाठी अवलंबली जाते. या पद्धतीत वय, उत्पन्न, कुटुंबाचा आकार, आर्थिक घटक इ. सर्व संख्यात्मक चल म्हणून विचारात घेतली जाते. ही पद्धती सामाजिक संशोधन विश्लेषणावर आधारित असते. या पद्धतीत तथ्यांचे विश्लेषण हे गणिती तत्त्वावर केले जाते. अनेक परस्पर घटकांतील सहसंबंध जाणून घेणे, या पद्धतीमुळे शक्य होते.''[७] या पद्धतीमुळे मिळणारे निष्कर्ष हे अधिक अचूक व बिनचूक असतात.

**३.८ नमुना निवड पद्धती :–**

प्रस्तुत संशोधनासाठी पुणे जिल्ह्याची निवड गैर संभाव्यता नमुना निवडीतील सहेतुक नमुना निवड पद्धतीचा वापर करून केली आहे. त्यामध्ये व्यक्तीचे वय, महिला, पुरुष, मूल, मुली, धर्म, शिक्षणाचा गट इत्यादी निकष लावून या पाच तालुक्यांमधून २२० वाचक निवडले आहेत. कारण राज्यामध्ये पुणे जिल्हा वाचन संस्कृती अव्वल आहे. म्हणून संशोधनासाठी पुणे जिल्हा निवडला आहे. सामजिक बदलांचे व सांस्कृतिक बदलाचे **निर्देशक** पुढीलप्रमाणे सांगता येतील.

- **सामाजिक** : समता, न्याय, जात, लिंगभाव, शैक्षणिक, एक गाव एक पाणवठा, व्यसनाधीनता, पर्यावरण.
- **सांस्कृतिक** : महापुरुषांची जयंती, पारंपरिक सण, उत्सव, अंधश्रद्धा, धार्मिक कलह, जात पंचायत, पारंपरिक प्रथा हे सामाजिक बदलांचे निर्देशक आहेत.

पुणे जिल्हयामध्ये एकुण १४ तालुके आहेत. या चौदा तालुक्यांमधून हवेली ३०, आंबेगाव १०, मावळ १०, वेल्हे १०, भोर १० या तालुक्यांचा अभ्यासासाठी विचार केला आहे. प्रस्तुत तालुक्यांमध्ये एकूण ७० वाचनालयांमधून २२०वाचकांकडून प्रश्नावलीच्या आधारे माहिती संकलीत

करण्यात आली आहे. तालुक्याची निवड प्रस्तुत संशोधनासाठी नमुना निवडीच्या विविध पद्धतीचा वापर करून केली आहे.

**वाचक वर्गाची निवड :–**

प्रस्तुत संशोधनासाठी पुणे जिल्ह्यातील वाचक वर्गाची निवड करण्यात आली आहे. वाचक वर्गाची निवड नमुना निवडीतील गैर संभाव्यता पद्धतीमधील सहेतुक किंवा उद्‌देश्यपूर्ण नमूना निवड पद्धतीचा वापर केला आहे. वाचक वर्गात विद्यार्थी, शेतकरी, ग्रामस्थ, शिक्षक, ग्रंथपाल इतरांचा समावेश केला आहे.

संशोधन कार्यात संपूर्ण अभ्यास क्षेत्राचा अभ्यास करणे, हे कठीण काम असते. सगळयाच घटकांशी संबंध साधून माहिती गोळा करणे, कठीण काम असते. अशा वेळी नमुना निवड प्रणालीचा वापर करून माहिती गोळा केली जाते.

सदर संशोधनात सहेतुक किंवा उद्देशपूर्ण नमुना प्रकार वापरण्यात आला. गैर संभाव्यता नमुना निवडीचा हा एक प्रकार आहे. या प्रकारात संशोधकाला संपूर्ण संशोधनाची माहिती असल्यामुळे नमुना एकक निवडताना समग्राची गुण वैशिष्टये असलेले नमुने निवडण्यावर भर देण्यात आला. छाननी अंती यामध्ये पुणे जिल्ह्यातील ७० वाचनालयातून माहिती गोळा करण्यात आली.

## ३.९ प्रश्नावली :–

प्रश्नावली ही प्रश्नांची एक पूर्व नियोजन क्रमाने मांडण्यात आलेली यादी असते. ज्या व्यक्तीकडून अथवा संस्थेकडून माहिती मागवावयाची असेल त्या व्यक्तीस अथवा त्या संस्था प्रमुखास या प्रश्नांची छापील यादी पोस्टाने पाठवून किंवा प्रत्यक्ष भेटून दिली जाते. यात महत्त्वाची बाब ही की, प्रश्नावलीतील प्रश्नांची उत्तरे प्रतिसादकांनी कोणाचीही मदत न घेता लिखित स्वरूपात द्यावयाची असते. प्रश्नावली म्हणजे प्रश्नांचे व्यवस्थित केलेले संकलन होय.

प्रश्नावली म्हणजे प्रश्नांचे व्यवस्थित केलेले संकलन हे संकलन नमुना गटास, प्रतिसादकास दिले जाते. प्रश्नावलीद्वारे व्यवस्थित प्रकारे माहिती गोळा करता येते.''[०९]

''प्रश्नावली म्हणजे पाहणीसाठी तयार केलेल्या यादीत अंतर्भाव असणाऱ्या किंवा सर्वेक्षण नमुना निवड केलेल्या व्यक्तींना पाठवावयाची प्रश्नपत्रिका किंवा प्रश्नसूची होय.''[१०]

विशेषत: वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धतीत या साधनांचा फार मोठा वापर केला जातो. म्हणून प्रश्नावली तयार करण्यापूर्वी संशोधकांनी पूर्वीच्या संशोधकाच्या प्रश्नावल्यांचा अभ्यास केला आहे.

प्रश्नावलीत प्रामुख्याने बंदिस्त व खुल्या प्रश्नांचा समावेश करण्यात आला व त्या माध्यमातून सामान्य माहिती गोळा करण्यात आली.

त्यामध्ये वाचकांच्या आवडीनुसार ग्रंथांचे संकलन व संख्या विचार घेण्यात आली. सोबतच वर्तमानपत्रे व नियतकालिके वाचनालयात ठेवण्यात आली आहेत. त्यातील माहितीच्या आधारे वाचक आणि समाजामधील झालेले बदल लक्षात घेण्यात आले. याचबरोबर वाचकांची आवड आणि बदलाबाबत त्यांची असणारी मते प्रश्नावलीच्या आधारे जाणून घेण्यात आली.

प्रश्नावली व्यतिरिक्त सहभागी निरक्षण केले. वाचन संस्कृतीचा प्रभाव किंवा आव्हान जाणून घेण्यासाठी पुणे येथील साहित्य मंडळ तज्ज्ञाची भेट घेऊन आव्हानाची मुद्देसुद चर्चा केली.

## ३.१० तथ्य संकलन पद्धती –:

प्रस्तुत संशोधनासाठी सामाजिक शास्त्रातील प्रचलित प्राथमिक व दुय्यम माहितीचा आधार घेतला आहे. सामाजिक संशोधनात तथ्य संकलनाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. तथ्य संकलन म्हणजे निवडलेल्या संशोधन विषयासंदर्भात माहितीचे संकलन करणे होय. कोणत्याही सामाजिक संशोधनातील तथ्य संशोधनातील तथ्य संकलन ही अतिशय महत्त्वाची प्रकिया असून तथ्य संकलनाची प्रश्नावली, मुलाखत, अनुसूची, निरीक्षण, सर्वेक्षण इ. संशोधन कार्यासाठी प्राथमिक तथ्य व दुय्यम या दोनही मार्गाने तथ्य संकलन केलेले असून मुलाखत, अनुसूची, सहभागी निरीक्षण, असहभागी निरीक्षण या साधनांचा वापर केला. शास्त्रीय पध्दतीने निवडलेल्या गावास वारंवार भेटी दिल्या व तथ्य संकलन केले.

**१.माहितीचे विश्लेषण :–**

प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण या साधनांच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी शेकडेवारी या सांख्यिकीय तंत्राचा अवलंब करण्यात आला. पुरुष व महिला प्रश्नावलीसाठी टक्केवारी (शेकडा प्रमाण) काढून निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

या प्रकारचे संशोधन हे सद्यस्थितीचे वर्णन करणे आणि सद्यस्थिती स्पष्ट करणे, वर्तमानात असलेले संबंध प्रचलित परिपाठ, दिसून येणाऱ्या निष्ठा, दृष्टीकोन आणि अभिवृत्ती सुरू असलेल्या प्रक्रिया जाणवणारे परिणाम विकसित होत असलेले विचार प्रवाह यांच्याशी ते संबंधित असते.

माहिती संकलनासाठी प्राथमिक स्रोत म्हणून प्रश्नावली, निरीक्षण व मुलाखत यांचा वापर करण्यात आला आहे. तसेच दुय्यम स्रोतांमधील संदर्भग्रंथ, इंटरनेट, मासिक, वर्तमानपत्रे यांचाही आधार घेण्यात आला आहे.

## ३.११ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:

''प्रयोग याचा अर्थ नियंत्रित परिस्थितीत केलेले निरीक्षण होय. परंतु नैसर्गिक शास्त्रांच्या संशोधनात मानवी अतिवृत्तीला व पूर्वग्रहांचा पगडा निरीक्षणावर असण्याची शक्यता नाहीच, असे ठामपणे म्हणता येईल. याउलट सामाजिक शास्त्रे ज्या अभ्यासाविषयीचे अध्ययन करतात तो अतिशय गुंतागुंतीचा असा आहे.''[११]

कार्यक्षेत्र निवडत असताना जो विषय संशोधकांनी निवडलेला आहे. तो विषय व्यवस्थित पद्धतीने मांडणे गरजेचे आहे. त्यामुळे निष्कर्ष अचुक निघण्यास मदत मिळते. म्हणून संशोधकांनी आपले काम उत्तम रीतीने व्हावे म्हणून विषयाची व्याप्ती कशी असावी, याचे नियोजन केले आहे. वाचन साहित्याशी संबंधीत अध्ययन हे खूप बृहद आहे म्हणून संशोधकांनी पुणे जिल्हा निवडून त्यामधील हवेली, आंबेगाव, मावळ, वेल्हे व भोर या पाच तालुक्यांतून व्याप्ती व मर्यादा घेतली आहे. त्यामुळे संशोधनाचे काम व्यवस्थित पद्धतीने पुर्णत्वास जाईल, याची काळजी संशोधकानी घेतली आहे. या संशोधनासाठी ठरवलेल्या व्याप्तीमुळे निश्चितच वेळ, पैसा, श्रम, आर्थिक खर्चामध्येही बचत झाली आहे. अभ्यास विषयाच्या मर्यादित व्याप्तीमुळे विषयाच्या उद्दिष्टांबाबत वैयक्तिक

जास्तीतजास्त वेळ देऊन अधिकाधिक माहिती संकलित करता आली. त्यामुळे संशोधन प्रकल्प अधिक चांगला होण्यास मदत झाली आहे.

पुणे जिल्ह्यामध्ये एकूण ४८५ सार्वजनिक वाचनालये आहेत. पुणे परिसरात जवळपास ९,४४२,१४२ आहे. १४ तालुके असून त्यामधून हवेली, आंबेगाव, मावळ, वेल्हे, भोर या तालुक्यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

सदर संशोधन कार्याची व्याप्ती व मर्यादा खालीलप्रमाणे दर्शविलेली आहे.

**१) व्याप्ती :–**

१. संशोधनाची व्याप्ती :– सदर संशोधन अभ्यासासाठी पुणे जिल्ह्यातील सामाजिक व सांस्कृतिक बदलामध्ये वाचक चळवळींचे योगदान हे कार्यक्षेत्र निवडलेले आहे.
२. जनसंख्या व्याप्ती :– प्रस्तुत संशोधन करण्यासाठी पुणे जिल्ह्यातील सामाजिक व सांस्कृतिक बदलामध्ये वाचक वर्ग, शिक्षक, विद्यार्थी, ग्रंथपाल व इतर ग्रामस्थ हे जनसंख्या व्याप्तीमध्ये समाविष्ट आहेत.
३. कालावधी व्याप्ती :– प्रस्तुत संशोधन कार्य सामाजिक व सांस्कृतिक बदलामध्ये २०१७–१८ या वर्षातील घेण्यात आलेल्या मुलाखती, प्रश्नावली व निरीक्षण या कालावधीतील माहितीशी निगडीत आहे.
४. आशय व क्षेत्र व्याप्ती :– प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी पुणे जिल्ह्यातील वाचक हे कार्यक्षेत्र निवडले आहे. तसेच पुणे जिल्ह्यातील सामाजिक व सांस्कृतिक बदलामध्ये वाचक चळवळीला, विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ, पत्रकार यांना येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे, या आशयाशी निवडीत आहे.
५. उपाययोजना व्याप्ती :– प्रस्तुत संशोधनातील निष्कर्ष व शिफारशी पुणे जिल्ह्यातील वाचक चळवळीशी संबंधित असतील.

**२) मर्यादा :–**

१. प्रस्तुत संशोधन हे पुणे जिल्ह्यातील एकूण ४८५ वाचनालयापैकी ७० वाचनालयांसंदर्भात मर्यादित आहेत.

२. पुणे जिल्ह्यामध्ये एकूण १४ तालुके असून ०५ तालुके संशोधन कार्यास काही व्यक्ती, स्थळ व काळाच्या मर्यादा आहेत.

३. प्रस्तुत संशोधन पुणे जिल्ह्यातील सामाजिक व सांस्कृतिक बदलामध्ये वाचक चळवळीतील योगदान २०१७–१८ वर्ष मधील किंवा या कालावधीमधील घेण्यात आलेल्या मुलाखती व प्रश्नांपुरतेच मर्यादित असेल.

४. सदर संशोधनामध्ये पुणे जिल्ह्यात एकूण १४ तालुके असून त्यातील केवळ ०५ तालुके मर्यादित आहेत. (उदा. हवेली, आंबेगाव, मावळ, वेल्हे, भोर)

५. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष व शिफारशी पुणे जिल्ह्यातील सामाजिक व सांस्कृतिक बदलातील वाचक वर्गातील व मर्यादा पुरतेच असतील. तसेच प्रतिसादकांनी दिलेल्या माहितीच्या आधारे निष्कर्ष हे मर्यादित स्वरूप मांडण्यात आले आहेत.

## ३.१२ सारांश:

प्रस्तुत प्रकरण संशोधनामध्ये महत्त्वाचे आहे. या प्रकरणात अभ्यासाच्या रूपरेषाविषयी माहिती सांगितली, जी संशोधनास पूरक सिद्ध होत आहे. या संशोधन कार्य पद्धतीमध्ये नमुना निवड, संशोधन साधने यांची माहिती देण्यात आली आहे. पुढील प्रकरणामध्ये संशोधकाने संकलित माहितीची नोंद, अर्थ विवेचन मांडलेले आहे. वरील अभ्यासात पुणे परिसरातील माहिती विविध संशोधन पद्धतीच्या आधारे जमा केली आहे व त्याची मांडणी पुढील प्रकरणात केली आहे. या प्रकरणात तथ्यसंकलन व व्यष्टी अध्ययन या आधारे संख्यात्मक व गुणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

## संदर्भ सूची


१. आगलावे प्रदिप; २०००, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.

२. काचोळे दा. धो., मुधोळकर ग.रा.;२००५ समाजशास्त्रीय संशोधन पद्धती, कैलाश प्रकाशन, औरंगाबाद

३. उपरोक्त

४. नागरिकांची सनद प्रशासकीय विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग. मंत्रालय मुंबई.

५. नाडगोंडे गुरूनाथ; १९९९, सामाजिक संशोधन पद्धती, कोल्हापूर, फडके प्रकाशन,

६. आगलावे प्रदिप; २०००, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.

७. उपरोक्त

८. बोधनकर सु., अकोणी वि.; १९९३, सामाजिक संशोधन पद्धती औरंगाबाद, श्री साईनाथ प्रकाशन.

९. आगलावे प्रदिप; २०००, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.

१०. बोधनकर सु., अकोणी वि.; १९९३, सामाजिक संशोधन पद्धती औरंगाबाद, श्री साईनाथ प्रकाशन.

११. आगलावे प्रदिप; २०००, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.

# प्रकरण चौथे

# तथ्यांचे संकलन व विश्लेषण


| | | | |
|---|---|---|---|
| ४.१ | प्रस्तावना (क्षेत्रीय पाहणी) | | १०२ |
| ४.२ | वैयक्तिक माहितीचे विश्लेषण | | १०४ |
| | ४.२.१ | वय | १०४ |
| | ४.२.२ | शिक्षण | १०५ |
| | ४.२.३ | लिंग | १०६ |
| | ४.२.४ | वाचन साहित्य | १०७ |
| | ४.२.५ | वाचनाचा उद्देश | १०८ |
| | ४.२.६ | वाचनालयाची नियमिता | १०९ |
| | ४.२.७ | वाचनालयाची सुविधा | ११० |
| ४.३ | सामाजिक बदल | | १११ |
| | ४.३.१ | तक्ता क्र : १ जाती व्यवस्थेत झालेला बदल | ११२ |
| | ४.३.२ | तक्ता क्र : २ अंधश्रद्धेवर झालेला परिणाम | ११५ |
| | ४.३.३ | तक्ता क्र :३ स्त्रियांविषयक सामाजिक दृष्टीकोनात बदल | ११७ |
| | ४.३.४ | तक्ता क्र : ४ गुन्हेगारीवर झालेला बदल | १२० |
| | ४.३.५ | तक्ता क्र : ५ सामाजिक प्रश्नांची तीव्रता | १२२ |
| | ४.३.६ | तक्ता क्र : ६ दुर्बल घटक | १२५ |
| | ४.३.७ | तक्ता क्र : ७ साक्षरतेचे प्रमाण वाढले | १२६ |
| | ४.३.८ | तक्ता क्र : ८ पर्यावरण संवर्धन | १२७ |
| | ४.३.९ | तक्ता क्र : ९ लोकसंख्येवर झालेला परिणाम | १३० |
| | ४.३.१० | तक्ता क्र : १० स्वच्छतेविषयक जागृती | १३२ |
| | ४.३.११ | तक्ता क्र : ११ वैचारिक प्रबोधन | १३३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ४.३.१ २ | तक्ता क्र: १२ आरोग्यविषयक दृष्टीकोन | **१३७** |
| ४.४ | सांस्कृतिक बदल (क्षेत्रीय पाहणी) | | **१३९** |
| | ४.४.१ | तक्ता क्र : १ उत्सव | **१४०** |
| | ४.४.२ | तक्ता क्र : २ सांस्कृतिक कार्यक्रम | **१४३** |
| | ४.४.३ | तक्ता क्र : ३ राष्ट्रीय सण | **१४६** |
| | ४.४.४ | तक्ता क्र: ४ कलह निवारण | **१४८** |
| | ४.४.५ | तक्ता क्र : ५ आंतरजातीय विवाह | **१५०** |
| | ४.४.६ | तक्ता क्र : ६ पारंपरिक रूढी, परंपरा | **१५२** |
| | ४.४.७ | तक्ता क्र : ७ धर्मांचे प्रमाण | **१५५** |
| | ४.४.८ | तक्ता क्र : ८ सहिष्णुतेचे प्रमाण | **१५७** |
| ४.५ | आर्थिक बदल (क्षेत्रीय पाहणी) | | **१६१** |
| | ४.५.१ | तक्ता क्र : १ आर्थिक स्तर | **१६१** |
| | ४.५.२ | तक्ता क्र : २ राहणीमानाचा दर्जा | **१६३** |
| | ४.५.३ | तक्ता क्र : ३ दळणवळण सुविधा | **१६५** |
| | ४.५.४ | तक्ता क्र : ४ प्रसारमाध्यमांचा वापर | **१६८** |
| | ४.५.५ | तक्ता क : ५ बचत प्रकार | **१६९** |
| | ४.५.६ | तक्ता क : ६ सरकारी योजना | **१७२** |
| | ४.५.७ | तक्ता क : ७ कुटीर उद्योग | **१७५** |
| | ४.५.८ | तक्ता क : ८ कृषी उद्योग | **१७७** |
| | ४.५.९ | तक्ता क : ९ आर्थिक उत्पादनाची साधने | **१७९** |
| ४.६ | राजकीय बदल (क्षेत्रीय पाहणी) | | **१८१** |
| | ४.६.१ | तक्ता क्र : १ राजकीय नेतृत्व | **१८१** |
| | ४.६.२ | तक्ता क्र : २ सामाजिक नेतृत्व | **१८३** |
| | ४.६.३ | तक्ता क्र : ३ महिलांचा राजकारणातील सहभाग | **१८६** |

| | | | |
|---|---|---|---|
| | ४.६.४ | तक्ता क्र : ४ समूह राजकीय नेतृत्व | **१८८** |
| | ४.६.५ | तक्ता क्र : ५ मतदार जागृती | **१९०** |
| | ४.६.६ | तक्ता क्र : ६ राजकीय समाजकारण | **१९२** |
| | ४.६.७ | तक्ता क्र : ७ राजकीय पक्षीय विचारसरणी | **१९४** |
| | ४.६.८ | तक्ता क्र : ८ जातीय राजकारण | **१९६** |
| | ४.६.९ | तक्ता क्र : ९ ग्रामपंचायत | **१९८** |
| | ४.६.१० | तक्ता क्र : १० राजकीय विविधता | **२००** |
| | ४.६.११ | तक्ता क्र : ११ राजकीय सलोखा | **२०१** |
| | ४.६.१२ | तक्ता क्र : १२ वाचन चळवळीमुळे झालेले परिवर्तन | **२०३** |
| ४.७ | तथ्य संकलन–सारांश | | **२०५** |
| ४.८ | व्यक्तीनिष्ठ व्यष्टीचे विश्लेषण | | **२०८** |

# प्रकरण चौथे

# तथ्यांचे संकलन व विश्लेषण

**४.१ प्रस्तावना:**

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधकाने संकलित केलेल्या माहितीचे वस्तुनिष्ठ विश्लेषणाच्या आधारावर वाचन चळवळीमध्ये झालेल्या सामजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय आधारावर मांडणी केली आहे. तसेच, व्यक्तीनिष्ठ व्यष्टीचे व्यष्टी अध्ययन पद्धतीचा वापर करून उत्तरदात्याचे व्यक्तीनिष्ठ पद्धतीने वाचन संस्कृतीच्या चवळीच्या माध्यामतून झालेल्या सामाजिक व सांस्कृतिक बदलांचे चिकित्सात्मक विश्लेषण केले आहे.

प्रत्यक्ष मुलाखत, प्रश्नावली, निरीक्षणाच्या साहाय्याने तथ्य संकलन करण्यात आलेले आहे. तथ्य संकलन करत असताना पुणे जिल्ह्यातील १४ तालुक्यांपैकी पाच तालुक्यांचा विचार करण्यात आला आहे. वाचनालये आणि वाचकांच्या आधारे हे संशोधन करण्यात येणार असल्याने ७० वाचनालये व २२० वाचक हे संशोधन पद्धतीतील नमुना निवडीच्या आधारे संशोधकाने आपले संशोधनाचे काम अचूक व सुरळीत होण्यासाठी नमुना निवडीच्या आधारे निवडले आहेत.

देशाच्या विकासाच्या दृष्टीकोनातून पाहिले तर वाचन हा घटक महत्त्वाचा आहे. समाजातील सामाजिक सांस्कृतिक विकासामध्ये वाचनाचा प्रत्यक्ष सहभाग सहजपणे दिसून येतो. पुणे जिल्ह्यातील सामाजिक व सांस्कृतिक विकासामध्ये वाचनाचा मोलाचा वाटा आहे. वाचनामुळे समाजामध्ये सामाजिक आणि सांस्कृतिक स्तरावरती कसे बदल होत गेले हे पाहणे संशोधनाचे उद्दिष्ट आहे. समाजातील अंधश्रद्धा, परंपरा, जातिभेद, स्त्री–पुरुष असमानता यांसारखे प्रश्न सोडविण्यामध्ये वाचन चळवळीचे खूप मोठे योगदान आहे. हे योगदान नमुना निवडीच्या आधारे निवडलेल्या वाचनालये व वाचकांच्या मुलाखतीच्या आधारे स्पष्ट करण्यात येणार आहे.

ज्ञानसंवर्धन आणि वृद्धीचे साधन वाचनालय आहे. प्राचीन काळापासून ज्ञानसंवर्धन व वृद्धीच्या आधारे समाजामध्ये मोठे बदल झालेले आपणास दिसतात हाच बदल केंद्रस्थानी ठेवून महाराष्ट्र शासनाने १९६७ साली ''गाव तेथे वाचनालय'' ही घोषणा केली. ही योजना राबवण्याच्या दृष्टीने राज्य मध्यवर्ती वाचनालय, विभागीय वाचनालय व जिल्हा वाचनालयाची स्थापना केली याचा

परिणाम असा झाला की, वाचनामुळे समाजामध्ये सामाजिक व सांस्कृतिक बदल होऊन खऱ्या अर्थाने समाजाचा एकूण विकास झाल्याचे आपणास दिसते.

समाजातील विषमता वर्गवारी सोबतच जातीय स्वरूपाची सुरवातीच्या काळात मोठ्या प्रमाणात होती. परंतु शिक्षण आणि वाचनाच्या माध्यमातून अनेक समाजसुधारकांनी यातील फोलपणा स्पष्ट केला आहे. समाजात जागृती झाली आणि जातिभेदाचे स्वरूप बदलून जातिभेदाचे प्रमाण कमी झाल्याचे दिसते. एवढेच नाही तर, मागासवर्गीयांचे जीवनमान उंचावण्यामध्येही वाचनाने मोठे योगदान दिले आहे. वाचनाने समाजामध्ये मोठ्या प्रमाणात प्रबोधन केल्यामुळे समाजात अस्तित्वात असणारी अंधश्रद्धा कमी झाली. एकूण समाजामध्ये अनिष्ट चालीरिती मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होत्या. केशवपन, सतीप्रथा, बालविवाह यांसारख्या प्रश्नांना अनेक समाजसुधारकांनी विरोध केला आणि वाचनाच्या माध्यमातून समाजाला खऱ्या खोट्याची जाणीव करून दिली. त्यामुळे समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा बंद होऊन सुदृढ समाज निर्माण होण्यास पोषक वातावरण निर्माण झाले. समाजातील जातीजातीतील तेढ कमी होऊन वाचनामुळे सामाजिक सलोखा निर्माण झाल्याचे दिसते.

वाचनामुळे धार्मिक कलह कमी करण्याचे पूरक साधन म्हणून सिद्ध झाले आहे. धर्म, धर्मातील तेढ कमी होऊन धर्मनिरपेक्षता स्थापन होण्यास वाचन चळवळीची मोठ्या प्रमाणात मदत झाली आहे. रूढी, परंपरा जोपासताना समाजामध्ये असणारे स्त्रियांचे नगण्य स्थान बदलून स्त्रियांना मुख्य प्रवाहात आणण्यामध्ये वाचन चळवळीचे फार मोठे योगदान आहे. स्त्रियांच्या विकासासाठी त्यांच्या साक्षरतेचे प्रमाण वाढणे गरजेचे आहे, हे ओळखून तत्कालीन महापुरुषांनी स्त्रियांच्या शिक्षणावर भर दिला आणि वाचनाच्या माध्यमातून स्त्रियांची साक्षरता वाढवली. एवढेच नव्हे तर, स्त्रियांना समान हक्क व दर्जा मिळवून देण्यातही वाचनाची मोठी मदत झाली आहे. एवढेच नव्हे तर, पुरुषांमधील ही साक्षरतेचे प्रमाण वाढवून वाचनाने एकंदरीत सामाजिक विकासाला चालना दिल्याचे दिसते.

वाचनामुळे समाजातील गुन्हेगारीचे प्रमाण कमी होऊन समाज नैतिकतेकडे जाऊ लागला. समाजामध्ये आवश्यक असणारी पर्यावरणीय जागृतीसुद्धा निर्माण होऊन पर्यावरण संवर्धनाचे धडे, वाचनाच्या माध्यमातून समाजास मिळू लागले. वैयक्तिक स्वच्छतेबरोबरच सामाजिक स्वच्छतासुद्धा खूप महत्त्वाची असल्याचे विचार लोकांपर्यंत वाचनाच्या माध्यमातून पोहोचले आणि महापुरुषांचे विचार केंद्रस्थानी ठेवून समाजविकास करू लागला. समाजामध्ये एक गाव एक पाणवठा, वैयक्तिक

व सामाजिक आरोग्य आणि 'बेटी बचावो व बेटी बढाओ' सारखे प्रबोधन मोठ्या प्रमाणात करून वाचनाने आपले योगदान स्पष्ट केले आहे.

सामाजिक विकासासाठी सांस्कृतिक बदल मोलाचे आहे, हे ओळखून वाचनाने गावागावामध्ये एकत्रित उत्सवासाठी वातावरण निर्मिती केली. एवढेच नव्हे तर, विविध महापुरुषांची जयंती साजरी करून त्या माध्यमातून सांस्कृतिक एकता स्थापित करण्यामध्ये वाचनाचा पुढाकार मोलाचा ठरला. विविध सांस्कृतिक सण, सांस्कृतिक मंडळे, राष्ट्रीय सण, सांस्कृतिक बदलांसाठी मोलाचे आहेत, हे ओळखून वाचन चळवळीने त्यावर भर दिल्याचे दिसते. गावागावात वास्तव्यात असणारे अनेक जाती- धर्माचे लोक आंतरजातीय विवाहास मान्यता देऊ लागले. पारंपरिक दृष्टीकोन बदलून आधुनिक जगाकडे वाटचाल करण्यास वाचन चळवळ मोलाची ठरत गेली. एकूणच वाचनाचा सामाजिक आणि सांस्कृतिक विकासातील सहभाग स्पष्ट करण्यासाठी सदर प्रकरणामध्ये त्या विषयाचा उपलब्ध सर्वेक्षणाच्या आधारे अभ्यास करण्यात आला आहे.

## ४.२ वैयक्तिक माहितीचे विश्लेषण :

सामाजिक तथ्य संकलनाच्या माध्यमातून पाच तालुक्यातून प्रश्नावली, मुलाखत व निरीक्षणाच्या साह्याने या वाचनालयातील वाचकांची वैयक्तिक माहिती घेतली आहे. त्याचे विश्लेषण तक्त्यांच्या साह्याने पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आले आहे.

**तक्ता क्र : १**

**४.२.१ वय**

| अ.क्र | वयोगट | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १५ ते २५ वयोगट | ५२ | २३.६३ |
| २ | २५ ते ५० वयोगट | ७२ | ३२.७२ |
| ३ | ५० ते ७५ वयोगट | ६८ | ३०.९० |
| ४ | ७५ ते पुढे | २८ | १२.७२ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७

संशोधाकाने वाचन चळवळीच्या माध्यमातून समाजातील समाजिक, सांस्कृतिक ,राजकीय, आर्थिक माहिती जाणून घेतली आहे. ही माहिती संकलन करत असताना वाचकांचा नेमका कोणता वयोगट आहे. तो तक्त्यांच्या आधारे वाचकांची वारंवारिता केली आहे.

१५ ते २५ हा वयोगट वाचनाच्या प्रकियेमध्ये दिसत आहे. इंटरनेट, वॉटसपच्या, जमान्यामध्ये तरूण वर्ग हा वेगवेगळी साहित्य वाचताना दिसतो त्यामध्ये २३.६३ ही या वयोगटातील वाचकांची टक्केवारी आहे. २५ ते ५० हा वयोगट समाजामधला महत्त्वाचा घटक आहे. कुटुंबाची जबाबदारी मुख्यता या वयोगटातील लोकांची आहे. सरासरी ३२.७२ एवढी आहे, ही जबाबदारी संभाळून हा वर्ग वाचनाकडे मोठ्या संख्येने वळलेला दिसतो. ५० ते ७५ या वर्गामध्येसुद्धा वाचनाचा कल असून हा वाचक वर्ग दोन नंबरला म्हणजेच त्याची सरासरी ३० .९० एवढी आहे. ७५ ते पुढे हा वाचक वर्ग थोडा कमी झाल्याचे दिसून येते. परंतु वेगवेगळे साहित्य वाचनाची आवड आहे, असे या वर्गातील १२.७२ लोकांनी सांगितले.

वरील तक्त्यांच्या अधारे असे लक्षात येते की, २५ च्या पुढील वाचकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. कारण सामाजिक बदलांची धुरा या वर्गावर मोठ्या प्रमाणावर आहे. या वर्गातील लोक मोठ्या प्रमाणात सक्रिय असलेला दिसून येतो.

**तक्ता क्र : २**

**४.२.२शिक्षण**

| अ.क्र | शिक्षणाचे प्रमाण | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ५वी ते १०वी | ५२ | २३.६३ |
| २ | १०वी ते १२वी | ७२ | ३२.७२ |
| ३ | पदवी | ६८ | ३०.९० |
| ४ | पदव्युत्तर व पुढे | २८ | १२.७२ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७

वाचकांची शैक्षणिक गुणवत्ता तपासण्याचा प्रयत्न अभ्यासकाने केला आहे. कारण वाचनाच्या माध्यमातून समाजातिल परिवर्तन घडून येते. या अनुषंगाने या ठिकाणच्या वाचक वर्गाची शैक्षणिक गुणवत्ता नेमकी कशी आहे. हे तक्त्यांच्या माध्यमातून अभ्यासकाने स्पष्ट केले आहे.

५ वी ते १० वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्याचे प्रमाण २४.५४ टक्के एवढे आहे. १० वी ते १२ वीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या वाचकांचे प्रमाण ६३.५२टक्के एवढे आहे. १० वी ते १२ वीपर्यंतचे शिकलेल्या वाचकांचे प्रमाण या ठिकाणी जास्त असलेला वाचक वर्ग दिसून येतो. पदवीपर्यंतचे शिक्षण घेतलेला वाचक वर्ग २१.८१ टक्के एवढा आहे. तर पदव्युत्तर ते पुढे शिक्षण घेणाऱ्या वाचक वर्गाचे प्रमाण १५.०० टक्के एवढे आहे. वैयक्तिक माहितीमध्ये या कार्यक्षेत्रातील वाचक वर्गाने आपली शैक्षणिक योग्यता सांगितली आहे.

**तक्ता क्र :३**

**४.२.३ लिंग**

| अ.क्र | लिंग | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | महिला | ८० | ३६.३६ |
| ४ | पुरुष | १४० | ६३.६३ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७

वाचनामुळे महिला व पुरुष महत्त्वाची यांच्यामध्ये बदल झाला असला तरी, पुरुषांच्या तुलनेत वाचनालयात किंवा वाचन चळवळीमध्ये महिलांचा सहभाग कमी असलेला दिसून येतो. वाचन संस्कृती समाजामध्ये जरी रूजली असली तरी, महत्त्वाची प्रधानता प्रबळ असलेली या वारंववारीतेमुळे लक्षात येते. महिलांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत निम्मे असलेले म्हणजेच ३६.३६ एवढे प्रमाण असल्याचे दिसते. वाचन चळवळीचा माध्यमातून स्त्रियांचे प्रमाण व पुरुषांचे प्रमाण तपासले असता या ठिकाणी पुरुषाचे प्रमाण महिलांपेक्षा जास्त असलेले दिसते. कारण सामाजिक परिवर्तनामध्ये महिलांचा सहभाग वाढल्या शिवाय खरे परिवर्तन झाले असे म्हणता येणार नाही. असे असले तरी ६३.६३ एवढे प्रमाण पुरुष वाचकाचे असलेले दिसून येते.

### तक्ता क्र : ४

### ४.२.४ वाचन साहित्य

| अ.क्र | वाचन साहित्य | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कथा | १५ | ०६.१८ |
| २ | कदंबरी | २४ | १०.९० |
| ३ | नाटक | ११ | ०५.०० |
| ४ | चरित्र | १२ | ०५.४५ |
| ५ | आत्मचरीत्र | १० | ०४.५४ |
| ६ | कविता | ११ | ०५.०० |
| ७ | वैचारिक साहित्य | १० | ०४.५४ |
| ८ | प्रवास वर्णन | १२ | ०५.४५ |
| ९ | मासिक | १० | ०४.५४ |
| १० | वर्तमानपत्र | १०५ | ४७.७२ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्त्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

वाचन चळवळीचा मुख्य उद्देश हा लोकांना त्यांच्या आवडीचे साहित्य पुरवणे हा आहे. अभ्यासकाने लोक नेमके कोणते साहित्य वाचतात ते साहित्य त्यांच्या जीवनामध्ये कितपत उपयोगी आहे. याची पाहणी करून(पथदर्शी सर्व्हे) प्रश्नावली बनली आहे.समाजातील सांस्कृतिक बदलामध्ये साहित्याचा नेमका कोणता सहभाग आहे, हे साहित्य माणसाला कसे डोळस बनविते व लोकांची प्रगती, बदल कसा होतो हा वाचनाचा मूळ उद्देश आहे. या तक्त्याच्या आधारे वाचक कोणते साहित्य वाचतो, हे लक्षात येते. कथा वाचणाऱ्या वाचकांची ६.८१ प्रमाण आहे. कादंबऱ्या वाचणाऱ्यावाचकांची १०.९० एवढी प्रमाण आहे. नाटक वाचणाऱ्यांचे प्रमाण ०५.०० एवढे आहे.चरित्र वाचनाऱ्यांचे प्रमाण ०५.४५ एवढे आहे आत्मचरित्रे वाचणाऱ्या वाचकांचे प्रमाण ०४.५४ एवढे आहे. कविता वाचणाऱ्या वाचकाचे प्रमाण ०५.०० एवढे आहे. वैचारिक साहित्य वाचनाऱ्यांचे प्रमाण ४.५४ एवढे आहे. प्रवास वर्णन वाचणाऱ्यावाचकांचे प्रमाण ५.५४ एवढे आहे तर मासिके वाचणाऱ्या वाचकांचे प्रमाण ०४.५४

एवढे आहे. वर्तमानपत्रे वाचणाऱ्यांचे प्रमाण ४७.७२ एवढे आहे. वरील विवेचनावरून असे लक्षात येते की, इतर साहित्याच्या तुलनेत वर्तमानपत्रे वाचणाऱ्याचे प्रमाण जास्त आहे.

**तक्ता क्र : ५**

**४.२.५ वाचनाचा उद्देश**

| अ.क्र | वाचनाचा उद्देश | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मनोरंजन | ८२ | ३७.२७ |
| २ | ज्ञानप्राप्ती | ४० | १८.१८ |
| ३ | अध्ययन | २७ | १२.२७ |
| ४ | अध्यापन | १८ | ०८.१८ |
| ५ | सामाजिक जाणीव | २८ | १२.७२ |
| ६ | सामाजिक प्रश्नांची उकल | २५ | ११.३६ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७

वाचन चळवळीच्या माध्यमातून वाचनाचा उद्देश काय आहे, ते या तक्त्याचे आधारे स्पष्ट केले आहे. वाचनाचा उद्देश केवळ ज्ञानी बनणे असा नसून त्या व्यक्तीला व्यक्ती म्हणून समाजामध्ये चांगले जगता आले पाहिजे. समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो, हा विचार समाजामध्ये रुजवणे हा वाचनाचा उद्देश आहे, असे ३७.२७ लोकांनी सांगितले. वाचनाच्या माध्यमातून आमचे मनोरंजन होते, असे १८.१८ लोकांनी सांगितले. समाजातील खरे प्रश्न समजाऊेत, समस्या समजाव्यात, समाजाची प्रगती व्हावी, समाजामध्ये परिवर्तन व्हावे, यासाठी ज्ञानप्राप्ती होणे गरजेचे आहे, असे या १२.२७ वाचकांनी सांगितले. अध्ययन करणारा १२.२७ टक्के वाचक आहे.वाचनाचा फायदा दुसऱ्याला ज्ञान देण्यासाठी हातो. त्यामुळे समाजात प्रबोधन होते व या प्रबोधनाच्या माध्यमातून समाजात परिवर्तन होते असे ८.१८ वाचकांनी सांगितले. वाचनाचा खरा उद्‌देश आहे तो म्हणजे सामाजिक जाणीव निर्माण होणे. समाजामध्ये वेगवेगळ्या स्तरावर असंख्य अडचणी आहेत, त्या अडचणी कशा दूर करता येतील त्या अनुषंगाने लोकांमध्ये जाणीव निर्माण होणे गरजेचे आहे असे १२.७२ टक्के वाचवकांनी सांगितले. समाजात अनेक प्रश्न आहेत. ते प्रश्न नेमके कोणते व कशा

पद्धतीने सोडविणे गरजेचे आहे. त्यामुळे लोकांच्या सहभागातून ते स्थानिक प्रश्न कसे सोडवता येतील, त्या प्रश्नाची उकल कशी करता येईल, वाचनाच्या माध्यमातून हे प्रश्न व्यवस्थित मार्गी लावता येतील, असे ११.३६ वाचकांनी सांगितले.

**तक्ता क्र: ६**

**४.२.६ वाचनालयाची नियमितता**

| **अ.क्र** | **वाचनालयाची नियमितता** | **वाचकांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | १६० | ७२.७२ |
| २ | नाही | ४० | १८.१८ |
| ३ | तटस्थ | २० | ०९.०९ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७

'गाव तेथे वाचनालय' ही संकल्पना तत्कालीन महाराष्ट्रातील मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी मांडली. लोकांमध्ये समाजिक जागृती निर्माण करावयाची असेल तर लोकांना साक्षर करणे गरजेचे आहे. लोक साक्षर झाली तर, लोकांना चांगले आणि वाईट काय आहे ते समजण्यास मदत होईल. लोक वाचनाकडे आकर्षित झाले, तर समाजात परिवर्तन करणे सोपे जाईल. रोजगार निर्मिती, लोकांचे प्रश्न, लोकसहभागातून सोडवता येतील. त्यासाठी अगोदर लोकांनी वाचन केले पाहिजे हा उद्देश गाव तेथे वाचनालयांचा होता. हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून गाव तेथे वाचनालयाची निर्मिती झाली. वाचनालयाचा कार्यक्रम सफल झाला किंवा नाही ते त्या गावाच्या विकासावर अवलंबून आहे. ज्या भागामध्ये वाचनालये आहे, ते वाचनालये वाचकांना वाचन साहित्य पुरवतात का किंवा वाचनालये नियमित उघडे असतात का, याविषयी विचारणा केली असता ७२.७२ वाचकांनी सांगितले की, होय वेळेत उघडतात. परंतु १८.१८ वाचकांनी सांगितले की, ते वेळेवर उघडत नाहीत, तर ९.०९ टक्के वाचकांनी या वाचनालयाच्या नियमिततेबद्दल सांगण्यास नकार दिला.

**तक्ता क्र: ७**

## ४.२.७ वाचनालयाची सुविधा

| अ.क्र | वाचनालयाची सुविधा | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | बसण्याची व्यवस्था | ७० | ३१.८१ |
| २ | देवघेव व्यवस्था | ६६ | ३०.०० |
| ३ | साहित्य उपलब्ध | ४८ | २१.८१ |
| ४ | काही प्रमाणात साहित्य उपलब्ध | ३२ | १४.५४ |
| ५ | तटस्थ | ०४ | ०१.८१ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७

वाचकांसाठी सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे बसण्याची व्यवस्था, शांतता, लाईटची व्यवस्था, पंखे, वाचनाचे साहित्य, साहित्याची देवघेव, साहित्य व्यवस्थित पद्धतीने उपलब्ध करून देणे इत्यादी व्यवस्था ही वाचनालयाची असते. वाचकाला ती व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे का, त्या अनुषंगाने प्रश्न विचारले असता ३१.८१ टक्के वाचकांनी सांगितले की, बसण्याची व्यवस्था चांगली आहे. देवघेव व्यवस्था उत्तम प्रकारची आहे असे ३०.०० टक्के वाचकांनी सांगितले. वाचकांना जे वाचन साहित्य लागते ते सर्व वाचन साहित्य वाचकांना उपलब्ध करून दिले जाते असे. २१.८१ वाचकांनी सांगितले, तर १४.५४ वाचकांनी सांगितले की, संपूर्ण वाचन साहित्य पुरविले जात नाही. १.८१ टक्के वाचकांनी या वाचन साहित्य पुरवले जाते किंवा जात नाही, याबद्दल तटस्थ असलेले दिसून येते.

### ४.३.३ वाचन चळवळीमुळे झालेला सामाजिक बदल

वाचनामुळे झालेला सामाजिक व सांस्कृतिक बदल क्षेत्रीय पाहणीच्या आधारे स्पष्ट करण्यासाठी नमुना निवडीच्या आधारे तालुकानिहाय हवेली ३०, आंबेगाव १०, मावळ १०, वेल्हा १०, भोर १०, वाचनालयातील वाचकांच्या प्रश्नावलीच्या आधारे एकूण २२० वाचकांचा विचार करण्यात आला आहे. या वाचकांची तालुकानिहाय निवड दर्शवणारा तक्ता खालील प्रमाणे:


**४.३.१ वाचनालय व वाचकांची तालुकानिहाय निवड दर्शविणारा संख्यात्मक तक्ता**

| अ. क्र. | तालुका | तालुकानिहाय वाचनालयाची संख्या | वाचकांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | हवेली | ३० | ९६ |
| २ | आंबेगाव | १० | ३४ |
| ३ | मावळ | १० | २८ |
| ४ | वेल्हा | १० | ३० |
| ५ | भोर | १० | ३२ |
| **एकूण** | | **७०** | **२२०** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

**आलेख क्र.१**

**वाचनालय व वाचकांची तालुकानिहाय निवड**



पुणे जिल्ह्याच्या सामाजिक व सांस्कृतिक बदलामध्ये वाचन चळवळीचे असणारे योगदान अभ्यासण्यासाठी व संशोधनाचे काय योग्य दिशेने व्हावे, यासाठी संशोधकाने नमुना निवडीच्या आधारे काही मर्यादा घालून घेतल्या आहेत. १९६७ ला 'गाव तेथे वाचनालय' ही योजना अस्तित्वात आली तेव्हापासून आजपर्यंत वाचनाच्या माध्यमातून झालेल्या सामाजिक व सांस्कृतिक बदलाचा आलेख प्रस्तुत संशोधनात संशोधकाने मांडला आहे. पुणे जिल्ह्यातील पाच तालुके व पाच तालुक्यातील ७० वाचनालयामधील २२० वाचकांच्या आधारे संशोधनाचे काम पूर्ण केले आहे. वाचनामुळे झालेला सामाजिक बदल प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षणाच्या व तक्त्याच्या आधारे स्पष्ट करण्यात आला आहे.

**तक्ता क्र : १**


**४.३.२ जातिव्यवस्थेत झालेला बदल**

| **अ.क्र** | **जातिव्यवस्थेत बदल** | **वाचकांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | शैक्षणिक परिणाम | ५० | २२.७२ |
| २ | मानसिक परिणाम | २५ | ११.३६ |
| ३ | सामाजिक प्रबोधन | ६५ | २९.५४ |
| ४ | सामाजिक जागृती | ३५ | १५.९० |
| ५ | जातीय अस्मिता अस्थिर | ४५ | २०.४५ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

**आलेख क्र : २**

**जातिव्यवस्थेत झालेला बदल**




वाचनामुळे सामाजिक बदल मोठ्या प्रमाणात झालेले दिसतात या बदलांमध्ये प्रामुख्याने जाती व्यवस्थेमध्ये झालेला बदल उल्लेखनीय आहे. प्रस्तुत तक्त्याच्या आधारे जाति व्यवस्थेमध्ये झालेले बदल वेगवेगळ्या मुद्दयांच्या आधारे समोर येतात. वाचकांच्या प्रश्नावलीच्या आधारे असे दिसून येते की, जाती–जातीमध्ये वाचनामुळे शिक्षणाचे प्रमाण वाढलेले आहे शिक्षणाचे प्रमाण वाढत्यामुळे जातीय तीव्रता कमी झाल्याचे २२० वाचकांपैकी ५० वाचकांनी सांगितले म्हणजेच सरासरी २२.७२ टक्के समाजातील जातीयता कमी होण्यास वाचनाची महत्त्वाची भूमिका आहे.

वाचनामुळे जातीय मानसिकता कमी झाल्याचे २५ लोकांनी सांगितले. जातीय मानसिकता दूर करणे सर्वात महत्त्वाचे आहे. मानसिकता कमी करण्यामध्ये ११.३६ टक्के असल्याचे दिसते. वाचन चळवळ समाजामध्ये चांगले विचार रुजवण्याचे काम करते. चांगला विचार समाजाच्या तळागाळात पोहोचविण्यासाठी प्रबोधनाची गरज असते. हाच विचार वाचनाने समाजातील शेवटच्या माणसांपर्यंत पोहोचविल्याने गावागावातील जातीय आंतर कमी होऊन गावकुसाबाहेर समाजगावामध्ये समाविष्ट होण्यास मदत झाली. जातीजातीत मतभेद कमी होऊन सामाजिक प्रबोधनास चालना मिळाली, असे जवळपास ६५ लोकांनी सांगितले. याचे शेकडा प्रमाण २९.५४ टक्के असल्याचे तक्ता दर्शवितो. एकूणच समाजामध्ये सामाजिक जागृती होताना माणूस हा एकच आहे जातीयता फोल आहे

असे म्हणणाऱ्यांची संख्या ३५ एवढी आहे. समाजामध्ये सर्वस्तरांमध्ये वाचनामुळे जागृती झाली. आपण इतरांप्रमाणे माणूस म्हणून जगू शकतो, प्रगती करू शकतो, याची जाणीव वाचनामुळे झाल्याचे दिसते. शेकडा प्रमाणानुसार १५.९० टक्के लोकांनी वाचनामुळे सामाजिक जागृती झाल्याचे सांगितले.

वाचनामुळे जातीय विकृती कमी होऊन जातीय आलेख अस्थिर झाल्याचे दिसते. प्रत्येकाला आपल्या जातीविषयी असलेला अभिमान कमी होऊन दुसऱ्याच्या जाती बद्दलही आदर वाढीस लागला. वाचनामुळे झालेला हा बदल महत्त्वाचा आहे. जातीय अस्मिता कमी झाल्याचे ४५ लोक सांगतात एकूण शेकडा प्रमाण २०.४५ असल्याचे दिसते. एकंदरीत पाहता प्रस्तुत तक्ता वाचनामुळे झालेला जातीय बदल दर्शवतो, हा सामाजिक बदलातील महत्त्वाचा मुद्दा आहे.

### तक्ता क्र : २


### ४.३.३ अंधश्रद्धेवर झालेला परिणाम

| अ.क्र | अंधश्रद्धा बदल | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सामाजिक जनजागृती | ८५ | ३८.६३ |
| २ | दैववाद कमी झाला | ३० | १३.६३ |
| ३ | प्राणिमात्रांचा बळी | २५ | ११.३६ |
| ४ | लोकांची फसवणूक | ३५ | १५.९० |
| ५ | अंधरूढी परंपरेत बदल | ४५ | २०.४५ |
| **एकूण** | | **२२०** | **१००** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

### आलेख क्र : ३

### अंधश्रद्धेवर झालेला परिणाम




वाचनामुळे समाजातील सर्व स्तरांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाल्याचे आपणास दिसते. समाजामध्ये अंधश्रद्धा किंवा अनिष्ठ रूढी परंपरा मोठ्या प्रमाणात अस्तित्वात असल्याने त्याचे दूरगामी परिणाम समाजाऊर झालेले दिसतात. या रूढी परंपरेतून समाजाला बाहेर काढण्याचे काम वाचन चळवळीमुळे सर्व प्रथम अंधश्रद्धेविषयी सामाजिक जनजागृती झाल्याचे दिसते. वाचकांच्या

प्रश्नावलीच्या आधारे स्पष्ट करावयाचे झाल्यास ३८.६३ टक्के वाचकांनी समाजामध्ये वाचनामुळे समाजात सामाजिक जनजागृती झाल्याचे सांगितले.

अंधश्रद्धचा एक भाग म्हणजे दैववाद होय. अशिक्षित समाजामध्ये अशी धारणा होती की, माझ्या जीवनामध्ये ज्या काही चांगल्या–वाईट घटना घडतात, त्यास माझे नशीब, दैव जबाबदार आहे. माझ्या दैवात असेल तर सर्व सुख माझ्या घरी पाणी भरतील आणि माझ्यावर होणारे अन्याय, अत्याचार व शोषण माझ्या दैवाचाच भाग आहे, असे समजून सर्व शोषण निमूटपणे सहन केले जात होते. परंतु वाचनाचा परिणाम असा झाला की, समाजाला खऱ्या खोट्यातील सत्य–असत्यामध्ये अंतर कळू लागले. दैव नावाची गोष्ट अस्तित्वात नाही. दैव स्वतःच्या हिंमतीवर बदलता येते, याची जाणीव झाली. वाचकांच्या सरासरीनुसार १३.६३ टक्के वाचकांनी आपले मत नोंदवले की, वाचनामुळे समाजातील दैववाद कमी होऊन कर्मवादावर लोकांचा विश्वास निर्माण झाला आहे.

समाजामध्ये अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात अस्तित्वात असत्यामुळे त्यातून मुक्ती हवी असेल तर बळी देण्याची प्रथा रूढ होती. वेगवेगळ्या यात्रा, जत्रांच्या किंवा देवी देवतांचे नवस फेडण्यासाठी मोठ्या प्रमाणात बळी दिला जात असे. वाचनामुळे आज प्राणिमात्रांचा बळी देण्याचे प्रमाण कमी झाल्याचे दिसते. वाचकांच्या सर्व्हेनुसार १३.३३ टक्के प्राणिमात्रांचा बळी देण्याचे प्रमाण कमी झाले आहे असे सांगितले.

समाजामध्ये शिक्षणाचे अत्यल्प प्रमाण आणि अंध–परंपराच्या माध्यमातून लोकांची फसवणूक केली जात होती. वेगवेगळ्या अडचणींमधून सुटका करून घेण्यासाठी धनसंपत्ती, मौल्यवान वस्तू तत्सम स्वरूपाच्या अनेक गोष्टी फसवून लुबाडल्या जात होत्या. वाचनामुळे समाजामध्ये जागृती झात्यामुळे १५.९० टक्के वाचकांच्या म्हणण्यानुसार लोकांची फसवणूक कमी झाल्याचे नमूद केले आहे.

परंपरेनुसार समाजामध्ये अनेक अनिष्ट रूढी, परंपरा अस्तित्वात होत्या. समाजामध्ये जसजसे वाचनामुळे प्रबोधन होत गेले तसतशी सामाजिक जागृती होऊन अंधरूढी, परंपरामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाल्याचे दिसते. मुलगी ही दुसऱ्याचे धन असते असे समजून तिला शिक्षणापासून वंचित ठेवले जायचे तिची भूमिका चूल आणि मूल एवढीच आहे, अशी परंपरा होती. विवाहामधून मोठ्या प्रमाणात मुलींकडून हुंडा घेतला जायचा. मुलगा हाच वंशाचा दिवा आहे अशा

प्रकारच्या अनेक रूढी परंपरामध्ये बदल होऊन मुलींचे शिक्षण त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन वाचनामुळे बदलला आहे. वाचकांच्या म्हणण्यानुसार २०.४५ टक्के समाजातील रूढी परंपरेमध्ये बदल झाल्याचे म्हटले आहे.

**तक्ता क्र : ३**


**४.३.४ स्त्रियांविषयक सामाजिक दृष्टीकोनात बदल**

| अ.क्र | सामाजिक बदल | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कौटुंबिक दर्जा | ५२ | २३.६३ |
| २ | सामाजिक स्थान | २८ | १२.७२ |
| ३ | मानसिक दृष्टीकोन | २२ | १०.०० |
| ४ | अर्थाजनामधील सहभाग | ३० | १३.६३ |
| ५ | मुलींचे शिक्षणाचे प्रमाण | ५७ | २५.९० |
| ६ | बेटी बचाव बेटी पढाओ | ३१ | १४.०९ |
| एकूण | | २२० | १००% |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण, २०१७.

**आलेख क्र : ४**

**स्त्रियांविषयक सामाजिक दृष्टीकोनात बदल**



भारतीय पुरुष प्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांचे स्थान नगण्य होते. स्त्रिया सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, स्वरूपाच्या सर्व हक्क अधिकारांपासून वंचित होत्या अनेक महापूरूषांनी समाजातील स्त्रियांचा दर्जा वाढवण्यासाठी आपले आयुष्य पणाला लावले. या महापुरुषांच्या सोबतच वाचनानेही स्त्रियांविषयक सामाजिक दृष्टीकोनात बदल घडविण्यामध्ये मोलाचे योगदान दिले आहे. वाचनामुळे स्त्रियांविषयक असणाऱ्या समज गैरसमाजामध्ये मोठ्या प्रमाणात बदल घडून आला आणि एकूणच समाजव्यवस्था प्रगत होत गेली.

वाचनामुळे एकूणच स्त्रियांविषयक आचार विचारांमध्ये बदल झाला असला तरी अजूनही खूप बदल होण्याची गरज आहे. आज स्त्रियांचा कौटुंबिक दर्जा सुधारल्याचे दिसत असले तरी त्यामध्ये अजून बरीच सुधारणा होणे गरजेचे आहे. कुटुंबामध्ये स्त्री आणि पुरुषाला एका स्थायी दोन चाके म्हटले जाते असे असले तरी अजून बरेचशे हक्क अधिकार स्त्रियांना देणे गरजेचे आहे. आज रोजी स्त्रियांच्या कौटुबिंक दर्जा सुधारला असता तिला निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेतले जाते. कुटूंबामधील संपत्तीचे विभागणी करताना स्त्रियांच्या वाटणीचाही विचार केला जातो. एवढेच नव्हे तर वाचनामुळे सामाजिक प्रबोधन होऊन स्त्रिया नोकरी व्यवसायमध्येही पुढे जात असताना घरातील मुली तिच्या पाठीशी उभ्या राहत आहेत. कुटुंबातील अनेक निर्णय स्त्रियांच्या संमतीने होताना दिसतात. स्त्रियांच्या संमतीनेच संतती विषयक निर्णय घेतला जातो. स्त्रियांच्या विचारांचा वाढता प्रभाव, कौटूंबिक दर्जा वाढल्याचे स्पष्ट होत आहे. वाचकांच्या म्हणण्यानुसार २३.६३ टक्के स्त्रियांचा कौटुंबिक दर्जा वाढला आहे.

वाचनामुळे स्त्री विषयक सामाजिक दृष्टी कोनात झालेल्या बदलांपैकी एक म्हणजे स्त्रियांच वाढलेले समाजातील स्थान होय. परंपरेनुसार स्त्रियांना हक्क आणि अधिकारांपासून वंचित ठेवले जात होते, परंतु समाज मनावर वाचनाचा परिणाम झाला त्यामुळे स्त्रियांच्या सामाजिक स्थानामध्ये अमुलाग्र बदल घडून आले. स्त्रीच्या लेखनाच्या माध्यमातून आपली सुखदु:खे समाजासमोर मांडू लागत्यामुळे समाजातील इतर स्त्रियाही आपल्या सामाजिक स्थानाविषयी सजग झाल्या एकूणच सामाजिक विकास प्रक्रियेमध्ये त्यांचा सहभाग वाढल्याने त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलू लागला. पूर्वी स्त्रियांचे समाजातील स्थान अगदी नगण्य होते, परंतु आज स्त्रीच घर, गावचा आधार बनू लागल्याने समाजातील त्यांचे स्थान दिवसेंदिवस उंचावत गेले. यामध्ये वाचनाचे फार मोठे

योगदान आहे. वाचकांच्या म्हणण्यानुसार १२.७२ टक्के महिलांचे समाजातील स्थान उंचावल्याचे दिसते.

वाचनामुळे समाजामध्ये वरवरचा बदल घडत नसून मानसिक बदल घडवून आणण्याची ताकद वाचन चळवळीत आहे. वाचन चळवळीमुळे लोकांचा एकमेकांकडे म्हणजेच धनिकांचा गरिबांकडे, उच्चवर्गीयांचा कनिष्ठ वर्गाकडे पुरुषांचा महिलांकडे पाहण्याचा दृष्टी कोन बदलण्यामध्ये वाचन चळवळ अग्रेसर आहे. वृत्तपत्रे, मासिके आणि संदर्भग्रंथ समाजातील शेवटच्या माणसापर्यंत पोहचत्यामुळे त्यांच्यात सर्वांगीण मानसिक बदल सहज घडून आला. आज समाजातील, जाती जातीतील, धर्मा धर्मातील अंतर कमी होऊन मानसिकदृष्ट्या सर्व मानव एक असण्याची मानसिकता लोकांची निर्माण झाली आहे. वाचकांच्या सर्व्हेनुसार १०.०० टक्के लोकांचा मानसिक दृष्टीकोन वाचनामुळे बदलण्यास मदत झाली आहे.

वाचन समाजातील सर्व स्तरांमध्ये बदल घडवत असताना अर्थार्जनामधील बदलही महत्त्वाचा आहे. वाचनामुळे आर्थिक उत्पादनाची अनेक साधने उपलब्ध झाली अनेक नोकरीच्या, व्यवसायाच्या संधी उपलब्ध झाल्या. वाचनाच्या माध्यमातून व्यवसाय मार्गदर्शन, करीअरच्या संधी उपलब्ध झाल्या आणि आर्थिक उत्पन्न अधिक वाढले. वाचकांच्या केलेल्या सर्व्हेमधून असे दिसून येते की, १३.३३ टक्के आर्थिक उत्पादनामध्ये वाचनामुळे वाढ झाली आहे.

वाचन चळवळ सामाजिक प्रबोधनाचे मुख्य साधन आहे. समाजामधील अनेक अनिष्ठ चाली रूढी बंद करून नव्या दिशेने समाजाला घेऊन जाण्याचे श्रेय वाचनाला जाते. वाचनामुळे मुलीकडे पाहण्याचा संकुचित दृष्टीकोन बदलला आणि प्रत्येक पालक आपल्या मुलीला शिक्षण देऊ लागला. त्यामुळे मुलींने शिक्षणाचे प्रमाण वाढून प्रत्येक कुटूंबाचा मानसिक विकास होत गेल्याचे दिसते. पूर्वी मुलींना शिक्षण देणे म्हणजे धर्म बुडवणे ही मानसिकता वाचनाने मोडित काढली आणि आज सर्व स्तरातील सर्वोच्च पदावरती मुली सक्षमपणे कारभार सांभाळत आहेत. वाचकांच्या म्हणण्यानुसार, २५.९० टक्के मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. यामध्ये वाचनाचा मोठा हातभार आहे.

वाचनामुळे समाजामध्ये आमूलाग्र बदल झाले असले तरी अजून काही बदल होणे बाकी आहे. आज जवळपास हजार मुलांपाठीमागे मुलींचे प्रमाण ८४० ते ९४० च्या दरम्यान आहे. म्हणजेच १००० मुलांच्या पाठीमागे १०० ते १५० मुलींचे प्रमाण कमी आहे. भविष्यातील ही समस्या ओळखून 'बेटी

बचाव बेटी पढाओ' सारखी अनेक अभियान समाजामध्ये प्रबोधनाचे काम करत आहेत. मुलींचे जनदराचे प्रमाण वाढले पाहिजे, यासाठी वाचन चळवळ प्रबोधन करीत आहे. १४.९ टक्के लोकांच्या म्हणण्यानुसार 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' हे अभियान समाजातील शेवटच्या स्तरापर्यंत पोहोचविण्याचे काम वाचन चळवळीने केले आहे.

**तक्ता क : ४**

**४.३.५ गुन्हेगारीवर झालेला बदल**

| अ.क्र | गुन्हेगारीतील बदल | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | बाल गुन्हेगारी | ३२ | १४.५४ |
| २ | जातीय गुन्हेगारी | ४७ | २१.३६ |
| ३ | पांढरपेशीय गुन्हेगारी | ७८ | ३५.४५ |
| ४ | मादक द्रव्य पदार्थ गुन्हे | २७ | १२.२७ |
| ५ | भुरटी गुन्हेगारी | ३६ | १६.३६ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

वाचन चळवळ समाजातील संस्काराचे एक केंद्र बनले आहे. वाचनाच्या माध्यमातून प्रत्येक कुटुंबातील मुलांचे पालन पोषण कसे करावे याचा धडा मिळतो याचा परिणाम असा झाला की समाजातील एकूणच बालगुन्हेगारीचे प्रमाण कमी झाल्याचे दिसते. आपला मुलगा शिक्षित, सुसंस्कारीत असावा यासाठी पालकांचे बारीक लक्ष असते. मुले कोणत्या वयात बिघडू शकतात, त्यांची काळजी कशी घ्यावी, या विषयी वाचनाच्या माध्यमातून प्रबोधन होत असल्याने बालगुन्हेगारी १४.५४ टक्के एवढे प्रमाण दिसून येते.

पारंपरिक समाज व्यवस्था बदलण्यामध्ये वाचनाचे मोठे योगदान आहे. भटक्या विमुक्त जाती जमातीतील अनेक जाती गुन्हेगारी जाती म्हणून ओळखल्या जायच्या. पोटाची भूक भागवण्यासाठी अनेक जातींना चोरी केल्याशिवाय पर्याय नव्हता परंतु आज वाचनामुळत्या–त्या समाजातील मुले–मुली शिक्षण घेऊन नोकरी करू लागले, लेखन करू लागले. परिणामी वाचनाच्या माध्यमातून २१.३६ टक्के एवढेच जातीय गुन्हगारीचे प्रमाण दिसून येते.

समाजातील प्रत्येक घटक कमी वेळेत जास्त पैसा कमावण्याच्या पाठीमागे लागला आहे. पर्यायी समाजातील पांढरपेशीय गुन्हेगारी वाढल्याचे वेगळे सांगावयास नको. प्रत्येक स्तरातील व्यक्ती दुसऱ्याचे शोषण करून मोठा होण्याचे स्वप्न पाहत आहे. राजकारण त्याचाच एक भाग आहे. सफेद कपडे घालून काळे धंदे करण्याचे प्रमाण वाढण्यापाठीमागेही वाचनाचा हात आहे. वाचकांच्या म्हणण्यानूसार ३५.४५ टक्के एवढे पांढरपेशीय गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे.

समाजामध्ये स्वत:ला वेगळे स्थापित करण्यासाठी अती उच्चभ्रू वर्गाची निर्मिती झाली. अती उच्चभ्रू च्या नावाखाली सर्व सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक बंधने झुगारून दिली आणि पाश्च्यात्य अनुकरणातून मादक द्रव्य पदार्थाच्या आहारी उच्चभ्रू वर्गातील तरूणपिढी गेली आहे. आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी नैतिक, अनैतिक कामे करून गुन्हेगारी जगतामध्ये समाविष्ट होऊ लागले आहे. मादकद्रव्य पदार्थामधील गुन्हेगारीचे प्रमाण सर्व्हेनुसार १२.२७ टक्के झाल्याचे वाचकांनी सांगितले.

वाचनामुळे समाजामध्ये घडणाऱ्या चांगल्या बदला सोबतच काही वाईट बदल घडल्याचे दिसते. वाचनाच्या माध्यमातून अनेक छोटे मोठे गुन्हे वाचकांच्या समोर येतात आणि अविवेकीपणाने अडचणीमध्ये असलेले लोक भुरट्या गुन्हेगारीचे शिकार होतात. छोटी मोठी चोरी, लांडी लबाडी आणि आजकाल वाढत चाललेल्या पैशाच्या बदल्यात जामिनासारख्या घटना घडताना दिसतात. हे सर्व मार्ग वाचनाच्या माध्यमातून समाजाच्या समोर येतात आणि समाज तशा स्वरूपाचा गुन्हा करून जातो वाचकांच्या पाहणीनुसार १६.३६ टक्के समाजामध्ये भुरट्या गुन्हेगारीचे प्रमाण असल्याचे दिसते.

**तक्ता क्र : ५**


**४.३.६ सामाजिक प्रश्नांची तिव्रता**

| अ.क्र | सामाजिक बदल | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शिक्षणाचे प्रमाण | ४६ | २०.९० |
| २ | स्त्री–पुरुष समानता | २६ | ११.८१ |
| ३ | धार्मिक तेढ | ३२ | १४.५४ |
| ४ | बेटी व्यवहार | ०८ | ३.६३ |
| ५ | सामाजिक विषमता कमी | ६८ | ३०.९० |
| ६ | सहभोजन | ४० | १८.१८ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्त्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

**आलेख क्र : ६**

**सामाजिक प्रश्नांची तिव्रता**




सामाजिक बदलामध्ये महत्त्वाचे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते. शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करण्यामध्ये वाचन चळवळीचा मोलाचा वाटा आहे. शिक्षणाशिवाय तरूणोपाय नाही हे तळागाळापर्यंत वाचन चळवळीने पोहोचविले.

शिक्षणामुळे एकूण समाजात किती बदल होतो, हे दर्शवित्यामुळे सामाजातील प्रत्येक घटक शिक्षणाकडे वळाला. ज्या कुटुंबातील आई–वडील अशिक्षित होते. त्यांनीही आपल्या मुलाला शिक्षित करण्याचा निर्णय घेतला आणि समाजातील नगण्य असणारे शिक्षणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले, हे प्रमाण वाचकांच्या म्हणण्यानुसार २०.९० टक्के एवढे असल्याचे दिसते.

निसर्गतः स्त्री व पुरुष वेगळे असले तरी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. स्त्रियांना नगण्य समजून सर्व हक्क अधिकारांपासून दूर ठेवल्याने सामाजिक विकास थांबला गेला. वाचनाने स्त्री–पुरुष समता स्थापित करण्याच्या दृष्टीने प्रबोधन केले. याचसोबत अनेक महापुरुषांनीही हा मुद्दा उचलून धरला. परिणामी समाजातील स्त्री पुरुष समानता वाढली आणि पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनासुद्धा त्यांचे हक्क अधिकार मिळू लागले वाचकांच्या सर्व्हेनुसार वाचनामुळे ११.८१ टक्के स्त्री–पुरुष समानतेचे प्रमाण वाढले आहे.

भारत बहुभाषिक आणि बहुधार्मिक देश आहे विविधतेत एकता निर्माण करण्यामध्ये वाचनाचे मोठे योगदान आहे. पूर्वी धर्मा–धर्मा मध्ये द्वेष पसरल्याने धार्मिक तेढ निर्माण होऊन सामाजिक विकास थांबत असे. आज वाचनामुळे सर्व धर्मांची शिकवण एकच आहे. सर्व धर्माच्या केंद्रस्थानी माणूस आहे ही गोष्ट समाजाला पटली आहे. काही लोक जाणीवपूर्वक धर्माधर्मामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. परंतु यामध्ये तथ्य नाही, ही गोष्ट वाचनामुळे लोकांच्या लक्षात आली. वाचकांच्या पाहणीनुसार १४.५४ टक्के वाचक म्हणतात की, वाचनामुळे धार्मिक तेढ कमी झाली आहे.

आजच्या आधुनिक युगामध्ये वेगवेगळ्या जाती–धर्मात रोटी–बेटी व्यवहार सुरू झाला आहे. शिक्षित लोक जातीधर्माचा विचार न करता आपल्या मुलीचा दुसऱ्या जातीत किंवा धर्मात विवाह करतात पूर्वी जात किंवा धर्म महत्त्वाचा असायचा. आज शिक्षण, नोकरी आणि माणूसपण पाहिले जाते. म्हणजे आज ३.६३ टक्के लोकांनी बेटी व्यवहार होत असल्याचे सांगितले.

वाचनामुळे सामाजिक विषमता कमी होण्यास मदत झाली आहे. समाजातील जाती–जातीमधील द्वेष कमी होऊन एकमेकांत सहकार्याची भावना निर्माण झाली आहे. समाजातील अनिष्ठ चालीरिती कमी होऊन सामाजिक विषयाची तीव्रता कमी झाली आहे. हिंदू, मुस्लीम, शीख,

इसाई हम सब भाई भाई ची भावना निर्माण झाली आहे. धर्मा धर्माकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलत्यामुळे धार्मिक आणि सांस्कृतिक पातळीवर असणारी विषमता कमी होऊन एकसंघ समाज निर्माण होण्यास मदत झाली आहे. सर्व्हेमधील वाचकांच्या म्हणण्यानुसार ३०.९० टक्के सामाजिक विषमता कमी झाल्याचे दिसते.

वाचनामुळे समाजातील जातीय तीव्र भावना कमी होऊन त्याच्याकडे माणूस म्हणून पाहू लागले आहे. पूर्वी प्रत्येक जाती धर्माचे राहण्याचे आणि सार्वजनिक ठिकाणी भोजनाची जागा ठरलेली असायची. सहभोजन नावाची गोष्ट अस्तित्वात नव्हती वाचनामुळे या सर्व मानसिकता मोडित निघाल्या आणि समाजामधील वेगवेगळ्या निमित्ताने सहभोजनाचे प्रमाण वाढले. सर्वेक्षणातील १८.१८ टक्के लोक म्हणतात की, वाचनामुळे सहभोजनाचे प्रमाण वाढून सामाजिक एकोपा निर्माण झाला आहे.

**तक्ता क्र.६**

**४.३.७ दुर्बल घटक**

| अ.क्र | दुर्बल घटक | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दूर्बलांचे प्रमाण कमी | २५ | ११.३६ |
| २ | शिक्षण आवड | ८६ | ३९.०९ |
| ३ | आर्थिक स्थैर्य | २६ | ११.८१ |
| ४ | दृष्टीकोनात बदल | ४८ | २१.८१ |
| ५ | सामाजिक स्थैर्य | ३५ | १५.९० |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

वाचन चळवळ समाजातील प्रत्येक घटकावरती सकारात्मक परिणाम करताना दिसते समाजामध्ये पूर्वी दुर्बलांचे मोठे प्रमाण होते परंतु दुर्बलतेची कारणे व त्यातून मुक्त होण्याचा मार्ग दुर्बल घटकांपर्यंत पोहोचल्याने दुर्बल घटकांनी यातून प्रेरणा घेऊन आर्थिक उत्पादन वाढवले या कामी वाचन चळवळ वेळोवेळी समाजास मार्गदर्शक म्हणून उभी राहिल्याचे वाचक सांगतात. ११.३३ टक्के वाचकांच्या म्हणण्यानुसार वाचनामुळे दुर्बल घटकांचे प्रमाण कमी झाले आहे.

शिक्षण सर्व समाजामध्ये क्रांती घडवून आणण्याचे काम करते. परंतु समाजाला शिक्षणाची आवड असल्याशिवाय हे शक्य नाही वाचन चळवळ यामध्ये सक्रिय होऊन त्यांनी शिक्षणाचे महत्त्व तळागाळातील लोकांना समजाऊले आपला विकास शिक्षणामुळेच होऊ शकतो हे समजल्याने ३९.९ टक्के लोक म्हणतात की, वाचनामुळे समाजातील सर्व स्तरांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण झाली.

वाचनामुळे माणसाला सामाजिक आणि आर्थिक स्थैर्य सुद्धा प्राप्त करून देण्यास मदत करते. वाचनाच्या माध्यमातून अनेक लोकांनी नोकरी, व्यवसाय सुरू केला. परीवारातील आर्थिक नियोजन केले. त्यामुळे आर्थिक स्थैर्य निर्माण होण्यास मदत झाली. १५.९० टक्के लोक म्हणतात की वाचनामुळे समाजात आर्थिक स्थैर्य निर्माण होण्यास मदत झाली.

वाचनामुळे शिक्षणाकडे, व्यवसायाकडे अन्य जाती, धर्माकडे बघण्याचा दृष्टीकोन मोठ्या प्रमाणात बदलला. जोपर्यंत सामाजिक दृष्टीकोन बदलत नाही, तोपर्यंत कुठलाच बदल समाजात घडणार नाही. वाचन चळवळीने मुळातच म्हणजेच मानसिकतेत बदल घडवून आणत्यामुळे सर्व घटकाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलल्याचे २१.८१ टक्के वाचक म्हणतात.

सामाजिक स्थैर्य सामाजिक विकासासाठी आवश्यक असते. वाचन स्वस्थ समाज निर्मितीसाठी सतत कार्यरत असल्याचे दिसते सर्व महापुरुषांनी सामाजिक स्थैर्य निर्माण करण्यासाठी वाचनाच्या हातात हात घालून काम केल्याचे दिसते. सामाजिक स्थैर्य मिळविण्यासाठी समाज सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय दृष्टीने स्थीर असणे गरजेचे आहे ही आवश्यकता ओळखून वाचन चळवळीने सामाजिक स्थैर्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसतात १५.९० टक्के लोक म्हणतात की, वाचन चळवळीमुळे सामाजिक स्थैर्य निर्माण होण्यास मोठी मदत झाली आहे.

**तक्ता क्र : ७**

**४.३.८ साक्षरतेचे प्रमाण.**

| **अ.क्र** | **साक्षरतेचे प्रमाण** | **वाचकांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | स्त्री प्रौढ शिक्षण | २८ | १२.७२ |
| २ | पुरुष प्रौढ शिक्षण | ६८ | ३०.९० |
| ३ | मुले | ७२ | ३२.७२ |
| ४ | मुली | ५२ | २३.६३ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

वाचन चळवळीमुळे एकूणच साक्षरतेचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. स्त्रिया शिक्षणापासून वंचित होत्या परंतु वाचन चळवळीमुळे स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. एवढेच नव्हे तर आज प्रौढ शिक्षणाच्या माध्यमातून सुद्धा स्त्रिया शिक्षण घेताना दिसत आहेत याचे श्रेय वाचन चळवळीस जाते. वाचन चळवळीमुळे स्त्रियांना शिक्षणाचे महत्त्व समजले आणि वयाचा आड पडदा बाजूला सारूना स्त्रिया प्रौढ शिक्षण घेऊ लागल्या १२.७२ टक्के वाचकांच्या मते, स्त्री प्रौढ शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे.

समाजामधील प्रौढ पुरुषांचे सुद्धा शिक्षणाचे प्रमाण पूर्वी कमी होते परंतु वाचन चळवळीच्या माध्यमातून प्रौढ पुरुषांनाही शिक्षणासाठी प्रोत्साहित केल्याने प्रौढ शिक्षणाच्या माध्यमातून पुरुष शिक्षण घेऊ लागले वाचन चळवळीमुळे प्रौढ शिक्षण केंद्र आणि त्याचे कार्य उपयोगित लोकांपर्यत पोहोचल्याने प्रौढांचे शिक्षणाचे प्रमाण वाढले. ३०.९० टक्के वाचकांच्या म्हणण्यानुसार प्रौढ पुरुषांचे शिक्षणाचे प्रमाण वाढण्यामागे वाचनाचा हात आहे.

वाचन चळवळ प्रौढांसोबतच तरूण मुलां–मुलींनाही शिक्षणासाठी प्रेरित करत आली आहे. वाचनामुळे समाजातील मुलामुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढत गेले आणि एकूणच देश पातळीवर शिक्षणाचे प्रमाण वाढल्याचे दिसते. वाचकांच्या मते, वाचनामुळे ३२.७२ टक्के मुलांचे तर २३.६३ टक्के मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. एकंदरीतच साक्षरतेचे प्रमाण वाढवण्यामध्ये शिक्षित पालक यांचा मोलाचा वाटा आहे कारण जे पालक शिक्षित आहेत तेच पालक शिक्षणाचे मर्म ओळखून आपल्या मुला–मुलींना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करतात.

**तक्ता क्र. ८**


**४.३.९ पर्यावरण संवर्धन**

| अ.क्र | पर्यावरण संवर्धन | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पर्यावरण सजगता | ७२ | ३२.७२ |
| २ | शाश्वत विकास | २० | ०९.०९ |
| ३ | वृक्षसंवर्धन | २१ | ०९.५४ |
| ४ | जलसंवर्धन | २० | ०९.०९ |
| ५ | विद्युतसंवर्धन | २२ | १०.०० |
| ६ | शेतीसंवर्धन | ४० | १८.१८ |
| ७ | आपत्तीसंवर्धन | १० | ४.५४ |
| ८ | सौरउर्जा वापर | १५ | ६.८१ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

**आलेख क्र. ९**

## पर्यावरण संवर्धन




पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे समाज विविध सुख वस्तूंचा उपयोग करत असताना त्याचे दूरगामी वाईट परिणाम दिसतात. मानवीय हस्तक्षेपामुळे अनेक जंगले नष्ट झाली त्यामुळे जमिनीची धूप होऊ लागली पर्जन्याचे प्रमाण कमी झाले, उष्णतेचे प्रमाण वाढले. हा जगासमोरील प्रश्न अचानक असल्याने या विषयाचे प्रबोधन वाचनाच्या माध्यमातून केले जात आहे. वाचन चळवळ जनमानसात पर्यावरणविषयक जागृती निर्माण करून पर्यावरणीय प्रश्नाविषयी सजगता निर्माण करत आहे. ३२.७२ टक्के वाचकांच्या मते, वाचनामुळे समाजामधील पर्यावरणीय सजगता निर्माण झाली आहे.

वाचनामुळे एकूणच समाजाच्या शाश्वत विकासावरती भर दिलेला आहे. आज सर्व समाज क्षणिक विचार करून भविष्यासाठी धोका निर्माण करीत आहे हा विचार करता समाजामधील शेती, जल, विद्युत, वृक्षसंवर्धन झाले पाहिजे व ते पुढील पिढीस त्याचा फायदा झाला पाहीजे असे ९.९ टक्के लोकांनी म्हटले.

दिवसेंदिवस वृक्षतोड मोठ्या प्रमाणात होत आहे त्यामुळे आता झाडे लाऊन पुन्हा निसर्गाचे संतुलन बिघडले आहे ते रोखणे गरजेचे आहे असे ९.५४ टक्के वाचकांनी सांगितले. वृक्ष संवर्धन

विषयक जनजागृती वाचनाच्या माध्यमातून केली जात आहे. वनराई, वृक्षमित्र सारख्या योजना राबवून वृक्षसंवर्धनास पूरक वातावरण वाचन चळवळ निर्माण करत आहे.

पर्जन्याचे प्रमाण कमी होत असल्याने भुजल पातळी खोल होत चालली आहे त्यामुळेपृथ्वी तलावर पाण्याचा प्रश्न ही बिकट होत चालला आहे. भविष्यातील पाणी प्रश्न आधिक तीव्र होऊ नये म्हणून 'पाणी आडवा व पाणी जिरवा', जलयुक्त शिवार सारख्या योजना राबवून जल संवर्धन करण्याचे प्रयत्न केले जात आहे हे वाचन चळवळीमुळे जल संवर्धनाच्या प्रबोधनामध्ये ९.०९ टक्के लोकांनी सांगितले आहे.

निसर्गाचा समतोल बिघडत्यामुळे धरणे भरणे कठीण होत चालले आहे कारण पाणी पिण्याचा प्रश्न दिवसेंदिवस कठीण बनत चालला आहे कारण निसर्गातील भ्रमण हे एकमेकांवर अवलंबून असते. एकामध्ये बिघाड झाली तर दुसरी व्यवस्था बंद पडते म्हणून जर लोकांनी वीजेची बचत केली तर ती पुढील पिढीसाठी महत्त्वाची आहे. वाचन चळवळीच्या माध्यमातून लोकांमध्ये जन जागृतीचे काम केले आहे १०.०० टक्के वाचकांनी सांगितले की, वीजेचे संवर्धन करणे पुढील पिढीसाठी महत्त्वाचे आहे.

दिवसेंदिवस जमिनीचा कस कमी होत चालला आहे, कारण वाढत्या लोकसंखेचा विचार करता लोकांना धान्य कमी पडू नये म्हणून अतिरेकी धान्य शेतीतून निर्माण केले जाते. धान्य मोठ्या प्रमाणात रासायनिक खताचा वापर करून शेती ही भविष्यामध्ये बंजर होण्याची चिन्हे आहेत. शेती ही भविष्यात बंजर होऊ नये त्यासाठी शेतीचे विविध प्रयोग शाळेत माती परीक्षण करून त्या शेतीसाठी लागणारी सेंद्रिय जैविक खते वापरून शेती केली पाहिजे, हे वाचन चळवळीमुळे लोकांमध्ये जाणीव जागृती निर्माण झाली. शेती संवर्धनाच्या बाबतीत १८.१८ टक्के लोकांनी मुलाखतीमध्ये माहिती सांगितली.

मानव निर्मित आपत्ती आणि निसर्ग निर्मित आपत्तीपासून सुरक्षित राहण्यासाठी वाचन चळवळ सामाजिक प्रबोधन करत आहे. एखाद्या गावात किंवा शहरास नजिकच्या काळात किंवा भविष्यात कोणतीही आपत्ती येऊ शकते या विषयी पूर्व नियोजन करून आपत्ती व्यवस्थापन केल्यास जिवीत व वित्त हानी रोखली जाऊ शकते. या विषयी वाचन चळवळ नेहमी जनजागृती करत आली

आहे. ४.५४ टक्के वाचकांच्या मते, आपत्ती व्यवस्थापनास किंवा संवर्धनास पूरक वातावरण निर्माण करण्याचे काम वाचन चळवळ करत आहे.

आधुनिक काळात जलविद्युत, अणूविद्युत सारखी उर्जेची साधने अस्तित्वात आहेत तर जल विद्युत अपुरी आणि अनिश्चित स्वरूपाची असल्याने उर्जेची गरज भागवल्याने सौर उर्जा किंवा पारंपरिक उर्जेचा उपयोग होणे गरजेचे आहे. ६.८१ टक्के वाचकांच्या मते, वाचन चळवळी समाजामध्ये पारंपरिक उर्जा उपयोगाचे आवहन करत आहे. एकंदरीत सौर उर्जा किंवा तत्सम उर्जा साधनांचा उपयोग करण्याविषयी वाचन चळवळ सामाजिक प्रबोधन करत असते.

**तक्ता क्र.९**

**४.३.१० लोकसंख्येवर झालेला परिणाम**

| **अ.क्र** | **लोकसंख्या प्रमाण** | **वाचकांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | पूरूष | ८० | ३६.३६ |
| २ | स्त्री | ४० | १८.१८ |
| ३ | मुले | २७ | १२.२७ |
| ४ | मुली | २० | ०९.९० |
| ५ | जन्मदर प्रमाण | २८ | १२.७२ |
| ६ | मृत्यूदर प्रमाण | २५ | ११.३६ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

वाचन चळवळीमुळे लोकसंख्येवर सकारात्मक परिणाम झाल्याचे दिसते. वाढत्या लोकसंख्येस रोखण्यासाठी सामाजिक जागृती गरजेची आहे. ती जागृती हम दो हमारे दो पासून हम दो हमारा एक इथपर्यंत आज येऊन ठेपली आहे. मुलगाच फक्त वंशाचा दिवा आहे, ही संकल्पना आज मोडीत निघाली आहे. ३६.३६ टक्के वाचकांच्या मते पुरुषांच्या लोकसंख्येवर सकारात्मक परिणाम होण्यास वाचन चळवळीचे मोठे योगदान आहे.

वाचन चळवळीमुळे सामाजिक प्रबोधन होऊन स्त्री–पूरूष समता स्थापित होऊन स्त्रियांच्या संख्येत वाढ झाल्याचे १८.१८ टक्के वाचकांनी सांगितले आहे.

वाचनामुळे मुलगा किंवा मुलगी हा भेदभाव कमी झाला .समाजामध्ये दोघांचे स्थान महत्त्वाचे आहे. मुलांचे प्रमाण कमी झाले असे १२.२७ टक्के वाचकांनी सांगितले, आणि मुलींचे प्रमाण स्थिर आहे असे ९.९० टक्के वाचकांनी म्हटले आहे. वाचनामुळे मुलांचे प्रमाण कमी होऊन मुलींचे प्रमाण स्थिर राहण्यास मदत झाली आहे.

समाजातील जागृतीमुळे दिवसेंदिवस जन्मदराचे प्रमाण कमी होत चालले आहे. पूर्वीप्रमाणे कुटुंबातील अपत्यांची संख्या मोठी राहिली नसून मर्यादित झाल्याने लोकसंख्या वाढीवरती निर्बंध आणण्याच्या दृष्टीने आवश्यक साधने उपलब्ध होत असल्याने जन्मदराचे प्रमाण १२.७२ टक्के वाचकांच्या मते कमी झाले आहे.

वाचनामुळे जन्मदराप्रमाणे मृत्यूदरांचे प्रमाण ही कमी झाल्याचे दिसते. वाचनाच्या माध्यमातून असाध्य रोगाची जनजागृती त्यावरील उपाय योजनांची माहिती समाजास उपलब्ध झाल्याने वेळीच खबरदारी घेतली जात आहे. त्यामुळे एकूणच समाजातील मृत्यूदराचे प्रमाण ११.३६ टक्के वाचकांच्या मते, वाचन चळवळीमुळे कमी झाले आहे.

### तक्ता क्र.१०

### ४.३.११ स्वच्छतेविषयक जागृती

| अ.क्र | स्वच्छतेविषयक | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | परिसर स्वच्छता | ७२ | ३२.७२ |
| २ | सांडपाणी व्यवस्था | ४५ | २०.४५ |
| ३ | शौचालयाचा वापर | ७० | ३१.८१ |
| ४ | वैयक्तिक स्वच्छता | ३३ | १५.०० |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

समाजाला रोगराईपासून दूर ठेवण्यासाठी परीसर स्वच्छता राखणे गरजेचे आहे. प्रत्येक व्यक्ती आपल्या घराबाहेर स्वच्छतेविषयक जागृत राहत नाही. प्रत्येकजन परीसर स्वच्छता दुसऱ्याने करावी अशी अपेक्षा करतात. परिणामी गल्लीच वस्ती रोगराईस निमंत्रण देते. स्वच्छतेविषयी समाजामध्ये जागृती करण्याचे काम वाचन चळवळीने केले आहे असे ३२.७२ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

गाव किंवा शहरामध्ये सांडपाण्याचे व्यवस्थापन असणे गरजेचे आहे. सांडपाण्याचे व्यवस्थापन न केल्यास सांडपाणी रस्त्यावर पसरले जाईल. यामुळे माश्या, मच्छर, झुरळ या सारख्या रोगराई पसरवणाऱ्या कीटकांच्या प्रादुर्भाव वाढता सांडपाणी व्यवस्थापनाचे फायदे आणि तोटे समाजासमोर मांडून सांडपाणी व्यवस्थापनाविषयी जनजागृती करण्याचे काम वाचन चळवळ करते आहे. वाचकांच्या मते, २०.४५ टक्के सांडपाणी व्यवस्थापनाच्या जागृती विषयी बोलतात.

स्वच्छतेविषयी प्रबोधन करताना महाराष्ट्र शासनाने हागणदारी मुक्त गाव ही योजना प्रभावीपणे राबवली ही योजना जनमानसापर्यंत पोहचविण्यामध्ये वाचन चळवळीचा मोठा वाटा आहे. आज बहुतांश खेडोपाडी शौचालयाचा वापर घरोघरी होताना दिसतो आहे या विषयी मोठ्या प्रमाणात प्रबोधन झाल्याने शौचालय असेल तरच या घरात मी लग्न करेन अशा मुलीसुद्धा ठामपणे भूमिका घेत आहेत या भूमिकेस मिडिया आणि वाचन चळवळ प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष पाठींबा देत आहेत.

घरोघरी शौचालयाचा वापर होण्यापाठीमागे वाचन चळवळी कार्यरत असल्याचे ३१.८१ टक्के वाचकांनी सांगितले.

सार्वजनिक स्वच्छते बरोबरच वैयक्तिक स्वच्छताही खूप महत्त्वाची आहे. बाहेरून आल्यानंतर हात पाय स्वच्छ धुवावीत. शोचालयात जाऊ न आल्यानंतर साबणाने हात स्वच्छ धुवावे. झोपेतून उठल्यानंतर किंवा झोपण्यापूर्वी ब्रश करावा अशा छोट्या–छोट्या अनेक गोष्टी आहेत ज्या वैयक्तिक स्वच्छतेमध्ये येतात. वैयक्तिक स्वच्छता आजारास दूर ठेवून निरोगी शरीर संपदा आपणास बहाल करते. वैयक्तिक स्वच्छतेविषयी वाचन चळवळीच्या माध्यमातून नेहमीच प्रबोधन केले जाते. १५.०० टक्के वाचकांच्या मते, वैयक्तिक स्वच्छता राखण्याविषयी वाचन चळवळ मोलाची मार्गदर्शक ठरते.

**तक्ता क्र. ११**


**४.३.१० वैचारिक प्रबोधन**

| **अ.क्र** | **प्रबोधन** | **वाचकांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | समता विषयक | ३८ | १७.२७ |
| २ | न्याय विषयक | २२ | १०.०० |
| ३ | जातीविषयक विचार | ३० | १३.६३ |
| ४ | लिंगभाव विषयक विचार | २२ | १०.०० |
| ५ | शैक्षणिक विचार | ३२ | १४.५४ |
| ६ | मानवता विषयक विचार | १२ | ५.४५ |
| ७ | एक गाव एक पाणवठा | १८ | ८.१८ |
| ८ | गाडगेमहाराज अभियान | ३८ | १७.२७ |
| ९ | व्यसनाधिनता | ०८ | ३.६३ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

**आलेख क्र. १०**

## ४.३.१० वैचारिक प्रबोधन




वैचारिक प्रबोधन प्रत्येक व्यक्ती आणि समाजास सर्वांगीण बदलास कारणीभूत ठरते. वैचारिक प्रबोधन हे क्षणिक नसून दिर्घकालीन बदल असतो. वैचारिक बदल समाज विकास करतो त्यासाठी देशातील अनेक महापुरुषांनी वैचारिक प्रबोधन करून आपला ठसा उमठवला आहे. २५०० वर्षापूर्वी बुद्धांनी समतेचा विचार मांडला. जी परंपरा पुढील काळात महात्मा बसवेश्वर, संत कबीर, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुढे चालवून समाजामध्ये सामाजिक समता स्थापित करताना त्यांची वैचारिक मांडणी सुद्धा केली आहे. समता विषयक विचार त्या–त्या काळात वर्तमानपत्रे, मासिके आणि ग्रंथाच्याा रूपाने समाजासमोर मांडून समाजाचे वैचारिक प्रबोधन करण्याचे काम वाचन चळवळीने केल्याचे १७.२७ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

समाजातील अराजकतेस पायबंद घालून सामाजिक न्याय स्थापित करणे गरजेचे असते. पूर्वीपासून अशा महापुरुषांनी आपल्या राज्यांमध्ये न्याय विषयक विचार स्वयंम कृतीतून स्थापित केला आहे. इतिहासातील अनेक महापुरुषांचे न्याय विषयक विचार वाचन चळवळीच्या माध्यमातून समाजासमोर येताना दिसतात हे विचार आजही समाजास न्यायाने वागल्यास मदत करतात वाचनामुळे न्याय विषयक विचार लोकांपर्यंत पोहोचण्याचे १०.०० टक्के वाचक म्हणतात.

समाजामध्ये असणारी जातियता किंवा धर्मीकताही समाजास लागलेला कलंक आहे. हा कलंक धुवून काढण्यासाठी किंवा जातीयता नष्ट करण्यासाठी अनेक महापुरुषांनी जाती अंताचा लढा उभारला. जातीयता समाजातून हद्दपार करण्यासाठी महात्मा फुल्यांनी आपले आयुष्य खर्च केले. बाबासाहेबांनी जातीयता नष्ट करण्यासाठी आंतरजातीय विवाह गरजेचे असल्याचे म्हटले आहे. महात्मा गांधीनी वधु आणि वर वेगवेगळ्या जातीचे असल्याशिवाय लग्नास जाणार नाही अशी भूमिका घेतली. या सर्व भूमिका समाजातून जातीयता नष्ट करण्यासाठी महत्त्वाच्या होत्या. आज जाती-विषयक विचार समाजामध्ये प्रबोधनात्मक स्वरूपात पसरवणे ही काळाची गरज आहे हे काम अनेक वर्षे वाचन चळवळ अविरतपणे करत असल्याचे १३.६३ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

वैचारिक प्रबोधन लिंगभाव विषमता दूर करण्यासाठी महत्त्वाचे आहे. निसर्गत: स्त्री आणि पुरुष हे दोन लिंग भेद अस्तित्वात आहेत. परंतु प्राचीन काळापासून पुरुषप्रधान व्यवस्था भारतात अस्तित्वात असल्याने स्त्रियांना दुय्यम स्थान दिले गेले. स्त्री ही केवळ उपभोगाची वस्तू आहे असा विचार समाजात स्थापित झाला होता. स्त्रियांना शिक्षण, धार्मिक अधिकार, धनसंपत्तीतील वाटा निर्णय प्रक्रियेपासून नेहमी दूर ठेवून तिचे शोषण केले गेले त्यामुळे महात्मा फुलेंनी सर्व प्रथम स्त्री शिक्षणाचा विचार पहिल्यांदा मांडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोडबीलाच्या माध्यमातुन पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना सर्व हक्क, अधिकार बहाल केले आणि समाजामध्ये असणारी लिंगभाव विषयक विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला. अशा स्वरूपाचा लिंगभाव विषयक विचार अनेक महापुरुषांनी मांडला जो विचार समाजापर्यंत घेऊन जाण्याचे काम वाचन चळवळीने केले. लिंग भाव विषयक विचार करताना राजाराम मोहन रॉय, शाहू महाराज, महर्षी धोंडों कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे यांचा विचार करूनच पुढे जाऊे लागते. या सर्वांचे विचार वाचन चळवळीने शेवटच्या घटकांपर्यंत पोहचवून लिंगभाव विषयक विषमता कमी केल्याचे १०.०० टक्के वाचकांनी म्हटले आहे.

समाजाच्या एकूणच विकासाठी शिक्षण खूप महत्त्वाचे असल्याचे महात्मा फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले महात्मा फुलेंनी १८४८ साली पुण्यामध्ये भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली समाजाचा विकास करावयाचा असेल तर प्रथम शिक्षण घेतले पाहिजे अशी भूमिका डॉ. बाबासाहेबांनी कृती आणि विचारातून मांडली हा विचार जनमानसांपर्यंत पोहोचविण्याचे काम वेगवेगळ्या मार्गाने वाचन चळवळीने केले आहे. वाचन चळवळीमुळे शैक्षणिक विचार तळागाळापर्यंत पोहचविला असे १४.५४ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागावे हा विचार समाजामध्ये वाचनामुळे पोहचविला. समाजामध्ये अस्तित्वात असणाऱ्या धर्मांधता आणि जातीयता आणि माणसाचे माणूसपण नाकारून दलित, अस्पृश्यते सारखा विचार समोर आला आणि मानवता धोक्यात आली. नदी नाल्यावरती पाणी पिण्याचा जनावरांना असणारा अधिकार सुद्धा माणसांना नव्हता किडे, मुंग्या सुद्धा मंदिरात प्रवेश करत असत, पण माणसाला प्रवेश नव्हता. समाजामध्ये अमानवियता पराकोटीची पसरली असल्याने मानवता विषयक विचार स्थापित होणे गरजेचे होते ही आवश्यकता ओळखून वेळोवेळी वाचन चळवळीने मानवता विषयक विचार समाजापर्यंत पोहोचविला असे ५.४५ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

समाजामध्ये जाती धर्मावरून मोठी विषमता अस्तित्वात आली होती. एकोपा नावाची गोष्ट समाजात राहिलीच नव्हती. एक गाव अनेक पाणवठे अस्तित्वात असल्याने समाजा–समाजातील दरी मोडीत काढण्यासाठी एक गाव एक पाणवठा ही चळवळ उभारून सामाजिक एकता स्थापित करण्याचे काम केले गेले हा विचार समाजापर्यंत घेऊन जाण्याचे काम वाचन चळवळीनेही केल्याचे ८.१८ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

संत गाडगे महाराज यांनी सामाजिक, वैचारिक आणि परीसर स्वच्छता करण्याचे काम आयुष्यभर केले समाजातील अनेक वाईट चालीरिती मोडीत काढून विज्ञानाच्या आधारे समाज प्रबोधन केले. गाडगे महाराजांची ग्रामस्वच्छता मोहीम केद्रस्थानी घेऊन महाराष्ट्र शासनाने ग्रामस्वच्छता अभियान राबवले गाडगे महाराजांनी आयुष्यभर केलेले प्रबोधन समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम वाचन चळवळ करत असल्याचे १७.२७ टक्के वाचकांनी सांगितले आहे.

प्राचीन काळी सर्व सुख सुविधांपासून दूर असणारा समाज आज सुखी जीवन उपभोगात असताना अनेक व्यसनाच्या आहारी गेला आहे. दारूच्या व्यसनाधिनतेविषयी गाडगेमहाराजांनी आपले परखड विचार पूर्वीच मांडलेले आहेत. आजचा तरूण वर्ग अफू, गांज्या, चरस हकीम, दारू, बीडी, सिगारेट सारख्या व्यसनाच्या आहारी गेला आहे. या व्यसनाधिनतेमुळे कर्करोग, लिव्हर सारखे असाध्य रोग लोकांना होताना दिसतात, या व्यसनाधीनतेपासून समाजास दूर ठेवण्यात वाचन चळवळ महत्त्वाची भूमिका निभावत आहेत. वर्तमान पत्रे, मासिके, ग्रंथामधून या विषयी प्रबोधन करण्याचे काम वाचन करत आहे. व्यसनाधीनता समाजापासून दूर राहिली पाहिजे अशी वाचन चळवळीची भूमिका असल्याचे ३.६३ टक्के लोकांनी सांगितले.

**तक्ता क्र. १२**

**४.३.११ आरोग्य विषयक दृष्टीकोन**

| अ.क्र | आरोग्य विषयक | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्राथमिक उपचार | ४२ | १९.०९ |
| २ | कुपोषण | २० | ०९.०९ |
| ३ | सकस आहार | १८ | ०८.१८ |
| ४ | स्त्रियांचे आरोग्य | १७ | ०७.७२ |
| ५ | वृद्धांचे आरोग्य | १२ | ०५.४५ |
| ६ | लसीकरणाविषयी मोहीम | ७९ | ३५.९० |
| ७ | आरोग्यविषयक सल्ला | २२ | १०.०० |
| ८ | असाध्य रोग जागृती | ०८ | ०३.६३ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

आधुनिक काळातील धावपळीच्या जीवनामध्ये आरोग्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. पूर्वी आरोग्य विषयक समाजामध्ये जागरूकता नसत्यामुळे असाध्य रोग किंवा साथीच्या रोगाने अनेक मृत्यू होत असत हे रोग किंवा साथीचे रोग समाजामध्ये पसरू नये म्हणून प्राथमिक उपचारांविषयी माहिती समाजास करून देण्याचे काम वाचन चळवळ करत आली आहे. वर्तमानपत्रे, मासिकांमधून किंवा आरोग्यविषयक ग्रंथामधून रोगांविषयक जन जागृती उपचार विषयक माहिती दिली जाते म्हणून १९.९ टक्के वाचकांच्या मते आरोग्य विषयक प्रबोधन वाचन चळवळ करत आहे.

दऱ्या–खोऱ्यांमधून किंवा जंगलामध्ये राहणारा समाज आजही आरोग्य विषयक सुविधांपासून दूर आहे. गरोदर महिलांना सकस आहाराविषयी ज्ञान किंवा सकस आहार उपलब्ध हात नसल्याने कुपोषणाचे प्रमाण वाढत असे याविषयी वाचन चळवळीने प्रबोधनाची भूमिका घेतल्याने शासन किंवा समाजातील काही सामाजिक कार्यकर्ते याविषयी स्वतंत्रपणे काम करू लागले. ज्यामुळे कुपोषणाचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली आहे. या विषयी वाचन चळवळीचा मोलाचा वाटा असल्याने ९.९० टक्के लोकांनी म्हटले आहे.

समाजामध्ये आहार उपलब्ध होण्याची समस्या असताना सकस आहाराविषयी ज्ञान उपलब्ध होणे शक्य नाही तरीही गरोदर महिला किंवा तत्सम प्रश्नाच्या वेळी सकस आहार काय दिला जाऊा या विषयची जागृती वाचन चळवळीच्या माध्यमातून केली जाते. नेहमी वर्तमानपत्रातून सकस आहाराविषयी चर्चा करून वाचन चळवळ प्रबोधनाचे मोलाचे काम करत असल्याचे काम ८.१८ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

समाजामध्ये नेहमी दुय्यम स्थान दिल्या गेलेल्या स्त्रिया आपल्या आरोग्याविषयी जागरूक नसतात किंवा परीवाराच्या जबाबदाऱ्या सांभाळता संभाळता स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष दिले जात नाही कधी कधी आर्थिक अडचणीमुळे महिला आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात परंतु या सर्वा विषयी प्रबोधन करण्याचे काम वाचन चळवळ करते स्त्रियांमधील विविध आजार, आजारांची कारणे आणि उपाय या विषयी वाचन चळवळ सतत प्रबोधन करत असल्याचे ७.७२ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

आजकाल समाजामध्ये वृद्धांचे विविध प्रश्न निर्माण होताना दिसतात. वृद्धांचे आरोग्य हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. वृद्धापकाळात होणारे आजार खर्चिक असल्याने वेगळाच प्रश्न निर्माण होताना दिसतो. या सर्वांविषयी प्रबोधनाची जबाबदारी वाचन चळवळ घेत असून वाचन चळवळीच्या माध्यमातून वृद्धांचे आजार, त्यांचे उपचार विषयक विचार वाचन चळवळ मांडत आहे. वृद्धांच्या आरोग्यविषयक जागृती करण्याचे काम वाचन चळवळ करते ५.४५ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

वाचन चळवळ विविध मोहीम विषयी नेहमी प्रबोधन करत आली आहे. समाजामध्ये लसीकरणांविषयी मोठ्या प्रमाणात जागृती झाल्या देवी सारखा रोग जवळपास संपुष्टात आला. पोलिओ, लसीकरणाची मोहीम जोरात आहे. ही मोहीम समाजातील तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे काम वाचन चळवळ करत आली आहे. एवढेच नव्हे तर गोवर, कांजण्या, चिकनगुनिया यांसारख्या रोगांच्या लसीकरणाच्या मोहीमेत वाचन चळवळीचा मोठा वाटा आहे. लसीकरणाच्या माध्यमातून वाचन चळवळ आरोग्यविषयक प्रबोधन करत आहे असे ३५.९० टक्के वाचकांचे म्हणणे आहे. वर्तमानपत्रे, मासिक आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या माध्यमातून आज आरोग्य विषय सल्ला दिला जातो. अनेक रूग्ण आपले प्रश्न विचारतात आणि आरोग्यविषयक सल्ला या सदरच्या माध्यमातून त्याची उत्तरे दिली जातात. विचार धारा एक असली तरी ती आरोग्याविषयक सल्ला अनेकांना कामाचा

असतो. त्यामुळे वाचन चळवळीच्या माध्यमातून दिला जाणारा आरोग्यविषयक सल्ला मोलाचा असल्याचे १०.०० टक्के लोकांनी सांगितले.

समाजामध्ये पूर्वीपासून चालत आलेले अनेक असाध्य रोग अस्तित्वात आहेत या रोगांची शिकार भविष्यात अन्य रोगी होऊ नये, यासाठी असाध्य रोग जागृती वाचन चळवळ करत आहे. याशिवाय अलिकडच्या काळात नवनवीनरोगांचा उद्‌भव होत आहे. ज्या विषयी आजपर्यंत औषध उपचारही उपलब्ध नाहीत अशा रोगांविषयी समाजामध्ये जागरूकता आणून हा रोगच होणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे. असाध्य रोग कोणते त्या पासून दूर कसे राहता येईल या विषयाची जनजागृती वाचन चळवळीच्या माध्यमातून केली जात असल्याचे ३.६३ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

वाचन चळवळीमुळे एकूणच सामाजिक व्यवस्थेमध्ये मोठा बदल झाला आहे हे प्रस्तुत संशोधनातून दिसून येते. वाचन चळवळीमुळे जाती व्यवस्था किंवा अंद्धश्रद्धा विषयक सकारात्मक बदल झाले आहेत. एवढेच नव्हे तर स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टीकोन बराचसा बदलला असून समाजातील गुन्हेगारीचे स्वरूपही मोठ्या प्रमाणात बदलले आहे. समाजातील प्रश्नांची तिव्रता अधिक वाढण्यापेक्षा कमी होण्यास वाचनाचा मोलाचा वाटा आहे.

### ४.४ सांस्कृतिक बदल

वाचन चळवळ केंद्रस्थानी ठेवून सांस्कृतिक बदलाचा विचार केल्यास समाजामध्ये मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक बदल झाल्याचे दिसतात. सांस्कृतिक बदल सकारात्मक स्वरूपाचे पाहिल्यास वाचन चळवळीचे योगदान आपल्या लक्षात येईल. समाजात एकोपा निर्माण करण्यासाठी किंवा धर्मा–धर्मा मध्ये, जाती जातीमध्ये प्रेम निर्माण करण्यासाठी सांस्कृतिक बदल मोलाचे ठरतात. प्रत्येक जाती धर्माने दुसऱ्या जाती धर्मातील सकारात्मक सांस्कृतिक बदल स्वीकारले हा सर्व सांस्कृतिक बदल वाचन चळवळीच्या माध्यमातून कसा होत गेला हे खालील तक्त्याच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

**तक्ता क्र. १**


**४.४.१ उत्सव**

| **अ.क्र** | **उत्सव** | **वाचकांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | गणेश उत्सव | ६३ | २८.६३ |
| २ | नवरात्री | ४२ | १९.०९ |
| ३ | महापुरुषांची जयंती | ३२ | १४.५९ |
| ४ | यात्रा / जत्रा | १० | ०४.५४ |
| ५ | मोहरम | १२ | ०५.४५ |
| ६ | ख्रिसमस | ०८ | ०३.६३ |
| ७ | दीपावली | ५३ | २४.०९ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्त्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

**आलेख क्र. १**

**उत्सव**




वाचन चळवळीमुळवेगवेगळे उत्सव समाजातील तळागाळापर्यंत साजरे होऊ लागले उदा. म्हणून गणेश उत्सवाकडे पाहता येईल. स्वातंत्र्यपूर्व काळात सामाजिक एकोपा साधून स्वातंत्र्याचा विचार जनमानासापर्यंत पोहचविण्यासाठी लोकमान्य टिळकांनी गणेश उत्सव साजरा करण्यास सुरवात केली सुरुवातीच्या काळात सिमीत स्वरूपाचा असणारा गणेश उत्सव बदलत बदलत आज खेड्या–पाड्यामधून सुद्धा मोठ्या प्रमाणात साजरा होताना दिसतो. या उत्सवात जवळपास सर्व जाती धर्मांचे लोक सहभागी होऊन सांस्कृतिक एकतेचा संदेश पुढील पिढीस दिला. याविषयी वाचन चळवळीने महत्त्वाची भूमिका घेऊन सांस्कृतिक उत्सवाचे स्वरूप समाजामध्ये स्थापित केले. वाचन चळवळीमुळे गणेश उत्सवाच्या माध्यमातून सांस्कृतिक आदान–प्रदान झाल्याचे २८.६३ टक्के वाचकांनी सांगितले.

समाजामध्ये उत्सवाचे वातावरण निर्माण करण्यामध्ये नवरात्री उत्सव अग्रभागी आहे. देशभर नवरात्र उत्सव साजरा केला जातो. हा उत्सव आपली सांस्कृतिक परंपरा जपत असून त्या माध्यमातून समाजाला एकत्र आणण्याचे काम करतो. वाचन चळवळीने या उत्सवाकडे बघण्याचा पारंपरिक दृष्टीकोन बदलून टाकला आणि निकोप वातावरणनिर्माण करुन सर्वांना जोडण्याचे काम केले. या उत्सवामध्ये शहरापासून खेड्यांपर्यंत सर्व जाती धर्मांचे लोक सहभागी होतात या माध्यमातून देवीची

आराधना करून समाजामध्ये शक्तीचे प्रतिक म्हणून स्थापित केले आहे. नवरात्री उत्सव सांस्कृतिक बदलामध्ये महत्त्वाचा असून त्यामध्ये वाचन चळवळीचा मोठा हात असल्याचे १९.०९ टक्के वाचकांनी सांगितले.

समाजामध्ये सामाजिक बदलासोबतच सांस्कृतिक बदल घडवून आणण्यात महापुरुषांचे खूप मोठे योगदान आहे. या योगदानाचे स्मरण करण्यासाठी व महापूरूषांचे विचार समाजामध्ये काळानुरूप पोचविण्यासाठी ठिकठिकाणी महापुरुषांची जयंती साजरी होताना दिसते. स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, शाहु महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सारख्या अनेक महापुरुषांच्या जयंत्या साजऱ्या होतात यांचे सांस्कृतिक विचार आणि सांस्कृतिक बदलातील त्यांची भूमिका समाजापर्यंत पाहेचविण्याची जबाबदारी वाचन चळवळीमुळे निभावल्याची दिसते. या महापुरुषांनी वाईट सांस्कृतिक चालीरितींवरती हल्ला चढवून त्यामध्ये सुदृढ समाजास पोषक सांस्कृतिक वातावरण निर्माण केले हा वारसा समाजामध्ये कायम टिकून ठेवण्यामध्ये वाचन चळवळीचे मोठे योगदान असल्याचे १४.५९ टक्के वाचकांनी सांगितले आहे.

गावोगावी यात्रा किंवा जत्रा भरवणे, एक संस्कृतीचा भाग आहे. पूर्वी यात्रा किंवा जत्रांचे स्वरूप अनिष्ठ चालीरिती मध्ये बंदिस्त होते. वाचन चळवळीने या विषयी प्रबोधन करून यात्रा किंवा जत्रांमधून मोठ्या प्रमाणात पशु हत्या कमी करण्याचे काम केले. कोंबडी, बकरी सोबतच रेड्यांच्या हत्या सुद्धा या कार्यक्रमांचा एक भाग असत परंतु पशु प्राण्याची हत्या ही अमानविय आहे. हा विचार लोकांच्या मनामध्ये रूजवून यात्रा किंवा जत्रांचे स्वरूप बदलण्यास वाचनाचे योगदान दिले असल्याचे ४.५४ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

समाजामध्ये वरकरणी मोहरम हा सण मुस्लीम समाज जरी साजरा करीत असला तरी गाव पातळीवरती मोहरम या सणामध्ये वेगवेगळ्या जाती धर्मातील लोक सहभागी होत असतात. हा सण म्हणजे धार्मिक व सांस्कृतिक समन्वयाचे प्रतिक आहे असे म्हटल्यास वावगे वाटणार नाही. वाचनाने हाच समन्वयाचा धागा धरून मोहरम सणाविषयी प्रबोधन केल्याचे दिसते. वाचन चळवळीमुळे हा विचार तळागाळापर्यंत पोहचून सामाजिक सौहार्द निर्माण करण्याचे काम केल्याचे ५.४५ टक्के वाचकांनी सांगितले आहे.

ख्रिसमस हा ख्रिस्ती बांधवांचा जगभर साजरा होणारा उत्सव आहे. ख्रिसमस हा सण देशातील सर्व जाती धर्मातील लोकांमध्ये लोकप्रिय आहे. भारतासारख्या देशामध्ये ख्रिसमस निमित्त ८ ते १० दिवस सुट्टया देऊन याविषयी आपली सकारात्मक भावना व्यक्त केली जाते. शाळा, महाविद्यालयामधून याविषयी चांगले वातावरण निर्माण केले जाते. या पाठीमागे वाचन चळवळ कार्यरत असल्याचे आपणास दिसून येईल. वाचन चळवळीमुळे ख्रिसमस सणामुळे समाजामध्ये एकोप्याचे वातावरण निर्माण होत असल्याचे ३.६३ टक्के वाचकांनी सांगितले.


भारतातील दिपावली हा उत्सव दिव्यांचा उत्सव म्हणून ओळखला जातो. दिवा प्रकाशाचे प्रतिक आहे. समाजातील अंधार या दिव्यांच्या माध्यमातून उजळून टाकला जाऊा अशी या पाठीमागची धारणा आहे. हा उत्सव जवळपास चार पाच दिवस चालतो या दरम्यान घरोघरी मिष्ठान्न बनवले जाते सर्व जाती–धर्मातील लोकांना बोलवून मोठ्या प्रेमाने खाऊ घातले जाते. त्यामुळे सर्व जाती धर्मांमधील या उत्सवा विषयी वेगळे आकर्षण आहे. दीपावली उत्सवाविषयी समाजामध्ये सकारात्मक भावना निर्माण करण्याचे काम वाचन चळवळीने सतत केले आहे. या उत्सवाच्या वेळी वर्तमानपत्रे, मासिकांमधून मोठ्या प्रमाणात लेखन करून त्या विषयी समाजात प्रबोधन केले जाते हे काम अविरत वाचन चळवळ करत असल्याचे २४.९ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

**तक्ता क : २**
**४.४.२ सांस्कृतिक कार्यक्रम**

| अ.क्र | सांस्कृतिक कार्यक्रम | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | भाषण | २४ | १०.९० |
| २ | काव्यवाचन | १३ | ०५.९० |
| ३ | नाटक | ११ | ०५.०० |
| ४ | गीत गायन | १४ | ०६.३६ |
| ५ | नृत्य (पारंपरिक/आधूनिक) | १६ | ०७.२७ |
| ६ | भजन/गवळण | ४२ | १९.९ |
| ७ | कीर्तन/भारूड | ३८ | १७.२७ |
| ८ | सप्ताह | ६२ | २८.१८ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

## आलेख क्र. २
## सांस्कृतिक कार्यक्रम




वाचनाच्या माध्यमातून होणारे सांस्कृतिक बदल सामाजिक विकासास पूरक असतात. वाचन चळवळ समाजाला विचार करायला भाग पाडते. विचारातून समाज बोलू लागतो आणि बोलण्यातून पुन्हा समाज प्रबोधन घडून येते ही अशी साखळी सांस्कृतिक बदलास उपयुक्त असते. वाचन चळवळीमुळे लोकांमध्ये ज्ञानाचा संचार झाला त्यातून उलट सुलट विचार करू लागले आणि हे ज्ञान शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी भाषण कला अवगत आणि विकसित झाली भाषण करणे म्हणजे एका वेळी अनेकास संबोधित करणे किंवा जागृत करणे होय. त्याच्या माध्यमातून समाजात सर्वांगीण बदल घडवून आणला जातो. भाषण कला ही सांस्कृतिक कार्यक्रमाचा एक भाग असत्यामुळे सांस्कृतिक बदलामध्ये याचा सहभाग असल्याचे १०.९० टक्के वाचकांनी म्हटले आहे.

सांस्कृतिक बदलामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन महत्त्वाचे ठरते. समाजामधील बदल हा साहित्याच्या माध्यमातून पुन्हा समाजासमोर येतो. ठिकठिकाणी काव्य वाचनासारखे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या काव्य वाचनामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय बदला विषयी कविता सादर केल्या जातात आणि समाजातील बदल अधोरेखित केला जातो. वेगवेगळ्या समूहांनी आपल्या दु:ख आणि वेदना कवितांच्या माध्यमातून समाजासमोर सादर केल्या आणि ते दु:ख वेदना कमी होण्यास मदत झाली. वाचन चळवळीच्या माध्यमातून अनेक लोक अशा

कार्यक्रमांविषयी माहिती घेतात, त्यात सहभागी होतात आणि या मधूनच सांस्कृतिक बदलास पूरक वातावरण निर्माण होते असे ५.९० टक्के वाचकांनी सांगितले.

नाटक सांस्कृतिक कलेचाच एक भाग आहे. नाटक दृश्य आणि श्राव्य माध्यम असल्याने जास्त परिणाम कारक सिद्ध होते. पूर्वीपासून सामाजिक प्रबोधनाचे एक माध्यम म्हणून नाटकाकडे पाहिले जायचे. रामायण, महाभारत, कंसवध या सारख्या ऐतिहासिक घटना नाटकाच्या माध्यमातून समाजासमोर मांडल्या जायच्या आणि त्यातून समाज प्रबोधन होत असे आजही अनेक विषयांवरची नाटके रंगमंचावर गाजत आहेत. लोकांना विचार करावयाला आणि बदलावयाला भाग पाडत आहेत म्हणूनच सांस्कृतिक बदलाचा एक भाग म्हणून नाटक चळवळीचा एक हिस्सा म्हणजे नाटक सांस्कृतिक बदलातील एक मुख्य घटक असल्याचे ५.०० टक्के वाचकांनी सांगितले आहे.वाचन चळवळ देशभक्ती समाजसुधारणा विषयक गीतांच्या माध्यमातून सांस्कृतिक प्रबोधनाचे काम करत आली आहे. विविध गीत गायन स्पर्धा किंवा समूह गीत गायन स्पर्धाच्या माध्यमातून सांस्कृतिक बदलाचे आवाहन केले जाते या सांस्कृतिक बदलामध्ये वाचनाचा मोलाचा वाटा आहे असे ६.३६ टक्के वाचकांनी म्हटले आहे.सांस्कृतिक कलांमध्ये नृत्यकला सर्वांना परिचित आहे. नृत्य कलेच्या माध्यमातून समाजातील वेगवेगळ्या समूहांचे मनोरंजन आणि प्रबोधन केले जाते. पारंपरिक नृत्य अविष्कारामधून आपआपल्या देशविषयी किंवा प्रादेशिक संस्कृतीविषयी माहिती देत असतो. लावणी नृत्य हे मराठी संस्कृतीचा भाग आहे. असेच वेगवेगळ्या राज्याच्या संस्कृतीचे दर्शन तेथील नृत्य प्रकारात पाहावयास मिळते.आधुनिक काळामध्ये देशी विदेशी नृत्याचे अनेक प्रकार समाजासमोर होत आहेत हे प्रकार समाजासमोर घेऊन जाण्याचे काम वाचन चळवळ करते. वाचन चळवळीच्या माध्यमातूनच नृत्य कलेचा विकास आणि प्रबोधन होत गेल्याचे ७.२७ टक्के वाचकांनी सांगितले आहे.

वाचनाच्या माध्यमातून वेगवेगळे विषय समाजापर्यंत पोहचत असतात. आधात्मिक प्रबोधन करण्याचे काम भजन किंवा कीर्तनाच्या माध्यमातून समाजात होत असते. भजन किंवा कीर्तन समाजामध्ये नैतिकता निर्माण करण्याचे काम करते ही नैतिकता भजन किंवा कीर्तनाच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम वाचन चळवळ करते म्हणून सांस्कृतिक बदलांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम महत्त्वाचे ठरतात वाचन चळवळ भजन कीर्तनाच्या माध्यमातून सांस्कृतिक बदल घडवून आणत असल्याचे १९.०९ वाचकांनी म्हटले आहे. भजन किंवा गवळण लोककलेचे माध्यम आहे या कलेच्या माध्यमातून समाजाचे प्रबोधन आणि मनोरंजन केले जाते. गवळण हे आपल्या आराध्यास

रिझवण्याचे माध्यम आहे. भारूड भाविकांचे मनोरंजनाचे माध्यम आहे. भारूडआणि गवळणीच्या माध्यमातून समाज प्रबोधन करण्याचे काम केले जाते. भजन आणि कीर्तन हे लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम वाचन चळवळ करत असल्याचे मत १७.२७ टक्के वाचकांनी नोंदवले आहे.

गावोगावी देवतांच्या नावाने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते. या सप्ताहामधून सात दिवस, दिवस रात्र वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमांमधून सामाजिक, सांस्कृतिक प्रबोधन केले जाते. जे लोक प्रत्येक सप्त्यामध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहु शकले नाहीत त्यांच्यासाठी वेगवेगळ्या वर्तमानपत्रातून माहिती, लेख, बातम्या दिल्या जातात या सर्वांच्या माध्यमातून वाचन चळवळ समाजात सांस्कृतिक बदल घडवून आणण्याचे काम करत असल्याचे २८.१८ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

**तक्ता क्र. ३**
**४.४.३ राष्ट्रीय सण**

| **अ.क्र** | **सण सभारंभ** | **वाचकांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | २६ जानेवारी | ९१ | ४१.३६ |
| २ | १ मे | १२ | ०५.४५ |
| ३ | १५ ऑगस्ट | ८७ | ३९.५४ |
| ४ | शिक्षक दिन | ३० | १३.६३ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीयसर्वेक्षण,२०१७.

राष्ट्रीय सण आणि वाचन चळवळीचा जवळचा संबध आहे. वाचन चळवळीच्या माध्यमातून राष्ट्रीय सणाविषयी समाजामध्ये जनजागृती केली जाते. २६ जानेवारी हा राष्ट्रीय सण म्हणून देशभर साजरा होतो. ग्रामपंचायती पासून ते लोकसभेपर्यंत सर्वत्र ध्वज उभारून देशाविषयी आदर व्यक्त केला जातो. सुरवातीच्या काळात २६ जानेवारीचे स्वरूप आजच्या एवढे विस्तारीत नव्हते या राष्ट्रीय सणाचा विस्तार वाढवून लोकांच्या मनामध्ये देशाभिमान निर्माण करण्याचे काम वाचन चळवळीने केल्याचे ४१.३६ टक्के वाचकांनी सांगितले.

१५ ऑगस्ट हा ही राष्ट्रीय सण म्हणून ओळखला जातो. तसेच देशभर साजराही केला जातो. या दिवशी देशाला स्वातंत्र्य मिळाले म्हणून या दिवसाचे स्मरण म्हणून १५ ऑगस्ट देशभर राष्ट्रीय

सन म्हणून साजरा केला जातो. प्रजासत्ताक दिन म्हणजेच २६ जानेवारी जसा देशभर साजरा केला जातो त्याचप्रमाणे १५ ऑगस्ट म्हणजेच स्वातंत्र्य दिन ही देशभर सण म्हणून साजरा केला जातो. या विषयीचे प्रबोधन वाचन चळवळीमुळे झाले असे ३९.५४ टक्के वाचकांनी सांगितले.

शिक्षक समाजाच्या विकासातील महत्त्वाचा घटक आहे. आपल्या शिक्षकांविषयी आदर व्यक्त करण्यासाठी ५ सप्टेंबर या दिवशी सर्वत्र शिक्षक दिन साजरा केला जातो. प्राचीन काळापासून असणारा विद्यार्थी आणि शिक्षक संबंध वाचन चळवळ या निमित्ताने वर्तमान पत्रामधून स्पष्ट करत असते. त्यामुळे गुरू आणि शिक्षकातील नाते लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम वाचन चळवळीने केले आहे. त्यामुळे शिक्षक दिन राष्ट्रीय सण मोठ्या प्रमाणात साजरा होण्यापाठीमागे वाचन चळवळीचा मोलाचा वाटा असल्याचे १३.६३ टक्के वाचकांनी सांगितले.

वाचन चळवळ राष्ट्रीय सणाविषयी जसे प्रबोधन करते तसेच प्रादेशिक सणाविषयी वाचन चळवळ प्रबोधन करत असते. प्रादेशिक सण म्हणजे संबंधित राज्याची स्थापना दिवस किंवा त्या राज्यातील सर्वांत महत्त्वाचा उत्सव होय. १ मे महाराष्ट्राचा स्थापना दिवस होय याच दिवशी कामगार दिन ही साजरा केला जातो. महाराष्ट्र दिन किंवा कामगार दिन या विषयी समाजामध्ये प्रबोधन करण्याचे काम वाचन चळवळीने केल्याचे ५.४५ टक्के वाचकांनी सांगितले.

**तक्ता क्र. ४**

**४.४.४ कलह निवारण**

| अ.क्र | कलह निवारण | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | व्यसनाधीनता | १२ | ०५.४५ |
| २ | अन्याय अत्याचार | ६३ | २८.६३ |
| ३ | घरगुती कलह | ४७ | २१.३६ |
| ४ | जातीय कलह | ४२ | १९.०९ |
| ५ | धार्मिक कलह | २२ | १०.०० |
| ६ | अल्पसंख्याक | ०५ | ०२.२७ |
| ७ | प्रबळ जाती | २९ | १३.१८ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

वाचन चळवळीमुळे वेगवेगळ्या समूहांमधील किंवा जाती धर्मामधील अंतर कमी होऊन एकोपा निर्माण झाल्याचे दिसते. देशामध्ये विविध जाती धर्माचे लोक राहतात. या सर्वांची संस्कृती भिन्न असल्याने या सगळयांमध्ये एकता राखण्याचे काम वाचन चळवळ करत आली आहे. विविध संस्कृतीमधील कलह कमी करण्याचे काम वाचन चळवळीने केले आहे सर्व संस्कृतीच्या केंद्रस्थानी माणूसच आहे ही भावना वाचन चळवळीने समाजामध्ये निर्माण करून सांस्कृतिक कलह कमी करण्याचे काम केले असल्याचे ५.४५ टक्के वाचकांनी सांगितले.

वाचन चळवळ मानसिक प्रबोधन करण्याचे एक साधन आहे. या प्रबोधनामुळे समाजातील अन्याय, अत्याचार कमी होण्यास मदत झाली आहे. समाजातील एक वर्ग दुसऱ्या वर्गाचे शोषण करून आपले पोट भरत होता परंतु वाचन चळवळीने केलेल्या प्रबोधनामुळे शोषक वर्गाच्या लक्षात आलेकी आपण हे काम चुकीचे करत आहोत ही भावना समाजामध्ये निर्माण करण्यामध्ये वाचन चळवळीचे मोलाचे योगदान असल्याचे २८.६३ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

वाचन चळवळ आजकाल घराघरामध्ये पोहचली आहे. घराघरातील प्रश्न वाचन चळवळीच्या माध्यमातून समाजासमोर येऊ लागली आहेत.हे सर्व प्रश्न केंद्रस्थानी ठेवून सत्य असत्य किंवा चांगले

वाईट अशी चर्चा होऊ लागले या चर्चेतून प्रबोधन होऊन घरगुती कलह कमी होत गेल्याचे २१.३६ टक्के वाचकांनी सांगितले आहेत.

समाजामध्ये जाती जातीतील तेढ कलहास कारणीभूत ठरत गेली आहे. एक जात दुसऱ्या जातीला कमी लेखून स्वत:ला श्रेष्ठ मानत गेल्याने दोन्ही जातीमधील अंतर वाढत गेले हे अंतर कमी करण्याचे काम वाचन चळवळीने केल्याचे १९.९ टक्के वाचकांनी सांगितले.

वाचन चळवळ धार्मिक कलहाविषयी प्रबोधन करताना दिसते. समाजातील धर्माधर्माविषयी असणारे अज्ञान किंवा गैरसमज दूर करण्याचे काम वाचन चळवळीने केले आहे. एक धर्म दुसऱ्या धर्मास पूरक असल्याचे किंवा सर्व धर्माची शिकवण एकच असल्याचे वाचन चळवळीने लक्षात आणून दिले त्यामुळेो धर्माधर्मातील कलह कमी झाल्याचे १०.०० टक्के वाचकांनी सांगितले.

समाजामध्ये बहुसंख्य आणि अल्पसंख्य असाही भेदभाव अस्तित्वात आहे. बहुसंख्य समाज अल्पसंख्याक समाजाऊरती हुकूमत गाजवून अल्प संख्यांक समाजाऊरती अन्याय अत्याचार करण्याचे काम करत होता. अल्प संख्याक समाज हेही आपलेच भाऊ बांधव असल्याचे वाचन चळवळीने बहुसंख्य समाजाच्या मनावरती रूजवले बहुसंख्य समाजाची मानसिकता बदलण्याचे काम वाचन चळवळीने केले असत्यामुळे अल्पसंख्यांक समाज सुरक्षित होत गेल्याचे २.९७ टक्के वाचकांनी सांगितले.

समाज जाती–जाती मध्ये विभागला आहे. गावोगावी बहुसंख्य असणारी जात, प्रबळ जात म्हणून उदयास येत गेल्याने अन्य जाती वरती अन्याय अत्याचार करू लागली. आपल्या जातीची संख्या जास्त असल्याने गावचे अर्थकारण, राजकारण, समाजकारण, धर्मकारण त्याच जाती भोवती फिरू लागल्याने सत्तेची सर्व सूत्रे त्याच प्रबळ जातीच्या हाती येत गेली. त्यामुळे समाजातील इतर जाती विकासापासून दूर राहू लागल्या वाचन चळवळीने याविषयी समाजामध्ये प्रबोधन करून प्रत्येक जातीला आपल्या विकासाचा समान अधिकार असल्याचे सांगितले. प्रत्येकास आपल्या हक्क अधिकाराविषयी जागृक करून प्रबळ जातींनाही या विषयी समजाऊले त्यामुळेप्रबळ जातीच्या हाताची सूत्रे हळूहळू अन्य जातींकडे येवू लागली आणि सर्वच जाती विकास प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ लागल्या हे सर्व वाचनामुळे होऊ शकले असे १३.१८ टक्के वाचकांनी सांगितले.

**तक्ता क्र. ५**

**४.४.५ आंतर जातीय विवाह**

| अ.क्र | आंतर जातीय विवाह | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | जातीय सलोखा | २२ | १०.०० |
| २ | धार्मिक सलोखा | १६ | ०७.२७ |
| ३ | वर्गीय सलोखा | २७ | १२.२७ |
| ४ | मानसिक बदल | २२ | १०.०० |
| ५ | आर्थिक बदल | ६२ | २८.१८ |
| ६ | सांस्कृतिक बदल | ७१ | ३२.२७ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

वाचनामुळे समाजामध्ये परंपरागत जीवन जगण्याच्या पद्धतीमध्ये बदल झाला आहे. कारण पारंपरिक जीवन जगण्याच्या पद्धतीमध्ये लोक आपाआपल्या जातीमध्ये बंदिस्त होते. लोक ज्या चालत आलेल्या प्रथा, परंपराना याला चिटकून बसले होते. परंतु वाचन चळवळीमुळे लोकांमध्ये जाणीव जागृती होऊन परिवर्तन होण्यास मदत झाली. अनेक समाजसुधारकांनी जातीच्या भिंती तोडण्यासाठी, आंतरजातीय विवाहाची आवश्यकता असल्याचे सांगितले आहे. आंतरजातीय विवाहामुळे दोन जाती दोन परंपरा किंवा संस्कृती जवळ येतात एकमेकास पूरक समजून घेतात. त्यामुळे जातीय सलोखा निर्माण होण्यास मदत होते. वाचन चळवळीमुळे जातीय कट्टरता कमी होऊन लवचीकता आल्याने दोन्ही घरातील मंडळी आंतरजातीय विवाहास मान्यता देऊ लागले परिणामी समाजातील जातीय सलोखा वाढण्यास वाचन चळवळीची मदत झाली असल्याचे १०.०० टक्के वाचकांनी सांगितले.

वाचनामुळे एकाच धर्मातील दोन जातींमध्ये सलोखा निर्माण होण्यास मदत झाली आहे. आंतरजातीय विवाह हा एकाच धर्मातील दोन जातीमध्ये किंवा आंतरधर्मिय दोन धर्मामध्ये होत असल्याने दोन जाती बरोबरच दोन धर्मामध्येही सलोखा निर्माण झाला आहे. काही परिवारांमध्ये हिंदू, बौद्ध, शिख, आणि ख्रिश्चन अशा महिला सुखाने नांदत आहेत. एकच परिवार असल्याने प्रत्येकजण

आपल्या धर्मानुसार आचरण करत आहे. यामुळे आंतरजातीय विवाह जातीय सलोख्यास कारणीभूत आहे असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. वाचन चळवळीमुळे धार्मिक सलोखा निर्माण होण्यास मदत झाल्याचे ७.२७ टक्के वाचकांनी सांगितले.

वाचनामुळे दोन जाती धर्माप्रमाणेच दोन वर्गामध्येही सलोखा निर्माण होण्यास मदत झाली आहे. वाचन चळवळ दोन वर्गांतील अंतराचे कारण ओळखून त्यावरती प्रबोधन करण्याचे काम करते. दोन वर्ग म्हणजे गरीब, श्रीमंत किंवा श्रीमंत, श्रीमंत अथवा गरीब, गरीब असे असतानाही त्यांच्यातील मतभेद, त्यांच्यातील वैचारिक अंतर कमी करण्यास आंतरवर्गीय विवाह मदतनीस ठरले आहेत हे सर्व घडवून आणण्यामध्ये वाचन चळवळीचे मोठे योगदान असल्याचे १२.२७ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

आंतरजातीय विवाह हा मुळातच मानसिक बदलामुळे होणारा विवाह आहे. जातीच्या, धर्माच्या बंधनामध्ये आडकलेला मुलगा किंवा मुलगी आंतरजातीय विवाह करणे शक्य नाही, आंतरजातीय विवाहास पूरक वातावरण निर्माण करण्याचे काम वाचन चळवळीने केले आहे. वाचन चळवळीमुळे जाती धर्मातील कट्टरता कमी होऊन एक दूसऱ्याच्या प्रती प्रेमाची भावना निर्माण झाल्याने कट्टरतेमधील फोलपणा, निरर्थकता वाचकांच्या लक्षात आल्याने आंतरजातीय विवाहास मानसिक बदल पूरक ठरला आहे या मानसिक बदलास वाचन चळवळ जबाबदार असल्याचे १०.०० टक्के वाचकांनी सांगितले आहे.

वाचनामुळे समाजातील सर्वच स्तरांमध्ये आमूलाग्र बदल घडून आले आहेत. वाचनाच्या प्रबोधनामुळे आंतरजातीय विवाहाची मानसिकता तर झालीच आहे. त्याच बरोबर इतरांप्रमाणे आपलाही आर्थिक स्तर उंचावला पाहिजे अशी मानसिकता निर्माण होण्यास मदत झाली. आंतरजातीय विवाहासाठी आर्थिक स्तर ही चांगला असणे गरजेचे आहे याची जाणीव ही वाचन चळवळीमुळे युवकांना झाली. आंतरजातीय विवाह केल्यानंतर त्याला साजेसा आपलाही आर्थिक स्तर असावा अशी मानसिकता निर्माण झात्यामुळे आंतरजातीय बरोबरच आर्थिक बदल ही समाजामध्ये होण्यास वाचन चळवळीचे योगदान असल्याचे २८.१८ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

आंतरजातीय विवाह म्हणजे दोन जाती, दोन धर्म किंवा दोन संस्कृतीचा मिलाप होय आंतरजातीय विवाहामुळे दोन संस्कृती जवळ येतात आणि पूरक अशा गोष्टी त्यातून घेऊन एक तिसरी संस्कृती निर्माण होते. हा सांस्कृतिक बदल घडवण्याची ताकत समाजामध्ये वाचनामुळे येते. वाचन चळवळ समाजातील सर्व स्तरामधील बदलांसोबत सांस्कृतिक बदल ही मोठ्या प्रमाणात घडवून आणते. सांस्कृतिक बदल हा एक दोन महीने किंवा वर्षामध्ये होणे शक्य नाही म्हणजेच दिर्घ काळ चालणाऱ्या या प्रकीयेस वाचन चळवळ कायम कार्यरत ठेवते. समाजामध्ये सांस्कृतिक स्वरूपात होणारा बदल वाचन चळवळ स्वीकारते आणि भविष्यातील सांस्कृतिक बदलास पूरक वातावरण निर्माण करते. सांस्कृतिक बदल हा समाजातील बदलाची पूर्वतयारी आहे. ही पूर्वतयारी आंतरजातीय विवाहासारख्या प्रसंगामधून वाचन चळवळ करून घेत असल्याचे ३२.२७ टक्के वाचकांनी सांगितले आहे.

**तक्ता क्र. ६**


**४.४.६ पारंपरिक रूढी, परंपरा**

| अ.क्र | पारंपरिक रूढी, परंपरा | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | बाल विवाह | ९२ | ४१.८१ |
| २ | विधवा विवाह | १३ | ०५.९० |
| ३ | पुरुष प्रधानता | ३६ | १६.३६ |
| ४ | वंशाचा दिवा | २३ | १०.४५ |
| ५ | जात पंचायत | १३ | ०५.९० |
| ६ | पारंपरिक व्यवसाय | ४३ | १९.५४ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्त्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

**आलेख क्र. ६**

**पारंपरिक रूढी, परंपरा**




वाचन चळवळीमुळे अनेक पारंपरिक रूढी परंपरांमध्ये मोठा बदल घडून आला. समाजातील अनेक अनिष्ट चालीरीती समाजसुधारकांनी वाचन चळवळीच्या माध्यमातून नष्ट केल्या समाजामध्ये पूर्वी सर्रास बाल विवाह होत असत त्यामुळे बालपणीच मुलाचे मृत्यू झाल्यास मुलींना बाल वयापासूनच विधवांचे जीवन जगावे लागत असे. त्यामुळे एकूणच स्त्रियांची अवस्था दयनीय होती. ही गोष्ट समाजसुधारकांच्या लक्षात आल्याने त्यांनी या विरूद्ध आवाज उठवला व बाल विवाहास विरोध केला. वर्तमानपत्रे, मासिके अशा माध्यमातून वाचन चळवळीचा आधार घेत समाजातील बालविवाह बंद करत आणले त्यामध्ये वाचन चळवळीचा मोलाचा वाटा असल्याचे ४१.८१ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

समाजातील वाढते विधवांचे प्रमाण आणि त्यांच्यावर होणारे अन्याय, अत्याचार यामुळे विधवांना मृत्युशिवाय दुसरा पर्याय नव्हता. नैसर्गिक आपत्ती किंवा रोगराईमुळे नवऱ्याचा मृत्यू झाल्यास विधवांना एकाकी आणि तुच्छ जीवन काहीही दोष नसताना जगावे लागत असे या विधवांचे जीवन पुन्हा पूववत करण्यास वाचन चळवळीने मोठा भाग घेतला. वाचन चळवळीने विधवांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलवून विधवा विवाहास पूरक वातावरण निर्माण केले. त्यामुळे समाजातील विधवांचे जीवनमान सुधारले असे ०५.९० टक्के वाचकांनी सांगितले.

भारतीय समाज व्यवस्था ही पुरुषप्रधान व्यवस्था असल्याने स्त्रियांना दुय्यम लेखले जात असे. समाजातील सर्व निर्णय प्रक्रीयेत पुरुष पुढे असत व स्त्रियांना पाठीमागे लोटून त्यांचे शोषण केले जात असत. स्त्रियांनाही पुरुषांप्रमाणे सर्व हक्क, अधिकार मिळाले पाहीजे अशी मानसिकता निर्माण करण्यामध्ये वाचन चळवळीने मोठा सहभाग घेतला. समाजातील प्रबोधनामुळे स्त्री–पुरुष समतेचा विचार मनामनात रूजून पुरुषप्रधानता कमी होण्यास मदत झाली असे १६.३६ टक्के वाचकांनी सांगितले.

स्त्री–पुरुष महत्त्वाची असा भेदाभेद समाजामध्ये असत्यामुळे मुलगा हाचा वंशाचा दिवा मानला जातो. समाजातील परंपरेनुसार मुलगी विवाह झाल्यानंतर सासरी जाते म्हणून मुलगा वंशाचा दिवा किंवा म्हातारपणाचा आधार मानला जात असे. वाचन चळवळीने समाजातील हा ही समज दूर करण्यास मदत केली आहे. आज काल मुली ही शिक्षण घेऊन नोकरी करत असल्याने आई वडीलांचा सांभाळ चांगल्या प्रकारे करू लागल्या आहेत. दुसऱ्या बाजूला मुलगा आपली पत्नी आणि मुले यांचेकडेच लक्ष देऊ लागल्याने म्हातरपणास आई–वडिलांना वृद्धाश्रमाचा रस्ता धरणे भाग पडते. पर्यायाने समाजातील हे बदल वाचनाच्या माध्यमातून होत गेला आहे. मुलगा हाच वंशाचा दिवा हा विचार मागे पडून, मुली सुद्धा आई–वडीलांचा चांगल्याप्रकारे सांभाळ करू शकतात. वाचनाच्या माध्यमातून होत असणारे प्रबोधन आणि समाजातील बदललेली परिस्थिती मुलगा आणि मुलगी यांच्याकडे समान दृष्टीने पाहण्यास भाग पाडत आहे. हा विचार बदलण्यास कारणीभूत असल्याचे १०.४५ टक्के वाचकांनी सांगितले.

भारतीय समाज अनेक जाती धर्मांमध्ये विभागलेला आहे. प्रत्येक जाती धर्माची आपली एक स्वतंत्र परंपरा आहे. त्यामुळे या जाती किंवा जमाती मुख्य प्रवाहापासून दूर असल्याने आपल्या परंपरेला चिटकून बसलेला आहे. भारतीय परंपरेमध्ये सर्वच जाती धर्मांमध्ये स्त्रियांना दुय्यम लेखले जाते. भारत हा एक लोकशाहीप्रधान देश असताना या जाती जमातीचे आपली एक स्वतंत्र न्याय प्रक्रीया अस्तित्वात आहे. या न्याय प्रक्रीयेमध्ये समाजातील काही प्रतिष्ठीत लोक न्यायदानाचे काम करून समाजातील वेगळे अस्तित्व टिकवण्याचे प्रयत्न करू लागले आहेत. परिणामी भारतीय लोकशाहीवरील किंवा न्याय व्यवस्थेवरील विश्वास न ठेवला गेल्याने जात पंचायतीच्या माध्यमातून महिलांवरती अनेक बंधने आणि अन्याय अत्याचार केले जात आहेत. या सर्वांविषयी वाचन चळवळ

नेहमीच आवाज उठवत आली आहे. वाचन चळवळीने या विषयी समाजामध्ये प्रबोधन तर चालू ठेवले आहे. शिवाय अन्याय अत्याचाराच्या विरोधात आवाज ही उठवला आहे. हळूहळू या समाजातील काही लोक शिकू लागले. वाचन चळवळीच्या माध्यमातून चांगले वाईट समजू लागले आहेत आणि त्यांनी स्वत:च त्या जात पंचायतीच्या विरोधात आवाज उठवण्यास सुरवात केली. वाचन चळवळ या प्रबोधनाच्या अग्रभागी राहून याचे नेतृत्व करत राहिली. त्यामुळे वेगवेगळ्या जातीतील जात पंचायती हळूहळू बंद होत गेल्याचे ५.९० टक्के वाचकांनी म्हटले आहे.

समाजामध्ये गाव पातळीवर बलुतेदारी अस्तित्वात होती या बलुतेदारीत प्रत्येक जातीचा एक व्यवसाय ठरलेला होता. तो व्यवसाय सोडून दुसरा व्यवसाय करण्याची मानसिकता समाजाची नव्हती त्यामुळे पारंपारीक व्यवसाय हीच आपली ओळख धरून बसल्याने त्या जातीचा विकास थांबला होता भारतीय राज्यघटनेमुळे समाजातील कुठल्याही वर्गाला कुठल्याही वर्गात जाऊन काही व्यवसाय करण्याचा अधिकार दिला आणि या अधिकाराची जाणीव वाचन चळवळीने समाजाला करून दिली. समाज आपला पारंपरिक व्यवसाय सोडून दुसरा व्यवसाय करू लागला परिणामी त्यांची आर्थिक प्रगती होऊन समाज सुधारणेस मदत झाली. वाचन चळवळीने प्रबोधन करून पारंपारीक व्यवसायास आधुनिक व्यवसायाचे रूप देण्यास भाग पाडले असे १९.५४ टक्के वाचकांनी सांगितले.

**तक्ता क्र.७**


**४.४.७ धर्मांचे प्रमाण**

| अ.क्र | धर्माचे प्रमाण | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हिंन्दू | ११० | ५०.०० |
| २ | मुस्लीम | २० | ०९.०९ |
| ३ | बौद्ध | ५३ | २४.०९ |
| ४ | जैन | ०७ | ०३.१८ |
| ५ | ख्रिश्चन | १८ | ०८.१८ |
| ६ | अन्य | १२ | ०५.४५ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

## आलेख क्र. ७

## ४.४.७ धर्मांचे प्रमाण




वाचन चळवळीच्या माध्यमातून झालेला सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय बदल आभ्यासण्यासाठी पुणे जिल्ह्यातील पाच तालुके आणि त्यामधील २२० वाचकांचा सर्वे करण्यात आला. या सर्वेमध्ये सर्वेक्षण करताना वाचकांमध्ये वेगवेगळ्या धर्माचे प्रमाण असे दिसून येते की, हिंदू धर्माचे प्रमाण ५०.०० टक्के असल्याचे दिसून आले, तर मुस्लीम धर्माचे प्रमाण ९.९ टक्के असे दिसले तर बौद्ध धर्मांचे ३.१८ टक्के प्रमाण असल्याचे दिसले. जैन धर्माचे प्रमाण ३.१८ टक्के असे प्रमाण तर ख्रिश्चन धर्माचे प्रमाण ८.१८ टक्के असे सर्वेक्षणात दिसले. या सर्व धर्मांशिवाय असणाऱ्या अन्य धर्मांचे प्रमाण ५.४५ टक्के असल्याचे अभ्यासकाच्या सर्वेक्षणात दिसून आले.

**तक्ता क्र. ८**

**४.४.८ सहिष्णुतेचे प्रमाण**

| अ.क्र | सहिष्णुताचे प्रमाण | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सहिष्णुता | ४३ | १९.५४ |
| २ | धार्मिक सहिष्णुता | ३८ | १७.२७ |
| ३ | सांस्कृतिक सहिष्णुता | ५१ | २३.१८ |
| ४ | सामाजिक सहिष्णुता | ७७ | ३५.०० |
| ५ | जातीय सहिष्णुता | ११ | ०५.०० |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

आजकाल समाजामध्ये सहिष्णुतेविषयी उलटसुलट चर्चा चालू आहे. समाजामधील सहिष्णुतेचे प्रमाण कमी झाल्याचे अनेक विद्वान किंवा साहित्यिक सांगत आहेत. या पार्श्वभूमीवर अभ्यासकाने आपल्या संशोधनामध्ये भरून घेतलेल्या प्रश्नावली वरून असे दिसते की समाजामध्ये पारंपरिक सहिष्णुतेचे प्रमाण १९.५४ टक्के आहे.

वाचन चळवळ समाजात जशी पारंपरिक सहीष्णूता कायम ठेवण्याचे काम करते. तसेच धार्मिक सहिष्णुता राखण्याचेही काम करते भारतातील अनेक धर्मामध्ये सहिष्णुता असणे काळाची गरज आहे ही सहिष्णुता असेल तरच सामाजिक आणि पर्यायाने देशाचा विकास होईल. वाचन चळवळ धर्माधर्मामधील तेढ कमी करून सलोखा निर्माण करण्याचे काम करत आले आहे त्यामुळे वाचन चळवळीचा धार्मिक सहिष्णुता रुजविण्यात मोठा वाटा असल्याचे १७.२७ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

समाजामध्ये अनेक जाती धर्माचे, संस्कृतीचे लोक राहत आहेत. सांस्कृतिक वेगवेगळ्या असताना दोन संस्कृतीमधील समन्वय साधून दोन संस्कृतीमध्ये सहिष्णुता राखण्यामध्ये वाचन चळवळीने मोठे काम केले आहे. दोन्ही संस्कृतीमधील कच्चे दुवे बाजूला ठेवून शक्ती स्थळावर काम केले आहे यामुळे दोन्ही संस्कृती जवळ येवून एक दुसऱ्या विषयी आत्मीयता निर्माण केली हि

सांस्कृतिक सहिष्णुता कायम राखण्यामध्ये वाचन चळवळ नेहमीच पुढे असल्याचे २३.१८ टक्के वाचकांनी सांगितले.

समाजामध्ये वाचन चळवळ आत्मीयता वाढविण्यासाठी सतत कार्यरत असते. सामाजिक सहिष्णुता ही सामाजिक विकासासाठी आवश्यक आहे. समाजामध्ये जर सहिष्णुता नसेल तर सामाजिक विकास साधता येणार नाही. समाजामध्ये अनेक जाती धर्माचे लोक राहत असतात यांच्या मधील सौख्य राखण्याचे काम वाचन चळवळीच्या माध्यमातून सोपे होत गेले आहे. वाचन चळवळ नेहमीच या विषयी प्रबोधन करत आली आहे. गावोगावी पोहोचलेली वाचन चळवळ या दृष्टीने मोलाची असल्याचे ३५.०१ टक्के वाचकांनी सांगितले.

भारतीय समाज वेगवेगळ्या जातीमध्ये विभागला गेला आहे. प्रत्येक जातीची जगण्याची आपली एक रित आहे त्यामुळे जाती–जाती मध्ये भेद निर्माण होत जातो आणि जातीय असहीष्णूता निर्माण होते. ही गोष्ट लक्षात घेऊन वाचन चळवळीने समाजात जातीय सहिष्णूतेविषयी पूरक वातावरण निर्माण करण्याचे काम हाती घेतले जातीय सहिष्णुता समाजातील दंगे रोखू शकते याची जाणीव ठेवून वाचन चळवळ प्रत्येक जातीचे प्रबोधन करत आली आहे. वाचन चळवळीच्या माध्यमातून प्रत्येक जातीतील व्यक्तीस कळू लागले की आपण निरर्थक दुसऱ्या जाती विषयी द्वेष पसरवत आहोत. सामाजिक हिताच्या दृष्टीने ती सतत कार्यरत आहे. वाचन चळवळीमुळे जातीय सहिष्णुता कायम राहिल्याचे ५.०० टक्के वाचकांनी सांगितले आहे.

### ४.५ आर्थिक बदल(क्षेत्रीय पाहणी)

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधकाने क्षेत्रीय सर्वेक्षणामधून प्राथमिक तथ्ये संकलनाच्या तंत्राव्दारे प्राप्त केलेल्या संख्यात्मक तथ्यांचे विश्लेषण केलेले आहे. महाराष्ट्र नव्हे तर देश पातळीवर वाचन चळवळीमुळे बदल झाल्याचे आपणास दिसून येतात. त्या संदर्भात अनेक उदाहरणे ही आपणास पाहता येतील परंतु संशोधनाची मर्यादा पाहता क्षेत्रीय मर्यादा घालून घेणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने पुणे जिल्ह्यातील पाच तालुक्यातील ७० वाचनालयातील २२० वाचकांच्या नमुना निवडीच्या आधारे संशोधकाने आपले संशोधनाचे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे.

वाचन चळवळीमुळे समाजातील एकूणच सर्व स्तरांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल घडून आल्याचे आपणास दिसून येईल परंतु सदर प्रकरणामध्ये वाचन चळवळीमुळे झालेला आर्थिक व

राजकीय बदल केंद्र स्थानी ठेवून विचार केला गेला आहे. समाजातील आर्थिक स्तर हा उंचावण्यामध्ये वाचन चळवळीचे मोठे योगदान आहे. वाचन चळवळीमुळे समाजामध्ये आर्थिक विकासाची जाणीव झाली आणि त्यातून आर्थिक उत्पादन वाढत गेल्यामुळे अर्थातच समाजाचा सर्वांगीण आर्थिक स्तर सुधारल्याचे आपणास दिसून येईल. आर्थिक उत्पादन वाढल्यामुळे ग्रामीण भागातही शहरीकरणाच्या धरतीवरती राहणीमान आधारलेले दिसून येते. एवढेच नव्हे तर समाजाचा एकूणच आर्थिक विकास झाल्यामुळे त्यांच्याकडे विविध दळणवळणाची साधने ही उपलब्ध असल्याचे दिसते. सुरवातीच्या काळात सार्वजनिक दळणवळणावरती अवलंबून असलेला समाज आज सार्वजनिक किंवा चार चाकी गाड्या वापरताना दिसतो हा बदल आर्थिक बदलाशिवाय घडूच शकत नाही या बदलाच्या मुळाशी वाचन चळवळ सुप्तपणे काम करत आहे. गावामध्ये आर्थिक विकासाबरोबर बँकिंग सुविधा सहजपणे उपलब्ध होत आहेत त्यामुळेआर्थिक बचत असेल किंवा विकासासाठी आर्थिक कर्ज घ्यावयाचे असेल तर सहजपणे आज उपलब्ध होत आहे. एवढेच नव्हे तर वाचन चळवळीमुळे समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत सरकारी योजनांची माहिती सहजपणे उपलब्ध होत आहे. या योजनांचा आधार घेत समाजामध्ये मोठा आर्थिक बदल झाल्याचे आपणास दिसते. कर्ज उपलब्ध झाल्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागामध्ये कुटीर उद्योगास मोठ्या प्रमाणात चालना मिळाली आणि या कुटीर उद्योगाच्या माध्यमातून लोकांचा मोठ्या प्रमाणात आर्थिक विकास झाला आहे.

भारत हा कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे कृषी देशाच्या विकासाचा केंद्र बिंदू आहे त्यामुळे आधुनिक पद्धतीने शेती कसणे, नवनवीन प्रयोग करणे, अत्याधुनिक तंत्राचा वापर करून जास्तीत जास्त उत्पादन घेणे वाचन चळवळीमुळे शेतकऱ्यांना शक्य होऊ लागले आहे. म्हणजेच वाचन चळवळीमुळे कृषी व्यवसायासाठी चालना मिळाल्यामुळे आर्थिक विकासाचा केंद्र बिंदू म्हणून शेती समोर येत आहे या सर्व गोष्टींचा फायदा होत आहे. वाचन चळवळीने आर्थिक उत्पादनाची नवनवीन साधन समाजाच्या समोर आणावी आणि त्याचा उपयोग करून शहरी आणि ग्रामीण भागामध्ये आर्थिक विकास मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसते.

वाचन चळवळ ही समाजाच्या सर्वागीण विकासास पूरक आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. वाचन चळवळीमुळे देशामध्ये मोठ्या प्रमाणात राजकीय उलथा–पालथ झाल्याचे आपण नेहमी पाहतो. वाचन चळवळीमुळे समाजामध्ये राजकीय अस्मिता निर्माण झाली आणि घरोघरी एक नेता झाल्याचे आपणास दिसते. या गोष्टीकडे आपण सकारात्मक पाहिल्यास आपणास असे दिसून येईल

की, आज वाचन चळवळीमुळे शिक्षित नेतृत्व निर्माण होत आहे. एवढेच नव्हे तर मोठ्या प्रमाणात युवा नेतृत्व ही समोर येत आहे. आज काल सर्वच पक्ष नवीन चेहऱ्यांना संधी देऊ पाहत आहे. म्हणजेच सर्वच पक्षांमध्ये युवा नेतृत्व निर्माण होताना आपणास दिसते हे नेतृत्व पूणे जिल्ह्यातील निर्धारित पाच तालुक्यांमध्ये कशा पद्धतीने विकसीत होत गेले आहे आणि त्याच्यामुळे अशी वाचन चळवळ कशी कार्यरत आहे हे पाहणे या संशोधनाची उद्दिष्टच आहे.

वाचन चळवळ ही पुरुषी नेतृत्वापुरती मर्यादित नाही. वाचन चळवळीमुळे एकूणच राजकीय जाणीव जागृती झात्यामुळे आणि महिलांना राजकीय आरक्षण मिळात्यामुळे समाजामध्ये मोठ्या प्रमाणात महिलांचे नेतृत्व समोर येत आहे. महिलांचा राजकरणातील वाढता सहभाग आणि समाजातील छोट्या छोट्या समूहांना मिळणारे राजकीय प्रतिनिधीत्व वाचन चळवळीचा एक भाग आहे. निर्धारीत पाच तालुक्यातील समूह नेतृत्व किंवा महिलांचा राजकीय सहभाग तर आहेच, शिवाय वाचन चळवळीमुळे समाजामध्ये मतदानाविषयी झालेली जनजागृती ही विसरता येणार नाही. वाचन चळवळीमुळे मतदार नोंदणी व मतदानाचे प्रमाण वाढले आहे. हे वेगळे सांगण्याची गरज नाही. प्रत्येक व्यक्ती वाचन चळवळीमुळे शिक्षित झात्यामुळे राजकीय सलोखा साधून समाजातील विविध प्रश्न सामोपचाराने सोडवताना आपणास दिसतात. वाचन चळवळीमुळेच गावागावात विविध पक्षांच्या शाखा निर्माण झाल्या आणि विविध पक्षांची विचारसरणी समाजातील शेवटच्या घटकांपर्यत माहीत झात्यामुळे समाजात सकारात्मक बदल होण्यास मोठी मदत झाली आहे. या विषयी माहिती मिळवताना निश्चित केलेल्या पाच तालुक्यातील गावागावातील राजकीय पक्षांचे अस्तित्व या निमित्ताने शोधले आहे. त्या पाठीमागे कार्यरत असणारी वाचन चळवळ अभ्यासकाने प्रस्तूत संशोधनात विस्ताराने मांडली आहे.

वाचन चळवळीमुळे गावागावामध्ये ग्रामसभेचे स्वरूप बदलल्याचे आपणास दिसते. प्रत्येक गावी आज ग्रामसभा होत आहेत. प्रत्येकाच्या मताचा विचार करून विकसीत गावांना मॉडेल म्हणून समोर ठेवून अविकसित गावे ही वाचन चळवळीच्या माध्यमातून विकसित होत आहेत. वाचन चळवळीच्या माध्यमातून जशी राजकीय अस्मिता, वाढीस लागली आहे तशीच जातीय अस्मिता, धार्मिक अस्मिता सुद्धा समाजामध्ये वाढीस लागली आहे त्यामुळे आजकाल राजकारणास जातीय रंग चढल्याचे आपणास दिसून येते. यातून जातीय किंवा समूह नेतृत्व निर्माण झाले असले तरी ते

लोकशाहीस पूरक नाही त्यामुळे वाचन चळवळीमुळे वाढीस लागलेले जातीय राजकारण प्रस्तुत संशोधनात तपासून पाहीले आहे.

एकंदरीत पाहता या पाचव्या प्रकरणामध्ये संशोधकाने वाचन चळवळीमुळे झालेला उलट सुलट आर्थिक व राजकीय बदल नोंदवण्याचा प्रयत्न केला आहे तो बदल प्रश्नावलीच्या आधारे बनवलेल्या तक्त्यांमधून अधिक स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. क्षेत्रीय पाहणी करून प्रश्नावली, निरीक्षण, मुलाखतीच्या तंत्राचा उपयोग करून हे संशोधन अधिक उपयोजित कसे होईल याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे.

**वाचन चळवळीमुळे झालेला आर्थिक बदल**

**तक्ता क्र : १**
**४.५.१ आर्थिक स्तर**

| अ.क्र | आर्थिक स्तर विषय जागृती | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | रोजगाराची हमी | २० | ०९.०९ |
| २ | नवीनरोजगार निर्मिती | ३० | १३.६३ |
| ३ | दरडोई उत्पनात वाढ | ५५ | २५.०० |
| ४ | सुख सुविधा | ७२ | ३२.७२ |
| ५ | सामाजिक बदल | ४३ | १९.५४ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

वाचन चळवळीमुळे विविध क्षेत्रात अनेक बदल झाले आहेत. त्यापैकी एक म्हणजे आर्थिक क्षेत्र होय. वाचन चळवळीमुळे लोकांना रोजगाराचे क्षेत्र माहित झाले घरबसल्या वाचन चळवळीच्या माध्यमातून शिक्षित युवकांना विविध क्षेत्रातील नोकरीच्या संधी माहित झाल्या. त्यातून अनेक युवकांना रोजगार मिळू लागला. त्यामुळे त्यांच्या गरजा पूर्ण होऊ लागल्या. शिक्षणामुळे लोकांना नोकरी मिळेलच याची शाश्वती लोकांना नसत्यामुळे एक प्रकारची उदासीनता निर्माण झाली होती. परंतु वाचन चळवळीने हा समज दूर करून शिक्षित तरूणांना विविध क्षेत्रामध्ये नोकरी मिळू शकण्याची शाश्वती मिळाली. कोणत्याही क्षेत्रामध्ये कामगाराची गरज आहे याची जाहिरात विविध वर्तमानपत्र किंवा मिड्यिाच्या माध्यमातून युवकापर्यंत पोहचवली जाते. या माध्यमातून अनेकांना रोजगार मिळू

लागला. गरजू तरूण आणि मालक यामधील दुवा वाचन चळवळ बनली आहे. वाचन चळवळीच्या माध्यमातून रोजगार मिळण्याची हमी मिळत असल्याचे ९.९ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

वाचन चळवळीमुळे समाजामध्ये आणि वेगवेगळ्या छोट्या मोठ्या व्यवसायामध्ये सतत बदल होऊ लागले. वाचकांना प्रसार माध्यमातून आपल्या आजूबाजूच्या कच्च्या मालाची माहिती मिळू लागली. या मालावरती छोटी–मोठी प्रक्रिया करून उपयोग उभारण्या संदर्भातील माहिती मिळू लागली या माहितीच्या आधारे सुज्ञ वाचक स्वतःचे लघू उद्योग उभारू लागले त्यामुळेस्वतःसाठी आणि इतरांसाठी नवीनरोजगार निर्माण झाला. गावोगावी सुद्धा छोटे लघू उद्योग निर्माण होऊन नवीनरोजगार निर्मिती झाल्याचे १३.६३ टक्के लोकांनी सांगितले.

वाचन चळवळीमुळे लोकांना रोजगार उपलब्ध होण्यास मदत झाली आहे पण या सोबतच लोकांना आपल्या हक्क आणि अधिकारांची जाणीव झाली त्यातून कामाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे अशी मागणी जोर धरू लागली त्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागात काम करणाऱ्या लोकांच्या श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त झाली. योग्य मोबदला मिळात्यामुळे लोकांच्या दरडोई उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. परंपरेने ग्रामीण गावगाड्यात काम करणारे बलुतेदार यांना आपल्या कामाचा मोबदला हा पैशाच्या स्वरूपात मिळू लागला. वाचन चळवळीमुळे लोकांना त्यांच्या श्रमाची किंमत कळू लागली याचा एकूण परिणाम होऊन लोकांच्या दरडोई उत्पन्नात वाढ झाल्याचे सर्वेक्षणातील २५.०० टक्के लोकांचे मत आहे.

वाचन चळवळीमुळे लोकांमध्ये रोजगाराची उपलब्धता होऊन दरडोई उत्पन्नात वाढ झाली. पैशाच्या स्वरूपात मिळालेल्या मोबदत्यामुळे लोकांनी सुख सुविधा देणाऱ्या वस्तू खरेदी करण्यावर भर दिला एकूण वर्तमान परिस्थितीत जागतिकीकरणाचा परिणाम समाजाच्या जीवनमानावरती झाला आहे. त्यामुळे सुद्धा चंगळवादाला प्रोत्साहन मिळाले. वाचन चळवळीमुळे लोकांना सुखमय जीवन जगण्याची लालसा निर्माण झाली. त्यामुळे लोकांचा कल हा सुख सुविधा मिळवण्याच्या दृष्टीकोनातून उपलब्ध आहेत व त्या सुविधा लोकांना कशा सहज उपलब्ध होतील हे वाचन चळवळीच्या माध्यमातून ३२.७२ टक्के लोकांनी प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती दिली.

वाचनामुळे आर्थिक सुबत्तेमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक समानता सामाजिक बदलासही पूरक सिद्ध होत असल्याने लोकांच्या आचार–विचार, राहणीमान, दृष्टीकोन व मानसिकता यांच्यामध्ये प्रबोधन झाले. पूरूषाच्या बरोबरीने स्त्रिया ही अर्थाजन करू लागल्या याचा परिणाम असा झाला की समाजाचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला. चुल आणि मुल इथपर्यंतच असलेला दृष्टीकोन आर्थिक बदलामुळे बदलला आणि स्त्रिया ही कुटुंबाचा आधार बनल्या या आर्थिक बदलामध्ये वाचन चळवळीचा मोठा वाटा आहे. वाचन चळवळीमुळे आर्थिक बदला सोबतच समाजाच्या विविध स्तरामध्ये बदल होत गेल्याचे १९.५४ टक्के वाचकांनी सांगितले.

**तक्ता क्र. २**

**४.५.२ राहणीमानाचा दर्जा**

| अ.क्र | राहणीमान विषयक जागृती | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्त्रिया | ५८ | २६.३६ |
| २ | पुरुष | ७२ | ३२.७२ |
| ३ | मुल | ५५ | २५.०० |
| ४ | मुली | ३५ | १५.९० |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीयसर्वेक्षण,२०१७.

वाचन चळवळीमुळे एकूणच समाजातील लोकांचे राहणीमानाचे स्वरूप बदलल्याचे लक्षात येते. स्त्रियाचा स्वत:विषयक दृष्टीकोन तर बदलला आहे परंतु स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा सुद्धा दृष्टीकोन बदलला आहे. वाचन चळवळीमुळे स्त्रियांना हक्क आणि अधिकाराची जाणीव झाली. स्त्रिया शिक्षणाकडे मोठ्या प्रमाणात वळू लागल्या. १७ व्या शतकापासून स्त्री सुधारणेचा झालेला लढा आजच्या स्त्रियांपर्यंत पोहचला त्यामुळे महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, महर्षी कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे, आनंदीबाई जोशी, ताराबाई शिंदे, अशा विविध लोकांनी कमी केलेली स्त्री सुधारणेची चळवळ जन सामान्यांपर्यंत माहिती होण्यास वाचन चळवळीची मोलाची मदत झाली.

वाचन चळवळीमुळे स्त्रियांकडे बघण्याचा पारंपरिक दृष्टीकोन बदलला आणि स्त्रिया या आर्थिक सक्षम होत गेल्या. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियाही आर्थिक दृष्टया सक्षम झाल्याने आजच्या स्त्रियांचा राहणीमानाचा दर्जा अधिक प्रमाणात उंचावला आहे असे मत २६.३६ टक्के वाचकांचे आहे.

आर्थिक बदल हा सर्वव्यापी असतो हा बदल अनेक घटकांवरती परिणाम घडवून आणत असतो. वाचन चळवळीमुळे स्त्री घटकांवर आर्थिक राहणीमानाच्या बाबतीत जसा परिणाम झाला अगदी तसाच परिणाम पुरुष या घटकावरीत झालेला आहे.

वाचन चळवळीमुळे आर्थिक उत्पादनाची साधने उपलब्ध झाली. त्यामुळे पुरुषंच्या एकूण राहणीमानात बदल झाला आर्थिक उत्पन्नाची साधने वाचन चळवळीमुळे माहिती झाली त्यामुळे पुरुषांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्याचे ३२.७२ टक्के वाचकांनी सांगितले.

वाचन चळवळीमुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक बदल झाल्याचे दिसते. आर्थिक बदल हा स्त्री आणि पुरुषांप्रमाणे मुलांमध्ये ही मोठ्या प्रमाणात दिसून येतो. रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध असल्याने मुले आर्थिक दृष्टया स्वतःच्या पायावर उभी राहू लागली. याचा परिणाम असा झाला की मुलांचा राहणीमानाचा दर्जा सुधारला असल्याचे २५.०० टक्के वाचकांनी सांगितले.

मुलांच्या बरोबरीने मुलीही रोजगाराच्या निमित्ताने घराबाहेर पडू लागल्या मुलींना घराबाहेर पडण्याची संधी वाचन चळवळीमुळेच मिळाली असल्याचे दिसते. मुली नोकरी धंदा करू लागल्याने आर्थिक दृष्टया सक्षम होत गेल्या. त्यामुळे त्यांच्या राहणीमानात बदल झाल्याचे आणि एकूण राहणीमानाचा दर्जा उंचावल्याचे १५.९० टक्के वाचकांनी सांगितले.

**तक्ता क्र.३**

**४.५.३ दळणवळण सुविधा**

| अ.क्र | दळणवळण | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दळणवळण विषयक जागृती | ८३ | ३७.७२ |
| २ | दळणवळण साधनात वाढ | ६७ | ३०.४५ |
| ३ | वैयक्तिक दळणवळणाची साधने | ६२ | २८.१८ |
| ४ | हवाई दळणवळण वाढ | ०८ | ०३.६३ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

वाचन चळवळीमुळे ज्याप्रकारे आर्थिक स्तर उंचावला, राहणीमानाचा दर्जा वाढला या बदला प्रमाणेच समाजामध्ये मोठ्या प्रमाणात दळणवळण विषयक बदलही दिसून येतो. समाजाचा आर्थिक स्तर वाढण्याबरोबरच दळणवळण विषयक दृष्टीकोन बदलला आणि पूर्वी पायी चालणारे अंतर सुद्धा यांत्रिक साधनाच्या माध्यमातून पूर्ण करू लागले. छोटे छोटे अंतर वाहनांशिवाय पूर्ण न करण्यापाठीमागे आर्थिक सुंविधांचा निर्माण झालेला स्रोत हे कारण होय. वाचन चळवळीमुळे समाजाचा आर्थिक दर्जा उंचावला आणि त्यातून दळणवळण विषयक बदल झाल्याचे ३७.७२ टक्के वाचकांनी सांगितले.

समाजाचा आर्थिक स्तर उंचावण्यामध्ये वाचन चळवळीचा मोलाचा वाटा आहे या आर्थिक उत्पादनातून समाजामध्ये आपोआप दळणवळणाच्या साधनामध्ये वाढ झाली. पूर्वी गावासाठी असणारी एक बस चार वेळा फेऱ्या मारू लागली. चार वेळा गावातील लोक मोठ्या संख्येने प्रवास करू लागले या शिवाय अनेक खाजगी वाहनांमध्येही मोठ्या प्रमाणात वाढ झाली, त्यातूनच टुरिझम सारखा उद्योग समोर आला. आर्थिक उत्पादनात झालेल्या वाढीमुळजास्त किमतीची तिकीटे किंवा महागडा प्रवास लोक करू लागले. या सर्वांच्या मुळाशी वाचन चळवळ काम करत असत्यामुळे दळणवळण साधनांमध्ये वाढझाल्याचे ३०.४५ टक्के वाचकांनी सांगितले.

वाचन चळवळ समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत जाऊन पोहचली. वाचन चळवळीमुळे प्रत्येक माणूस आर्थिक उत्पादनामध्ये हातभार लावू लागला. परिणामी परिवाराची आर्थिक सुधारणा होऊ लागली. वैयक्तिक उत्पादना बरोबरच वैयक्तिक दळण वळणाची साधने सुद्धा समाजामध्ये वाढू

लागली. घरातील प्रत्येक व्यक्तिस वैयक्तिक दळणवळणाचे साधन उपलब्ध होऊ लागले.हा बदल आर्थिक उत्पादनात झालेल्या वाढीमुळे समाजात दिसून येतो. प्रत्येक व्यक्तीस रोजगार उपलब्ध होण्यापाठीमागील वाचन चळवळीचा हात असल्याचे २८.१८ टक्के वाचक सांगतात.

वाचन चळवळीमुळे एकूणच समाजातील दळणवळणाच्या साधनांमध्ये वाढ झाली आहे. समाजाचा आर्थिक स्तर उंचावत्यामुळे एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी जाणे एवढाच उद्‌देश आज उरला नाही त्या दळणवळणाच्या साधनामध्ये प्रवासादरम्यान किती सुख-सुविधा उपलब्ध आहेत? किती कमीत कमी वेळेत प्रवास कसा कमी करता येईल? यातून हवाई दळण वळणासारखी साधने समाजास उपलब्ध झाल्याने लोक हवाई प्रवास करू लागले.हवाई प्रवास महागडा असला तरी प्रतिष्ठेचा मानला जात असल्याने पैसा हातात आत्यामुळे तो प्रवास सामान्य जनता करू लागली. या विषयाची सर्व माहिती, वाचन चळवळीच्या माध्यमातून बऱ्यापैकी लोकांना मिळू लागल्याने हवाई दळणवळणामध्ये वाढझाल्याचे ३.६३ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

**तक्ता क्र. ४**


**४.५.४ प्रसारमाध्यमांचा वापर**

| अ.क्र | प्रसारमाध्यमांचा वापर | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | संगणकाचा वापर | ३२ | १४.५४ |
| २ | इंटरनेट | २८ | १२.७२ |
| ३ | मोबाईल | ६० | २७.२७ |
| ४ | टि.व्ही चा वापर | ६८ | ३०.९० |
| ५ | रेडिओ | १० | ०४.५४ |
| ६ | ऑडीओ व्हिडिओ | १४ | ०६.३६ |
| ७ | अन्य | ०८ | ०३.६३ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

**आलेख क्र. ४**

**प्रसारमाध्यमांचा वापर**




वाचन चळवळ समाजातील माहिती प्रसारणाचे प्रमुख साधन होय अलीकडच्या काळात वाचन चळवळी सोबतच समाजामध्ये माहिती पोहचविण्याचे काम अनेक माध्यमे करीत आहेत. वाचन

चळवळीच्या माध्यमातून या सर्व माध्यमांची माहिती समाजापर्यंत सहज पोहचू लागली. वाचन चळवळीच्या माध्यमातून समाजामध्ये संगणक साक्षरता निर्माण झाली. हळूहळू संगणकाचा वापर समाजामध्ये मोठ्या प्रमाणात होऊ लागला संगणकाच्या वापरासाठी लागणारा खर्च आर्थिक उत्पादनात झालेल्या वाढीमुळे समाज पेलवू लागला. त्यामुळे समाजामध्ये संगणकाचा वापर जास्त प्रमाणात होऊ लागल्याचे १४.५४ टक्के वाचकांनी सांगितले.

इंटरनेट प्रसार माध्यमाचा एक प्रकार होय. या माध्यमाचा उपयोग करून जगातील माहिती सहजपणे मिळवली जाऊ शकते. या विषयीचे प्रबोधन वाचन चळवळीमुळे समाजात होत गेले. समाज इंटरनेटचा होणारा खर्च सहजपणे करू लागला. त्यामुळे समाजातील जास्तीतजास्त घटकांपर्यंत ज्ञान, माहिती पोहचू लागली. यामध्ये वाचन चळवळीचे मोठे येगदान असल्याचे १२.७२ टक्के वाचकांनी सांगितले.

वाचन चळवळ समाजामध्ये जागृती करण्याचे काम करते. वाचन चळवळीमुळसमाजात झालेल्या आर्थिक बदलांमुळे प्रत्येक व्यक्तिीच्या हाती मोबाईल आला आणि तो सहजपणे दुसऱ्याशी संवाद करू लागला. पूर्वी महागडे असणारे मोबाईल सुद्धा काळाच्या ओघात स्वस्त झाले. सामान्य माणसाच्या आवाक्यात या सर्व सुखसुविधा आल्याने प्रसार माध्यमातील मोबाईल ही सेवा घरोघरी पोहचल्याचे २७.२७ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

वाचन चळवळ समाजाचे अविभाज्य अंग आहे या वाचन चळवळीच्या माध्यमातून समाजात आर्थिक स्रोत निर्माण झाला आणि घरोघरी टि.व्ही. सारख्या प्रसार माध्यमांचा वापर होऊ लागला आज समाजातील प्रत्येक घटक आपल्या आर्थिक उत्पन्नाच्या आधारे टि.व्ही. चा वापर करू लागला या पाठीमागे वाचन चळवळीचा हात असल्याचे ३०.९० टक्के वाचकांनी सांगितले.

रेडिओ हे समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहचलेले माध्यम आहे. ज्या ठिकाणी आजही संगणक, इंटरनेट किंवा टि.व्ही. सारखे साधने पोहचली नाहीत अशा ठिकाणी रेडीओ प्रसार माध्यमाचे काम करत आहे. पूर्वी वाचन चळवळ एक मात्र प्रबोधनाचे साधन होते परंतु त्यानंतर रेडिओ हे प्रसार माध्यमाचे मुख्य साधन म्हणून उदयास आले. आर्थिक दृष्टया सामान्य जनतेस परवडणारी गोष्ट असल्याने सामान्य जनता त्याचा सहजपणे वापर करत असल्याचे ४.५४ टक्के वाचकांनी सांगितले.

वाचन चळवळीमुळे समाजास अनेक प्रसार माध्यमांची माहिती झाली त्याच्या वापराविषयाचे ज्ञान व त्यास लागणाारा पैसा वाचन चळवळच्या माध्यमातून उभा राहू लागला. लोकांना विविध उत्पादनाची साधने उपलब्ध होऊ लागल्याने समाजात ऑडिओ व्हिडिओचा वापर होऊ लागल्याचे ६.३६ टक्के वाचकांनी सांगितले आहे.

वाचन चळवळ सामाजिक बदलाच्या मुळाशी काम करत असल्याने समाजात होणारा लहानातील लहान बदल ही वाचन चळवळीशी संबंधित असतो. वाचन चळवळीमुळे अनेक प्रसार माध्यमांची माहिती समाजापर्यंत पोहचत असते. संगणक, इंटरनेट, मोबाईल, टि.व्ही. या सारख्या प्रसार माध्यमाशिवाय ब्लॉग, व्टिटर, ई–मेल, फेसबुक, व्हॉटस्ॲप या सारख्या अनेक माध्यमांचा वापर जनता करू लागली या विषयाचे लागणारे ज्ञान आणि आवश्यक असणारा पैसा वाचन चळवळीच्या माध्यमातून उपलब्ध होऊ लागल्याने विविध प्रसार माध्यमांचा वापर जनता करत असल्याचे ३.६३ टक्के वाचकांचे म्हणणे आहे.

**तक्ता क्र. ५**


**४.५.५ बचत प्रकार**

| अ.क्र | बचत प्रकार | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | बॅक बचत | ६२ | २८.१८ |
| २ | पत संस्था | १० | ०४.५४ |
| ३ | बचत गट | ५५ | २५.०० |
| ४ | पोस्ट ऑफिस | ४५ | २०.४५ |
| ५ | विमा पॅलिसी | ३८ | १७.२७ |
| ६ | इतर | १० | ०४.५४ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

**आलेख क्र. ५**

**बचत प्रकार**




वाचन चळवळ समाजामध्ये आर्थिक प्रबोधन करत असल्याने बॅक बचती विषयी समाजामध्ये जागृती होत गेली. पूर्वी कुटुंबाच्या गरजा भागू न शकणारा समाज आर्थिक उत्पादनात झालेल्या वाढीमुळे बँक बचत करू लागला बँक बचतीचे महत्त्व त्याला समजले. या पाठीमागे वाचन चळवळी असल्याचे २८.१८ टक्के वाचकांनी सांगितले आहे.

समाजामध्ये वाचन चळवळीच्या माध्यमातून बँक बचतीविषयी जागृती झाली परंतु ज्या समाजास बँक बचत करणे शक्य नाही किंवा ज्या ठिकाणी बँक सेवा उपलब्ध नाही अशा ठिकाणी बॅकेची जागा पतसंस्थेनी घेतली. पतसंस्थेच्या माध्यमातून कर्ज देणे किंवा ठेवी स्वीकारणे सारखी कामे होऊ लागली. या विषयी ही वाचन चळवळीच्या माध्यमातून जन जागृती झात्यामुळे समाजामध्ये अनेक पतसंस्था निर्माण झाल्या. या सर्व पतसंस्था आर्थिक उत्पादनात झालेल्या वाढीशिवाय निर्माण होणे शक्य नाही. त्यामुळे आर्थिक उत्पादन आर्थिक उत्पादनातील वाढ व पतसंस्थाची निर्मिती होण्यापाठीमागे वाचन चळवळ कार्यरत असल्याचे ४.५४ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

समाजामध्ये छोटे–छोटे गट स्थापन करून आर्थिक दृष्टया समाजास सक्षम बनवते. बचत गटाचे उद्‌दिष्टे आहे छोटे छोटे बचत गट समाजिक बदलामध्ये कशी भूमिका निभवू शकतात. त्या विषयी वाचन चळवळ नेहमी प्रबोधन करत आली आहे वाचन चळवळीच्या माध्यमातून यशस्वी बचत गटाची माहिती समाजापर्यंत वाचन चळवळ सहज पर्यंत पोहचवित आहे. बचत गट गाव पातळीपासून

शहरापर्यंत समाजामध्ये आर्थिक स्रोत उपलब्ध करण्याचे काम करत आहे. या बचत गटाविषयी असणारी सरकारची भूमिका आणि सरकारी योजना वाचन चळवळीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचत असल्याचे २५.०० टक्के वाचकांनी म्हटले आहे.

पोस्ट ऑफिस मार्फत बचत योजना राबवली जाते. याविषयीची माहिती वाचन चळवळीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचवीली जाते. पोस्ट ऑफिस मध्ये विविध बचत योजना राबवल्या जातात या सर्व योजना सामान्य जनतेस परवडणाऱ्या व सहज शक्य होणाऱ्या आहेत. बचत करण्या इतपत आर्थिक स्रोत समाजामध्ये वाचन चळवळीच्या माध्यमातून उपलब्ध होऊ लागला परिणामी पोस्ट ऑफिसच्या योजनामध्ये सर्वसामान्य जनता बचत करू लागल्याचे २०.२५ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

समाजामध्ये स्वत:विषयी आणि समाजाविषयी जाणीव आणि जबाबदारी निर्माण करण्याचे काम वाचन चळवळ करीत आली आहे. वाचन चळवळीमुळे आर्थिक उत्पादनात वाढ झाली असली तरी स्वत:चा विमा उतरविणे काळाची गरज आहे. त्याची जाणीव वाचन चळवळीने समाजातील सर्व घटकापर्यंत पोहचविली आहे. सुरवातीच्या काळात एल. आय. सी. सारखी दिसणाऱ्या विमा योजनेसोबत आज अनेक विमा योजना कार्यरत आहेत. या सर्व विमा योजनांची माहिती त्यातून मिळणारा परतावा त्याचे महत्त्व विषद करण्याचे काम वाचन चळवळ करत असल्याचे काम १७.२७ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

वाचनामुळे अनेक बचत योजनांची, विमा योजनांची माहिती समाजापर्यंत पोहचत आहे. या शिवाय व्यवहारामध्ये इतरही अनेक बचत योजना विमा योजना कार्यरत असल्याची माहिती वाचन चळवळ समाजास करून देते. समाजामध्ये कार्यरत असणारे पिग्मी, शिक्षण विषयक योजना, मुलींसाठींच्या विशेष योजना, जेष्ठ नागरिक, निराधार, योजना या सारख्या योजनांची माहिती वाचन चळवळीच्या माध्यमातून समाजास होत राहते. वाचन चळवळीच्या माध्यमातून या सर्व योजनांची माहिती झाल्याने समाजामध्ये इतर बचतीचे प्रमाण वाढले आहे असे ४.५४ टक्के वाचकांनी सांगितले आहे.

**तक्ता क्र. ६**

**४.५.६ सरकारी योजना**


| अ.क्र | सरकारी योजना | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रंथालय योजना | ३५ | १५.९० |
| २ | ग्राम स्वच्छता अभियान | ६८ | ३०.९० |
| ३ | अल्पभूधारक | २८ | १२.७२ |
| ४ | पिक विमा | २६ | ११.८१ |
| ५ | इंदिरा आवास योजना | २१ | ०९.५४ |
| ६ | राजीव गांधी योजना | १० | ०४.५५ |
| ७ | संजय गांधी निराधार | ३२ | १४.५४ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

समाजाच्या एकूण विकासासाठी शासकीय स्तरावर अनेक योजना राबविल्या जातात या सर्व योजनांची माहिती वाचन चळवळीच्या माध्यमातून समाजापर्यंत सहजपणे पोहचविली जाते. समाजामध्ये ज्ञानाची वृद्धी व्हावी, यासाठी गाव तिथे वाचनालय किंवा ग्रंथालय अशी सरकारी योजना राबवली गेली. आज ही गावोगावी ग्रंथालये दिसून येतात या ग्रंथालयामध्ये असणारे ग्रंथ आणि वर्तमानपत्रे समाजास माहिती देतात, ज्ञानी बनवतात त्यामुळे वाचन चळवळ या योजनांच्या मुळाशी कार्यरत असल्याचे १५.९० टक्के वाचकांनी सांगितले.

**आलेख क्र. ६**

**सरकारी योजना**




गावोगावी स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी ग्राम स्वच्छता अभियान गावागावात राबविले जाते या अभियाना विषयीची सर्व माहिती वर्तमानपत्रे, मासिकांमधून समाजापर्यंत पोहचविली जाते. आर्थिक उन्नती सोबतच स्वच्छतेचे प्रमाण वाढणे ही काळाची गरज असल्याचे वाचन चळवळ समाजास पटवून सांगते. आर्थिक स्तर उंचावला आणि स्वच्छतेकडे दुर्लक्ष केल्यास रोगराईचे प्रमाण वाढेल परिणामी दवाखान्याचा खर्च पुन्हा वाढेल. यासाठी ग्राम स्वच्छता अभियान सरकाने गावोगावी राबवून त्यास प्रोत्साहन देण्यासाठी पुरस्कारही जाहीर केले. या पुरस्कारांविषयी वाचन चळवळीने समाजामध्ये जागृती केली. परिणामी ग्राम स्वच्छता अभियान यशस्वी होण्यामध्ये वाचन चळवळीचा हात असल्याचे ३०.९० टक्के वाचकांनी सांगितले.

वाचन चळवळ समाजातील छोट्या घटकांसाठी असणाऱ्या योजनांची माहिती देखील समाजापर्यंत पोहचविते. समाजातील अल्पभूधारक, अल्प संख्याकांच्या आर्थिक विकासाठी असणाऱ्या विविध योजनांची माहिती त्या–त्या समाजापर्यंत माहिती पोहचविली जाते. त्यामुळे अल्पभूधारक किंवा अल्प संख्यांक समूहातील आर्थिक विकासामध्ये वाचन चळवळीचा वाटा असल्याचे १२.७२ टक्के वाचकांनी सांगितले.

वाचन चळवळ समाजातील सर्व घटकांच्या विकासासाठी कटिबद्ध आहे भारत हा कृषीप्रधान देश असल्याने शेतकऱ्यासाठी पिक विमा, किंवा बी–बियाणाच्या अनुदानाविषयी माहिती, वाचन

चळवळ शेतकऱ्यापर्यंत पोहचविते. या शिवाय शेतकऱ्यांना फवारणी साठी लागणारी साधने, बैलगाडी साठीचे अनुदान, पाणी पंपासाठी दिले जाणारे अनुदान, अन्य शेती औजारां विषयीची माहिती समाजापर्यंत वाचन चळवळ पोहोचवित असल्याची माहिती ११.८१ टक्के वाचकांनी सांगितले.

समाजातील दुर्बल घटकांसाठी शासकीय स्तरावरती इंदिरा आवास योजना राबवली जाते या योजनेची माहिती गाव पातळीवरती, तलाठी, ग्रामसेवक, किंवा सरपंच यांच्या माध्यमातून करून दिली जातेच परंतु या शिवाय वाचन चळवळी हे या योजन विषयीची माहिती समाजातील दुर्बल घटकास करून देते. ज्यामुळे समाजातील दुर्बल घटकातील लोक यासाठी या आवास योजनेत सहभागी होण्यासाठी आपले नाव नोंदवतात व या योजनांचा फायदा घेतात. ही योजना अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम वाचन चळवळ करत असल्याचे ९.५४ टक्के लोकांनी सांगितले.

समाजातील दुर्बल घटकांसाठी राजीव गांधी योजना सरकारी स्तरावरती राबवली जाते. समाजातील गरीब व गरजू लोकांसाठी वैद्यकीय सेवा सहज आणि मोफत उपलब्ध व्हावी यासाठी ही योजना राबवली जाते. समाजातील अनेक लोकांना वैद्यकीय खर्चाच्या अभावाने जीव गमवावा लागतो. या विषयीचे प्रबोधन वाचन चळवळ करत आली आहे. शहरातील किंवा ग्रामीण भागातील हॉस्पीटलमध्ये या योजनेचे स्वतंत्र माहिती दालन उपलब्ध आहे. या विषयीची सविस्तर माहिती वाचन चळवळीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचवली जात असल्याचे ४.५५ टक्के वाचकांनी सांगितले.

इंदिरा गांधी, राजीव गांधी आवास योजना प्रमाणेच सरकारी स्तरावरती संजय गांधी निराधार योजनाही राबवली जाते. संजय गांधी निराधार योजना अंतर्गत वयोवृद्ध, अपंग, आधारहीन, विधवा साठी आर्थिक मदत केली जाते. या याविषयीची माहिती सुद्धा वाचन चळवळीच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहचविली जाते. वाचन चळवळीमुळे या योजनांची माहिती ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचवली आहे. त्यामुळे संजय गांधी निराधार योजनेचा प्रचार प्रसार वाचनामुळे सर्व घटकांपर्यंत झाल्याचे १४.५४ टक्के वाचकांनी सांगितले.

सरकारी स्तरावरती वरील विश्लेषीत योजनांशिवाय अनेक छोट्या मोठ्या योजना सामाजिक विकासासाठी राबवल्या जातात. ज्या योजनांच्या माध्यमातून समाजातील गरजू लोकांना आर्थिक मदतीचा हात मिळत असल्याचे श्रेय वाचन चळवळीला दिल्यास चुकीचे ठरणार नाही.

**तक्ता क्र.७**


**४.५.७ कुटीर उद्योग**

| अ.क्र | कुटीर उद्योग | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गृह उद्योग | ७२ | ३२.७२ |
| २ | पशुपालन दुध | ३३ | १५.०० |
| ३ | कुक्कुटपालन | ३८ | १७.२७ |
| ४ | शेळी मेंढी पालन | २३ | १०.४५ |
| ५ | खाद्य व्यवसाय (हॉटेल) | ३६ | १६.३६ |
| ६ | फार्म हाऊस | ०६ | ०२.७२ |
| ७ | मंगल कार्यालय | १२ | ०५.४५ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

**आलेख क्र. ७**

**कुटीर उद्योग**



वाचन चळवळीमुळे वेगवेगळ्या पातळीवरती आर्थिक स्रोत उपलब्ध होण्याबरोबरच अनेक कुटीर उद्योगासंदर्भातील माहिती आणि ज्ञान समाजास उपलब्ध होत गेले आहे. या ज्ञानातून अनेक लोकांनी उत्पादनाचे साधन म्हणून गृह उद्योग चालू केले. घरातली घरात वेगवेगळ्या वस्तूंचे किंवा पदार्थाचे उत्पादन करून बाजार पेठेत विकल्याने वेगळा पैसा मिळू लागला. वेगवेगळे गृह उद्योग कसे करावे त्यासाठी लागणाऱ्या साहित्याची माहिती वाचन चळवळीच्या माध्यमातून लोकांना मिळत गेली. या माहितीच्या आधारे अनेक लोकांनी गृह उद्योग चालू केले आणि त्यातून आर्थिक स्रोत उपलब्ध झाल्याचे ३२.७२ वाचकांनी सांगितले.

वाचन चळवळीमुळे कुटीर उद्योगांना चालना मिळत गेली. वाचन चळवळीच्या माध्यमातून मिळालेल्या ज्ञान व माहितीच्या आधारे अनेकांनी पशु पालन किंवा दुग्ध व्यवसायाची माहिती करून घेतली त्यातून अनेकांना रोजगार उपलब्ध झाला. या उपलब्ध झालेल्या रोजगारामुळे परीवाराची आर्थिक परीस्थिती सुधारल्याचे १५.०० टक्के वाचकांनी सांगितले.

ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत आज कुक्कुट पालनाचा व्यवसाय जोरात चालू आहे. कुक्कुटपालन विषयीचे ज्ञान, करावा लागणारा रोगराईचा सामना, लसीकरण, खाद्य आणि बाजारपेठया सर्वांची माहिती वाचन चळवळीच्या माध्यमातून सहजपणे समाजापर्यंत पोहचते. या माहितीच्या आधारे कुक्कुट पालन व्यवसाय करणारांची संख्या वाढत गेली. परिणामी समाजाचा आर्थिक स्तर उंचावण्यास मदत झाल्याचे १७.२७ टक्के वाचकांनी सांगितले.

लहानसहान उद्योगांमध्ये शेळी मेंढीपालन व्यवसाय ही जोर धरू लागला आहे. बंदिस्त शेळी मेंढी पालन व्यवसायासंदर्भाची सविस्तर माहिती वाचन चळवळीच्या माध्यमातून समाजास मिळत राहते. या माहितीच्या आधारे अनेकांनी शेळी मेंढी पालन प्रशिक्षण घेऊन हा व्यवसाय सुरू केला या व्यवसायातून आर्थिक स्रोत उपलब्ध होऊ शकते याची जाणीव ही वाचन चळवळीने करून दिली. त्यामुळे शेळी मेंढी पालन व्यवसायाच्या वाढीस वाचन चळवळ जबाबदार असल्याचे १०.४५ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

आजकाल खाद्य व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढत चालला आहे. या खाद्य व्यवसायाविषयी वाचन चळवळ प्रबोधन करत आली आहे. खाद्य व्यवसायाच्या माध्यमातून मिळणारे आर्थिक उत्पादन

समाजाच्या आर्थिक सबलीकरणास पूरक आहे. खाद्य संदर्भातील माहिती, त्याचे प्रशिक्षण त्या विषयीचे ज्ञान वाचन चळवळीतून उपलब्ध होऊन खाद्य व्यवसाय वाढत गेल्याचे १६.३६ टक्के वाचकांनी सांगितले.

वाचन चळवळ नवनवीन बदल समाजापर्यंत पोहचवित असते. या नवनवीन बदलांद्वारे समाजाची जीवन शैली बदलत असल्याची माहिती वाचन चळवळ जनतेस करून देते. शहरीकरणास कंटाळून किंवा रोजच्या दिन क्रमातून मोकळीक म्हणून फार्म हाऊस वरती एक दोन दिवस घालवणारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. समाजातील हा कल वाचन चळवळीच्या माध्यमातून व्यावसायिकांना समजला आणि ज्यांनी शहरी करणा लगत फार्म हाऊस उभारले. दिवसभराची खाण्याफिरण्याची व्यवस्था करण्यामधून या व्यावसायिकांना आर्थिक उत्पादन मिळू लागते. या बदलाची माहिती वाचन चळवळीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचत असल्याचे २.७२ टक्के वाचकांनी सांगितले.

आजच्या आधुनिकीकरणामध्ये वेगवेगळ्या सभारंभाकरीता मंडप उभारण्यापेक्षा मंगल कार्यालयाचा व्यवसाय जोर धरू लागला आहे. शहरीकरणामध्ये मंडपासाठी लागणारी जागा आणि त्यासाठीची उपलब्ध साधने कमी पडू लागली आहेत. त्यामुळे लोकांनी मंगल कार्यालयाचा पर्याय निवडला आहे. मंगल कार्यालय आज काळाची गरज आणि व्यवसाय ही बनला आहे. या व्यसायातून मोठ्या प्रमाणात पैसा उपलब्ध होऊ लागल्याने अनेक लोक या व्यवसायाकडे ओढताना दिसत आहेत. या सर्व व्यवसायांमध्ये अनेक कामगारांना कामही उपलब्ध होत असल्याने या विषयीची माहिती आणि ज्ञान वाचन चळवळ समाजापर्यंत पोहचवत असल्याचे ५.४५ टक्के वाचकांनी सांगितले.

**तक्ता क्र. ८**

**४.५.८ कृषीउद्योग**

| अ.क्र | कृषीउद्योग | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | भाजी पाला | ३८ | १७.२७ |
| २ | अन्न धान्यात वाढ | ६९ | ३१.३६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | आधुनिक शेती ठिबक सिंचन | २० | ०९.०९ |
| ४ | पिक लागवडीत बदल | ७२ | ३२.७२ |
| ५ | हवामान परीक्षण | १२ | ०५.४५ |
| ६ | माती परीक्षण | ०९ | ०४.०९ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

वाचन चळवळीमुळे कृषी उद्योगास ही मोठी चालना मिळालेली आहे. वाचन चळवळीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना माहिती मिळाली की भाजीपाला व्यवसाय आजची गरज आहे. भाजीपाला व्यवसाया मध्ये तीन महिन्याला नवीन भाजीचे उत्पादन घेतले जाऊ शकते. त्यासाठी लागणारे आवश्यक खत पुरवठा त्यासाठीची फवारणी आदिचे ज्ञान वाचन चळवळीच्या माध्यमातून शेतकऱ्यांला मिळू लागल्याने कमी दिवसात, कमी जागेत जास्तीत जास्त भाजी पाल्याचे उत्पादन घेतले जाऊ शकते याची जाणीव वाचन चळवळीमुळे झाल्याचे १७.२७ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

वाचन चळवळ सर्व प्रकारच्या ज्ञानाचा पूरवठा केंद्र आहे. या चळवळीच्या माध्यमातून शेती व्यवसायाचे स्वरूपच बदलले आहे. विविध बि बियाणांचा वापर करून जास्तीत जास्त उत्पादन काढण्याची कला वाचन चळवळीमुळे शेतकऱ्यांना अवगत झाली आहे. वेळोवेळीची फवारणी किंवा खत पुरवठा केला गेल्याने हेक्टरी उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली परिणामी आर्थिक उत्पादनातही वाढझाल्याचे ३१.३६ टक्के वाचकांनी सांगितले.

वाचन चळवळ आधुनिक ज्ञानाचा पुरवठा शेतकऱ्यांपर्यंत करत आली आहे. आजकाल शेतकरी माहितीच्या आधारे नवनवीन प्रयोग करून जास्तीत जास्त उत्पादन मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. आजकाल माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून शेती केली जाऊ लागल्याने उत्पादनात वाढ तर झालीच आहे शिवाय ठिबक सिंचना सारखे प्रयोग करून कमी पाण्यावरती जास्तीत जास्त उत्पादन काढण्याची कला शेतकऱ्याने वाचन चळवळीच्या माध्यमातून अवगत केल्याचे ९.९ टक्के वाचकांनी सांगितले.

शेती व्यवसायास पूरक असे वातावरण निर्माण करण्याचे श्रेय वाचन चळवळीस आहे. वाचन चळवळीच्या माध्यमातून शेतकरी पीक लागवडीत बदल करू लागला. कोणत्या मोसमात कोणते पीक

घ्यावे, त्यासाठीच्या कोणत्या जातीची लागवड करावी, या विषयीचे ज्ञान वाचन चळवळीच्या माध्यमातून मिळू लागल्याने पारंपरिक शेती आणि पीक लागवडीत बदल झाल्याचे ३२.७२ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

शेती व्यवसाय करत असताना मोसमाची माहिती असणे गरजेचे आहे. कोणत्या हवामानात कोणते पीक घेतले जाऊ शकते या विषयीची माहिती वाचन चळवळीतून शेती व्यवसाय करणाऱ्यांना मिळू लागली आहे. दमट हवामानात कोणती पिके घ्यावी, आद्र हवामानात कुठल्या पिकाची लागवड करावी अशा प्रकारचे ज्ञान शेतकऱ्यांना वाचन चळवळीच्या माध्यमातून मिळू लागली हवामान अंदाजही मोलाचे असल्याचे ५.४५ टक्के वाचकांनी सांगितले.

वाचन चळवळ शेती विषयीचे सुक्ष्म ज्ञान शेती व्यवसायिकास उपलब्ध करून देते. आजकाल ज्ञान आणि माहितीचा स्रोत उपलब्ध झाल्याने माती परीक्षणासारखा उपाय समोर आला आहे. मातीचे परीक्षण करून किंवा त्याचा फेत ओळखून त्यामध्ये कोणत्या पिकाची लागवड करावी त्या विषयाचे ज्ञान वेळोवळी वाचन चळवळ करून देत असल्याने उत्पादनात वाढ झाल्याचे ४.९ टक्के वाचकांचे म्हणणे आहे.

**तक्ता क्र. ९**

**४.५.९ आर्थिक उत्पादनाची साधने**

| **अ.क्र** | **उत्पन्नाचे स्रोत** | **वाचकांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | शेती | ८५ | ३८.६३ |
| २ | नोकरी | ४७ | २१.३६ |
| ३ | व्यवसाय | ५६ | २५.४५ |
| ४ | पर्यटन | १९ | ०८.६३ |
| ५ | अन्य | १३ | ०५.९० |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

वाचन चळवळीमुळे आर्थिक उत्पादनाची साधने विकसित होण्यास मदत झाली. सोबतच आर्थिक उत्पादनाच्या आधुनिक साधनांचा लोकांमध्ये प्रचार आणि प्रसार झाला. त्यामुळे शेतीमध्ये उत्पन्न वाढले. अल्पभुधारक शेतकरी असला तरी वाचन चळवळीमुळे त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांची आपले उत्पादन वाढवले. लागवड, कापणी, मळणी व मशागतीसाठी लागणारी नवनवीनसाधने उपलब्ध झाली त्या विषयीचे ज्ञान वाचन चळवळीच्या माध्यमातून सर्व घटकापर्यंत पोहचले. शेती विषयक ज्ञानामध्ये भर टाकण्याचे काम वाचन चळवळीने मोठ्या प्रमाणात केले आहे. शेती विषयक साधनांचे प्रदर्शन भरवून जास्तीत जास्त लोकांपर्यंतची माहिती सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहचवली. आजकाल ठिकठिकाणी कृषी प्रदर्शने भरवली जातात. त्या माध्यमातून नवनवीन कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम झाल्याचे ३८.६३ टक्के वाचकांचे म्हणणे आहे.

वाचन चळवळीमुळे नवनवीन रोजगाराच्या संधी तरूणांना उपलब्ध झाल्या आहेत. आधुनिक काळातील नवीन बदल आणि जागतिकीकरणामुळे वेगवेगळ्या कंपन्या वेगवेगळी उत्पादने घेऊन समाजासमोर येत आहेत. त्या कंपन्यांना प्रशिक्षित व अप्रशिक्षित कामगारांची गरज भासू लागली. त्या वेगवेगळ्या कंपन्यांच्या माध्यमातून नोकऱ्यांच्या संधी मिळत गेल्याने समाजातील आर्थिक उत्पन्न वाढल्याचे दिसून येते. या नवनवीन नोकऱ्यांची माहिती व ज्ञान तरूणांपर्यंत पोहाजाऊण्याचे काम वाचन चळवळीने केले असल्याचे २१.३६ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

वाचन चळवळीमुळे ज्ञान आणि माहितीचा प्रचार–प्रसार मोठ्या प्रमाणात होत गेला. या ज्ञान आणि माहितीच्या आधारे अनेकांनी नवनवीन व्यवसाय सुरू केले. या नवनवीन व्यवसायाच्या माध्यमातून आर्थिक उत्पादनात वाढ झाली. एवढेच नव्हे तर व्यवसायासोबतच मजूरांनाही रोजगार उपलब्ध झाल्याने समाजातील एकूण उत्पादक वाढत गेले. वाचन चळवळीच्या माध्यमातून कोणत्या भागात कोणता व्यवसाय केला जाऊ शकतो. व्यवसायासाठी आवश्यक असणारे सविस्तर ज्ञान वाचन चळवळ व्यावसायिकांना करून देऊ लागल्याने वेगवेगळ्या व्यवसायाच्या माध्यमातून आर्थिक उत्पादनाचे स्रोत निर्माण झाल्याचे २५.४५ टक्के वाचकांनी सांगितले आहे.

वाचन चळवळीमुळे पर्यटन व्यवसायास पूरक वातावरण मिळाले आहे. पर्यटनविषयाची माहिती वाचकांपर्यंत वाचन चळवळ पोहचवत आली आहे. पर्यटन व्यसायापासून आर्थिक उत्पादन ही मोठ्या प्रमाणात होऊ शकते. देश–विदेशातील पर्यटकांना आपल्याकडे आकर्षित केले जाऊ

शकते. त्यातून परकीय चलन प्राप्त होऊन अर्थव्यवस्था अधिक मजबूत होऊ शकते. या विषयीचे ज्ञान व माहिती वाचन चळवळीच्या माध्यमातून उपलब्ध होत गेल्याने पर्यटन व्यवसाय अधिक विकसित होत गेल्याचे ८.६३ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

वाचन चळवळीमुळे वरील विश्लेषित आर्थिक उत्पादनांच्या साधना व्यतिरीक्त अनेक छोटी–छोटी आर्थिक उत्पादनाची साधने जनतेस उपलब्ध झाली आहेत. पूर्वी या साधनांकडे फक्त उपजिविकेचे साधन म्हणून पाहिले जायचे परंतु वाचन चळवळीमुळे हा दृष्टीकोन बदलला आणि त्यास व्यावसायिकेचे रूप देऊन आर्थिक उत्पन्नाचे साधन बनविल्याने अधिक नफा झाला आहे. किरकोळ व्यापार, आर्थिक नफा देणारी खरेदी विक्री, स्वत:च्या मालाची जाहिरात करणे, आधुनिक तंत्रज्ञानातून होणारा नफा हे सर्व वाचन चळवळीतून शक्य झाल्याचे ५.९० टक्के वाचकांनी सांगितले आहे.

### ४.६ राजकीय बदल (क्षेत्रीय पाहणी)

**तक्ता क्र. १**


**४.६.१ राजकीय नेतृत्व**

| अ.क्र | राजकीय नेतृत्व | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | राजकीय जाणीव | ७१ | ३२.२७ |
| २ | राजकीय अस्मिता | ३४ | १५.४५ |
| ३ | शिक्षित नेतृत्व | ३२ | १४.५४ |
| ४ | युवा नेतृत्व | ३६ | १६.३६ |
| ५ | विभागीय नेतृत्व | ४७ | २१.३६ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

**आलेख क्र. १**

**राजकीय नेतृत्व**




वाचन चळवळीमुळे लोकांमध्ये राजकीय जाणीव निर्माण झाली. राजकारणाविषयी पूर्वी लोकांचे समज–गैरसमज होते. परंतु वाचन चळवळीमुळे राजकीय जाणीवांचा स्तर उंचावला. वाचनाने लोकांचा राजकीय अभ्यास वाढला त्यातूनच राजकीय जाणीव निर्माण झाली. त्या जाणीवेतूनच राजकीय सुधारणा मोठ्या प्रमाणात वाढली. समाजकारणातून राजकारणाकडे लोकांचा कल वाढला. त्याला कारणीभूत वाचन चळवळ ठरली  आहे. वाचन चळवळीच्या माध्यमातून राजकीय अभिलाषा मोठ्या प्रमाणांवर वाढून राजकीय जाणीव निर्माण झाल्याचे ३२.२७ टक्के लोकांचे मत आहे.

वाचन चळवळीमुळे राजकीय अस्मिता निर्माण होण्यास मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. राजकारणाचा इतिहास पूर्वकाळ व आधुनिक राजकारण याची माहिती सर्वसामान्य मतदारांना केवळ वाचन चळवळीमुळे प्राप्त झाली. त्या माहितीच्या आधारे लोकांमध्ये राजकीय अस्मिता निर्माण झाली. आधुनिक काळामध्ये राजकारणातील अस्मिता मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. अस्मिते पोटी आजच्या राजकारणाचा प्रचार व जाहिरात वाढली आहे. त्यामुळेराजकीय अस्मिता वाढल्याचे १५.४५ टक्के लोकांचे मत आहे.

वाचन चळवळीमुळे राजकीय शिक्षित नेतृत्व उदयास आले. पूर्वीच्या काळी फक्त विश्वासावर गावातल्या थोरा मोठ्यांना नेतृत्व करण्यास संधी दिली जात होती परंतु बदलत्या आधुनिक काळामध्ये शिक्षित नेतृत्व विकासासाठी साहाय्य व पूरक ठरले अशी भावना जनमानसात निर्माण झाली.

त्यामुळेइतर क्षेत्रांप्रमाणे राजकीय क्षेत्रात शिक्षित नेतृत्वाची गरज वाढू लागली. शिक्षित नेतृत्व समाजाचा सर्वांगीण विकास करू शकते असे मत तयार झाले त्यामुळे वाचन चळवळीने शिक्षित नेतृत्व विकसित केल्याचे १४.५४ टक्के लोकांचे मत आहे.

वाचन चळवळीने युवा नेतृत्वाला सुद्धा प्रोत्साहन मिळाले आहे पूर्वीच्या काळी विशिष्ट वयातली व विशिष्ट वर्गातील लोक समाजाचे राजकीय नेतृत्व करीत होती परंतु वाचन चळवळीने तरूणांच्या मनामध्ये राजकीय अभिलाषा निर्माण करून युवा नेतृत्वाचा उदय झाला. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून युवक आपले काम, आपले शिक्षण, हेतू आणि उद्देश जनमानसांपर्यंत पोहचवू लागले आणि राजकीय नेतृत्वात आपला राजकीय ठसा उमटवू लागले. वाचन चळवळीच्या या युवक नेतृत्वामुळे अनेक युवक लोक प्रतिनिधी म्हणून काम पाहू लागले आहेत. वाचन चळवळीमुळे युवा नेतृत्व मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे १६.३६ टक्के वाचकांचे मत आहे.

वाचन चळवळीमुळे विभागीय नेतृत्वसुद्धा वाढीस लागल्याचे दिसून येते. वाचन चळवळीमुळे संबंधित विभागातल्या समस्या, शिक्षण, रस्ते, आरोग्य व रोजगाराचे प्रश्न नेतृत्वाला समजू लागले या प्रश्नांचा व समस्येचा विचार करून ते सोडवण्यासाठी जो पुढाकार होऊ लागला. तोच व्यक्ती विभागीय नेतृत्व करणारा व्यक्ती म्हणून उदयास येऊ लागला. आपल्या विभागाचे प्रश्न सोडवून विकास करू लागला. वाचन चळवळीमुळे विभागीय नेतृत्वाला चालना मिळाली असे मत २१.३६ टक्के लोकांनी सांगितले.

**तक्ता क्र. २**

**४.६.२ सामाजिक नेतृत्व**


| अ.क्र | सामाजिक नेतृत्व | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सामाजिक नेतृत्व | ८९ | ४०.४५ |
| २ | सांस्कृतिक नेतृत्व | ५६ | २५.४५ |
| ३ | धार्मिक नेतृत्व | १८ | ०८.१८ |
| ४ | शेतकऱ्यांचे नेतृत्व | ३६ | १६.३६ |
| ५ | पर्यावरणीय नेतृत्व | ०९ | ०४.०९ |
| ६ | साहित्यिक नेतृत्व | १२ | ०५.४५ |

| एकूण | २२० | १००% |
|---|---|---|

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

**आलेख क्र. २**

**४.६.२ सामाजिक नेतृत्व**




वाचन चळवळीमुळे सामाजिक नेतृत्व वाढीस लागले. वाचनाच्या माध्यमातून समाजातील गंभीर प्रश्न, समस्या व समाजाची अवस्था लोकांना माहिती होऊ लागली. सोबतच ते प्रश्न किंवा समस्या सोडविण्याची भावना सुद्धा वाचन चळवळीमुळेच निर्माण झाली. समाजातील प्रश्न नष्ट करून सामाजिक समानता निर्माण करण्याची इच्छा लोकांमध्ये निर्माण झाली. त्यातूनच सामाजिक नेतृत्व वाढले. सामाजिक नेतृत्वामध्ये जातिनिहाय पक्ष व नेतृत्व करणारी फळी वाढली. राजकीय नेतृत्व वगळता सेवाभावी वृत्तीने काम करणारी एक पिढीही वाचनामुळे समृद्ध झाली. त्यामुळे एकूणच सामाजिक नेतृत्व उदयास आल्याचे ४०.४५ टक्के लोकांचे मत आहे.

वाचन चळवळीमुळे सांस्कृतिक नेतृत्व संकल्पना पुढे आली. कला, साहित्य व इतर प्रकारांमध्ये नेतृत्व करणाऱ्या व्यक्ति व संघटना तसेच संस्थाचा उदय झाला. सांस्कृतिक क्षेत्राचे प्रश्न व समस्या वाचन चळवळीमुळे माहित झाल्याने त्या सोडविणे आवश्यक असल्याचे मत एका वर्गाचे झाले तो वर्ग नेतृत्वात स्थिरावू लागला. नेतृत्व करून लागला.सांस्कृतिक क्षेत्रातील लोकांना संघटित करू लागला. त्यातूनच सांस्कृतिक नेतृत्वाची मुहूर्तमेढ रोवली गेली. वाचन चळवळीतून सांस्कृतिक नेतृत्व पुढे आल्याचे २५.४५ टक्के लोकांचे मत आहे.

वाचन चळवळीमुळे धार्मिक प्रश्नांची व अस्मितेची जाणीव वाढीस लागली. व्यक्तिच्या धार्मिक संकल्पना वाढू लागल्या. धार्मिक अस्मितेपोटी लोक धर्माचा विचार करू लागले. सोबतच धार्मिक विचारधारा ही वाढली. धार्मिक अस्तित्वाची लढाई लढण्याची गरज आहे असे वाटणारी पिढी या संकल्पनेने मांडली. त्यामुळे वाचन चळवळीतून धार्मिक नेतृत्व पुढे आले. हे धार्मिक नेतृत्व धर्माच्या आधारे संघटन करू लागले. मोर्चा काढू लागले. आंदोलन करू लागले एकूणच काय तर वाचन चळवळीमुळे धार्मिक नेतृत्व पुढे आल्याचे ८.१८ टक्के लोकांचे मत आहे.

वाचन चळवळीमुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील शेतीचे प्रश्न, समस्या, व उपाययोजना याची माहिती लोकांना होऊ लागली. त्यातच नवनवीन तंत्रज्ञानाच्या आधारे आधुनिक शेती केली तर काय होईल? याचीही माहिती होऊ लागली. वाचन चळवळीने दिलेल्या या माहितीतून शेतकऱ्यांचे 'कैवारी' पुढे आले तेच लोक आयोगावर काम करू लागले. त्यामुळे वाचन चळवळीतून शेतकऱ्यांचे नेतृत्व घडल्याचे १६.३६ टक्के लोकांनी सांगितले आहे.

वाचन चळवळीमुळे पर्यावरण विषयक माहिती मोठ्या प्रमाणावर मिळू लागली. पर्यावरणातील विघातक गोष्टींचा अभ्यास होऊ लागला. पर्यावरणाला हानीकारक असणारे घटक कोणते? यावर उपाय योजना काय? याचा शास्त्रीयदृष्टया अभ्यास होऊ लागला. त्यामुळे पर्यावरणाविषयक जनजागृती मोठ्या प्रमाणावर वाढली हे प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी पुढे आलेल्या व्यक्ती पर्यावरण विषयक नेतृत्व करीत असल्याचे ४.९ टक्के लोकांनी सांगितले आहे.

वाचन चळवळीमुळे साहित्यिक क्षेत्रातही नवनवीन बदल झाले. साहित्य वाचणारा वर्ग सामाजिक प्रश्नांकडे संवेदनशीलपणे बघू लागला. वाचक वर्गचं चांगल्या लोकांना पुढे करू लागला. त्यांना मान–सन्मान देऊ लागला.माहिती क्षेत्रातील गट, प्रश्न व समस्यांची जाणीव सर्व समस्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम वाचन चळवळ करू लागली. त्यातून साहित्यिक नेतृत्व पुढे आले. साहित्यिकांचे संघटन करुन काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या वाढली. वाचन चळवळीतून साहित्यिक नेतृत्व पुढे आल्याचे ५.४५ टक्के लोकांचे मत आहे.

**तक्ता क्र. ३**


**४.६.३ महिलांचा राजकारणातील सहभाग**

| अ.क्र | महिलांचा राजकारणातील सहभाग | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अस्मिता जागृती | ६२ | २८.१८ |
| २ | राजकीय जाणीव | ४२ | १९.०९ |
| ३ | राजकीय आरक्षण | ३४ | १५.४५ |
| ४ | ग्रामीण राजकारणातील सहभाग | २२ | १०.०० |
| ५ | शहरी राजकारणातील सहभाग | ३२ | १४.५४ |
| ६ | राजकीय विकास | २८ | १२.७२ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

**आलेख क्र. ३**

**महिलांचा राजकारणातील सहभाग**




दिवसेंदिवस महिलांचा वाढणारा राजकारणातील सहभाग उल्लेखनीय आहे. पूर्वी स्त्रिया राजकारणांपासून आंतर ठेवून राहत असत परंतु वाचन चळवळीने समाजामध्ये घडवून आणलेल्या प्रबोधनामुळे महिलाही राजकारणाकडे आकर्षित होत गेल्या. सभा आणि अधिकार या गोष्टी त्यांना आकर्षित करू लागल्या माझा राजकारणातील सहभाग मला ओळख निर्माण करून देऊ शकतो. मी उत्तम प्रकारे राजकारण करू शकते हा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये निर्माण झाला. वाचन

चळवळीमुळे महिलांमध्ये स्वत:ची जाणीव निर्माण झाली आणि आपल्या अस्मितेपोटी महिला राजकारणामध्ये सहभागी होऊ लागल्या ही अस्मिता जागृक करण्याचे काम वाचन चळवळीने केले असल्याचे २८.१८ टक्के वाचकांनी सांगितले.

वाचन चळवळीने राजकीय आराखडाच समाजासमोर मांडला जोपर्यंत आपण राजकारणात जात नाही किंवा राजकारण करत नाही तोपर्यंत महिलांचे प्रश्न आपण सोडवू शकत नाही अशा प्रकारची राजकीय जाणीव महिलांमध्ये वाचन चळवळीमुळे झाली. मी ही पुरुषांच्या बरोबरीने राजकारणामध्ये यशस्वी होऊ शकते. राजकारण माझ्या आणि महिला वर्गाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे आपण जोपर्यंत निर्णय प्रक्रियेमध्ये जात नाही तोपर्यंत महिलांची परिस्थिती बदलणे शक्य नाही अशा प्रकारची राजकीय जाणीव वाचन चळवळीच्या माध्यमातून महिलांना झाल्याचे १९.९ टक्के वाचकांनी सांगितले.

महिलांचा राजकारणातील सहभाग वाढवण्यासाठी राज्य घटनेमध्येच महिलांसाठीचे राजकीय आरक्षण देण्यात आले आहे. परंतु सामाजिक आणि राजकीय प्रबोधनाअभावी या विषयी आवाज उठवला गेला नाही किंवा राजकीय हक्क अधिकार महिलांना दिले गेले नाहीत. राजकीय आरक्षणामुळे ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, पंचायत समिती सदस्य, सभापती पासून आमदार खासदारापर्यंत आरक्षण जाहीर करण्यात आले याचा फायदा घेण्यासंबंधीचे प्रबोधन वाचन चळवळीने महिलांमध्ये केल्याने महिलांचा राजकीय सहभाग वाढल्याचे १५.४५ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

वाचन चळवळ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचून प्रबोधन करण्याचे काम करत आहे. वाचन चळवळीमुळेच ग्रामीण राजकारणामध्ये महिलांचा सहभाग वाढला. महिला स्वत:हून ग्रामीण भागामध्ये सुद्धा पुढे येवून बोलू लागल्या आहेत. सामाजिक किंवा राजकीय बदल घडवण्याची त्यांची इच्छाशक्ती वाढत चालली आहे. वाचन चळवळ समाजामध्ये राजकारणाविषयी प्रचार आणि प्रसार करत असल्याने ग्रामीण भागामध्येही महिलांचा राजकीय सहभाग वाढला असल्याचे १०.०० टक्के वाचकांनी सांगितले आहे.

शहरी भागामध्ये वाचन चळवळ अधिक प्रभावीपणे राजकीय प्रबोधनाचे काम करत आहे. राजकारणातील वाढता महिलांचा प्रभाव वाचन चळवळीमुळे वाढला असल्याचे दिसते. शहरी

भागामध्ये महिला राजकारणाविषयी जागृत होत आहेत अनेक पक्षीय पदे आणि नगरपालिका, महापालिका, जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून समर्थपणे काम पाहत आहेत. हे धाडस महिलांमध्ये येण्यामागे वाचन चळवळीचा मोठा हात आहे. वाचन चळवळीमुळे महिलांचा शहरी राजकारणामध्ये सहभाग वाढल्याचे मत १४.५४ टक्के वाचकांनी नोंदवले आहे.

महिला आपले अधिकारांचा वापर प्रामाणिकपणे करत असल्याने राजकारणातील त्यांचा सहभाग विकासास पूरक सिद्ध झाला आहे. राजकारणामध्ये महिलांचा सहभाग वाढल्याने राजकीय किंवा आर्थिक भ्रष्टाचार कमी झाल्याचे दिसून येते. राजकीय पक्षांमध्ये महिलांचा सहभाग वाढल्याने राजकीय पक्षांचा विकास सहजपणे होऊ लागला आहे. परिणामी राजकीय विकासामध्ये महिलांचा सहभाग महत्त्वपूर्ण असल्याचे व हा सहभाग वाढण्यामध्ये वाचन चळवळीचा मोलाचा वाटा असल्याचे १२.७२ टक्के वाचकांनी सांगितले.

**तक्ता क्र. ४**

**४.६.४ समूह राजकीय नेतृत्व**

| अ.क्र | समूह राजकीय नेतृत्व | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | समूह राजकीय अस्मिता | ६३ | २८.६३ |
| २ | जातीय समूह | ७१ | ३२.२७ |
| ३ | अल्पसंख्याक समूह | २० | ०९.०९ |
| ४ | वर्गीय समूह | ३३ | १५.०० |
| ५ | प्रादेशिक समूह | २२ | १०.०० |
| ६ | व्यावसायिक समूह | ११ | ०५.०० |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

वाचन चळवळीच्या माध्यमातून राजकीय पातळीवरती नवनवीन बदल होत राहतात. वाचन चळवळीमुळे समाजामध्ये समूह राजकीय अस्मिता निर्माण होण्यास मदत झाली समाजातील प्रत्येक समूहास आपले राजकीय अस्तित्व असावे असे वाटू लागले. ही वाटण्याची भावनाच वाचन चळवळीमुळे समाजात निर्माण झाली आहे. प्रत्येक समूहास आम्हास राजकीय वाटा असावा असे

वाटू लागले आहे. अलीकडच्या काळात सामूहिक प्रबोधन करून राजकारणामध्ये यशस्वी वाटचाल करणाऱ्या समूहांचे उदाहरणे इतर समूहांसमोर वाचन चळवळीच्या माध्यमातून मांडली जातात. त्यामुळेसमाजामध्ये सामूहिक राजकीय अस्मिता निर्माण झाल्याचे २८.६३ टक्के वाचकांनी सांगितले.

समूह राजकीय अस्मिता प्रमाणेच जातीय राजकारण ही समाजामध्ये जोर धरू लागले आहेत. त्यामुळेसमूह नेत्याकडे पाहून जातीय नेते निर्माण होऊ लागल्याचे अनेक उदा. आज राजकारणात आपणास दिसून येतात. या समूह नेत्यांविषयी किंवा जातीय नेत्या विषयी होणारी चर्चा वाचन चळवळीच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहचू लागली आहे. परिणामी राजकारणातील सत्तेचा वाटा जातीय समूहांना मिळाला पाहिजे अशी भावना प्रत्येक जात समूहामध्ये निर्माण होऊन दिवसेदिवस जातीय नेतृत्व वाढत असल्याचे आपणास दिसते हे जातीय नेतृत्व निर्माण होण्यामागे ही वाचन चळवळ असल्याचे मत ३२.२७ टक्के वाचकांनी नोंदवले आहे.

समाजामध्ये बहुसंख्य आणि अल्पसंख्य जातीय किंवा धार्मिक समूह अस्तित्वात आहेत. बहुसंख्य समूहाप्रमाणेच अल्पसंख्याक समूहांना देखील राजकारणातील आपला वाटा आपल्याला मिळावा ही भावना निर्माण झाली आहे.अल्पसंख्याक समूहामध्ये राजकीय अस्मिता निर्माण होण्यापाठीमागे देखील वाचन चळवळ कार्यरत असल्याचे ९.९ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

जातीय समूह किंवा इतर समूहांप्रमाणे वर्गीय समूह राजकारणात सहभागी होऊ लागले आहेत. सधन वर्ग प्रत्यक्ष अप्रत्यक्ष राजकारणातील सर्व फायदे मिळवण्यासाठी वर्गीय नेतृत्वास पुढे करत आहे. वर्गीय जाणीव निर्माण करून त्यावरती राजकीय हित साधण्याचा प्रयत्न वर्गीय समूह करू लागला आहे. वर्गीय समूहाच्या भावभावना, इच्छा अपेक्षांची चर्चा वेळोवेळी वाचन चळवळीच्या माध्यमातून होत असल्याने वर्गीय समूह नेतृत्व निर्माण होत असल्याचे १५.०० टक्के वाचकांनी सांगितले आहे.

वाचन चळवळीच्या माध्यमातून वेगवेगळे प्रादेशिक समूह एकत्र येवून आपले राजकीय अस्तित्व निर्माण करण्याचे प्रयत्न करू लागले आहेत. वेगवगळया राज्यातून आलेले लोक वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या निमित्ताने एकत्र येवून आपले संघटन निर्माण करू लागले आहेत या संघटना विषयी वेळोवेळी वाचन चळवळीच्या माध्यमातून केली जाणारी चर्चा, त्यांना दिले जाणारे महत्त्व त्यांच्या राजकीय अस्तित्वाचा मांडलेला प्रश्न प्रादेशिक समूहास किंवा प्रादेशिक समूह नेतृत्वास प्रोत्साहन

देऊ लागला आहे. या सर्व प्रादेशिक समूह नेतृत्वामागे वाचन चळवळीचा वाटा असल्याचे १०.०० टक्के वाचकांनी सांगितले आहे.

राजकीय सत्तेमध्ये आपलाही वाटा असावा असे व्यवसायिक समूहांना देखील आजकाल वाटू लागले आहे. व्यावसायिक समूहांनी आपले संघटन निर्माण करून राजकीय फायदे घेण्यास सुरवात केली आहे. यातूनच व्यवसायिक समूह नेतृत्व समोर येत गेले आहे. वाचन चळवळीने व्यवसायिक समूहाचेही प्रबोधन केल्याने त्यांच्यामध्ये एक राजकीय अभिलाषा निर्माण झाली आहे. व्यवसायिक समूह मिळून राजकीय सत्तेमध्ये वाटा मिळवू शकतो, अशा प्रकारची भावना वाचन चळवळीच्या माध्यमातून व्यवसायिक नेतृत्वामध्ये निर्माण झाली असल्याचे ०५.०० टक्के वाचकांनी सांगितले आहे.

**तक्ता क्र. ५**

**४.६.५ मतदार जागृती**

| **अ.क्र** | **मतदार जागृती** | **वाचकांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | मतदान नोंदणी | ८९ | ४०.४५ |
| २ | मतदान हक्क/ महत्त्व | ६२ | २८.१८ |
| ३ | राजकीय सहभाग | ४८ | २१.८१ |
| ४ | लोकशाहीची जाणीव | २१ | ०९.५४ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

वर्तमानपत्रे लोकशाहीचा आधार स्तंभ आहे. लोकशाही विषयीचे प्रबोधन वर्तमानपत्रे किंवा वाचन चळवळ नेहमी करत आली आहे. वाचन चळवळीच्या माध्यमातून मतदान नोंदणी विषयी प्रचार आणि प्रसार केला जातो. १८ वर्ष वयोगटातील सर्व तरूण तरूणींनी मतदान नोंदणी करावी आशा आशयाचे प्रबोधन वाचन चळवळ वर्षानुवर्षे करत आली आहे. वाचन चळवळीमुळे मतदान नोंदणीच्या तारखा त्यांची स्थळे जनतेपर्यंत सहज पोहचविली जातात मतदान नोदणी किती महत्त्वाची आहे या विषयीही प्रबोधन केत्यामुळे मतदान नोंदणी मोठ्या प्रमाणात होत असल्याचे ४०.४५ टक्के वाचकांनी सांगितले आहे.

भारतीय राज्यघटनेने सर्वांना समान मतदानाचा हक्क दिला आहे. एक व्यक्ती एक मतदान असल्याचे गरीब श्रीमंत एकाच स्तरावरती उभे आहेत. त्या दृष्टीने मतदानाचा हक्क प्रत्येकाने बजाऊणे किती मोलाचे आहे हे वाचन चळवळ सांगत आली आहे. गरीबातील गरीब व्यक्तीला एका मतदानाचा आणि श्रीमंतातील श्रीमंत व्यक्ती एकच मतदान देण्याचा हक्क असल्याने ही राजकीय समता मोलाची असल्याने वाचन चळवळ सांगत आली आहे. या चळवळीच्या माध्यमातून मतदानाचा हक्क व महत्त्व या विषयी सतत प्रबोधन केले जात असल्याचे २८.१८ टक्के वाचकांनी सांगितले.

वाचन चळवळीमुळे मतदान नोंदणी, मतदान हक्क व अधिकार या विषयी सतत प्रबोधन केले जात असल्याने मतदारांचा राजकीय सहभाग वाढत चालला आहे. वाचन चळवळीमुळे गरीबातील गरीबाला आणि दुर्गम भागातील व्यक्तीला ही मतदानाचे महत्त्व समजू लागले आहे. माझ्या मतामुळे माझ्या विचाराचे सरकार सत्तेवर येवू शकते. समाजाचा आणि देशाचा विकास यातून हजाऊ शकतो ही भावना वाचन चळवळीमुळे प्रत्येक मतदारामध्ये निर्माण होऊन त्यांचा राजकीय सहभाग वाढल्याचे २१.८१ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

भारतीय लोकशाही प्रत्यक्षात कार्यरत असली तरी लोकशाहीची जाणीव सर्व जनतेस होणे गरजेचे आहे ही गोष्ट लक्षात घेऊन वाचन चळवळ समाजात लोकशाही मूल्ये रूजवण्याचा प्रयत्न करत आहे. भारतीय लोकशाहीचा आधार म्हणजे संविधान असल्याचे वाचन चळवळ जनतेस सांगत आहे. त्यामुळे संविधान दिन अलीकडील काळात सर्वत्र साजरा होताना दिसत आहे. संविधान राहिले नाही तर लोकशाही राहणार नाही आणि लोकशाही राहीली नाही तर देश राहणार नाही याची जाणीव समाजाला करून देण्याची गरज वाचन चळवळीने ओळखून समाजामध्ये लोकशाहीची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न वाचन चळवळ करत असल्याचे ९.५४ वाचकांनी सांगितले आहे.

**तक्ता क्र. ६**

**४.६.६ राजकीय समाजकारण**

| अ.क्र | राजकीय समाजकारण | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | राजकीय समाज जाणीव | ६३ | २८.६३ |
| २ | बेकारीचा प्रश्न | ४१ | १८.६३ |
| ३ | मजूरांचा प्रश्न | ४५ | २०.४५ |
| ४ | रोजगारांचा प्रश्न | ३६ | १६.३६ |
| ५ | लोकसंख्येचा प्रश्न | २२ | १०.०० |
| ६ | ग्रामविकास प्रश्न | १३ | ०५.९० |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

वाचनामुळे राजकीय समाजकारण करण्यासाठी प्रत्येकजण समाजामध्ये जाऊन समाजातील समस्या कशा गंभीर आहेत, आणि त्या समस्या, मी कशा चांगल्या पद्धतीने सोडवत आहे हे लोकांमध्ये बिंबवण्याचे काम करत आहेत.आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने राजकीय समाज जाणीव लोकांमध्ये दृढ होऊ लागली आहे. वर्तमानपत्रामध्ये मोर्चा, आंदोलन पोस्टर्स व इतर प्रसार माध्यमातून राजकीय समाजकारण मोठ्या प्रमाणावर रूजू लागले आहे. असे २८.६३ टक्के लोकांनी सांगितले.

दिवसेंदिवस बेकारीचा प्रश्न अधिक गंभीर होत चालला आहे. या प्रश्नाविषयी वाचन चळवळ नेहमी प्रबोधन करत आली आहे. बेकारीचा हा प्रश्न समाजातील एक गंभीर प्रश्न असल्याची जाणीव राजकीय नेतृत्वाला करून दिली आहे. आपले राजकीय अस्तित्व दिर्घकाळ टिकवून ठेवायचे असेल तर बेकारीसारखा प्रश्न राजकीय असल्याची जाणीव ही राजकरण्यांना झाली. यातूनच राजकीय समाजकारण समोर आले. राजकीय पक्षाची भूमिका व त्यांची पक्षाच्या प्रती असणारी बांधीलकी वाचन चळवळ नेहमीच समाजासमोर मांडत आल्याने बेकारी सारखा सामाजिक प्रश्न राजकीय अजेंडा बनण्यापाठीमागे वाचन चळवळ कार्यरत असल्याचे १८.६३ टक्के वाचकांनी सांगितले आहे.

समाजामध्ये असंघटित मजूरांचा प्रश्नही मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे. कायम स्वरूपी असलेली नोकरी आणि मनमानी दिले जाणारे वेतन यामुळे मजुरांचे शोषण मोठ्या प्रमाणात होते.

मजूरांचे असणारे सर्व प्रश्न समाजासमोर मांडण्याचे काम वाचन चळवळीने केले आहे. समाज हळूहळू आपल्या प्रश्नाविषयी जागृत होत गेला आणि मजुरांनाही त्याची जाणीव झाली. राजकीय नेतृत्वाने मजूरांचा प्रश्न सोडवला नाही तर त्यांना सत्तेवर राहता येईल याची शाश्वती नाही. त्यामुळे राजकीय समाजकारण करताना मजूरांचे प्रश्न केंद्रस्थानी ठेवून केले जाणारे राजकारण वाचन चळवळीमुळे समाजाशी सुसंगत असल्याचे २०.४५ टक्के वाचकांनी सांगितले.

वाढती लोकसंख्या आणि सुशिक्षित बेकार यांच्या रोजगाराचा प्रश्न आज राज्यकर्त्यांना भेडसावत आहे. प्रत्येक निवडणूकीच्यावेळी रोजगार निर्मिती बद्दल चर्चा केली जाते आश्वासने दिली जातात. रोजगाराचा प्रश्न सोडवण्यासाठी वेगवेगळ्या योजनाही आखल्या जातात. राजकीय समीकरण रोजगाराभोवती फिरत असल्याने आणि रोजगाराचा प्रश्न अतिशय महत्त्वाचा असल्याचे वाचन चळवळ बिंबवत असल्याचे १६.३६ टक्के लोकांनी सांगितले.

भारतासारख्या विकसनशिल देशासमोर लोकसंख्येचा प्रश्न गंभीर बनला आहे. लोकसंख्या वाढीमुळे समाजामध्ये अनेक प्रश्न निर्माण होत असल्याची जाणीव वाचन चळवळीने करून दिली आहे. ही लोकसंख्या अशीच वाढत गेली तर समाजामध्ये अनेक प्रश्न नव्याने निर्माण होण्याची भीती वाचन चळवळीने व्यक्त केली आहे. राजकीय इच्छाशक्ती असल्या शिवाय वाढत्या लोकसंख्येस आळा घातला जाऊ शकत नाही. लोकसंख्या नियंत्रण प्रत्येक राजकीय पदाचा अजेंडा असणे काळाची गरज आहे. या प्रश्नाविषयाचे सर्वतोपरी प्रबोधन वाचन चळवळ करत आली असल्याचे १०.०० टक्के वाचकांनी सांगितले आहे.

भारतीय देश हा खेड्यांचा देश आहे. जोपर्यंत खेडी विकसित होत नाहीत तोपर्यंत देश विकसित होणार नाही याची जाणीव वाचन चळवळीने समाजाला आणि राजकीय नेतृत्वाला करून दिली आहे. ग्रामीण विकास झाल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही याची जाणीव राजकीय नेतृत्वाला केंद्र स्थानी ठेवून प्रबोधन करू लागला. वाचन चळवळीमुळे ग्रामविकासाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलत गेला असल्याचे ५.९० टक्के वाचकांनी सांगितले.

**तक्ता क्र. ७**

**४.६.७ राजकीय पक्षीय विचारसरणी**

| अ.क्र | विचारसरणी | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पक्षीय अस्मिता निर्माण | ४९ | २२.२७ |
| २ | पक्षीय विचार सरणी | ५२ | २३.६३ |
| ३ | पक्षाचा विकास खेड्यापर्यंत | ७१ | ३२.२७ |
| ४ | अन्य राजकीय पक्षाच्या विचारांची जाणीव | ४८ | २१.८१ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

वाचन चळवळीमुळे समाजामध्ये राजकीय पक्षांच्या विचारसरणी अधिक दृढ होत गेल्या. पक्षीय भावना प्रत्येक कार्यकर्त्यांमध्ये उतरत गेली. तसतशी पक्षाशी एकनिष्ठा किंवा बांधिलकी मोलाची ठरली. पक्षीय कार्यकर्त्यांमध्ये पक्षाची अस्मिता निर्माण झाली आणि ती अस्मिता टिकवण्यासाठी कार्यकर्ते प्रयत्न करू लागले. वाचन चळवळीमुळे पक्षीय अस्मिता छोट्या कार्यकर्त्यांमध्ये सुद्धा निर्माण झाली आणि त्यातून पक्षीय संघटन, बांधिलकी वाढत गेली हा विचार शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यामध्ये वाचन चळवळीचे योगदान असल्याचे २२.२७ वाचकांनी सांगितले.

वाचन चळवळीमुळे जशी पक्षीय अस्मिता निर्माण झाली तसे पक्षीय विचारसरणी प्रत्येक कार्यकर्त्यापर्यंत पोहोचविण्याचे काम वाचन चळवळीने केले. त्यातूनच मार्क्सवादी विचारसरणी, समाजवादी विचारसरणी, बहुजनवादी विचारसरणी हिंदूत्ववादी विचारसरणी, सारख्या विविध विचारसरणी घेऊन पक्ष कार्यरत आहेत. या राजकीय पक्षांची विचारसरणी आणि त्यांची समाज आणि देशाच्या प्रती असणारी बांधीलकी सामान्य जनतेपर्यंत पोहचविली असल्याचे २३.६३ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

वाचन चळवळीमुळे पक्षीय विचार खेड्यापाड्यापर्यंत पोहचला शहरापर्यंत मर्यादित असणाऱ्या पक्षांच्या शाखा किंवा संघटन गावोगावी निर्माण झाले. एवढेच नव्हे तर युवा अध्यक्ष, ब्लॉक अध्यक्ष,

मागासवर्गीय, महिला अध्यक्ष सारख्या शाखांची निर्मिती करून पक्षीय बांधणी अधिक मजबूत करण्याचे काम राजकीय पक्षाने जरी केले असले तरी या विषयाचे प्रबोधन किंवा हा विचार समाजापर्यंत पोहचवून प्रत्येक पक्ष गाव पातळीवर घेऊन जाण्याचे काम वाचन चळवळीने केले असल्याचे ३२.२७ टक्के वाचकांनी सांगितले आहे.

प्रादेशिक पक्षीप्रमाणे राष्ट्रीय पक्षाची ही वाढती संख्या लक्षात घेता प्रत्येक पक्षाची भूमिका ही समाजास उमजणे आवश्यक आहे. एखादा कार्यकर्ता ज्या पक्षाशी संबंधित आहे. त्याला त्या पक्षाची विचारधारणा समजण्या बरोबरच इतर पक्षांची विचारधाराही समजणे आवश्यक आहे. प्रत्येक पक्षाची विचारधारा जेव्हा प्रत्येक कार्यकर्त्यास माहीत होईल तेव्हा एकत्रित विचार करणे सोपे जाईल. विविध पक्षांची विचारधारा समाज आणि कार्यकर्त्यापर्यंत पोहोचविण्याचे काम वाचन चळवळ करत असल्याचे २१.८१ टक्के वाचकांनी सांगितले आहे.

**तक्ता क्र. ८**


**४.६.८ जातीय राजकारण**

| अ.क्र | जातीय राजकारण | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | जातीय अस्मिता वाढली | ७२ | ३२.७२ |
| २ | जातीय संघटन निर्माण | ६२ | २८.१८ |
| ३ | जातीय पक्षाची निर्मिती | २२ | १०.०० |
| ४ | जातीय मतदान बँक | ४८ | २१.८१ |
| ५ | लोकशाही मूल्ये | १६ | ०७.२७ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

**आलेख क्र. ८**

**जातीय राजकारण**




सामाजिक बदलाबरोबरच राजकीय बदल काळानुरूप होताना राजकारणाने वेगळेच वळण घेतल्याचे आपणास दिसून येते. पूर्वी राष्ट्रीय पक्षास असणारे महत्त्व आजकाल कमी होऊन प्रादेशिक पक्षाचे महत्त्व वाढताना दिसत आहे. एवढेच नव्हे तर समाजातील प्रत्येक समूहास किंवा जातीस

राजकीय प्रतिनिधित्व मिळण्याची अपेक्षा वाढीस लागली आहे. यातून कोणत्या क्षेत्रामध्ये कोणत्या जातीची संख्या अधिक आहे याचे समीकरण मांडून निवडणूक जिकंली जाऊ शकते. याविषयीचा विचार वाढू लागल्याने प्रत्येक जातीमध्ये राजकीय जातीय अस्मिता वाढीस लागली आहे. ही जातीय अस्मिता वाढण्यामागेही वाचन चळवळ जबाबदार असल्याचे ३२.७२ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

वाचन चळवळीमुळे समाजास राजकीय जाणीव झाली आणि जातीय अस्मितेसोबतच जातीय संघटन निर्माण होऊ लागले. प्रत्येक जातीय संघटन आपले राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी प्रयत्न करू लागले. जातीय संघटनेच्या माध्यमातून राजकीय वाटा प्राप्त करणे किंवा दबाब गट निर्माण करून राजकीय फायदे मिळवण्याचे काम जातीय संघटना करू लागल्या प्रत्येक जातीची राजकीय अस्मिता जागृत होण्यापाठीमागेही वाचन चळवळ कार्यरत असल्याचे २८.१८ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

वाचन चळवळीमुळे प्रत्येक समूह किंवा गटामध्ये राजकीय अभिलाषा निर्माण झाली आहे. त्यातूनच त्या समूहाचा पक्ष किंवा त्या जातीचा पक्ष उदयास येत गेला एखादा पक्ष राष्ट्रीय पक्ष म्हणून जरी घोषित झाला असला तरी त्याची मर्यादा त्या त्या प्रदेशापुरती किंवा जाती पुरती असल्याचे आपणास दिसते. त्या पक्षामध्ये इतर जाती जमातीचे लोक नावापुरते कार्यरत असल्याचे आपणास दिसून येते. त्यामुळे जातीय पक्षाचे निर्मिती झाल्याचे आपणास दिसते. ही सर्व भावभावना वाचन चळवळीच्या माध्यमातून समाजामध्ये रूजली. परिणामी जातीय पक्षांची निर्मिती होत गेल्याचे १०.०० टक्के वाचकांनी सांगितले.

वाचन चळवळीच्या माध्यमातून सर्व राजकीय समीकरणे समाजासमोर मांडली जातात. निवडणूका जाहीरझाल्यापासून उमेदवार निवडून येईपर्यंत ही समीकरणे कार्यरत तर असतातच शिवाय उमेदवार निवडून आल्यानंतरही ही समीकरणे मांडत पुढील निवडणूकीची तयारी करू लागतो. मतदार संघामध्ये ज्या जातीची संख्या अधिक आहे किंवा जातीय मतदान अधिक आहे. अशा जातीतील प्रत्येक राजकीय पक्ष उमेदवारी देऊ करतो. अशा स्वरूपाचा मथळा वर्तमानपत्रे छापून समाजापर्यंत पोहचवितात अशाच जातीय समीकरणांची चर्चा विविध न्यूज चॅनलवर होताना दिसते. म्हणजेच वाचन चळवळीच्या माध्यमातून जातीय मतदान बँक तयार करण्याचे काम होत असल्याचे २१.८१ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

भारतीय लोकशाही अनेक पक्षीय लोकशाही आहे त्यामुळे प्रत्येक जाती समूहाची अस्मिता असणारे पक्ष टिकून आहेत. काही नव्याने निर्माण होत आहेत. या राजकीय पक्षांना जातीय वलय असल्याने किंवा तशाच स्वरूपाच्या विचारसरणीवर हे पक्ष उभे असल्याने लोकशाही मूल्ये पायदळीत तुडवली जात आहेत. लोकशाही अधिक मजबूत करावयाची असेल तर जाती जमातीच्या पलीकडे जाऊन राष्ट्रीय भावना समाजात निर्माण होणे आवश्यक आहे किंवा धर्मनिरपेक्ष समाज घडवण्याची गरज आहे. परंतु राजकीय पक्ष आपला स्वार्थ साधण्यासाठी जातीय राजकारणास खतपाणी घालत असल्याने सामाजिक एकोपा निर्माण होण्याऐवजी विभाजन अधिक होताना दिसते. हे विभाजन लोकशाहीस घातक असल्याचे वेगळे सांगण्याची गरज नाही हा सर्व विचार पुढे घेऊन जाण्याचे काम प्रत्यक्ष अप्रत्यक्ष वाचन चळवळ करत असल्याने लोकशाही मूल्ये पायदळी तुडवली जात असल्याचे ७.२७ टक्के वाचकांनी सांगितले.

**तक्ता क्र.९**

**४.६.९ ग्रामपंचायत**

| अ.क्र | ग्रामसभा | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसभेची जाणीव | ७९ | ३५.९० |
| २ | ग्रामसभेचे स्वरूप | ४२ | १९.०९ |
| ३ | ग्रामसभेतील प्रश्न | ५१ | २३.१८ |
| ४ | ग्रामप्रश्नाची उकल | ४८ | २१.८१ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

राजकीय दृष्टया सर्वसामान्य जनतेला जागृत करण्याचे काम वाचन चळवळ करत आली आहे. वाचन चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण स्तरावरील राजकारण सामान्य जनतेस समजले आहे. ग्रामपंचायतेतील राजकारण समजून घेण्यासाठी जनतेस ग्रामसभेची जाणीव होणे गरजेचे आहे. गावाच्या विकासामध्ये सर्वांचा सहभाग असावा. निर्णय प्रक्रियेमध्ये सर्वांची मते जाणून घेण्यासाठी ग्रामसभेची किती आवश्यकता आहे या विषयीची माहिती वाचन चळवळीने सामान्य जनतेस करून दिल्याचे ३५.९० टक्के वाचकांनी सांगितले आहे.

ग्रामसभेतील सहभाग नोंदवताना ग्रामसभेचे स्वरूपही समजाऊन घेणे आवश्यक असते. या ग्रामसभेमध्ये सरपंच, उपसरपंच, ग्रामसदस्य, तलाठी, ग्रामसेवक व ग्रामस्थ उपस्थित असतात. या सर्वांच्या समोर गावाच्या विकासा संदर्भात चर्चा केली जाते. या ग्रामसभेचे अध्यक्षीय स्थान सरपंच भुषवत असत तर ग्रामसेवक सरकारी योजना आणि गावचा विकास यासंबधीची माहिती ग्रामस्थांना व ग्राम सदस्यांना देत असतात. या सभेत सर्वांनुमते निर्णय घेतला जातो. ग्रामसभेचे स्वरूप सर्वांना समजाऊन देण्यात वाचन चळवळीचा मोलाचा वाटा असल्याचे १९.९ टक्के वाचकांनी म्हटले आहे. ग्रामीण स्तरावरील विविध प्रश्नांची जाणीव जनतेस करून देण्याचे काम वाचन चळवळ करत आली आहे. विविध ग्राम पंचायती समोरील प्रश्न उपस्थित करून ते कशाप्रकारे सोडवले जाऊ शकतात, या संबंधीची माहिती वाचन चळवळ करून देते. ग्रामसभेपुढील प्रश्न व त्याचे समाधान, हे प्रश्न सोडवताना येणाऱ्या अडचणी या विषयीची सविस्तर माहिती वाचन चळवळ ग्रामस्थांना करून देत असल्याचे २३.१८ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

वाचन चळवळ ग्रामीण राजकारणासंदर्भात नेहमीच मार्गदर्शक ठरली आहे. ग्रामस्तरावरती अनेक प्रश्न छुप्या स्वरूपात असल्याने सहजपणे लक्षात येत नाहीत. हे प्रश्न लक्षात न आल्याने त्या संदर्भातील उकल होणे शक्य नाही. त्यामुळे साहजिकच गावचा विकास होत नाही. गावातील राजकारण्यांना जोपर्यंत गावचे भौगोलिक स्थान, गावचे आपत्ती व्यवस्थापन, गावच्या पाण्याचा प्रश्न कसा सोडवला जाऊ शकतो हे कळत नाही तोपर्यंत त्याचा उपाय शोधला जाऊ शकत नाही. गावच्या पाण्याचा प्रश्न, आपत्तीचे व्यवस्थापन कशाप्रकारे केले जाऊ  शकते या संदर्भात वाचन चळवळ नेहमी मार्गदर्शन करत असते आणि गावासमोरील प्रश्नांची उकल करून त्यावरील उपायासंदर्भात मार्गदर्शन करत असल्याचे २१.८१ टक्के वाचकांनी सांगितले आहे.

**तक्ता क्र. १०**

**४.६.१० राजकीय विविधता**

| अ.क्र | राजकीय विविधता | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय पक्ष | ९२ | ४१.८१ |
| २ | प्रादेशिक पक्ष | ८१ | ३६.८१ |
| ३ | सत्तेसमोरील आव्हाने | २७ | १२.२७ |
| ४ | आव्हानाचे निराकरण | २० | ०९.०९ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

भारत देशामध्ये पक्षीय विविधता आहे. त्यामुळे देशामध्ये प्रादेशिक आणि राष्ट्रीय असे अनेक पक्ष कार्यरत आहेत या सर्व पक्षांची भूमिका सामान्य जनतेपर्यंत घेऊन जाण्याचे काम वाचन चळवळ करत आली आहे. देशामध्ये अनेक राष्ट्रीय पक्ष आपली भूमिका घेऊन किंवा निवडणूक अजेंडा घेऊन जनतेसमोर येतात परंतु या अजेंड्यामध्ये काय त्रुटी आहे, यातील आश्वासने यापूर्वी दिली गेली होती काय, या मागची सत्यता किंवा फोलपणा जनतेला समजाऊण्याचे काम वाचन चळवळ करत आली आहे. आजपर्यंत या राष्ट्रीय पक्षांनी कशा स्वरूपाचे राजकारण केले आहे. देशहिताच्या संदर्भात कोणते महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत, त्यांनी राजकारण्यांसाठी राजकारण केले आहे की समाजासाठी राजकारण केले आहे या विषयाची माहिती वाचन चळवळ सतत जनतेस देत असल्याचे ४१.८१ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

राज्या–राज्यामध्ये अनेक प्रादेशिक पक्ष सक्षमपणे कार्यरत असल्याचे दिसतात. या प्रादेशिक पक्षांची नाळ स्थानिक प्रश्नांशी जोडली गेली असल्याने प्रादेशिक अस्मिता किंवा भाषिक अस्मिता लोकांमध्ये जागृत झाल्याने दिवसेंदिवस प्रादेशिक पक्षांचे महत्त्व वाढताना दिसते. प्रादेशिक पक्षांची भूमिका, त्यांचे वाढणारे महत्त्व या विषयीची सविस्तर माहिती वाचन चळवळ त्या–त्यावेळी सामान्य जनतेस करून देत असल्याने राजकारणातील सत्यता व असत्यता समजणे वाचन चळवळीमुळे सहज शक्य झाल्याचे ३६.८१ टक्के वाचकांनी सांगितले आहे.

वाचन चळवळ राजकीय बदलांविषयी नेहमी समाजास जागृत करत असतेच शिवाय सत्तेसमोरील आव्हानांची जाणीव जनतेला आणि राजकारण्यांना करून देण्याचे काम वाचन चळवळ

करत आली आहे. निवडून आल्याच्या नंतर सरकार समोर कोणकोणती आव्हाने आहेत या विषयीचे सविस्तर लेखन विविध वर्तमानपत्रे मासिके व विविध चॅनल वरील चर्चेच्या माध्यमातून सत्तेसमोर आणि जनतेसमोर मांडली जातात यासाठी वाचन चळवळ महत्त्वाची असल्याचे १२.२७ टक्के वाचकांनी सांगितले आहे.

वाचन चळवळ राजकीय पक्षांसमोरील किंवा सत्तेसमोरील आव्हानांची फक्त चर्चाच करत नाही तर त्या प्रश्नांचे समाधान शोधण्याचे काम करते हा प्रश्न किंवा आव्हान समोर का आले या पाठीमागील कारणांचा अभ्यास करून या विषयीचे समाधान शोधले जाते. त्यामुळे वाचन चळवळ सत्तेसमोरील आव्हानांची ही फक्त चर्चा न करता त्यांचे निराकरण शोधण्याचे काम करत असल्याचे ९.९ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

**तक्ता क्र. ११**

**४.६.११ राजकीय सलोखा**

| अ.क्र | राजकीय सलोखा | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विविध राजकीय पक्ष | ५६ | २५.४५ |
| २ | सामाजिक सलोखा | ८१ | ३६.८१ |
| ३ | सांस्कृतिक सलोखा | ५१ | २३.१८ |
| ४ | धार्मिक सलोखा | ३२ | १४.५४ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्त्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

वाचन चळवळीच्या माध्यमातून राजकीय सत्ता आणि जनतेमध्ये संवाद केला जातो. या संवादाच्या माध्यमातून विविध राजकीय पक्षांची भूमिका जनतेस समजतेच. या शिवाय पक्षा–पक्षामध्ये राजकीय सलोखा राखण्यासाठी वाचन चळवळ मदत करते. एखाद्या पक्षास दुसरा पक्ष पूरक भूमिका घेतो किंवा दुसऱ्या पक्षाच्या निर्णयाचे समर्थन करतो परिणाम दुसऱ्या पक्षाकडूनही अशा प्रकारची कृती घडते आणि दोन्ही पक्षांमध्ये राजकीय सलोखा निर्माण होतो. एका पक्षाची भूमिका दुसऱ्या पक्षापर्यंत पोहचविणे आणि दुसऱ्या पक्षाचे मत पहिल्या पक्षापर्यंत पोहचवून त्यांच्यामध्ये सलोखा निर्माण करण्याचे काम वाचन चळवळ करत आल्याचे २५.४५ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

प्रादेशिक पातळीवरती किंवा राष्ट्रीय पातळीवरती राजकीय पक्ष कार्यरत असताना अनेक वेळा समाजामध्ये आंदोलने होऊन अस्थिरता निर्माण होते. देशाच्या विकासासाठी सामाजिक व राजकीय स्थैर्याची गरज असते. यासाठी समाजामध्ये एकोपा असणे किंवा सलोखा असणे गरजेचे आहे. एखाद्या समाजास चुकीची माहिती देऊन दुसऱ्या समाजाविरूद्ध भडकावले जाते. त्यावेळी सत्य असत्याची जाणीव करून देऊन सामाजिक सलोखा राखण्यामध्ये वाचन चळवळीचा मोलाचा वाटा असल्याचे ३६.८१ टक्के वाचकांनी म्हटले आहे.

सामाजिक सलोख्या प्रमाणेच सांस्कृतिक सलोखाही महत्त्वाचा आहे. देशामध्ये अनेक जाती धर्माचे लोक राहत असल्याने प्रत्येकाची वेगळी संस्कृती आहे. प्रत्येकजण आपल्याच संस्कृतीवर अडून बसला तर सर्वत्र द्वेष पसरला जाईल आणि सांस्कृतिक ऐक्य धोक्यात येईल. जर सांस्कृतिक ऐक्य किंवा सलोखा धोक्यात आला तर रोज समाजामध्ये हिंसा केली जाईल हे सर्व रोखण्यासाठी सांस्कृतिक सलोखा आवश्यक असल्याचे वाचन चळवळीने जाणले आहे. समाजातील अनेक प्रश्नांची उत्तरे आपल्याकडे असतात. परंतु इच्छाशक्ती नसल्यास सांस्कृतिक सलोखा धोक्यात येवू शकते ही गंभीर बाब लक्षात घेऊन वाचन चळवळ नेहमी विविध जातीधर्म आणि पंथांमध्ये सांस्कृतिक सलोखा राखण्यामध्ये प्रयत्नशिल असल्याचे मत २३.१८ टक्के वाचकांनी नोंदवले आहे.

भारत देश विविध जाती धर्मांनी नटलेला आहे. त्या सर्व जाती धर्मामध्ये सलोखा राखणे देशाच्या दृष्टीने अतिशय मोलाचे आहे समाजामध्ये धार्मिक सलोखा अस्तित्वात नसेल तर आराजकता माजेल धर्मा–धर्मावरती हल्ले केले जातील, हिंसा वाढेल त्यामुळे वाचन चळवळ वेळोवेळी धर्मा–धर्मातील संघर्ष टाळण्याचा प्रयत्न करत आली आहे. एखादा धार्मिक हिंसाचार भडकला तर त्या विषयाची सत्यता व प्रबोधनही वाचन चळवळ करत आली आहे. भारतासारख्या देशामध्ये धार्मिक सलोखा राखणे खूप महत्त्वाचे आहे हे महत्त्वाचे काम वाचन चळवळ सतत करत आली असल्याचे १४.५४ टक्के वाचकांनी सांगितले आहे.

**तक्ता क्र. १**


**४.६.१२ वाचन चळवळीमुळे झालेले परिवर्तन**

| अ.क्र | राजकीय बदल | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सामाजिक परिवर्तन | ७६ | ३९.५४ |
| २ | वैचारिक परिवर्तन | ८७ | ३९.५४ |
| ३ | विकासात्मक बदल | ३८ | १७.२७ |
| ४ | अन्य बदल | २५ | ११.३६ |
| **एकूण** | | **२२०** | **१००%** |

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण,२०१७.

**आलेख क्र. १**

**वाचन चळवळीमुळे झालेले परिवर्तन**




वाचन चळवळीमुळे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय बदल मोठ्या प्रमाणात होत असल्याचे आपणास दिसून आलेले आहेत. राजकीय बदलाचा परिणाम सामाजिक बदलावरतीही होत असतो पूर्वी समाजातील ठराविक वर्गातील पुरुषच राजकारणामध्ये सहभाग होत असत. दिवसेंदिवस या विषयी प्रबोधन होत गेल्याने समाजातील सर्व स्तरातील स्त्री–पुरुष राजकारणामध्ये

सहभागी होऊ लागले आहेत. एवढेच नव्हे तर राजकीय क्षेत्राला आपल्या कार्य कर्तृत्वाने प्रभावित देखील केले आहे. समाजातील सर्व स्तरातील लोकांचा राजकारणातील सहभाग राजकीय समाज कारण बदलाची परीणिती आहे. हा सर्व बदल घडवून आणण्यामध्ये वाचन चळवळ सतत सक्रियअसल्याचे ३९.५४ टक्के वाचकांनी सांगितले आहे.

वाचन चळवळीच्या माध्यमातून समाजामध्ये वरवरचा बदल न होता मुळातूनच बदल होत चालला आहे. मुळातून बदल होण्यासाठी समाजामध्ये राजकीयदृष्टया वैचारिक परिवर्तन होणे गरजेचे असते. पूर्वीच्या काळी एकाच पक्षास जनता कसलाही विचार न करता वर्षानुवर्षे मतदान करत होती. परंतु आजकाल समाजामध्ये राजकीयदृष्टया वैचारिक परिवर्तन होऊ लागल्याने मतदान प्रत्येक पक्षास, उमेदवारास समजून उमजूनच मतदान करत आला आहे. या सर्व वैचारिक बदलामध्ये वाचन चळवळीचा मोठा वाटा असल्याचे ३९.५९ टक्के वाचकांनी सांगितले आहे.

वाचन चळवळ नेहमी बदलाच्या दिशेने काम करताना दिसून येते. महत्त्वाचे म्हणजे वाचन चळवळीने सकारात्मक बदलाची भूमिका घेतत्यामुळे समाजाच्या आणि देशाच्या विकासाच्या दृष्टीने वाचन चळवळ प्रबोधन करत आली आहे. राजकीय दृष्टया विकासात्मक बदल महत्त्वाचा असल्याने विकासात्मक बदलाचे समर्थन वाचन चळवळ सतत करत आली आहे. विकासाच्या दृष्टीने ध्येय धोरणे असणाऱ्या पक्षांची भूमिका वाचन चळवळ जनतेपर्यंत पोहचवित आली आहे. विकास करण्यासाठी अनेक गोष्टी जनतेपर्यंत आणि जनतेकडून सत्तेकडे आदान प्रदान करण्याची गरज असते. विकासात्मक भुमिका असणाऱ्या सत्तेच्या बाजूने वाचन चळवळ कार्यरत असल्याचे १७.२७ टक्के वाचकांनी सांगितले आहे.

राजकीयदृष्टया सामाजिक, वैचारिक बदलाप्रमाणेच अन्य बदलही महत्त्वाचे आहेत. समाजामध्ये राजकीय जाणीव जागृती करताना धार्मिक सांस्कृतिक बदलही महत्त्वाचा असतो या शिवाय समाजामध्ये राजकारणाच्या माध्यमातून होत असलेले छोटे मोठे बदल ही महत्त्वाचे असतात. या सर्व बदलांमध्ये वाचन चळवळीचे योगदान महत्त्वाचे आहे. वाचन चळवळीच्या माध्यमातून या सर्व बदलांची पा९र्वभूमि तयार केली जाते आणि त्यामुळे राजकीय, सामाजिक, वैचारिक, विकासात्मक यासारखे बदल घडवून आणणे सहज शक्य होते. वाचन चळवळीमुळे झालेले सर्व बदल मोलाचे असल्याचे ११.३६ टक्के वाचकांनी सांगितले आहे.

## ४.७ तथ्य संकलन– सारांश

वाचन चळवळीचा संदर्भात अभ्यास करत असताना काही मुलाखती, प्रश्नावली व निरीक्षणाचे साहाय्याने तथ्य संकलन करण्यात आले. पुणे जिल्ह्यातील हवेली, भोर, मुळशी, मावळ, आंबेगाव, वेल्हा या तालुक्यांचा अभ्यास यामध्ये करण्यात आला. नमुना निवडीच्या माध्यमातून अभ्यास करताना ७० वाचनालये व २२० वाचकांचा यामध्ये विचार करण्यात आला आहे.

या वाचकांच्या माध्यमातून समाजामध्ये वेगवेगळ्या स्वरूपाचा झालेला बदल दिसून आला. वाचन चळवळीमुळे माणसाच्या जाती विषयी दृष्टीकोनात बदल झाला त्यामुळे जाती–जातीतील द्वेष कमी झाल्याने सामाजिक दृष्टया बदल झाल्याचे दिसून येते. वाचन चळवळीमुळे समाज जागृत होत गेला. सत्य असत्य मधील फरक समजू लागल्याने समाजातील अंधश्रद्धेचे प्रमाण कमी झाल्याचे दिसते. सामाजिक बदलाच्या दृष्टीने स्त्रियांविषयक दृष्टीकोन खूप मोलाचा आहे. वाचन चळवळीमुळे सामाजिक बदल घडताना स्त्रियांचा कौटुंबिक दर्जा वाढला. अर्थाजर्नामध्ये त्यांचा सहभाग वाढल्याने सामाजिक स्थान उंचावलेले दिसते. वाचन चळवळीमुळे समाजातील सर्व स्तरात क्रांतीकारी बदल शिक्षणामुळे झाला. समाजातील वाढते शिक्षणाचे प्रमाण, स्त्री–पुरुष समता आणि सामाजिक विषमता कमी करण्यास कारणीभूत झाली आहे. सामाजिक बदलामध्ये प्रामुख्याने वाचन चळवळीचा लोकसंख्या वाढीवर झालेला बदल सहजपणे लक्षात येतो. सामाजिक बदल घरापासून शहरापर्यंत होत गेला आहे. समाजातील वैचारिक प्रबोधन सर्वांत जास्त मोलाचे ठरल्याने समता, न्याय, जातीयता, लिंगभाव या विषयी प्रबोधन होऊन एकूण समाजात मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे. एवढेच नव्हे तर पर्यावरण, आरोग्य विषयी ही समाज मोठ्या प्रमाणावर जागृत झाला आहे.

समाजिक बदलांप्रमाणे वाचन चळवळीमुळे सांस्कृतिक बदलही समाजात घडून आला आहे. गणेश उत्सव, नवरात्री उत्सव, महापुरुषांची जयंती यांसारख्या सांस्कृतिक उत्सवांमधून सर्व जाती धर्माचे लोक एकत्र सहभाग घेताना दिसतात. सांस्कृतिक उत्सवाच्या माध्यमातून वाचन चळवळ सर्व समाजाला एकत्र ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. वाचन चळवळीच्या माध्यमातून राष्ट्रीय सणांचेही स्वरूप व्यापक बनत गेले आहे. यातूनच एकत्रित देशाची संकल्पना वाढीस लागल्याचे दिसते.

सांस्कृतिक उपक्रमांमुळे समाजातील सांस्कृतिक कलांचे प्रमाण खूप कमी झाले आहे. वाचनाच्या माध्यमातून जाती धर्मातील सांस्कृतिक अंतर कमी होताना दिसते. आंतरजातीय विवाहाचे

प्रमाण वाढले आहे, एवढेच नव्हे तर समाजातील बाल विवाह, विधवा विवाह, पुरुष प्रधानता यासाख्या सांस्कृतिक अनिष्ठ प्रथा कमी होण्यास मदत झाली आहे. वाचनामुळे समाजातील धर्मांधता कमी होऊन धर्मांधर्मातील सलोखा वाढल्याचे दिसते. अलिकडच्या काळात चर्चेच्या केद्रस्थानी असणारी असहिष्णुता वाचनामुळे कमी झाल्याचे दिसते. समाजामध्ये धार्मिक सहिष्णुता व सांस्कृतिक सहिष्णुता वाढण्यापाठीमागे वाचन चळवळीचे योगदान असल्याचे अभ्यासाअंती दिसून येते.

समाजामध्ये सर्व प्रकारच्या बदलांसाठी आर्थिक बदल खूप महत्त्वाचा ठरतो. वाचन चळवळीमुळे समाजाचा आर्थिक स्तर तर बदललाच परंतु समाजाचा रोजगाराकडे बघण्याचा दृष्टीकोनही बदलला असल्याचे दिसते. समाजामध्ये झालेली नवीनरोजगार निर्मिती, सुख सुविधांमध्ये झालेली वाढ राहणीमानाचा वाढलेला दर्जा याच्या मुळाशी आर्थिक सधनता दिसून येते. वाचन चळवळीमुळे समाजाला वेगवेगळे आर्थिक स्रोत मिळत गेले. त्याचबरोबर बचतीचे प्रमाण वाढले आणि त्यातून वेगवेगळे कुटीरउद्योग घराघरातून किंवा गावागावातून सुरू झाले याविषयीची सविस्तर माहिती वाचन चळवळीच्या माध्यमातून समाजातला मिळत गेली आणि नोकरी बरोबरच व्यवसायाच्या रूपाने आर्थिक उत्पादनाची साधने हाती आली. वाचन चळवळीमुळे शेतीकडे पाहण्याचाही दृष्टीकोन बदलल्याचे या अभ्यासाअंती दिसून आले. पूर्वी शेतीकडे केवळ उपजिवीचे साधन म्हणून पाहिले जायचे. परंतु वाचन चळवळीच्या माध्यमातून नवीनतंत्रज्ञानाची माहिती मिळाली आणि आधुनिक शेतीचा विकास झाला. शेतकऱ्याने हवामान, माती परीक्षण आणि ठिबक सिंचन सारख्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून मोठ्या प्रमाणात उत्पादन काढू लागला ही सर्व आर्थिक प्रगती किंवा बदल घडवून आणण्यामध्ये वाचन चळवळीचे योगदान आहे. ही बाब या अभ्यासाच्या माध्यमातून स्पष्ट झाली आहे.

समाजामध्ये बदल घडवून आणण्यामध्ये निर्णय प्रक्रीया महत्त्वाची ठरते ही निर्णय प्रक्रीया राजकीय नेतृत्वाच्या हाती असते. राजकीयदृष्टया वाचनामुळे सर्व प्रथम झालेला बदल म्हणजे समाजाला झालेली राजकीय जाणीव होय. या राजकीय जाणीवेतून सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक नेतृत्व समोर आल्याने सहजपणे बदल घडून आल्याचे दिसते. वाचनामुळे स्त्रियांमध्येही राजकीय अस्मिता जागृत झाली आणि त्यांचाही राजकीय सहभाग वाढत गेल्याने समाजामध्ये राजकीय समता स्थापित होण्यास मदत झाली. वाचन चळवळीमुळे राजकीय वाटा प्रत्येक जात समूहास मिळतानाच

जातीय राजकारण्याची समीकरणे समोर येऊ लागली आहेत जी लोकशाहीस घातक ठरू शकतात. यामुळे समाजामध्ये जातीय समूह, वर्गीय समूह, प्रादेशिक समूह, व्यावसायिक समूह, अल्पसंख्याक समूह निर्माण होऊ लागले, ही भविष्यात मोठी समस्या ठरू शकते. याविषयी वाचन चळवळीस वेगळी भूमिका घेऊन प्रबोधन करण्याची गरज आहे.

राजकीयदृष्टया वाचन चळवळीमुळे ग्रामपंचायती पासून ते लोकसभेपर्यंतची राजकीय जाणीव निर्माण झाल्याने सर्वांचा राजकारणामध्ये सहभाग वाढू लागला आहे. याचबरोबर वाढत्या राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांची संख्या सामाजिकदृष्ट्या अराजकता निर्माण करू शकते. वाचन चळवळीच्या माध्यमातून याविषयी प्रबोधन होण्याची गरज अभ्यासाअंती होण्याची गरज आहे.

# व्यक्तीनिष्ठ व्यष्टीचे विश्लेषण

## प्रस्तावना

पुणे जिल्ह्यातील पाच तालुक्यामधील वाचकांचा सामाजिक व सांस्कृतिक अभ्यास करताना निरीक्षण, प्रश्नावली भरून घेणे व मुलाखत या तंत्राचा वापर संशोधनात केलेला आहे. त्याचबरोबर वाचनालयातील पुस्तकाबरोबरच काही वाचक वर्गांनी आधुनिक तंत्रज्ञाचा वापर करून समाजभिमुख असे ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न केला आहे, म्हणून १५ वाचकांचा अभ्यास व्यष्टी अध्ययनाच्या (Case Study) माध्यमातून केला आहे सद्यःस्थित गुणात्मक संशोधनाचे महत्त्व वाढले, हे नाकारून चालत नाही. म्हणून अभ्यासकांने काही केसेस गुणात्मक (Qualitative) व्यष्टी अध्ययन पद्धतीच्या माध्यमातून त्यांच्याशी विशेष संवाद करून त्या संवादातून जी माहिती उपलब्ध झालेली आहे. तिचा समावेश व्यष्टी अध्ययन पद्धतीच्या माध्यमातून केला आहे.

अभ्यासकाने काही केसेस गुणात्मक (Qualitative) संशोधनाच्या आधारे मांडल्या आहेत त्यासाठी काही सैद्धांतिक संकल्पनाच्या चौकटीचा आधार घेऊन त्या केसेस मांडल्या आहेत. त्या सैद्धांतिक संकल्पना म्हणजे नॉम चॉम्स्की याने (मिड्यिा) आधुनिक माध्यम व वाचन चळवळ या संदर्भात ते भाष्य करतात डीवाईस द्वारे लोक आपल्या ज्ञानाचा प्रसार करतात व लोक ही त्यावर विश्वास ठेऊन त्या ज्ञानाचा वापर करतात, असे मत त्यांनी मांडले आहे. त्याचबरोबर फ्रँकफर्ट स्कुल व नवमार्क्सवादी विचार प्रवाहामधील एंटोनिओ ग्रामशी यांचा वर्चस्व सिद्धांत, मायकेल फुको यांचा ‘कम्युनिटी ॲक्शन थेअरी, जुर्गन हेबरमास यांच्या ’पब्लिक स्पेअर‘ सिद्धांत या सैद्धांतिक संकल्पनांच्या माध्यमातून या केसेसचा अभ्यास करण्यात आला आहे.

वाचन चळवळीच्या माध्यमातून समाजात बदल कसा होत गेला व लोक आता पुस्तकाबरोबर मिड्यिाचा वापर करताना दिसतात व वाचन चळवळीला अधिक गतीमान करताना दिसतात. हे पुढील केसेस वरून आपणांस लक्षात येईल.

**केस नं. १**

प्रदीप कदम हे वाचक हवेली तालुक्यातील आहेत. त्यांचे शिक्षण हे अधिक प्रतिकु ल परिस्थितीत झाले आई वडील आडाणी असत्यामुळे त्याच्या घरचा आणि शिक्षणाचा तसा कांही संबंध नव्हता ते शिक्षण घेत असताना त्यांना जी माहिती मिळाली त्या प्रमाणे ते वाचन करीत गेले त्यांनी मुळ पुस्तके त्यामध्ये तुकारामांचे अभंग, ज्ञानेश्वराची ज्ञानेश्वरी व समाज सुधारकांचे पुस्तके, आत्मकथने, यातून त्यांच्या विचारावर एक वेगळा प्रभाव पडत गेला.

जुनिअर कॉलेजला असताना काम करून शिकायचे 'कमवा व शिका' योजना आयुष्यभर त्यांनी राबवली. घरची कामे, शेतीची कामे त्याचबरोबच अभ्यास किंवा इतर कोणतेही काम करणे, ही त्यांची हातोटी आहे.

महाविद्यालयीन शिक्षण विद्यापीठामध्ये बाहेरुन म्हणजे बहिस्थ विद्यार्थी म्हणून पूर्ण केलं बी. ए. इंग्रजी घेऊन पदवी घेतली एम. ए. इंग्रजी हे पदव्युत्तर शिक्षण पुर्ण केले. त्याचबरोबर बी.एड., एम.एड., एम. फिल., एम. बी. ए. चे शिक्षण पुर्ण केले. ते एका महाविद्यालयात प्राचार्य म्हणून काम करतात.

ते नोकरी, संसार संभाळून त्यामध्ये न अडकता अविरतपणे लोकांमध्ये जाऊ न ते समाजातील वास्तविक परिस्थितीवर ते भाष्य करतात. लोकांनी वाचनाकडे वळले पाहिजे, जे नवनवीन तंत्रज्ञान आहे ते आत्मसात केले पाहिजे व जे खरे ज्ञान आहे ते समाजापर्यंत पोहचले पाहिजे. त्यांनी वाचनाबरोबरच ते वाचलेले ज्ञान लोकांना उपयोगी पडले पाहिजे. हा त्यांचा नेहमी आग्रह असतो, म्हणून ते वेगवेगळ्या व्याख्यांनाच्या माध्यमातून ते महाराष्ट्रभर फिरत असतात. त्यांनी आतापर्यंत २००० हजारहून अधिक व्याख्याने दिलेली आहेत. त्यांच्या व्याख्यानाचे विषय छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज व इतर महामानवांच्या चरित्रातून आपल्या व्याख्यानाच्या माध्यमातून युवकांना जागृत करण्याचे, प्रेरणा देण्याचे काम ते करतात. यातून सांस्कृतिक बदल घडण्यास मदत होते.

आपल्या संभाषण कौशल्याच्या बळावर त्यांनी चाकण, मावळ, शिक्रापूर, खेड, पिंपरी चिंचवड मधील तीन हजार लोकांना संभाषण कौशल्यांचे प्रशिक्षण दिले.

प्रदीप कदम या वाचकास नेहमी असे वाटते की, लोक मूळ ग्रंथ कमी वाचतात. कारण खरी वास्तविक माहिती ही मूळ ग्रंथामध्ये असते. त्यामुळे आताचा युवक हा संगणक, यु–ट्युब, ट्विटर, व्हॉट्सअॅप मोबाईल वाचनाचे साहित्य म्हणून इलेक्ट्रानिक्स मीड्यिाकडे वळलेला दिसतो. म्हणून त्यांनी त्यांचे व्याख्याने यु–टयुबवर अपलोड केलेली आहेत त्यामुळे जो युवक वर्ग ते यु–ट्युब वरून ते ऐकत असतो.

ते एक अभ्यासक म्हणून वाचक वर्गाचे ते अंतरंग ओळखून त्यांना काय दयायला पाहिजे, कोणते ज्ञान त्यांस महत्त्वाचे आहे, याचे ते नेहमी चिंतन करून लोकांस ते प्रबोधन करण्याचे काम करतात. कोणताही महापुरुष समजून घ्यावयाचा असेल, तर त्यासाठी वाचन करणे गरजेचे आहे. लोकांना वरवरच्या ऐकीव गोष्टीवर लोक विश्वास ठेवताना दिसतात, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे वास्तविक शिवाजी राजे, संभाजी राजे कसे होते, त्यांची जीवन जगण्याची पद्धती कशी होती, आपण ही त्यांचा आदर्श का घेतला पाहिजे, असे ते नमुद करतात.

**विश्लेषण :–** सांगण्याचे तात्पर्य एवढेच आहे की, वाचनाने व्यक्ती प्रगल्भ बनतो. चांगले काम व वाईट काय या लोकांनी विचार करावा, म्हणून त्यांनी आपले वेगवेगळ्या विषयाची व्याख्याने यु–ट्युब, व्हॉट्सअॅप मासिके, न्युजपेपर या मिड्यिाच्या माध्यमातून ते प्रसारित करीत असतात व ते लोकांना या आधुनिक युगात प्रबोधन करतात. मी घडलो या वाचकाच्या माध्यमातून असे ते सांगतात. म्हणून वाचनाचे माध्यम जरी बदलले तरी वाचन चळवळ ही अविरतपणे काम करत आहे.

**केस नं.२**

माया सातपुते या वाचक देहूगाव (विठ्ठलवाडी) हवेली तालुक्यातील आहेत. यांच्या आई वडिलांचे लहानपणीच एका अपघातामध्ये निधन झाले. चार भांवडे यांना सांभाळायचे कसे, याची जबाबदारी पुर्ण माया सातपुते यांच्यावर येऊन पडली. सगळ्या भावंडाला सांभाळायचे, गावातच त्यांची आत्त्या असत्यामुळे आत्त्यांनी या निराधार मुलांना सहारा दिला. माया सातपुते यांचे जेमतेम ९ वी पर्यंत शिक्षण झाले. आत्याने तिची जबाबदारी म्हणून त्यांचे लग्न एका ड्रायव्हर सोबत लावून दिले. लग्न झाले असले, तरी त्यांना त्यांच मन स्वस्थ बसू देत नव्हते. त्यांना नेहमी वाटायचे की, निराधार मुलांसाठी काही तरी केले पाहिजे. परंतु मार्ग सापडत नव्हता अशातच त्यांना दोन अपत्य झाले. अपत्य झाल्यानंतर त्यांच्या संगोपन करताना त्यांना वाटले की, आपण आता काहीच करू शकत नाही. त्या नेहमी विचारात आणि उदास असायच्या.

शेजारी असणाऱ्या एका कुटुंबाशी त्यांची ओळख झाली. ते कुटुंब शिक्षित होते त्यांच्याकडे न्युजपेपर, वेगवेगळ्या विषयाची पुस्तके, समाजसुधारकाची पुस्तके, आत्मकथने अशी या कालावधीमध्ये त्यांना हे पुस्तके वाचावयास भेटली. याच कालावधीत पेपरला जाहिरात आली. बालवाडी कोर्सची त्यांनी ते कोर्स पूर्ण केला.

बिनाताई यांचे त्यांच्या जीवनामध्ये खूप महत्त्वाचे स्थान आहे. सहा महिन्यांसाठी त्यांना अंगणवाडीमध्ये काम करण्याची संधी मिळाली. सहा महिन्यांनंतर पुढे काय हा प्रश्न पुढे होताच शिक्षण कमी त्यामुळे त्यांना एका सरांनी Y.C.M. मुक्त विद्यापीठात तुम्ही तुमचे शिक्षण पूर्ण करू शकत असे सांगितले. काही दिवसांनी YCMOU ची पूव तयारीची परिक्षा दिली व या परिक्षेत मायाताई पास झाल्या व त्यांनी पुढील शिक्षण घेण्यास सुरूवात केली.

त्यांनी फोर्स मार्शल, योजक प्रगती स्वाधारमध्ये काम करताना वेगवेगळ्या विषयासंबंधी चर्चा सत्रे होत गेली, त्याचबरोबर वेगवेगळ्या विषयाची प्रशिक्षण ही त्यांना मिळत गेले. त्यामुळे वेगवेगळे विषय अभ्यासणे, त्याची मांडणी करणे व नवनवीन गोष्टी शिकणे, याकडे त्याचा जास्त कल होता.

त्यांनी लहानपणापासून खूप संघर्ष पाहिला आहे. त्यामुळे महिलांचे दुःख काय असते, त्यांच्या अडचणी काय असतात, याची त्यांना पुरेपुर जाणीव असत्यामुळे सेवाभावी संख्येत काम

करत असताना त्यांचा बऱ्याच महिलांशी संपर्क येत गेला व सामाजिक संस्था काय? कशी? याबद्दलही त्यांना माहिती होत गेले. मनात विचार आला, हेच काम मी स्वतःची N.G.O. संस्था उभारुन हे काम करू शकते. म्हणून त्यांनी ११ नोव्हेंबर २०१९ ला युनिक सोशल फाउंडेशनची स्थावना केली महिलांना एकत्र आणण्यासाठी वेगवेगळ्या बचत गटाची निर्मिती करून ५०० महिलांना युनिक फाऊंडेशनच्या माध्यमातून त्यांना रोजगार देण्याचे काम या मायाताई या वाचकाने केले आहे, असं त्यांनी सांगितले.

**विश्लेषण :–** या वाचकाचे मुळात शिक्षण कमी असून आपण काहीच करू शकत नाही, असा विचार न करता, उदास न होता त्यांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे व त्यांच्याकडे असलेल्या ज्ञानाच्या आधारे सेवाभावी संस्थाकडून लोकांना आधार देण्याचे काम करतात.

**केस नं. ३**

हरिदास रोहिदास भांगे हे वाचक (हवेली) तालुक्यातील सांगवी या गावचे रहिवासी आहेत. त्यांचे लहानपण अगदी दारिद्र्यात गेले. गावातील दारूच्या दुकानाच्या समोर चणे–फुटाणे विकत असे. तसेच, घरच्या शेळया व इतर रोजंदारीवर कामे करणे, तसेच गावातील इतर कामे ते करत. कामाची कोणतीही लाज न बाळगता १० वी पर्यंत शिक्षण पूर्ण केले.

ते दहावीच्या नंतर आत्याकडे रहावयास गेला. कारण आत्याच्या घराजवळ महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी सोय होती. पुण्यातील लष्कर भागामध्ये किराणा दुकानात नोकरी केली. महाविद्यालयीन शिक्षण घेत कामे करू लागले. त्यामध्ये त्यांचे काही मित्र पेपर टाकण्याचा उद्योग करीत होते व एका मित्राचे पुणे स्टेशनला मॅक्झिन व पुस्तकाचे दुकान होते. मित्राकडे भेटण्यासाठी गेले की त्यांना मित्रासोबत गप्पा मारताना बरीचशी मॅक्झिन, पेपर, पुस्तके चाळता येत होती. त्याच्या बुकस्टॉलवर त्यांचे मन रमत होते. मग मित्राने सांगितले की, तू काही दिवस बुकस्टॉलवर काम करावे. मग त्यांनी दोन वर्ष बुकस्टॉलवर महाविद्यालयीन शिक्षण घेत घेत काम केले. पदवीच्या तिसऱ्या वर्षात असताना त्यांना एका ग्रंथपाल सरांनी ग्रंथालयाचे महत्त्व सांगितले. त्यामुळे नोकरी मिळेल, या आशेने त्यांनी B.Lib, M.Lib हे ग्रंथालयाचे कोर्स केले.

एका दिवशी रुबी हॉलमधील डॉक्टर त्या बुकस्टॉलवर पेपर मॅक्झिन घेण्यासाठी गेले असता त्यांची भेट या वाचकाशी झाली. त्यांनी हॉस्पीटलमध्ये ग्रंथपालाची जागा आहे, असे सांगितले. त्यानुसार त्यांनी मुलाखत देऊन त्यांची निवडही झाली. याच दरम्यान त्या ग्रंथालयामध्ये वेगवेगळी पुस्तके वाचण्यास भेटली. त्याचबरोबर या पुस्तकाबरोबर जिवंत माणसे ही भेटली. या वाचकाचा अगोदरचा सोशक पिड होता. त्यांना दवाखाण्यात आलेली ओळखीचे असो वा अनओळखी त्यांना ते वेगवेगळ्या पद्धतीने मदत करत असत. त्यामुळे त्यांचा संपर्क आणखी वाढला.

त्यांनी ग्रंथालयातील असणारी साधन सामग्रीबरोबर, संगणक, मोबाईल इत्यादीच्या माध्यमातून लोकांना ज्या तज्ज्ञ डॉक्टरांची आवश्यकता आहे, अशा लोकांना ते त्या डॉक्टरांना भेट घडवून देत. दवाखान्यात लोकांना हे गृहस्थ भेटल्यास देव माणूस भेटला असे वाटत असे. कारण दवाखान्याचे बिल, मेडिकलचे बिल लोकांच्या अडचणी लक्षात येऊन ते कमी करून देत होते.

हे वाचक म्हणतात, त्यांना शिक्षणाचे खरे महत्त्व पटले. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, दलित साहित्य आत्मकथा त्यामुळे त्यांना शिक्षणाची व वेगळे काहीतरी करण्याची आवड निर्माण झाली. म्हणून त्यांनी एम. ए. इतिहास पुणे विद्यापीठ केले. त्याचबरोबर या वाचनातून त्यांना समाजकारण व राजकारण याची आवड निर्माण झाली. त्यांनी अनेक राजकीय सभा, मोर्च व इतर माध्यमातून लोकांची व्याख्याने ऐकली. त्यांना असे वाटू लागले की, लोकांना न्याय देण्यासाठी आपण कायद्याचे शिक्षण घेतले पाहिजे. म्हणून त्यांनी L.L.B. चे शिक्षण पुर्ण केले. ते पुणे येथील शिवाजीनगर कोर्टात वकिली करत आहेत. अनेक वंचित व दलित व गरीब समाजाचे प्रश्न व त्यांच्यावर दाखल केलेले गुन्हे ते सोडवण्याचा प्रयत्न करतात, असे त्यांनी सांगितले.

**विश्लेषण :–** या वाचकाने आपल्या आलेल्या अनुभवाच्या आधारे समाजातील जे सर्वसामान्य लोक आहेत, या सामान्य लोकांना माहितीचा पुरवठा झाला पाहिजे किंवा ज्या सुविधा आहेत ते त्यांच्यापर्यंत पोहचल्या पाहिजेत, त्या अनुषंगाने लोकांना मदत करण्याचे काम ते करत असतात. हे त्यांना वाचन चळवळीमुळे शक्य झाले.

**केस नं. ४**

बापुसाहेब ग्या. गायकवाड हे वाचक चिंचवडगाव (हवेली) मधील आहेत. ह्या वाचकांची त्यांच्या गावामध्ये वेगळीच ओळख होती. त्यांना गावगुंड म्हणून ओळखले जायचे. १० वी पर्यंतचे शिक्षण कसेतरी झाले. कारण मित्रपरिवार हा पुर्णपणे व्यसनाच्या आहारी गेलेला. सकाळी उठले की दारूनेच तोंड धुणे, अशा पद्धतीने हे वाचक दारूच्या आहारी गेलेले होते.

१२ वी पास कसे बसे झाले. कारण घरचा आणि शिक्षणाचा तसा काहीही संबंध नव्हता. १२ वी पास झाले. तेथील स्थानिक राजकीय कार्यकर्त्यांने त्यांना कचरा गाडीवर नोकरीला लावले. नोकरी कसली का असेना म्हणून शेजारीच ओळखीचे नातेवाईक यांनी त्यांना आपली मुलगी दिली. लग्न झालं, पगार पुरेना म्हणून त्यांना आणखीनच जास्त दारूचे व्यसन जडले. त्या वाचकाचे दररोजचे जगणे म्हणजे सकाळी ६ वा. पासून ते रात्री झोपेपर्यंत दारू पिणे, हाच कार्यक्रम होता. त्याचबरोबर उनाडक्या, भांडणे करणे, अशा स्वरूपाची त्यांची जगण्याची पद्धती होती.

शिक्षण १२ वी पर्यंत झालेले पण त्याची किंमत नव्हती. ते एके दिवशी एका मित्राच्या आग्रहाने हॅप्पी थॉट येथे व्याख्यान ऐकण्यासाठी गेले. तेथे वेगवेगळ्या समाजसुधारकांची पुस्तके होती. ते पुस्तके वाचायला लागले. त्याचबरोबर गुन्हेगारी क्षेत्रातील मित्र कमी कमी होत गेले. वाचन, व्याख्यान याच्यामुळे त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल होत गेला. वाचनामुळे त्यांनी कचरा गाडीवर काम करत टायपिंगचा कोर्स केला. त्या बेसवर त्यांना क्लार्क म्हणून नियुक्ती झाली. हळूहळू ते वाचनाकडे आकर्षित झाले. दारू सोडून दिली. गुन्हेगारीचा संबंध सोडून दिला. ते म्हणतात की, हा बदल केवळ व केवळ वाचनामुळे झाला आहे. नंतर त्यांनी पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले.

काही दिवसानंतर पालिकेत एका अधिकारी पदाची परिक्षा झाली व ती परिक्षा पास होऊन ते वर्ग दोनचे अधिकारी झाले. तेव्हापासून तर त्यांनी समाजातील गरीब व होतकरू लोकांना वह्या देणे, पुस्तके देणे, गरीब विद्यार्थ्यांची फिस भरणे, असा त्यांचा वेगळा उपक्रम चालू झाला. सामाजिक बांधिलकी म्हणून जे गरजू गरीब लोक आहेत, त्यांना पुर्णतः मदत करणे, हे केवळ वाचनामुळे शक्य झाले, असे ते सांगतात.

**विश्लेषण :–** हे वाचक गुन्हेगारी व पूर्ण व्यसनाच्या आहारी गेलेला. परंतु चांगली पुस्तके व चांगल्या लोकांचे विचार यामुळे त्यांच्या जीवनात खूप मोठा बदल झाला आहे, असे त्यांनी सांगितले.

त्याचबरोबर आपल्या मुलांनी चांगले शिक्षण घ्यावे, यासाठी ते सतत प्रयत्नवादी होते. त्यामुळे त्यांनी मुलांला डॉक्टर व मुलीला इंजिनिअर बनवले व पत्नीला स्टाफ नर्स बनवले. हे त्यांच्या जीवनाचे फलित आहे व ते वाचन चळवळीने केले आहे, असे म्हणतात.

**केस नं.५**

वैभव रोहिदास पोखरकर (आंबेगाव) तालुक्यातील पिंपळगाव खडकी गावचा रहिवाशी. घरची परिस्थिती अगदी बेताचीच म्हणजे आई वडील दोघेही अल्पभूधारक शेतकरी. उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडवावा म्हणून वडिलांचा जोडधंदा म्हणून मंडपाचा छोटासा व्यवसाय व आईचा कपडे शिवण्याचा व्यवसाय. घरी थांबल्यावर कामेच करावी लागायची म्हणून साहजिकच वैभवचे शाळेमध्ये मन रमले. त्यामुळे पुस्तके वाचनाची गोडी निर्माण झाली. शालेय जीवनात आयोजित वक्तृत्व स्पर्धेमध्ये सहभागी होण्याची धडपड, त्यात मिळालेली शाबासकी आणि कौतुक यामुळे सातत्याने व्यासपीठाची ओढ निर्माण झाली आणि त्यातुनच विविध विषयाच्या संदर्भाने पुस्तक चाळण्याची सवय जडली. या वाचन संस्कृतीच्या जोपासणेमध्ये प्राथमिक स्तरावर मदतीचा हात मिळाला तो शालेय पुस्तकांचा. १२ वीपर्यंत वैभव याने एकही वादविवाद स्पर्धा सोडली नाही. सांस्कृतिक स्पर्धांमध्ये नाटक बसवणे, नृत्यात वादविवाद, प्रश्नमंजुषा निबंध स्पर्धामध्ये सहभागी होणे, हा त्यांचा छंद होता.

गुणपत्रिकेच्या जोरावर त्याने सायन्स घेतले. पण मूळ कलेचा गाभा स्वस्त बसु देत नव्हता. मनाच्या याच अस्वस्थेमुळे साहजिकच बारावीमध्ये याला अपयशाला सामोरे जाऊे लागले, पण याच कारणामुळे संगणकाचे ज्ञान त्याला शिकावयास मिळाले.

संगणकीय क्षेत्रात पदवी घ्यावयाची म्हणून एका महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला. कमवा शिका योजना, राष्ट्रीय सेवा योजना, डेव्हलपमेंट प्रोग्राम अशा अनेक शालेय उपक्रमामध्ये सहभागी त्याला होता आले. त्यामुळे साहजिकच, सामाजिक सांस्कृतिक, आध्यात्मिक शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्राशी जवळून संबंध आला. राष्ट्रीय सेवा योजनामध्ये राबवलेल्या विविध उपक्रमाच्या बातम्या बनवण्याची जबाबदारी त्याच्यावर असे. त्यामुळे साहजिकच बातम्या तयार करण्यापासून त्या न्युजपेपरला प्रकाशित करण्याची जबाबदारी त्यांच्यावरच असे. कळत नकळत हा वाचन

संस्कृतीशी संलग्न होत गेला. महाविद्यालयाने कॅमेरा घेतला. विविध कार्यक्रमामध्ये तो फोटोग्राफरचे काम करू लागला.

महाविद्यालयातील एका प्राध्यापकाने व्याख्यानाच्या आधारे एक विचार मांडला आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी नोकरी करणे सोपे असते. परंतु उपजत ज्ञानाच्या जोरावर गरजू लोकांसाठी विधायक काम करण्याचे धारिष्ट्य दाखवून कार्यरत राहणे, फार अवघड असते. पदवी प्राप्त केल्यानंतर गावातील शाळेमध्ये संगणक शिक्षक म्हणून काम केले. २०१२ मध्ये गावात इंटरनेट आणले. ज्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक अद्यापणाबरोबर गुगल, युटयुब फेसबुक, स्काईप, टीम–व्हीव्हर त्याची ओळख करून दिली. समवेत शाळेत गावची बेबसाईट बनवली. गावात परदेशी पाहुणे आणले याचा फायदा गावामध्ये कंम्प्युटर इंजिनियरिंगचे शिक्षण घेणाऱ्याचे प्रमाण वाढले. आज ऑडीओ व्हिडिओ वेबसाईट, इव्हेट–प्रेझेन्टेशन आणि सेमीनार अशा विविध माध्यमातून त्याचे काम सुरू आहे.

१०० हून अधिक वेबसाईट ३००० हजारहून अधिक ऑडीओ क्लिप ५० हून अधिक डॉक्युमेंटरी समवेत वारकरी संप्रदायाचा वसा, वारसा जपणाऱ्या अनेक नामांकित कीर्तनकार महाराजांना यु–ट्युबच्या माध्यमातून कीर्तन, प्रवचन, स्वरूपात प्रतिपादीत करणे तसेच नवोदीत कलाकार यु–ट्युब चॅनलच्या माध्यमातून सोशल मीड्यावर झळकावण्याचे काम चालू आहे.

**विश्लेषणः–** सांगण्याचे तात्पर्य, या वाचकामध्ये प्रत्येक कामात नाविन्यता असत्यामुळे साहजिकच हे विषय हाताळताना, माहिती गोळा करण्यासाठी इंटरनेच्या सोशल नेटवर्कींगच्या आणि संबंधित वाचनाच्या साहाय्याने सामाजिक तथा आर्थिक, सांस्कृतिक जडण घडण अधिक बळकट बनवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

### केस नं. ६

आंबेगाव तालुक्यातील अवसरी गावचे शंकर हिंगे हे पारंपरिक पद्धतीने आपली शेती करत. त्यामुळे शेतीमधील उत्पन्न हे जेमतेम निघत होते. त्यामुळे घरची परिस्थिती खूप बेताची त्यात तीन मुली एक मुलगा असा परिवार. शेतीवर झालेला खर्चसुद्धा या उत्पादनातून मिळत नव्हता. त्यामुळे त्यांना असे वाटायला लागले की, शेती करण्यापेक्षा मजूरी केलेली परवडेल, असे त्यांना वाटू लागले.

एका दिवशी ते गावातील सहकारी सोसायटीत कामानिमित्ताने गेले असता त्यांच्या वाचनात सकाळ ॲग्रोवन पेपर आला आणि नित्याने तो पेपर वाचू लागले. त्यातून त्यांना शेती कशी करावयाची, याची प्रेरणा मिळाली. त्यांनी तशा स्वरूपाचे पेपर मासिके वाचनात आली. त्यांनी त्यातील शेतीविषयक माहितीचा उपयोग स्वतःच्या शेतीत करून प्रचंड उत्पादन घेतले. ते लोकांना अभिमानाने सांगतात हे सर्व बदल सकाळ ॲग्रोवन पेपर वाचनामुळे झाला आहे. शास्त्रीय पद्धतीने शेती कशी करावयाची आणि उत्पादन कसे घ्यायचे, याचे सर्व ज्ञान या ॲग्रोवन पेपरमुळे कळाले.

माती परीक्षण, पाण्याचे नियोजन, औषध फवारणी, बाजार भाव, सरकारी योजना या सर्वांची माहिती त्यांना ॲग्रोवन पेपर व तत्सम मासिकातून त्यांना सहज उपलब्ध झाली. त्यांनी गेल्या तीन वर्षात स्वतःची फळबागा, भाजीपाला, ऊस व इतर पिके घेऊन स्वतःची आर्थिक परिस्थिती खूप सुधारली आहे. ते एक आदर्श शेतकरी आहेत व ते इतर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतात. मागील तीन वर्षातील उत्पन्न, ऊसाचे एकरी १० टनाचे उत्पन्न, भाजीपाला, शिमला मिर्च, साधी मीरची यातून दरवर्षी दहा लाखाचे उत्पन्न काढतात ते लोकांना अवर्जून सांगतात की वाचन हे मानवी जीवन बदलू शकतो.

**विश्लेषण :–** वाचन साहित्य ही माणसाला लागणारे वैचारिक खाद्य पुरवत असते. परंतु साहित्याचा स्वतःच्या प्रगतीमध्ये कसा वापर करावयाचा व समाजाला कसा द्यावयाचा हे तुम्ही त्या गोष्टीकडे कसे पाहता, यावर अवलंबून असते, हे या शेतकऱ्यांनी सांगितले आहे.

**केस नं.७**

किशोर सुनील ढोरे हे **(मावळ)** तालुक्यातील मळवंडी ढोरे या गावातील हे वाचक आहेत. व्यष्टी अध्ययनाच्या माध्यमातून त्यांनी दिलेली माहिती अशी आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण हे त्यांच्या मूळ गावी झाले. गावाबद्दल सांगायचे झाले, तर मावळ तालुका जरी पुणे जिल्ह्यात असला तरी देखील

हे गाव मागासच आहे. यामुळे शिक्षण घेताना शिक्षणाबाबत एवढी आस्था नव्हती. किशोर ढोरे हे शेतकरी कुटुंबातील असल्याने गाई म्हशींना डोंगरात नेऊन चारणे, त्यांना धुणे यामध्ये शाळेपेक्षा जास्त मन रमत होते. प्राथमिक शिक्षणानंतर शेजारच्याच गावात ८ वी ते १० वी पर्यंत शिक्षण झाले. नंतर ११ वी व १२ वी साठी तालुक्याला सायन्सला ॲडमिशन घेतले.

गावामधून तालुक्याला आल्यावर नवीन मित्र, त्यांच्यातील विचार करण्याच्या पद्धती, टि.व्ही. वरील विविध चॅनेल त्याचबरोबर मोबाईल फोन संगणक, वॉटसप वेगवेगळे न्युज पेपर, विविध मासिकातील लेख यामुळे ते या सर्व गोष्टीमध्ये रमले. त्यांनी ठरवले की, आपल्या गावाकडील मित्र, नातेवाईकातील मुल यांनासुद्धा या साहित्याचा वापर करता आला पाहिजे. त्यासाठी आपण यांच्यासाठी काहीतरी केले पाहिजे, म्हणून त्यांनी गावातील काही मुलांना तालुक्याच्या ठिकाणी नेऊन, मोबाईल, दुरूस्ती, संगणक प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न केला.

ते ज्या वेळी गावी जात तेव्हा ते प्रेरणादायी पुस्तके वाचत असे. ते वाचन साहित्यात रमले त्यांना अवांतर वाचनाच्या साहित्यातून आपण काहीतरी वेगळे केले पाहिजे, असे त्यांना वाटू लागले बारावी सायन्स उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी बी.ए. करण्याचे ठरवले. बी.ए. पुर्ण केल्यानंतर वृत्तपत्र वाचनाच्या आवडीने मागील सहा वर्षांपासून ते पत्रकार म्हणून काम करत आहेत.

वाचनाच्या आवडीने त्यांना गप्प बसू दिले नाही त्यांनी गप्प बसू दिले नाही. त्यांनी M. A. Economics होऊन Journalism Mass Communication या विषयात पदवी घेतली. आता ते L.L.B. चे शिक्षण पुर्ण करत आहेत.

**विश्लेषण :–** सांगण्याचे तात्पर्य, मूळ गाव हे जरी मागासलेले असले तरी ते काही प्रेरणादायी पुस्तके वाचून त्याचबरोबर संगणक व इतर आधुनिक तंत्रज्ञानाच्या माहितीमुळे पदवी, पदवीत्तर पत्रकारिता, L.L.B. करू शकले. हे बदलत्या वाचन साहित्याचे यश आहे, असे म्हणावे लागेल.

**केस नं.८**

राजाराम रामभाऊ जाधव पाचाने **(मावळ)** शेतकरी कुटुंबामध्ये यांचा जन्म झाला. गावामध्ये ५ वी पर्यंतचे शिक्षण असत्यामुळे आणि शिक्षणाचे माहिती नसणे, अपुरी सुविधा, अपूरी दळणवळणाची साधने आणि शेतीतील कामे यामुळे शिक्षण थांबले. ते मोठ्या भावाबरोबर शेतावर काम करायला लागले. कुस्तीची आवड असत्यामुळे त्यांना त्यांच्या वडिलांनी कोल्हापूरला तालमीत ठेवले. या ठिकाणी त्यांना वाचनाची आवड निर्माण झाली. कारण तालमीच्या समोर वाचनालय होते. या वाचनालयातून त्यांनी विविध पुस्तके आणून वाचायची. शाहू महाराजांबद्दल वाचन केले. त्यांनी बांधलेल्या राधानगरी धरणाचा इतिहास वाचला. शाहू महाराजांनी शिक्षणाबद्दलची ओढ समजून घेतली. यातूनच विविध पुस्तके वाचावीत, असे वाटू लागले.

याच काळात त्याने थोर पुरुषांचे विचार वाचले. महात्मा फुले यांची गुलामगिरी व शेतकऱ्याचा असुड या पुस्कांनी विचार करण्याची पद्धत बदलून टाकली. शेतकरी व त्यांच्या समस्या समजल्या या नंतर त्यांनी शेतीविषयक पुस्तके वाचावयास सुरुवात केली. त्यामुळे त्यांनी शेतामध्ये विविध प्रकारची झाडे लावली. या झाडातून त्यांना चांगला आर्थिक फायदा झाला. त्याचबरोबर त्यांनी दुधाचा व्यवसाय सुरू केला. यासाठी लागणारी यंत्रणा आर्थिक मदत त्यांच्या भावाकडून त्यांना मिळाली. आज त्यांच्याकडे सुसज्ज व सर्व सोयी नियुक्त असा गोठा आहे. त्यांनी जैविक शेतीचा प्रयोग यशस्वी केला. त्यांनी सांगितले की, शेतकरी मासिकातून त्यांना जैविक शेतीबद्दल माहिती मिळाली. अगोदरपासूनच त्यांच्याकडे जनावरे भरपूर असत्यामुळे शेण खताचा साठा भरपूर होता. अभ्यास करून त्यांनी कंपोस्ट खत व गांडूळ खत निर्माण केले. त्यांनी या गोष्टी विकत न घेता स्वतःच्या शेतात वापरल्या त्याच्यातून तयार झालेले धान्य ते स्वतःच्या परिवारासाठी व भावाच्या परिवारासाठी वापरतात. असे म्हणतात की, जैविक शेती उत्पादने यांना बाजारात योग्य मूल्य मिळत नाही म्हणून ते स्वतः वापरतात व त्यांच्या मित्रांना देतात.

निसर्गाच्या सान्निध्यात राहणे, व्यायाम करणे, जैविक आहार घेणे ही त्यांच्या आयुष्याची त्रिसुत्री आहे. त्यांनी त्यांच्या मित्राला देखील त्यांच्या शेजारी जमिनी घेऊन दिल्या व त्यांना जैवीक शेतीचा आग्रह धरला.

टि. व्ही. वरील शेतीविषयक कार्यक्रमामध्ये त्यांना खूप फायदा झाला. रासायनिक खतांचे व औषधांचे दुष्परिणामांना पाहता ते जैविक शेतीकडे वळाले.

**विश्लेषण :–** वाचन संस्कृतीमुळे सुरू झालेली त्यांची वाटचाल पुढे तंत्रज्ञानाच्या साहय्याने यशस्वी झाली. वाचनाबरोबरच रेडिओवरील विविध कार्यक्रम, शेती प्रदर्शने, टि.व्ही. वरील कार्यक्रम या सर्वांचा वापर करून त्यांनी यशस्वी शेतकरी बरोबरच पर्यावरण प्रेमी व जैविक शेतीचा आग्रह धरणारे शेतकरी असा यशस्वी प्रवास केला. आज ते लोकांना प्रेरणा देऊन इतरांचा प्रवास सुखकर होईल, यासाठी ते प्रयत्न करत आहेत.

## केस नं.९

सचिन चंद्रकांत गायकवाड हे वाचक तळेगाव या गावचे **(मावळ)** असून त्यांनी वाचनाच्या माध्यमातून ते ग्रंथालयाकडे वळले व ते स्वतः ग्रंथपाल बनले. ते समाजातील एककामध्ये ज्यावेळेस जातात. त्यावेळेस लोकांना त्या पुस्तकाचे महत्त्व पटवून देतात. या पुस्तकामुळे लोकांना जी माहिती मिळले, ती माहिती वास्तविक असते त्याचा उपयोग प्रत्येकाचे जीवनामध्ये होतो, असे त्याचे मत आहे.

इयत्ता दुसरीत असताना क्रमिक पुस्तके, गोष्टीची पुस्तके, बालभारतीची पुस्तके, त्यातील धडे, कविता आणि चित्रे यामुळे वाचनाची आवड निर्माण झाली.

महाविद्यालयीन शिक्षण घेताना शिक्षण नेमके घ्यायचे कशासाठी, हा पेच त्यांच्या समोर होता. परंतु घरची परिस्थिती नाजूक असत्यामुळे लवकर नोकरी लागावी, या दृष्टीकोनातून काहीतरी कोर्स केला पाहिजे, हे त्यांना सरांनी सांगितले. कारण सरांना त्यांच्या परिस्थितीची जाणीव होती. म्हणून त्यांनी सांगितले की, तू ग्रंथपालाचा कोर्स करावा म्हणून त्यांनी पदवीनंतर B.Lib, M. Lib हे शिक्षण पूर्ण केले. याच कालवधीत त्यांनी पुस्तके परीक्षण करताना वेगवेगळे पुस्तक हाताळण्यात आले. यातून त्यांचा वाचनाचा आवाका वाढला. ग्रंथपाल होण्यासाठी सेट, नेट परीक्षा पास होणे अनिवार्य होते. त्यामुळे त्याने अनेक पुस्तके वाचली व नेट, सेट ही परीक्षा त्यांनी उत्तीर्ण केली. परिक्षा उत्तीर्ण झात्यामुळे त्यांना एका महाविद्यालयात ग्रंथपाल म्हणून नोकरी लागली.

महाविद्यालयामध्ये त्यांचे आणि विद्यार्थ्यांचे नाते हे वेगळे तयार झाले. कारण विद्यार्थ्यांने वाचन केले पाहिजे. त्यांनी कॉलेजमध्ये येऊन टाईमपास नाही केला पाहिजे. त्यांच्याकडे जे विद्यार्थी येत होते, त्यांना सतत ते सांगतात, कोणते मासिक वाचावे, पुस्तके कोणती वाचावी, स्पर्धा परीक्षेसाठी कोणते वाचन करावे, असे सतत ते विद्यार्थी केंद्रीत होते.

महाविद्यालयात ग्रंथालयाच्या माध्यमातून ते विद्यार्थ्यांना संगणक, ई–मेल, इंटरनेट, क्वीज कॉम्पिटीशन, नेटवर सर्चिंग कसे करायचे, वेगवेगळ्या वेबसाईटची माहिती विद्यार्थ्यांना ते देत. त्यांचे विद्यार्थी हे वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत आहेत, हे त्यांच्या वाचनाने साध्य झाले.

**विश्लेषण :–** आम्ही वाचनामुळे घडलो, तुम्हीही वाचनामुळे घडा, असे त्यांना वाटते. 'वाचाल तर वाचाल' या रंगनाथन यांच्या माहितीनुसार समाज चांगला घडेल म्हणून ते समाजाभिमुख कार्यक्रम सतत सहभागी असतात हे वाचनामुळे शक्य झाले, असे ते म्हणतात.

### केस नं. १०

बांदल विलास अमृतराव हे वाचक **(भोर)** तालुक्यातील संगमनेर या गावचे रहिवाशी आहेत. त्यांनी लहानपणापासूनच समाजभिमुख अशा कार्याची त्यांना आवड आहे. वडील गावातील समाजकारण व राजकारणाचा गावाच्या जडणघडणीमध्ये त्यांचा महत्त्वाचा सहभाग असत. वडिलांकडून व घरात ग्रंथसंपदा टी.व्ही., रेडीओ, संगणक इत्यादी बाबींचा त्यांच्या मनावर समाजभिमुख असा परिणाम झाला.

लहानपणी गावामध्ये शाळेत असताना २६ जानेवारी १५ ऑगस्ट या राष्ट्रीय सणासाठी ते भाषण करण्यासाठी आवर्जून सहभागी होत असत. ते वर्तमानपत्रे, मासिके, मराठीतील वेगवेगळे साहित्य वाचनाची त्यांना सवय झाली. त्यांना नेहमी वाटत असत की, आपण समाजातील गरीब लोकांसाठी काही तरी केले पाहिजे. यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असत. महाविद्यालयीन म्हणजे B.Com झाल्यानंतर त्यांनी M.B.A. चे शिक्षण पुर्ण केले. नंतर L.L.B. चे शिक्षण पुर्ण केले. B.Lib, M.Lib असे त्यांनी उच्चशिक्षण पुर्ण केले.

नोकरी करावी, हा त्यांचा पिंड नव्हता. परंतु एवढे शिक्षण असत्यामुळे ते एका महाविद्यालयात ग्रंथपाल म्हणून नोकरी करू लागले. नोकरी जरी पत्करली असली, तरी त्यांनी गावाकडे दुर्लक्ष केले नाही. सर्वसामान्य मुलांना चांगले शिक्षण मिळावे, म्हणून त्यांनी शिक्षण संस्था काढली व या शिखण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी ५ शाळा वेगवेगळ्या गावामध्ये सुरू केल्या. ज्या गावामध्ये या शाळा सुरू केल्या त्या गावातील गरीब मुलांना चांगले शिक्षण मिळावे, इंग्रजी माध्यमाचे शिक्षण मिळावे, म्हणून त्यांनी इंग्रजी माध्यम शाळा सुरू केल्या.

गावामधील सर्वसाधारण व्यक्ती त्यांनी ध्येय ठरवले की, समाजाचे आपण काही तरी देणे लागतो. त्या अनुषंगाने त्यांनी शाळेच्या माध्यमातून समाजकार्यास सुरूवात केली.

**विश्लेषणः–** या वाचकाने गावामधील जे असणारे राजकारण आहे. त्या राजकारणाला समाजकारणाचा आधार दिला. गावामध्ये असणाऱ्या समस्या जाणून घेऊन त्या समस्या कशा सोडवल्या पाहिजे, याचा त्यांनी कृती आराखडा तयार केला. त्यामध्ये तंटामुक्ती, सार्वजनिक पाणवठा, अंधश्रद्धा निर्मूलन, जातपंचायत शेतकऱ्यांच्या समस्या, महिलांच्या समस्या इ. विविध प्रश्न सोडवून गावाला एक आदर्श बनवण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये दारूबंदी, गुटखा बंदी, तंबाखू बंदी असे वेगवेगळे कार्यक्रम लोक सहभागातून त्यांनी पूर्ण केले.

**केस नं.११**

सु. ल. खुटवड हे वाचक उबरे **(भोर)** या मुळगावचे रहिवाशी असून डोंगरी व अशिक्षित असा समजल्या जाणाऱ्या भागातून आपली प्रगती केलेली आहे. इयत्ता बारावीमधून नापास झाल्यानंतर निराशेपोटी आत्महत्येचा प्रयत्न केला. गावामध्ये लोकांकडून मिळालेल्या अपमानास्पद वागणूकीमुळे शेवटी त्यांनी शिक्षण सोडून गुरे राखण्याचे काम केले. डोंगरामध्ये गायी व म्हशींना चारण्यासाठी घेऊन गेले असता रिकाम्या वेळेत पुस्तक वाचण्याचा छंद लागला व या वाचनामधूनच एक नवीन लेखक व पत्रकार उदयास आला. पवार सर यांच्या मदतीने पुनश्च या शिक्षण प्रवाहात आल्यानंतर महाविद्यालयातील ग्रंथालयातील सर्व पुस्तके वाचल्याचा विक्रम करून या वाचनवेड्या व्यक्तीने विविध प्रकारचे लेख महाविद्यालयीन काळामध्ये सकाळ, लोकमत, केसरी अशा नामांकित

वृत्तपत्रातून प्रसिद्ध केले. पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर वार्ताहार पदवीत्तर शिक्षण पूर्ण करून सकाळ या वृत्तपत्रामध्ये वार्ताहाराचे काम करण्यास सुरू केले.

त्यांच्या जीवनामध्ये वाचनाच्या आवडीमुळे आमूलाग्र बदल झाले. अपयशापोटी आत्महत्येकडे पाऊल उचलणाऱ्या व्यक्तीच्या जीवनामध्ये विविध वाचन माध्यमांनी व दृक श्राव्य माध्यमांनी अमुलाग्रह बदल घडवून आणले. यामध्ये टि.व्ही. व रेडिओ यांची योगदान महत्त्वाचे आहे. या माध्यमांमधून त्यांना मिळालेल्या ज्ञानाचा त्यांनी जीवनातील पुढील मार्ग सुकर करण्यासाठी उपयोग केला.

**विश्लेषण :–** सु. ल. खुटवड हे वाचक सकाळ वृत्तपत्राचे सहसंपादक म्हणून सध्या कार्यरत आहेत व आपल्या लेखनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करण्याचा सेवाभावी वसा त्यांनी स्वीकारलेला आहे. आधुनिकतेच्या काळामध्ये त्यांनी यु–ट्युब, फेसबुक व इंटनेट यांच्या माध्यमातून वाचन चळवळीला एक नवीन दिशा देण्याचे काम करीत आहे. सदर माध्यमांच्या साहाय्याने ज्ञान विस्तार व ज्ञानार्जन करून लिखानाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करण्याचा वसा त्यांनी वाचनाच्या माध्यमातून घेतलेला आहे.

### केस नं. १२

गायकवाड जीवन एकनाथ हे कामथडी **(भोर)** येथील हे वाचक आहेत. घरची परिस्थिती गरीबीची असल्या कारणाने शिक्षण क्षेत्र व वाचनाचा दूरान्वये, असा कोणताच संबंध नव्हता. शालेय शिक्षण घेत असताना वर्ग शिक्षकांकडून मिळालेले प्रेरणेमुळे वाचन करण्याची आवड निर्माण झाली.

वेगवेगळ्या प्रकारचे ज्ञानार्जन वाचनामुळे झाले. त्यामुळे शैक्षणिक क्षेत्रामध्ये प्रगती होण्यास मदत झाली. गावातील शेजाऱ्याकडे असणाऱ्या टि.व्ही. या उपलब्धेमुळे व वेळोवेळी दूरदर्शनवरील शैक्षणिक क्षेत्राची संबंधित असलेल्या कार्यक्रमाच्या पाहण्यामुळे वाचन करण्यास प्रेरणा मिळाली माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर उच्च शिक्षणासाठी महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतल्यानंतर महाविद्यालयातील समृद्ध ग्रंथालयाचा फायदा घेऊन ग्रंथालयातील वेगवेगळ्या विषयांच्या पुस्तकांचे वाचन करण्यात आले. विशेषतः वाणिज्य शाखेशी संबंधित असणाऱ्या पुस्तकांचे वाचनाची आवड निर्माण झाली. कारण महाविद्यालयीन शिक्षण वाणिज्य विभागातून पुर्ण करताना सदर वाणिज्य

शाखेशी संबंधित असण्याच्या वेगवेगळ्या पुस्तकाचे वाचन करण्याची संधी मला माझ्या जीवनात मिळाली.

या वाचनाच्या आवडीमुळे व सहजरीत्या उपलब्ध झालेल्या पुस्तकांने त्याच्या जीवनाला नवीन दिशा मिळाली पदवीचे शिक्षण पुर्ण केल्यानंतर महाविद्यालयामध्ये प्राध्यापक होण्यासाठी पदवी, पदव्युत्तर आवश्यक असणारी सेट परिक्षा उत्तीर्ण झात्यामुळे त्यांचा प्राध्यापक होण्याचा मार्ग सुकर झाला.

**विश्लेषण :–** सांगण्याचे तात्पर्य, ग्रामीण भागातील डोंगरी भागात गरीब कुटुंबात जन्माला आलेल्या सामान्य व्यक्तीला केवळ वाचनाच्या आवडीमुळे आपल्या जीवनामध्ये प्रगती करून महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून काम करण्यास संधी मिळाली. वाचनाच्या विविध घटकांचा वापर त्यांनी करून त्यामध्ये इंटरनेट, फेसबूक, E- लार्निंग, P.P.T हे माध्यमातून विशेष असे प्राविण्य मिळवून ते महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रभावीपणे शैक्षणिक सुविधाचा वापर कसा करावा, हे सांगत असतात.

**केस नं. १३**

गणेश बाळासाहेब गिरंजे हे वाचक सांगवी **(वेल्हे)** या मुळ गावातील रहिवाशी. गणेश बाळासाहेब यांच्या जीवनात वाचन चळवळीने व विविध प्रकारच्या पुस्तक वाचनामुळे झालेल्या बदलाबाबत अनुभव सांगत असताना असे नमुद केले की, शालेय जीवनापासून वाचनाची आवड होती. पण घरातील परस्थिती गरिबांची असत्यामुळे पुस्तके विकत घेऊन वाचणे परवडत नव्हते. गाई–म्हशींना चारण्यासाठी डोंगरात घेऊन जाताना टाईमपास म्हणून पुस्तकेवाचत असे. परंतु नंतर वाचनाची गोडी कधी लागली, हे समजले नाही. शेजारच्या घरातील T.V. वरील कार्यक्रम पहिल्यानंतर वाचनाची प्रेरणा मिळू लागली. रेडिओ व T.V. वरील विविध कार्यक्रम यामुळे वाचनातून ज्ञान मिळत, हे लक्षात आले. त्यामुळे त्यांचा ओढा वाचनाकडे वाढू लागला. महाविद्यालयात शिकत असताना राजकीय लोकांची भारदार भाषणे ऐकून प्रभावित झाले. त्यांच्यासारखे बोलण्यास यावे,

या अपेक्षेने त्यांनी राजकीय व विविध विषयावर पुस्तके वाचली. कॉलेज जीवनात शिकत असतात राजकारणाबद्दल आवड निर्माण झाली, पण भाषण करण्यासाठी ज्ञात व वाचनाची गरज आहे, हे समजून त्यांनी राजकीय नेत्यांची आत्मचरित्र वाचन व वेगवेगळ्या लोकांशी सुसंवाद करीत असतात. राजकारणातील विविध पैलूंचा उलगडा वाचनामुळे झाला व त्याचा उपयोग पुढील जीवनातील राजकारणाच्या वाटचालीसाठी झाला. मु. पोस्ट सांगवी बुद्रक या गावचा उपसरपंच म्हणून काम करताना त्यांना विविध वाचन केलेल्या पुस्तकातील ज्ञानाचा उपयोग भाषण संवाद तसेच लोकांना जोडण्यासाठी झाला.

भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती, वेल्हे या संघटनेत अध्यक्ष म्हणून काम करीत असतात. कायद्याशी संबंधित वाचलेल्या पुस्तकांमुळे वेगवेगळ्या लोकांच्या समस्या जाणून घेण्यास त्यांना मदत झाली. तसेच, वेल्हे तालुका विद्यार्थी काँग्रेस अध्यक्ष झाले. गावातील सुधारणेच्या विविध पैलूंना जाणून घेण्यासाठी वाचलेल्या पुस्तकांच्या व अनुभवाच्या आधारावर लोकसंबंध वाढवण्यास मदत झाली. ‘वाचाल तर वाचाल’ ही महाविद्यालयातील सरांनी दिलेल्या कानमंत्राचा वापर त्यांनी जीवनात केल्यामुळे त्यांना त्यांच्या निवडलेल्या क्षेत्रात यश आले आहे.

गावातील तंटामुक्ती, स्त्री अत्याचार समिती, निराधार योजना, गो–संगोपन, शेतीसाठी आधुनिक तंत्रांचा वापर व विविध कार्यशाळेचे आयोजन, एक गाव एक पाणवठा यांसारख्या कार्यक्रमाची नियोजन करता आले व गावाला बदलासाठी नवी दिशा मिळाली.

**विश्लेषण :–** वाचनामुळे स्वतः मध्ये तर बदल झालाच, पण गावामध्ये लोकांचे प्रश्न समजून घेऊन ते कसे सोडवायचे, प्रशासकीय अधिकाऱ्यांशी कसे बोलावे व गावचा विकास कसा करावा, हे त्यांना वाचनामुळे कळाले.

### केस नं. १४

रोहित रामचंद्र राजने हे **(वेल्हे)** तालुक्यातील धावर या गावचे रहिवाशी. गावामध्ये मुख्य व्यवसाय शेती, ती शेती पण निसर्गावर आधारित त्या शेतीमधून मिळणारे उत्पन्नही तुटपुंज्या स्वरूपाचे होते. शिक्षण B.A. पर्यंत झाले. समोर असंख्य प्रश्न पुढे काय करायचे. कारण शेतीमध्ये

ही मन रमेना व शिक्षण शिकून नोकऱ्या मिळेना, अशा स्वरूपाची त्यांची अवस्था होती. गावामध्ये चावडीवर जाऊ न निरर्थक गप्पा मारणे किंवा त्या गप्पामध्ये सहभागी होणे, अशा स्वरूपाचा नित्याचा कार्यक्रम असे.

त्याचा संबंध एकदा अनिसच्या कार्यकर्त्यांशी आला. त्यांनी सांगितले की, तुम्ही पुण्याला दाभोळकर सरांचे भाषण व त्यांचा कार्यक्रम पहा. त्यांनी एकदा आवर्जून दाभोळकर सरांचा कार्यक्रम पाहिला आणि त्यांना लक्षात आले की, आपण असे काहीतरी काम केले पाहिजे, आपल्या गावामधील अडचणी सोडवण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न केला पाहिजे.

पहिल्यांदा त्यांनी गावामध्ये ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सर्वांसाठी वाचनालय उघडण्याचे ठरवले. कारण गावामध्ये व्यसनाधीनता, अंधश्रद्धा, जातीय राजकारण अशा वेगवेगळ्या गावाला लोक घेऊन जात आहेत, असे त्यांच्या लक्षात आले. म्हणून त्यांनी आपले आयुष्य गाव घडवण्यामध्ये व्यथित करण्याचे ठरविले. त्यांनी हिवरे बाजार, राळेगण सिद्धी या ठिकाणी कोणत्या पद्धतीने कार्यक्रम राबवतात, लोकांचा कशा पद्धतीने सहभाग असतो, याची त्यांनी त्या गावांमध्ये जाऊ न पाहणी केली. भले त्या गावाएवढी मोठी प्रगती होणार नाही, परंतु गावाला या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे त्यांना वाटू लागले.

**विश्लेषण :–** या वाचकाने गावामध्ये समाजभिमुख कार्यक्रम राबवून त्यांनी गावातील लोकांमध्ये जागृती करण्यास सुरूवात केली. त्यामध्ये व्यसनाधिनता, अंधश्रद्धा, जातीतील राजकारण, शेतीविषय समस्या इत्यादीच्या संदर्भात ग्रामपंचायतीच्या माध्यमातून त्यांनी वेगवेगळे कार्यक्रम राबवून गावातील लोकांचे प्रश्न कसे सोडवायचे, बेरोजगार मुले आहेत यांना कशा पद्धतीने संघटन करून गावाचा विकास करायचा, यावर भर दिलेला आहे.

### केस नं. १५

सीमा विष्णु राऊत या वाचक अंब्रोली **(वेल्हा)** येथील रहिवाशी आहेत. त्या माजी सभापती व पंचायत समिती सदस्य आहेत. घरातील परिस्थिती बऱ्यापैकी असून स्त्री शिक्षणाच्या अभावामुळे

स्त्रियांना घराबाहेर जाऊ न स्वतःची व समाजाची प्रगती करण्यासाठी प्रोत्साहन व प्रेरणा मिळणे, दुर्मीळ झाले आहे.

शालेय घेत असताना पुस्तकांच्या माध्यमातून स्त्रियांबद्दलचे विचार व स्त्री स्वातंत्र्याचे धडे घेत असताना यांनी स्वयं स्फूर्तीने सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करणयाचे ठरविले. माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर घरातील आई वडील व नातेवाईकांच्या अग्रहाखातीर लग्न करावे लागले. पण दरम्याच्या काळामध्ये वाचनाची आवड असत्यामुळे पुस्तकांच्या माध्यमातून स्त्रियांबद्दलचे कायदे व नियम यांचे ज्ञान पिळवण्यास मार्ग मोकळा झाला. सासरकडील लोकांचे विचार स्वातंत्र्यवादी असत्यामुळे राजकीय क्षेत्रामध्ये काम करण्यास वाव मिळाला. सदर वातावरणाचा योग्य पद्धतीने उपयोग करून सीमाताई यांनी वेल्हे तालुक्यातील पंचायत समितीची निवडणुक लढवली. सदर निवडणुकीच्या प्रसारादरम्यान भाषण करण्यासाठी लागणारे ज्ञान व माहिती वेगवेगळ्या पुस्तकातून मोबाईल, संगणक, इंटरनेट या माध्यमातून मिळवले. निवडणुकीत यश प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या अभ्यासू, चिकित्सात्मक वाचना प्रवृत्तीमुळे त्यांची वेल्हे तालुक्यातील पंचायत समितीच्या सभापतीपदी एक मताने निवड झाली.

सामान्य स्त्री वर्गातून ते एक यशस्वी राजकीय स्त्री असा त्याचा राजकीय प्रवास वाचन चळवळीतील विविध सामाजिक विचारांमुळे यशस्वीपणे पुर्ण झाला आहे. त्यांनी अंधश्रद्धा, व्यसनमुक्ती, जाती निर्मूलन, स्त्री शिक्षण अशा वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये त्यांनी यशस्वीरीत्या भरीव कामगिरी केलेली आहे.

**विश्लेषण :–** शिक्षण व वाचनामुळे मानवी जीवनामध्ये आमूलाग्र बदल होतो, या विचारावर ठाम राहून त्यांनी सभापती असताना वेल्हे तालुक्यातील गावामध्ये ग्रंथालयांना चालना दिली. त्यातून स्त्रिया, पुरुष, मुले यांचा सहभाग कसा वाढेल, या दृष्टीकोनातून वेगवेगळ्या विषयाच्या व्याख्यानमालाचे आयोजन केले. ग्रंथ प्रदर्शन भरवून गावोगावातील लोकांपर्यंत वाचन चळवळीचा विचार त्यांनी रुजविला, हे त्यांच्या वाचनाचे फलित आहे.

**सारांश :**

वाचन चळवळीचा अभ्यास करताना व त्यामधील सामाजिक व सांस्कृतिक बदल स्पष्ट करताना समाजशास्त्रातील सैद्धांतिक संकल्पनात्मक चौकट, संशोधन पद्धतीच्या आधारे वाचकांची वेगवेगळ्या स्तरावर माहिती मिळवली. गुणात्मक व संख्यात्मक संशोधनाच्या आधारावर तथ्य संकलित करून त्याचे विश्लेषण केले. व्यष्टीच्या आधारे, १५ वाचकांच्या केसेसच्या माध्यमातून वस्तुनिष्ठ माहिती संकलत केली व त्या माहितीच्या आधारे पुढील प्रकरणामध्ये निष्कर्ष व शिफारशी संशोधकाने मांडल्या आहेत.

# प्रकरण पाचवे

# निष्कर्ष व शिफारशी

## ५.१ प्रस्तावना :

**''पुणे जिल्ह्याच्या सामाजिक व सांस्कृतिक बदलामध्ये वाचन चळवळीचे योगदान : समाजशास्त्रीय अभ्यास''**, या परिसरातील जमा केलेल्या माहितीमुळे काही निष्कर्ष मांडता येतात. शिवाय समाजामधील ज्या समस्या आहेत, त्याचे निराकरण कसे करता येईल, याचे विवेचन या प्रकरणात केले आहे.

प्रस्तुत संशोधनामधून असे सांगता येते, की १९६७ साली 'गाव तेथे वाचनालय' ही योजना यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली अंमलात आणली. या योजनेचा उद्देश सर्वांना शिक्षित, जागृत करणे हा होता. वाचनाच्या माध्यमातून पारंपरिक समाजापासून आधुनिक समाजापर्यंत सामाजिक परिवर्तन कसे झाले, हे संशोधन विषयाच्या अभ्यासातून लक्षात आले आहे. मिळालेली माहिती व या माहितीच्या विश्लेषणातून काढलेले गुणात्मक व संख्यात्मक तथ्यांचे निष्कर्ष मांडले आहेत. प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी प्राथमिक व दुय्यम स्रोताचा आधार घेतला आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये पुणे परिसरातील पाच तालुक्यातील ७० ग्रंथालयांमधून २२० वाचकांच्या प्रश्नावली, निरीक्षण, मुलाखत इ. माध्यमातून शोध घेण्यात आला. म्हणून हे निष्कर्ष सादर केले आहेत.

## ५.२ निष्कर्ष

प्रस्तुत संशोधन विषयातील **प्रकरण एक** मधून असे स्पष्ट करण्यात आले आहे की, वाचन ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. वाचनामुळे व्यक्तीचा जसा विकास होतो, अगदी तसाच व्यापक प्रमाणात समाजाचासुद्धा होत असतो. मानवी उत्क्रांतीचा इतिहास पाहिला तर आदिम काळापासून ते आधुनिक काळापर्यंत समाजामध्ये अनेक बदल होत गेले. त्या बदलाला ज्ञान, माहिती, वाचन ही त्रिसूत्री कारणीभूत ठरली आहे. लेखन आणि वाचन परंपरेत झाडाच्या पानापासून ते संगणकीय छपाईपर्यंत आमूलाग्र बदल झाला आहे. या परिवर्तनाला विज्ञान आणि तंत्रज्ञाची प्रगती कारण ठरली आहे. शाई

छपाईचा शोध लागल्यापासून माहितीचे आदान प्रदान मोठया प्रमाणात वाढले. त्यामुळे लेखन कला विकसित झाली आणि वाचनाचा पाया समृद्ध झाला. वाचनाची तीन माध्यमे आहेत. त्यामध्ये माहिती माध्यम, विचार माध्यम, वैकल्पिक माध्यम प्रामुख्याने दिसून येतात. समाजातील सर्व लोकांना वाचन चळवळीने प्रगतीकडे नेले आहे. व्यक्तीच्या बौद्धिक आणि सामाजिक विकासामध्ये वाचन चळवळीचे योगदान अमूल्य आहे. या बाबी प्रस्तुत प्रकरणात अधोरेखित करण्यात आल्या आहेत. या प्रकरणाच्या अनुषंगाने वाचन चळवळीचा अर्थ विस्तृतपणे स्पष्ट केला गेला आहे. त्यामध्ये वाचन चळवळीचा अर्थ, वाचनाचे महत्त्व, वाचनाची व्याख्या, ग्रंथालयांचे महत्त्व, ग्रंथालयांची व्याख्या अशा विविध घटकांचा प्रामुख्याने उहापोह करण्यात आला आहे. अगदी शिलालेखापासून ते ताम्रपटापर्यंतचा इतिहासाचा आढावा घेतला आहे.

वाचनाचे महत्त्व सांगत असताना वाचनाचे प्रकार ही अधोरेखित केले आहेत. त्यामध्ये प्रगटवाचन, मुक्त वाचन, सस्वर वाचन असे प्रमुख प्रकार नोंदविले आहेत. यातील मूकवाचन या प्रकारामध्ये संदर्भवाचन, सखोलवाचन, विस्तृतवाचन, गतिवाचन असे प्रकार आहेत. वाचन चळवळीच्या माध्यमातून लोकांना प्रेरणादायी विचार, शाश्वत मूल्यांची माहिती, सामाजिक व सांस्कृतिक माहिती व इतर विविध प्रकारांची माहिती उपलब्ध होते. त्यातून व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व घडते, हेही व्यापकपणे स्पष्ट केले आहे.

वाचन चळवळीचे महत्त्व अधोरेखित करत असताना वर्तमानकाळामध्ये वाचनाची आवश्यकता का आहे? या प्रश्नाच्या संदर्भाने अधिक प्रमाणात सखोल असे विवेचन केले आहे. सोबतच वाचन चळवळीचा इतिहास समजावून घेतला आहे. त्यामध्ये औपचारिक आणि अनौपचारिक वाचन चळवळीचे अनुषंगाने सकारात्मक चर्चा करण्यात आली आहे. आजच्या पिढीचे वाचन नाही? असा आक्षेप साधारणपणे नोंदविला जातो. त्या आक्षेपाचासुद्धा वस्तुस्थितीला धरून विश्लेषण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. वरील सर्व बाबी स्पष्ट करत असताना मराठीतील प्रसिद्ध पुस्तकांचे संदर्भ, कविता व अभंगांचे संदर्भ आणि लेखक व विचारवंत यांचा उल्लेख करून उल्लेखित कथनाला आधार दिला गेला

आहे. वसाहतवादी कालखंड ते उत्तर वसाहतवादी कालखंडापर्यंत बदलत गेलेल्या वाचन चळवळीचा विस्तृत आढावा यामध्ये घेतला गेला आहे.

भारतासारख्या खंडप्राय व विविध विचारधारा जोपासणाऱ्या देशात ज्ञान आणि माहिती पोहचविणे कसे आवश्यक आहे, त्याचाही विचार केला आहे. वाचन चळवळीची व्याप्ती व स्वरूप ठळकपणे अधोरेखित करताना बदलाच्या काळातील मोबाईल व संगणक याचे वाचन चळवळीवर नेमके काय परीणाम झाले आहेत, हे स्पष्ट केले आहेत.

वाचन चळवळीच्या उत्क्रांतीचा इतिहास आणि विविध बाबी तसेच देशातील वाचन चळवळ पाहत असताना जागतिक स्तरावरील वाचन चळवळीचे स्थानसुद्धा समजावून घेण्याचा प्रयत्न केला आहे. विविध देशांमध्ये लेखन आणि वाचन चळवळीचा विकास कशा प्रकारे होत गेला याचा आढावा, या प्रकरणामध्ये घेतला आहे. शिक्षण आणि ज्ञानाचे महत्त्व ओळखून जगामध्ये ग्रंथालये कशा पद्धतीने विकसित होत गेली, याचाही विचार यामध्ये केला आहे. इंग्लडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतर वाचनाने कशा पद्धतीने विकास प्रक्रियेमध्ये योगदान दिले आहे, याचा शोध प्रस्तुत प्रकरणात घेतला आहे. ताडाची पाने, रेशमी कापड, तांब्याच्या पट्ट्या, ताम्रपट अशा विविध इतिहासकालीन लेखन कलांचा उल्लेख प्रामुख्याने यामध्ये केला आहे. भारत आणि जागतिक पातळीवरील प्रबोधन व सुधारणेचा इतिहास या प्रकरणात नोंदविला आहे.

भारतातील वाचन चळवळीचा इतिहास पाहत असताना वाचन आणि आजचा समाज, वाचन आणि युवक, वाचन आणि महाविद्यालय, वाचन आणि तंत्रज्ञान अशा बाबी तपासल्या आहेत. प्राचीन भारतात प्रसिद्ध असणाऱ्या अयोध्या, काशी, कांची, उदनंपरू, गोजशीला, तक्षशिला, नालंदा या प्रमुख विद्यापीठांचे वाचन चळवळीमध्ये योगदान भारतात सत्ता स्थापन करून वर्चस्व निर्माण केलेल्या मोगल शासकापर्यंत ते वसाहतवादी कालखंड ते उत्तर वसाहतवादी ख्रिश्चन मिशनपर्यंत वाचन चळवळीचे महत्त्व किंवा वाचन चळवळीचा विकास कशा स्वरूपात झाला, याचे विस्तृत विवेचन केले आहे.

उल्लेखित सर्व बाबी पाहत असताना महाराष्ट्रातील वाचन चळवळीचा आढावा घेतला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने सुधारणा व प्रबोधनवादी कालखंडाचा विशेष विचार केला आहे. यामध्ये शैक्षणिक, सामाजिक धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक, वैचारीक सुधारणेचा पाया कसा विकसित झाला, याचे निरीक्षण नोंदविले आहे. त्यामध्ये पुणे हे अशा बदलांचे महत्त्वपूर्ण केंद्र असल्याचे समोर येते. याच पुण्यात १८४८ ला मुलींची पहिली शाळा महात्मा फुलेंनी काढली. त्यामुळे पुणे या शहराला केंद्रबिंदू ठेवून घडलेल्या विविध सामाजिक बदलांचा अभ्यास यामध्ये करण्यात आला आहे.

या प्रकरणाच्या समारोपात संशोधन विषयाला अनुसरून पुणे जिल्हयातील वाचन चळवळीचे योगदान स्पष्ट केले आहे. यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक धार्मिक व राजकीय अशा विविध क्षेत्रातील बदलांचा विचार करण्यात आला आहे.

प्रस्तुत संशोधनाच्या संशोधन साहित्य आढावा व संशोधन पद्धती या दुसऱ्या प्रकरणात मुख्यतः ४ भाग केले आहेत.

अ) संशोधन साहित्याची उद्दिष्ट्ये

ब) संशोधन साहित्याच्या आढाव्याचे महत्त्व

क) समाजशास्त्रीय सिद्धांत

ड) संशोधन साहित्याचे पुनरावलोकन.

यामध्ये संशोधनाची उद्दिष्ट्ये स्पष्ट केली आहेत. त्यात संशोधन विषयाची पुनरावृत्ती होऊ नये व संशोधनाबद्दल योग्य मार्गदर्शन मिळावे, संशोधन करत असताना योग्य पद्धती व तंत्राचा वापर व्हावा, संशोधन साहित्य व सामग्री याचा अभ्यास करून योग्य ते निष्कर्ष नोंदविले जावे. संशोधनात तुलनात्मक माहिती विश्लेषित केली जावी. सोबतच सांख्यिकीय आकडेवारीचा विचार करून संशोधन पूर्ण करावे, अशा बाबींचा अभ्यास करण्यात आला आहे.

यामध्ये संशोधन साहित्याच्या आढाव्याचे महत्त्व स्पष्ट करत असताना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष साहित्याचा व इतर संशोधनाचा आढावा घेण्यात आला आहे. त्यामध्ये संबंधित संशोधन पूर्वी झाले आहे

का? संशोधनाच्या माहितीचे विश्लेषण करताना संशोधकास समस्या निर्माण होते का, याचा आढावा घेतला आहे. सोबतच संशोधन साहित्यामुळे संशोधकास विश्लेषण करताना मार्गदर्शन मिळते. विषयासंदर्भातील ज्ञानात भर पडणे, संशोधनाची कार्यपद्धती समजते. संशोधनाची परिकल्पना स्पष्ट होते. संशोधनात कोण कोणती साधने वापरावीत, याची सखोल माहिती मिळते. संशोधनाची गृहीतके व मर्यादा ठरविता येतात. संख्याशास्त्रीय व गुणात्मक पध्दतीचा वापर कसा करावा, हे समजते. अशा विविध बाजू स्पष्ट करण्याकरता संशोधन साहित्य आढाव्याचे महत्त्व आहे, हे प्रस्तुत संशोधनातून स्पष्ट झाले आहे.

या प्रकरणामध्ये समाजशास्त्रीय सिद्धांत स्पष्ट करताना सिद्धांताचे स्वरूप, सिद्धांताच्या व्याख्या आणि सिद्धांताचे महत्त्व अधोरेखित केले आहे. सामान्यपणे सिद्धांत म्हणजे काय? तर सिद्धांत म्हणजे मर्यादा किंवा चौकट या मध्याला समोर ठेवून प्रस्तुत संशोधनामध्ये समाजशास्त्रीय सिद्धांताच्या आधारे अभ्यास करण्यात आला आहे. त्या सिद्धांतामध्ये फ्रँकफ्रंट स्कुलमध्ये नवीन प्रवाह हेबरमास, अल्थुजर, ग्रामसी, देरीदा, व मिडियाच्या संदर्भात नॉम चॉम्स्की यांच्या सैद्धांतिक मांडणीच्या आधारे माहिती मिळवली आहे.

प्रस्तुत प्रकरणात वाचन चळवळीच्या अनुषंगाने विचार करत असताना इतिहासकालीन, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय सुधारणेचा पाया किंवा केंद्रबिंदू पुणे हे शहर राहिले आहे. त्यामुळे विषय निवडीमध्ये हा भाग लक्षात घेऊन संशोधनासाठी ''पुणे जिल्ह्यातील सामाजिक व सांस्कृतिक बदलामध्ये वाचन चळवळीचे योगदानः समाजशास्त्रीय अभ्यास'' निवडला या संशोधनाच्या उद्दिष्टामागे पुणे जिल्ह्यातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय बदलातील वाचन चळवळीचे योगदान सिद्ध करणे, हा आहे. सोबतच वाचन चळवळीचे महत्त्व, वाचन चळवळीचा इतिहास, अर्थ, स्वरूप, व्याप्ती अशा विविध घटकांचा अभ्यास करणे, हे उदिष्ट आहे. त्या आधारे संशोधन करत असताना समाजशास्त्रीय सिद्धांताच्या अनुषंगाने पुणे जिल्ह्यातील १४ तालुक्यांपैकी ५ तालुक्यांतील ७० वाचनालयांची निवड करण्यात आली आहे. संशोधनास पूरक व प्रमाण माहिती मिळावी, म्हणून ७० वाचनालयांतील २२० वाचकांची निवड नमुना निवडीच्या माध्यमातून करण्यात आली आहे.

प्रस्तुत संशोधनातून पुणे जिल्ह्यातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय बदलांमध्ये वाचन चळवळीचे योगदान विस्तृतपणे अधोरेखित केले गेले आहे.

**संशोधन पद्धती** या प्रकरणामध्ये सामाजिक संशोधन पद्धतीचा विचार विस्तृतपणे केला आहे. त्यामध्ये विषयाची निवड (समस्या सूत्रण) संशोधन विषयाची व्याख्या, संशोधनाचे महत्त्व व उद्देश, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा संशोधन पद्धती, सर्वेक्षण प्रश्नावली, मुलाखत, नमुना निवड इत्यादी संशोधन सामग्रीचा विचार करून सविस्तरपणे विश्लेषण करण्यात आले आहे. त्यामध्ये विषयाला अनुसरून पुणे जिल्ह्यातील सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय बदलामध्ये वाचन चळवळीचे योगदान स्पष्ट करत असताना सामाजिक संशोधन पद्धतीचा आधार घेतला आहे. यामध्ये ऐतिहासिक संशोधन पद्धती, प्रायोगिक संशोधन पद्धती व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे.

**तथ्यांचे विश्लेषण** या चौथ्या प्रकरणात करण्यात आले आहे. हे तथ्य संकलन करत असताना पुणे जिल्ह्यातील १४ तालुक्यांपैकी ५ तालुक्यांचा विचार प्रामुख्याने केला गेला आहे. वाचनालये आणि वाचकांच्या आधारे हे संशोधन करण्यात येत असल्याने ७० वाचनालये व २२० वाचक हे संशोधन पद्धतीतील नमुना निवडीच्या आधारे निवडले आहेत. सोबतच संशोधकाने संधोधनासाठी गृहीतके मांडली आहेत. ही गृहितके तथ्यांचे विश्लेषण करत असताना सिद्ध झाले आहेत का? याचा सविस्तर आढावा निष्कर्षांच्या आधारे घेतला आहे. तसेच १५ वाचकाच्या केसेस्चा व्यष्टी अध्ययन पद्धतीच्या आधारे मांडणी केली आहे व त्याच आधारे, निष्कर्ष व शिफारशी मांडल्या आहे.

- **वाचनालयाच्या संदर्भात काळानुरूप झालेले बदल** :

या उद्दिष्टांच्या अनुषंगाने वाचन चळवळीबाबत असे म्हणता येईल. रूढी प्रिय व्यवस्थेपासून आधुनिक समाजापर्यंत पहायचे झाल्यास वाचन, साहित्य, संशोधन, याविषयी लोकांना माहिती पुरवण्याचे काम वाचनालयांनी केले आहे. ताम्रपटापासून ते संगणकापर्यंत लोकांना संबंधित विषयाची माहिती पुरवण्याचे काम वाचनालयांनी केले आहे.

पारंपरिक समाजव्यवस्थेत या वाचनावर काही उच्चभू लोकांची मालकी होती. त्यामुळे वाचन

साहित्याची उपलब्धता ही एवढ्या मोठ्या प्रमाणात नव्हती. परंतु, फ्रेंच व औद्योगिक क्रांतीनंतर जगामध्ये मोठे परिवर्तन झाले. व्यक्तींना उपदेशाच्या माध्यमातून गोळा करून त्यांना स्वत्वाची ओळख झाली. लोक साहजिकच वाचनालयांकडे आकर्षित झाले व वैयक्तिक ग्रंथालयांची जागा सार्वजनिक ग्रंथालयांनी घेतली. लोकांना पुस्तके हवी होती, ती पुस्तके त्यांना मिळाली. ते साहित्य मिळू लागले. आधुनिकीकरण आणि जागतिकीकरणामुळे लोक अधिक वाचन चळवळीशी जोडू लागले. लोकांमध्ये विविध साहित्य, कथा, कादंबऱ्या, नाटके, मासिके, वर्तमानपत्रे याविषयी मोठ्या प्रमाणात जागृती झाली. यांचे वाचन होऊ लागले. त्यामुळे प्रत्येक नगरात, गावात वाचनालय सुरु झाले. ई–सोर्स निर्माण झाले. ते लोकांपर्यंत जाऊन पोहोचले. मोबाईल, इंटरनेट, ई–मेल, ट्विटर इत्यादीमुळे माहितीची देवाणघेवाण होऊ लागली. नॉम चॉम्स्कीच्या चौकटीतून पाहिले असता, वाचन चळवळीच्या पुढे जाऊन सोशल मिडिया लोकांना मुबलक माहिती पुरवते.

- **गाव तेथे वाचनालय** :

१९६७ साली ‘गाव तेथे वाचनालय’ ही घोषणा करण्यात आली. वाचनालयांमुळे समाजाच्या पारंपरिक संरचनेच्या चौकटी परिवर्तन झाल्यामुळे समाजातील विषमता कमी होण्यास मदत झाली. लोक शिक्षित होऊ न समाजात जागृती निर्माण करतील, हा वाचनालयांमागचा उद्देश सफल झाल्याचे दिसते. वाचनामुळे सामाजिक स्तराची जाणीव निर्माण होते. लोकांमध्ये सामाजिक जागृती निर्माण करावयाची असेल, तर लोकांना साक्षर करणे गरजेचे असते. वाचन साहित्यामुळे प्रश्नांची उकल होते. जे प्रश्न लोकांमध्ये जाणीव करून देतात तेव्हा ती समस्या लोकसहभागातून सोडवता येते, हा वाचनाचा उद्देश आहे. तो सफल झाल्याचे दिसते. ‘गाव तेथे वाचनालया’चा विकास झाला की नाही, हे त्या गावाच्या विकासावर अवलंबून असते.

नगरातील किंवा गावातील तंटामुक्ती निवारण, स्त्रियांचे प्रश्न, गुन्हेगारीचे प्रश्न, जातीविषयक प्रश्न, मुला–मुलींचे प्रश्न, वृद्धांचे प्रश्न, व्यसनाधीनतेचे प्रश्न या प्रश्नांविषयी लोकांमध्ये जागृती झालेली दिसून येते. ‘गाव तेथे वाचनालय’ या कार्यक्रमाची सफलता झालेली दिसून आली.

शासनाचे वाचनालये उघडण्याचा उद्देश हा होता की, ज्या वाईट प्रथा, रूढी, परंपरा, लोकरीती

काळानुरूप बदलत असतात. त्या सोडून देऊन नव्या प्रचलित परंपरा स्वीकाराव्या, हा उद्देश सफल झालेला दिसतो.

वाचन चळवळीच्या माध्यमातून समाजसुधारकांनी समाजात साहित्याच्या माध्यमातून बदल केला आहे. त्यामध्ये पुण्याविषयी विचार करताना नक्की या नगरीला विचारवंताची व साधुसंताची परंपरा आहे. त्यामुळे वाचन चळवळीला पुण्यामध्ये मोठे यश मिळालेले दिसते. महाराष्ट्र शासनाचा जो उद्देश आहे, तो सफल झाला आहे का, हे जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. गाव तेथे वाचनालयाच्या माध्यमातून संशोधकानी माहिती घेत असताना देवाणघेवाण होत आहे. लोक वैयक्तिकरीत्या बोलायला लागले आहेत. परंतु लोकांमध्ये एक संभ्रम निर्माण झालेला आहे. लोक गोंधळलेल्या अवस्थेत आहेत, असे वाटते.

- **पुणे शहर व परिसरातील वाचनालय**

पुणे शहर व परिसराच्या बाबतीत असे दिसते की, पुणे शहरामध्ये म्हणजे हवेली तालुक्यात ३० वाचनालयातील वाचकांच्या माहितीच्या आधारे वाचनालयात चांगला प्रतिसाद आहे. या ठिकाणी येणारे वाचक हे नियमित वाचक आहेत. त्या वाचकांमध्ये वेगवेगळ्या विषयावर चर्चा होते, उदाहरणार्थ– वृद्धांच्या समस्या, स्त्रियांच्या समस्या, झोपडपट्टीतील प्रश्न, निसर्ग ऱ्हासाचे प्रश्न, गुन्हेगारीच्या समस्या, उद्योजकता, मुला–मुलींच्या समस्या, वाढत्या ट्रॅफिकची समस्या, वायू प्रदूषण, जल प्रदूषण आदी विषयावर चर्चा होताना दिसते. या विषयांवर चर्चा होणे व या समस्या सामूहिक पद्धतीने लोकसहभागातून यशस्वीपणे मार्गी लावणे, हा उद्देश वाचन चळवळीचा आहे. तो उद्देश हवेली शहरात सफल होताना दिसून आला. शहरात लोकांमध्ये वाचनाच्या आवडी निवडींबरोबरच समाजातील प्रश्न लक्ष वेधताना दिसतात.

पुणे परिसरातील आंबेगाव, मावळ, वेल्हे, भोर या तालुक्यांतील वाचकांच्या माहितीच्या आधारे असे लक्षात येते की, या ठिकाणचा वाचकवर्ग मोठ्या प्रमाणात वृत्तपत्रांचे वाचन करताना दिसतो. त्याचबरोबर कथा, कादंबऱ्या, वेगवेगळी मासिके वाचतानाही दिसतो. शेतीशी संबंधित मासिके, त्यामधील बी–बियाणांची लागवड, माती परीक्षण, वेगवेगळी फुलांची रोपे, शेळीपालन, कुक्कुटपालन, शेतीस लागणारी खते, ठिबक सिंचन या विषयी माहिती देणारे वाचन साहित्य या ठिकाणचे लोक वाचताना व

त्यानुसार त्या साहित्याचा उपयोग प्रत्यक्ष कृतीमध्ये आणताना दिसतात. ही वाचन चळवळीची सफलता आहे, म्हणून या ठिकाणी उद्देशाची सफलता होताना दिसते.

- **वाचनामुळे विविध स्थरातील बदल**

मानवाच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये वाचनाचा प्रत्यक्ष संबंध असलेला दिसतो. वाचन चळवळीमुळे समाजामध्ये विविध स्तरामध्ये परिवर्तन झाले. त्यामध्ये परंपरा, जातीभेद, स्त्री–पुरुष समानता हे बदल झालेले प्रकर्षाने जाणवतो.

सामाजिक विकासासाठी सांस्कृतिक बदल होणे, ही सामाजिक ऐक्यासाठी फार महत्त्वाची गोष्ट आहे. गावागावांमध्ये उत्सव साजरे करण्याचा उद्देश म्हणजे गावातील एकोपा होय. त्यामध्ये सणसमारंभ साजरे करणे, महामानवाचे जन्मदिवस साजरे करणे, सांस्कृतिक सण, सांस्कृतिक मंडळे यामुळे समाजातील लोक एकत्र येतात. त्याचबरोबर 'एक गाव एक पाणवठा' असे उपक्रम राष्ट्रीय सलोखा किंवा ऐक्य टिकवण्यासाठी मदत करतात, हे वाचनामुळे शक्य झाले असे म्हणता येईल.

रूढीप्रिय काळामध्ये भारतात पुरुषप्रधान व्यवस्था होती. भारतामध्ये महिलांना सम्मानाचे स्थान नव्हते. शैक्षणिक–सामाजिक अधिकार नव्हते. समाजामध्ये जाती धर्मावरून खूप मोठी विषमता पारंपरिक समाजव्यवस्थेमध्ये दिसून येत होती. समाजातील विषमता नष्ट करण्यासाठी 'एक गाव एक पाणवठा' या माध्यमातून समाजात संघटन झाले. समाजात माणसाचे माणूसपण नाकारून अस्पृश्यता ही किळसवाणी प्रथा अस्तित्वात आली होती. पाणी पिण्याचा अधिकार जनावरे, किडे, मुंग्या यांना होता, परंतु माणसाला हे अधिकार या व्यवस्थेने नाकारले होते, माणसाला मंदिरात प्रवेश नव्हता, परंतु जनावरांना प्रवेश होता. वाचन चळवळीने मानवताविषयक विचार समाजामध्ये रुजवला. त्यामुळे समाजातील वाईट प्रथा, परंपरा, विषमता कमी होण्यास मदत झाली.

महिलांना कोणताही मानसन्मान नव्हता. चूल आणि मूल या पलीकडे त्यांना कुटुंबात किंवा समाजात स्थान नव्हते. स्त्री मोलकरीण, कामवाली भोगाची वस्तू म्हणून तिच्याकडे पाहिले जात होते. परंतु शिक्षणामुळे तिच्यात आमूलाग्र बदल झाला. ती आता प्रत्येक ठिकाणी स्वाभिमानाने वावरते आहे.

हे केवळ वाचन चळवळीमुळे शक्य झाले. वाचनामुळे तिच्यातला आत्मविश्वास वाढला आहे व ती सोशल मिडियाचा वापर व इतर साहित्य याचाही तिचा स्तर बदलण्यास उपयोग झाला आहे.

- **सामाजिक व धार्मिक बदल**

पारंपरिक समाजामध्ये मोठ्या प्रमाणात विषमता होती. ही विषमता मोठ्या प्रमाणात पराकोटीला पोहोचली होती. पुण्याच्या बाबतीत विचार केल्यास असे लक्षात येते, या शहरात सर्वांगीण स्थित्यंतरे झालेली आहेत. त्यामुळे अशा स्वरूपाच्या घटना घडल्यामुळे वाचनामुळे सामाजिक व धार्मिक विषमता नष्ट होऊ न एक सलोख्याचे वातावरण निर्माण करण्यात येथील वाचन चळवळ यशस्वी होताना दिसते आहे.

समाजसुधारकांनी वाचन संस्कृतीमुळे समाजातील जाती द्वेष व धार्मिक द्वेष कमी करण्याचा घाट घातला आहे. जाती, जमाती व महिला यांच्या दर्जामध्ये सुधारणा झालेली आहे. समाजामध्ये असणारी अंधश्रद्धा, चालीरिती, रूढी, परंपरा, केशवपण, सतीप्रथा, बालविवाह इत्यादी जाचक समस्या सोडवण्याचा प्रयत्न समाजसुधारकांनी केला आणि वाचन चळवळीच्या माध्यमातून समाजाला चांगले व वाईट काय आहे, हे समजावून सांगितले. समाजातील वाईट प्रथा बंद होऊ न पोषक वातावरण निर्माण झाले. समाजातील जाती–जातीत तेढ कमी होऊ न सलोख्याचे वातावरण वाचनातून निर्माण झाल्याचे दिसते.

धार्मिक कलह कमी होऊ न धार्मिक सलोखा निर्माण होण्यास मदत झाली. स्त्रियांचे असणारे नगण्य स्थान बदलून तिला समाज प्रवाहात आणण्याचे काम वाचनाने केले आहे. स्त्रियांना सामाजिक प्रवाहात आणायचे असेल, तर त्यांना शिक्षित करण्याशिवाय पर्याय नाही. महिलांना समान अधिकार व समान दर्जा मिळवून देण्याचे वाचन चळवळीचे योगदान मोठे आहे, हे लक्षात येते.

वरील बदलास वसाहत काळामध्ये सुरुवात झाली याचे स्वरूप उग्र होते. पंरतु या बदलासाठी वाचन चळवळी बरोबर वसाहतवादी धोरणसुद्धा कारणीभूत आहे. कारण, वसाहतकालीन वैचारिक पांठीबा वाचन चळवळीला मिळाल्यामुळे हा बदल होताना दिसतो.

- **उपक्रमाची झालेली जाणीव**

वाचन चळवळीमुळे समाजात विकासाशी संबंधित माहिती लोकांपर्यंत येऊन पोहोचली. वाचनामुळे आर्थिक विकासाची जाणीव झाली. आर्थिक उत्पादन वाढल्यामुळे राहणीमानाचा दर्जा उंचावला. पारंपरिक समाजात सार्वजनिक दळणवळणावर अवलंबून असलेला समाज आज स्वतःच्या चार चाकी, दोन चाकी वाहने वापरताना दिसतो. या उद्दिष्टांच्या अनुषंगाने मिळवलेल्या माहितीतून उद्दिष्टांची पूर्ती झाल्याचे दिसून आले.

बँकेविषयी माहिती कर्ज कसे व कोठे उपलब्ध होते? बी–बियाणे यांना सबसिडी कशी मिळते? सहकारी बँकांकडून कर्ज मिळवणे, जिल्हा उद्योग केंद्राच्या साहाय्याने उद्योग चालू करणे, कृषीशी संबंधित लागवड, कमी पाण्यात जास्त उत्पादन, शेतीसंबंधित प्रदर्शने आदींबाबत वेगवेगळ्या मासिकांतून माहितीचे हस्तांतरण होते. रोजगाराची हमी निर्माण झाली. ग्रीन शेडची निर्मिती, वेगवेगळ्या फळ बागा विकसित करणे, कमी खर्चात जास्त भाजीपाला इत्यादी माहिती जनसमुदायापर्यंत घेऊन जाण्याचे काम वाचनामुळे झाले आहे. वाचन चळवळीमुळे लोकांना रोजगार उपलब्ध होण्यास मदत झाली. लोकांना स्वतःचे हक्क, अधिकार व कर्तव्य याविषयी जाणीव झाली. त्यातून लोकांना योग्य ते काम मिळून त्यांचा योग्य मोबदलाही मिळू लागला.

वाचन चळवळीमुळे शासनाच्या विविध उपक्रमांची माहिती अगदी शेवटच्या घटकापर्यंत पोहोचली आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीची आर्थिक उन्नती झालेली आहे. या उद्देशाच्या अनुषंगाने लोकांना नवनवीन उपक्रमांची माहिती मिळते व त्यातून लोक स्वतःचा व समाजाचा विचार करतात हे वाचनाचे फलित आहे, असे म्हणता येईल.

वरील उपक्रमाची माहिती लोकांना मिळते ही माहीती मिडियाच्या मार्फत लोकांपर्यंत येऊन पोहचते असे नॉम चॉम्स्की म्हणतात. हेबरमास म्हणतात की, लोकांनाही माहिती पब्लिक स्पेअरच्या माध्यमातून कळते. परंतु उत्तर वसाहत वादानंतर जी माहिती निर्माण झाली आहे, ती माहिती भांडवली व्यवस्थेचे प्रतिनिधित्व करणारी झाली आहे. त्यामुळे इथला वाचक खरी माहिती कोणती, कोणत्या माहितीवर विश्वास ठेवायचा, यासाठी संभ्रमात पडलेला दिसून येतो.

- **वाचन संस्कृतीमुळे चिकित्सक वाचन निर्माण होतो.**

वाचन संस्कृतीमुळे मनुष्याने त्याच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनात आमूलाग्र बदल केले आहेत. वाचन साहित्यामुळे जगामध्ये मोठी क्रांती झाली व त्या क्रांतीमधून अनेक चिकित्सक वाचक व विचारवंत निर्माण झालेले आहेत. फँकफर्ट स्कुलमधील विचारधारा जुर्गन हेबरमास यांचा **पब्लिक स्पेअर**, नॉम चॉम्स्की यांनी सांगितलेली मीडियाची भूमिका, संपूर्ण जगावर वसाहतवादाच्या माध्यमातून केलेले राज्य या संपूर्ण गोष्टीची मांडणी पाहिली, तर असे लक्षात येते की, वाचन चळवळ ही चळवळ न राहता त्याचे स्वरूप हे भांडवलदाराच्या हातामध्ये आले आहे, असे दिसते. कारण, प्रिंट व इलेक्ट्रॉनिक्स मिडिया या 'आहे रे' च्या हातामध्ये असल्यामुळे जो 'नाही रे' वाचक वाचन करतो, तो भांडवलदाराने निर्माण केलेले वाचन साहित्य वाचताना दिसतो. त्यामुळे या भांडवलशाही साहित्यातून भांडवलदारांना अपेक्षित असणारा वाचक वर्ग तयार होताना दिसतो व समाजामध्ये तशा पद्धतीने साहित्य निर्माण करून अभासी वाचक निर्माण होतो. त्यामुळे ही जी वाचन चळवळ आहे. उत्तर वसाहतवादी काळामध्ये भांडवलदारांना पोषक वातावरण निर्माण करून फेसबुक, व्हॉट्सअप, इंटरनेट, युटयुब, ट्विटर यांच्या आधारे नवीन वाचक तयार होताना दिसतो आहे. सद्यःस्थितीमध्ये सांगावयाचे झाल्यास भांडवलशाहीतील साहित्य प्रसारमाध्यमाद्वारे लोकांमध्ये मोठया प्रमाणावर या सोशल मिडियाद्वारे प्रसारित केले जाते.

समाजशास्त्राचा अभ्यासक म्हणून संशोधकाने काही नोंदी घेतल्या समाजात वाचन चळवळ काम करत आहे व जिवंतपणाने उभी आहे, असे दिसत असले, तरी भांडवली साहित्याचा बोजाखाली ही वाचन चळवळ दबलेली आहे. त्यामुळे वाचक वर्गात संभ्रमाची स्थिती निर्माण झाल्याचे दिसते, असे मार्क्सवादी सैद्धांतिक चौकटीच्या आधारे लक्षात येते. वसाहतकाळात प्रसारमाध्यमाची साधने खरे सत्य शोधत असते. परंतु आता मिडिया खोटे बोलते आणि लोकांना सत्य शोधावे लागते. जे खरे आहे ते प्रसिद्ध असेलच असे नाही आणि जे प्रसिद्ध झाले आहे, ते खरे असेल असे नाही. अशी वाचकांची अवस्था या मिडियाने केली आहे, असे नॉम चॉम्स्की यांनी म्हटले आहे. म्हणून खऱ्या माहितीसाठी येथील वाचक संभ्रमात पडला आहे, असे संशोधनांती लक्षात येते.

- **गृहीतकाची चाचणी**
- **वाचनामुळे व्यक्तीला माहिती मिळते.**

हे गृहीतक स्पष्ट करताना प्रस्तुत प्रकरणामध्ये असे स्पष्ट होते की, ज्ञानाचा वाहक म्हणून वाचकवर्ग आहे. रूढीप्रिय समाजापासून ते आधुनिक काळापर्यंत पाहायचे झाल्यास वाचकवर्ग हा ज्ञानाचा वाहक आहे. त्यामुळे समाजातील वेगवेगळ्या घटकांमध्ये परिवर्तन होताना दिसते.

पुणे कार्यक्षेत्रातील परिवर्तनाबाबत विचार केल्यास असे स्पष्ट होते की, वाचन चळवळीमुळे समाजातील लोकांच्या मानसिकतेत बदल घडून आले आहेत. सामाजिक व शैक्षणिक बदल होऊ न सामाजिक प्रबोधन झाले. वाचनामुळे समाजातील प्रत्येक घटकास माहिती उपलब्ध होण्यास मदत झाली. पुणे कार्यक्षेत्रातील आरोग्य संवर्धन, साक्षरता, अंधरुढी, पर्यावरणविषयक माहिती, प्रबोधन या विषयी लोकांना माहिती मिळाली व त्यातून लोकांच्या विचार करण्यात फरक दिसून आला व त्यांचा दृष्टिकोन बदलला.

पुणे परिसरातील संस्कृतीविषयी सांगत असताना असे दिसून येते की, विविध उत्सव, वेगवेगळे सण, जातीबाह्य विवाह, धार्मिक सहिष्णुता इत्यादींबाबत लोकांमध्ये वाचनामुळे विचारात बदल झालेला दिसतो. समाजव्यवस्थेचा कणा म्हणून अर्थव्यवस्थेचा विचार केला जातो. आदिम काळापासून ते आधुनिक काळापर्यंत अर्थव्यवस्थेच्या साधनांमध्ये बदल झालेला दिसून येतो. कंदमुळे, फळे गोळा करून त्यावर गुजराण करणारा मानव आज चंद्रावर जाऊन पोहोचला आहे. म्हणजेच, त्यांनी आपल्या बौद्धिक विचारातून समाजातील आर्थिक घडी बसवण्याचे काम केले आहे.

समाजातून मिळालेला आर्थिक दर्जा आर्थिक बदलास सरकारी योजनांची मिळालेली जोड, आर्थिक विकास करताना त्यांनी कुटीर उद्योग, कृषी उद्योग, कारखानदारी, आर्थिक उत्पादनाची साधने वाचनामुळे कळू लागली. जागतिकीकरणामुळे जग जवळ आले व त्यातून नवे उद्योग तयार झाले. केवळ वाचनामुळे मानवाने आपला आर्थिक विकास साध्य करून घेतला आहे.

वाचनामुळे लोकांच्या अस्मिता व जाणिवा जागृत झाल्या. जाणिवेमुळे शिकलेले पुढारी नेतृत्व

पुढे आले. महिलांचा राजकीय सहभाग वाढला. मतदारांमध्ये मतदानाविषयी जागृती झाली. म्हणजेच देशाच्या लोकशाहीविषयी समाज जागृत झाला. वाचनामुळे लोकांना मूलभूत माहितीचा पुरवठा होतो, हे या गृहीत कृत्यातून निष्पन्न झाले आहे.

- **वाचनामुळे समाजामधील अडचणीं लक्षात येते.**

वाचनामुळे समस्येची जाणीव होते व या जाणिवेतून समाज बदलण्याची प्रेरणा मिळते. वाचनामुळे समाजातील नेमक्या कोणत्या समस्या आहेत, त्या समस्या कशा पद्धतीने सोडवल्या पाहिजेत किंवा त्या समस्येची किती तीव्रता आहे, याची जाणीव होते. उदाहरणार्थ अस्पृश्यता, सतीप्रथा, केशवपण पद्धती, लिंगभाव, देवाच्या नावाने पशुहत्या, नरबळी, वेश्या, मुरुळी, देवदासी, स्त्री–पुरुष विषमता, शेतीच्या समस्या, पर्यटनाच्या नावाखाली निसर्गाची हानी, सांडपाण्याची समस्या, गलिच्छ वस्ती इत्यादी प्रश्नांची जाणीव होते. हे संशोधनाच्या विषयानुसार पुणे जिल्ह्यात वरील समस्येच्या जाणिवा, प्रश्नावली, निरीक्षण व मुलाखतीच्या आधारे निवडलेल्या वाचकांच्या वाचनातून झाले आहे व या जाणिवेतूनच समाजात बदल झाल्याचे दिसते.

कीर्तन, भारुड, काव्यवाचन, भाषण, नाटक, गवळणी, पारंपरिक गाणी, कादंबऱ्या, कथा, कविता इत्यादी माध्यमातून समाजामध्ये प्रबोधन होत आले आहे, त्या प्रबोधनातून लोक एकोप्याने सण–समारंभ साजरे करतात. समाजात जातीय अंतर कमी होऊ न धार्मिक सहिष्णुता वाढीस लागली आहे. पुणे परिसरातील सामाजिक व सांस्कृतिक बदलांमध्ये वाचन हे सामाजिक समस्येची जाणीव व समाज व्यवस्थेत बदल होतो हे असे दिसत असले तरी लोकांमध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे, असे दिसून येते.

लेखनाची परंपरा ही पारंपरिक समाजातून विकसित झालेली आहे. झाडाच्या पानापासून ते संगणकापर्यंत इतिहास साक्ष देतो. वाचन व लेखन हे सामाजिक बदलाचा पाया आहे. वाचनामुळे समाजात आमूलाग्र बदल घडून आले आहेत. सर्व धर्म, समभाव या मूल्यातून सामाजिक एकता जोपासली जाते. समाजातील अनेक महापुरुष, समाजसुधारक, विचारवंत हे वाचनामुळे घडले आहेत, या मान्यवरांनी आपापल्यापरीने समाजसुधारणेसाठी योगदान दिले आहे.

वाचन चळवळीमध्ये लोकांचा वाढता सहभाग पाहून सरकारने शहर व गावांमध्ये वाचनालय काढले. कारण लोकांनी जर वाचन केले, तर समाजात एकोपा राहील, जातीय सलोखा निर्माण होईल, स्त्रिया वाचन करतील व आत्मसन्मानाची भावना वाढीस लागेल, स्त्रियांचा राजकारणात सहभाग वाढेल, शेतीसाठी मदत होईल, लोकांमध्ये समाजातील अडचणींची जाणीव होईल व लोक सामुदायिकरीत्या ते प्रश्न सोडवतील. आजचा विचार केल्यास असे दिसते की, संख्येने जास्त असलेला समाज आजही खेड्यापाड्यात वाड्या–वस्त्यांवर आपले वास्तव्य करताना दिसून येतो. शहराच्या तुलनेत तो आजही मागास अशा पद्धतीचे जीवन जगत आहे. परंतु वाचन चळवळीमुळे लोकांचा विश्वास वाढला. ज्यांच्या हातामध्ये मिडिया आहे, तो मिडिया लोकांचे प्रश्न, लोकांचे संघटन व लोक कसे निरर्थक बनतील, याचा प्रयत्न करताना दिसतात.

- **सैद्धांतिक संकल्पना व संशोधन पद्धती**

संशोधनाचे काम पूर्ण करण्यासाठी किंवा त्या संशोधनाची चौकट तयार करण्यासाठी सिद्धांताच्या मांडणीची आवश्यकता असते, म्हणून संशोधकाने या संशोधनासाठी सैद्धांतिक चौकट म्हणून एपील डरखिमचा ''विचारप्रणालीचा सिद्धांत'', फ्रँकफर्ट स्कुलचे विचारप्रवाह मायकेल फुको यांच्या ''नॉलेजे अॅण्ड पॉवर'', एंटोनिओ ग्रामशी यांचा ''वर्चस्व सिद्धांत'', लुईस अॅल्युझर यांचा ''कम्युनिटी ऍक्शन थेअरी'' व जुर्गन हेबरमास यांचा ''पब्लिक स्पेअर सिद्धांत'' या सैद्धांतिक संकल्पनेच्या चौकटीच्या आधारे व्यष्टी अध्ययनाच्या माध्यमातून अभ्यास केला असता वाचनाने साहित्य, प्रिंट मिडिया व इलेक्ट्रॉनिक्स मिडिया यामुळे वाचकामध्ये संभ्रम निर्माण करून या मिडियावर भांडवलदाराची मालकी आहे. त्यांना जे अपेक्षित आहे, अशा पद्धतीने विचाराचा दबाव निर्माण करून लोकांमध्ये त्यांना अपेक्षित असणारी विचारांची चळवळ निर्माण करताना दिसतो. म्हणून वाचकात संभ्रमाची अवस्था निर्माण झालेली दिसते.

नॉम चॉम्स्की यांचे मिडिया संदर्भातील विचार संशोधकाने सैद्धांतिक संकल्पनेच्या चौकटीच्या व काही व्यष्टी अध्ययन पद्धतीच्या तसेच मुलाखतीच्या आधारे माहिती मिळवली असता, लोकांमध्ये जी माहिती जाते, त्या माहितीमुळे वाचकांमध्ये संभ्रमाची स्थिती निर्माण झालेली दिसून आली.

अभ्यासासाठी संशोधकाने गैर संभाव्यता पद्धतीमधील सहेतुक किंवा उद्देश पूर्ण नमुना निवड पद्धतीचा संशोधनासाठी वापर केला आहे. त्याचबरोबर संख्यात्मक व गुणात्मक अशा मिश्र संशोधन पद्धतीचाही वापर केला आहे. तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्याचा वापर केला आहे.

## ५.४ शिफारशी:

सदर संशोधनातून मिळालेल्या निष्कर्षामधून वाचन चळवळीचा विकास होण्यासाठी पुढील शिफारशी सादर केल्या आहेत.

१. 'गाव तेथे वाचनालय 'ही योजना सफल झाली असली तरी, या योजनेमध्ये शासनाने आणखी लक्ष घालून ही योजना अधिक मजबूत करणे सामाजिक बदलासाठी महत्त्वाचे आहे.
२. गाव पातळीवर किंवा शहरातील वेगवेगळया भागामध्ये ग्रामपंचायत, पंचायत समिती, नगर पालिका चर्चा सत्राचे आयोजन करून, समाज विकासासाठी किंवा सामाजिक बदलासाठी लोक कसे सकारात्मक प्रयत्न करतील यावर लक्ष देणे.
३. लोक शिक्षित, विचार करणारे असतील, तर आपला नेता तो योग्य पध्दतीने निवडीतील व त्याचा फायदा सर्वसामान्य लोकांना सामाजिक बदलासाठी नक्कीच होईल, यासाठी शिक्षण समितीने लक्ष घालणे गरजेचे आहे.
४. वाचनाच्या प्रचारामुळे समाजातल्या वेगवेगळया समस्यांवर समाजात चर्चा होईल व त्या समस्या ग्रामपंचायतीमधील सरपंचानी लोकसहभागातून सोडवणूक करावी.
५. वेगवेगळ्या क्षेत्रातील लोकांनी त्या त्या भागामध्ये जाऊन त्यांचा सर्वे एन. जी. ओ. च्या माध्यमातून करावा व तो सरकारी यंत्रणेतून क्षेत्रामध्ये लोकांचा सहभाग वाढवावा.
६. धार्मिक कलह कमी करण्यासाठी वाचन चळवळीचा शासनाने तसे ग्रामपंचायतीला सक्त आदेश देऊन गावामध्ये किंवा नगरामध्ये तंटामुक्ती केंद्र सक्षमपणे राबवणे.
७. गावागांवामध्ये ग्रामसेवक, तलाठी व सरपंच यांनी वेगवेगळी कृषी प्रदर्शने भरवून लोकांना सेंद्रीय पद्धतीने शेती कशी करावी, याबाबत माहिती प्राप्त करून दयावी.
८. ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ यावर कशा पद्धतीने मात करावी, यासाठी शासनाने ग्रामपंचायत व पंचायत समिती यांना आदेश देऊन डीझास्टरमॅनेजमेंट सक्षमपणाने समाजात राबवावे.

९. स्त्री सक्षमीकरण करण्यासाठी शासनाने प्रत्येक नगर किंवा गांवामध्ये पोलीस पाटील यांनी लोकसहभागातून समित्या गठीत करून स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवावा.

१०. शासनाने जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून लोकांना सक्षम अशा दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध कराव्यात व सर्वांगीण विकासाठी ग्रामपंचायतीला मार्गदर्शन करावे.

११. शासनाने प्रसार माध्यमांचा योग्य पध्दतीने वापर करून, सामान्य लोकांच्या विकासातून सामाजिक बदल करावा.

१२. वेळोवेळी काढलेले परिपत्रके लोकांना सहज उपलब्ध होतील व प्रत्येक योजनेची लोकांना ओळख होईल, त्यासाठी ग्रामपंचायत समितीमध्ये स्वतंत्र सेलची मुख्यमंत्र्यांनी सक्षम अशी व्यवस्था निर्माण करावी.

१३. सद्यःस्थिती पाहता समाजामधील बेरोजगारीवर मार्ग काढावा व लोकांना रोजगार कसा उपलब्ध होईल, याचे मार्गदर्शन व प्रत्येक गावात केंद्र सुरू करावीत.

१४. ग्रामपंतचायतीने वाचन चळवळीच्या माध्यमातून लोकांमध्ये मतदानाची जाणीव जागृती निर्माण करावी.

१५. समाजामधील जातीय संघर्ष कसा कमी करता येईल, प्रत्येक जातीला शांतपणाने कसे राहता येईल यासाठी ग्रामसेवक, सरपंच व पोलीस पाटील यांनी लोकसहभातून जाणीव जागृती निर्माण करावी.

१६. वाचन चळवळीमुळे लोकांमध्ये वैचारिक, सहिष्णुता निर्माण करण्यासाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती, महानगरपालिका यांमार्फत माहिती उपलब्ध करून द्यावी.

१७. गाव तेथे वाचनालय या आधारे ग्रामीण भागातील व नगरातील व्यक्तींना वाचन चळवळींतून सक्षम बनवणे, हे धोरण एन. जी. ओ. च्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालून करून घ्यावे.

# संशोधनासाठी काही नवीन विषय

## Limitations and Further Scope

* अशाच प्रकारचा संशोधन इतर जिल्ह्यांच्या बाबतीत संशोधक करू शकतात.
* महाराष्ट्रातील दोन जिल्ह्यातील तुलनात्मक अभ्यास करू शकतात.
* सदरचा अभ्यास हा १९६७ ते २०१७ पर्यंतचा आहे. एखादा संशोधक यापूर्वीच्या कालखंडाचा अभ्यास करू शकतो.
* एखादया व्यक्तीच्या/संस्थेच्या/राजकीय पक्षाच्या/परिवर्तनवादी चळवळीचा वाचन संस्कृतीचा प्रभाव कसा पडतो, हा देखील चांगल्या संशोधनाचा विषय होऊ  शकतो.
* धर्मप्रसारामध्ये वाचन चळवळीचा/धर्म सुधारण्यामध्ये वाचन चळवळीचा सहभाग/प्रभाव हा देखील संशोधनाचा विषय होऊ  शकतो.

# संदर्भ सूची

## मराठी संदर्भ


१. आगलावे प्रदिप; २०००, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.

२. मालशे स. ग.; २००६, शोध निबंधाचर लेखन पध्दती सुधारीत आवृत्ती, मिलिंद मालशे संपा., लोकवाड्मय गृह मुंबई.

३. नाडगोंडे गुरूनाथ; १९९९, सामाजिक संशोधन पध्दती, कोल्हापूर, फडके प्रकाशन.

४. काचोळे दा. धो. मुधोळकर ग.रा.; २००५, समाजशास्त्रीय संशोधन पद्धती, कैलाश प्रकाशन औरंगाबाद.

५. बोधनकर सु., अकोणी वि.; १९९३, सामाजिक संशोधन पध्दती, औरंगाबाद, श्री साईनाथ प्रकाशन.

६. किशोर शां. काळे; २००१, कोल्हाटयाचे पोर, प्रकाशन ग्रंथाली, पुणे.

७. भोळे भा. ल. (संपा.); २००३, बदलता महाराष्ट्र,.

८. कुलकर्णी सुधाकर, सामाजिक न्याय : महिला आरक्षण महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोक प्रशासन परिषद २३ वी, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे.

९. पुणे विद्यापीठ वार्ता, महिला सबलीकरण विशेषांक वर्ष एप्रिल २००२ मार्च २००३, अंक–२८ संचालक क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री–अभ्यास केंद्र.

१०. भागवत विद्युत/ रेगे शर्मिला/ पलसाने वंदना (संपा.), स्त्री जीवनाची गुंतागुंत, विकास अध्ययन केंद्र, प्रकाशक मुंबई.

११. पुणे विद्यापीठ वार्ता. महिला सबलीकरण विशेषांक वर्ष एप्रिल २००२ मार्च २००३, अंक–२८संचालक क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले स्त्री–अभ्यासकेंद्र.

१२. आगलावे प्रदिप; २००७, समाजशास्त्रीय विचारवंत, श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर.

१३. कुलकर्णी पी. के.; १९९७, प्रगत समाजशास्त्रीय सिध्दांत, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

१४. भागवत विद्युत; २००८, स्त्रीवादी सामाजिक विचार, डायमंड पब्लिकेशन पुणे.

१५. प्रा.व्ही.एन.गजेंद्रगड, प्रा. व्ही.एस. मारूलकर; २०००, समकालीन भारतीय समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

१६. प्रा.पी.के. कुलकर्णी; २०००, समाजशास्त्रातील सैद्धांतिक दृष्टीकोन, श्रीमंगेश प्रकाशन नागपूर.

१७. कमल मुळे; २००७, समाजशास्त्रीय सिद्धांत, विद्याप्रकाशन, औरंगाबचु.

१८. हरिकृष्ण रावत; २००२, समाजशास्त्र विश्वकोष, पब्लिकेशन, नवी दिल्ली.

१९. महात्मा ज्योतीबा फुले; २०१३, ब्राम्हणांचे कसब, शेतक.यांचा असुड.

२०. गोपाळ गणेश आगरकर; १८५६-१८९५.

२१. विठ्ठल रामजी शिंदे; १८७३, भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न.

२२. केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे; १८८५ ते १९७३.

२३. इंदुप्रकाश, विष्णुशस्त्री पंडीत.

२४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर; २०१२, अस्पृश्य मुळचे कोण, युगसाक्षीप्रकाशन, नागपूर.

२५. डॉ. बाळासाहेब सोनावणे; २०१९ विद्रोही कबीर,यशोदीप प्रकाशन, पुणे.

२६. किशोर शां काळे; २००१, कोल्हटयाचे पोर, प्रकाशन ग्रथाली, पुणे.

२७. शरन कुमार लिंबाळे; १९९१, 'प्रज्ञासुर्य,' दिलीपराज प्रकाशन पुणे ३०

२८. विश्वास पाटील; २०११, 'झाडाझडती' राजहंस पब्लिकेशन पुणे ३०

२९. डॉ. नरेद्र जाधव; २००६, आमचा बाप व आम्ही, ग्रंथाली पब्लिकेशन, दादर मुंबई

३०. वि.स. खांडेकर; २०१२, आमृतवेल,

३१. त्र्यबंक नारायण अत्रे; १९९५, गावगाडा, प्रकाशन वरदा कुक, पुणे १६

३२. ए.पी. जे. अब्दुल कलाम; १९९९, आग्नीपंख, राजहंस प्रकाशन,पुणे ३०

३३. आनंद यादव; २०१७,घरभिती, महता पब्लिकेशन हाऊस, पुणे ३०

३४. डॉ. नारायण कांबळे; २०१९, राजर्षी शाहु संर्घष पर्व,लोकायत प्रकाशन, पुणे

३५. बिपीनचंद्र; १९९८, आधुनिक भारत व मानवी इतिहास के. सागर प्रकाशन, पुणे.

३६. डॉ.सुलभा विधाते; २००१, माहिती संप्रेषण व तंत्रज्ञान - महाराष्ट्र शासन सरकारी मुद्रणालय, पुणे,

३७. भिडे व पाटील; १९८२, महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास – देशमुख व कंपनी प्रकाशन, पुणे.

३८. श्याम मराठे; १९८७, आकर्षण आणि व्यक्तिमत्त्व विकास – इंद्रायणी साहित्य प्रकाशन, रत्नागिरी.

३९. प्रा.सुहास राजभोसले ; १९८९, आम्हा कोण म्हणोनि काय पुसता? – राजे प्रकाशन, नागपूर.

४०. बिपीनचंद्र ; १९९८, आधुनिक भारत व मानवी इतिहास – के सागर प्रकाशन, पुणे.

४१. शिवराज गोर्ले; २००२, बदला तुमचं भविष्य – कॉन्टिनेन्टल प्रकाशन, मुंबई

४२. प्रा.डॉ.धनंजय लोखंडे; २०११, समाज प्रबोधन व लोकसंख्या शिक्षण – पुणे विद्यापीठ मुद्रणालय.

४३. लोकराज्य मासिक; जानेवारी २०११, साहित्य संमेलन विशेष – माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.

४४. प्रकाश बुरूटे; २००१, बहर व्यक्तिमत्वाचा – कॉन्टिनेन्टल प्रकाशन, मुंबई

४५. रंजन कोळंबे; २००१, विज्ञान आणि तंत्रज्ञान – के. सागर प्रकाशन, पुणे.

४६. डॉ.ए.वाय.कोंडेकर; १९९८, अश्मयुगीन इतिहास व बदल – प्रगती प्रकाशन, पुणे.

४७. डॉ.जयसिंगराव पवार, १९९९, आधुनिक भारताचा इतिहास – डायमंड प्रकाशन पुणे.

४८. श्यामसुदरदास ; १९८८, कबीर ग्रंथावली – वाणी प्रकाशन, नवी दिल्ली,

४९. S. L. Doshi; 2006, Modernity and Post Modernity, Rawat Publication Jaipur and New Delhi

५०. Edward S. Herman and Noam Chomsky; 1988 , Manufacturing Consent: The Political Economy of the Mass Media

५१. Ritzer, G. ; 2018, Sociogical Theory MCGrow- Hill International Edition : Sociology Series Publication.

५२. Jan Vrmeer; 2010, A History of the Modern World 1500-2000 A.D., Jain Publication.

५३. प्रशांत बनसोडे; २०१५, पंचनामा सांस्कृतिक भांडवलशाहीचा, मनोविकास प्रकाशन, पुणे.

५४. योगीराज बागूल; २०११, तमाशा : विठाबाईच्या आयुष्याचा – ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

५५. लक्ष्मण माने; १९८०, उपरा, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

५६. दया पवार; २०१२, बलुत, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

५७. उत्तम कांबळे; २०१३, वाट तुडवताना, मनोविकास प्रकाशन, पुणे.

५८. आनंद यादव; १९८०,  झोंबी, मेहता प्रकाशन, पुणे.

५९. आप्पा कोरपे; १९९९, मी तो हमाल, रूपाली प्रकाशन, अहमदनगर.

६०. आण्णा भाऊ साठे; २०१७ – १९ वी आवृत्ती, फकीरा, सुरेश एजन्सी, पुणे.

६१. भालचंद्र फडके; २०००, दलित साहित्य वेदना व विद्रोह

६२. विलास खोले; १९४७ ,स्त्री पुरुष तुलना– ताराबाई शिंदे लिखित, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

६३. श्री. म. माटे; १९४१, अपेक्षिताचे अंतरंग, सुगावा प्रकाशन, पुणे.

६४. गायकवाड लक्ष्मण; २०१७, 'उचल्या', श्रीविद्या प्रकाशन, शनिवार पेठ पुणे

६५. बाळासाहेब सोनावणे; २०१९, विद्रोही कबीर, यशोदीप प्रकाशन, पुणे.

## मासिके

१. सुमंत यशवंत, मिळुन साऱ्याजणी; एप्रिल १९९९, स्त्री मुक्तीकडून मानव मुक्तीकडे.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर: बहिष्कृत भारत; २०१९.

३. लोकमान्य टिळक : केसरी, १८८१

४. महात्मा गांधी : हरिजन, १९३३.

५. दर्पण व दिग्दर्शक : बाळशास्त्री जांभेकर १९३२.

६. अंधश्रद्धा निमूर्लन वार्तापत्र : संपादक राजीव देशपांडे.

७. बळीराजा  मुख्य संपादक, नितीन भोसले. २०२०.

८. मिळून साऱ्याजणी : मुख्य संपादक, विद्याबाळ, २०२०.

९. परिवर्तनाचा वाटसरू: २०१८, सपांदक, अभय कांता, शरद वनवरे, प्रज्ञा रमा पवार, सुरेश कोथळे. कार्य. संपादक, देवेंद्र ईगंळे.

१०. साधना: मुख्य संपादक, विनोद सिरसाठ , २०१८

११. योजना : मुख्य संपादक, राजेशकुमार झा , २०१४

१२. सुगावा: मुख्य संपादक, विलास वाघ, २००३

१३.समाज प्रबोधन पत्रिका, २००३

१४.नव भारत : मुख्य संपादक, वसंत पळसीकर

१५. आंदोलन : मुख्य संपादक, मेघा पाठकर, २०१७

## Journals

1. Gopal M. H. An Introduction to Research Procedure in Social Sciences
2. Goshaskar, Sujatha ; 1992, Struggles of Women at Work, Vikas Publishing House, Delhi
3. Gupta, Amit Kumar ; 1986, Women and Society The Development Perspective, Criterion Publications, New Delhi,
4. Kalbagh, Chetan ; 1986, Women and Development, Discovery Publishing House, New Delhi.
5. Misra, Lakshmi ;1992 Women's Issues An Indian Perspective, Northern Book Centre, New Delhi.
6. Ramagowad, A. ;1997 Gender Inequkality: power, Privilege and Poverty, Rawat Publication, Jaipur.
7. Sangari, Kumkum and Sudesh Waid ; 1994, Women and Culture, SNDT Women's University, Mumbai.
8. Sethi, Raj Mohini ;1999, Globalisation, Culture and Women's Development, Rawat Publication's Jaipur.
9. Sharan, B.R. ;1992, Status of Indian Women, Uppal Publishing House, New Delhi.
10. Takur, Devendra ; 1997, Research Methodology in Social Sciences, Deep and Deep Publications, New Delhi.
11. Kothari, C,R ; 1993, Research MethmoD$ology Methods and Techniques, Wiley Eastern Ltd. New Delhi.
12. Kumar ; 1997, A Social Research Method, Anmol Publications Pvt. Ltd. New Delhi.

13. Ref-Goode ; 1981, Willaim Y. Arul Hatt Paul K.: Method in Social Research, Mc Graw-Hill Book Company.
14. Pauine Young ; 1982, Scienlific Social Surveys and Research, Prentice Hall of India, Private Limited, New Delhi.
15. Bagchi ; 1995, Jasodhara, (etd) Indian Woman: Myth and Reality, Sangam Book, New Delhi,.
16. Bathla, Sonica ; 1998, Women, Democracy and the Media, Sage Publications, New Delhi**.**
17. Davis, Kathy (et as) ;1991, The Gender of Power, Sage Publication, New Delhi.
18. Desai, A. R. ; 1995, State and Society, Popular Prakashan, Mumbai.
19. Upadhyay, H.C. ; 1991, Status of Women in India (Vol.1) Anmol Publication.

# परिशिष्टे

‘पुणे जिल्हयाच्या सामाजिक व सांस्कृतिक बदलांमध्ये वाचन चळवळीचे योगदान: समाजशास्त्रीय अभ्यास’’

अ) वाचकांसाठी प्रश्नावली

✓ अशी खुण करा.

● वैयक्तिक माहिती:

१) वाचकांचे संपूर्ण नावः..........................................वयः..........शिक्षणः...................

लिंगः............धर्मः.............व्यवसाय/नोकरीः.........................

वाचनाची आवडः................................कथा/कांदबरी/नाटक/चरित्रे/आत्मचरित्रे

/कविता/वैचारिक/वैज्ञानिक/धार्मिक/प्रवासवर्णन/वर्तमानपत्रे/इतर.....................

२) आपण ग्रंथालयाचे सभासद आहात काय? असल्यास कोणत्या?

..........................................................................................

३) वाचनाचा उद्देश: मनोरंजन: ज्ञानप्राप्ती/अध्ययन/अध्यापन/इतर..........................

४) आपल्याकडे कोण कोणती वर्तमानपत्रे येतात..................................................

५) आपल्याकडे नियतकालिके येतात काय?.....................................................

६) वाचनालय नियमित सुरु असते का? होय/नाही

७) वाचनालयाच्या सुविधा व्यवस्थित उपलब्ध होतात का? होय/नाही?

**●सामाजिक प्रश्न:**

१)वाचन चळवळीमुळे जातीय भेदभाव कमी झालेले आहे का? होय/नाही

२) वाचन चळवळीमुळे सामान्य वर्गाचे जीवनमान उंचावले आहे काय? होय/नाही

३) वाचन चळवळीमुळे अंद्धश्रद्धचे प्रमाण कमी झाले आहे काय? होय/नाही

४) वाचनामुळे अनिष्ठ चालीरिती बंद होण्यास मदत झाली आहे काय? होय/नाही

५) वाचन चळवळीमुळे सामाजिक सलोखा निर्माण झाला आहे का? होय/नाही

६) वाचन चळवळीमुळे धार्मिक कलह कमी झाले आहेत का? होय/नाही

७) वाचन चळवळीमुळे स्त्रीयामध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे का? होय/नाही

८) स्त्रियांना समान हक्क/दर्जा मिळण्यास वाचनालयाची मदत झाली आहे काय? होय/नाही

९) वाचन चळवळीमुळे गावामध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे काय? होय/नाही

१०) वाचनामुळे समाजातील गुन्हेगारीचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली आहे काय? होय/नाही

११) वाचन चळवळीमुळे पर्यावरण संवर्धनास मदत झाली आहे काय? होय/नाही

१२) वाचन चळवळीमुळे स्वच्छतेविषयी जागृती झाली आहे काय? होय/नाही

१३) वाचन चळवळीमुळे थोरपुरुषांचे विचार/कार्य लोकांपर्यंत पोहचले आहे का? होय/नाही

१४) वाचन चळवळीमुळे शौचालयाबाबत जाणीव जागृती निर्माण झाली आहे काय? होय/नाही

१५) एक गाव एक पाणवठा किंवा लोक एकत्र येऊन चर्चा करतात का? होय/नाही

१६) वाचन चळवळीमुळे गावामध्ये आरोग्य सुविधेबद्दल जागरुकता निर्माण झाली आहे का?होय/नाही

१७) मुलीच्या शिक्षणाचे प्रमाण वाढण्यास वाचन चळवळीची मदत झाली आहे का? होय/नाही

१८) बेटी बचाव, बेटी पढाव अशा स्वरूपाचे आयोजन केले जाते का? होय/नाही

१९) आरोग्याचे प्रबोधन कसे केले जाते?

२०) वाचन चळवळीमुळे लोकसंख्या कमी होण्यास मदत झाली आहे का? होय/नाही

.......................................................................................

**●सांस्कृतिक प्रश्न:**

१)आपण कोणते उत्सव एकत्रित साजरे करता?

.......................................................................................

२) आपण कोणत्या महापुरुषांच्या जयंत्या साजऱ्या करता?

.......................................................................................

३) आपल्याकडे कोण कोणत्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते?

.................................................................................................

४) आपण सांस्कृतिक मंडळाचे सदस्य आहात का? असल्यास कोणत्या?

.................................................................................................

५) आपण कोण कोणते राष्ट्रीय सण साजरे करता?

.................................................................................................

६) गावामध्ये कलह निवारण समिती आहे का? होय/नाही

७) गावामध्ये कोण कोणत्या जाती धर्माचे लोक राहतात?

.................................................................................................

८) वाचन चळवळीमुळे आंतरजातीय विवाह विषयक पारंपारिक दृष्टीकोन बदलला आहे का?

.................................................................................................

९) वाचन चळवळीमुळे पारंपारिक अनिष्ठ रूढी व परंपरामध्ये बदल झाला आहे काय? होय/नाही

१०) वाचन चळवळीमुळे सहिष्णुता वाढली आहे काय? होय/नाही

## ●आर्थिक प्रश्न:

१) वाचन चळवळीमुळे लोकांचा आर्थिक स्तर उंचवण्यामध्ये मदत झाली आहे का? होय/नाही

२) स्त्री पुरुषांचे राहणीमान सुधारले आहे का? होय/नाही

३) वाचन चळवळीमुळे दळणवळण सुविधेत वाढ झाली आहे का? होय/नाही

४) वाचन चळवळीमुळे आर्थिक बचतीचे प्रमाण वाढले आहे काय? होय/नाही

५) लोकांचा मोबाईल/इंटरनेट वापर वाढला आहे का? होय/नाही

६) लोक सोशल मिडिया (फेसबुक/व्हॉट्सअॅप/वुईचॅट) चा वापर करतात का? होय/नाही

७) लोक स्वत:ची दोन चाकी/चार चाकी गाडया वापरतात का? होय/नाही

८)गावामध्ये लोक बॅंकिंग सुविधेचा वापर करतात का? होय/नाही

९) वाचनालयामुळे लोकांना सरकारी योजनांची माहिती होण्यास मदत होते का?

होय/नाही

१०) वाचन चळवळीमुळे कुटीर उदयोग विकासास चालना मिळाली आहे काय?होय /नाही

११) वाचन चळवळीमुळे कृषी क्षेत्रात बदल झाला आहे काय?

१२) वाचन चळवळीमुळे आर्थिक उत्पन्नाची साधने वाढली आहेत का? होय/नाही

## • राजकीय प्रश्न:

१) वाचन चळवळीमुळे राजकीय नेतृत्व निर्माण होण्यास मदत झाली आहे काय? होय/नाही

२)वाचन चळवळीमुळे महिलांचा राजकारणात सहभाग वाढला आहे काय? होय/नाही

३) वाचन चळवळीमुळे छोटया समूहांना राजकीय प्रतिनिधित्व मिळाले आहे काय? होय/नाही

४) वाचन चळवळीमुळे लोकांचे मतदानाचे प्रमाण वाढले आहे काय?होय/नाही

५) वाचन चळवळीमुळे शिक्षित नेतृत्व निर्माण झाले आहे काय? होय/नाही

६) राजकारणाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न सोडवण्यास मदत झाली आहे काय? होय/नाही

७) लोकांना राजकीय पक्षांची विचारसरणी समजण्यामध्ये मदत झाली आहे काय? होय/नाही

८) जातीचे राजकारण बदलण्यास वाचन चळवळीचा उपयोग झाला आहे का? होय/नाही

९) ग्रामसभेत कोणत्या स्वरूपाचे प्रश्न सोडविले जातात?

..........................................................................................

१०) गावात आपत्ती नंतर वाचनालयाच्या माध्यमातून समूपदेशन केले जाते का?
होय/नाही

११) गावामध्ये कोण कोणते राजकीय पक्ष आहेत?

१२) गावामध्ये राजकीय सलोखा आहे का? होय/नाही

# पुणे जिल्ह्याचा तालुकानिहाय नकाशा

## हवेली, आंबेगाव, भोर, मावळ व वेल्हे

